# ख्रिस्तायन

नाताळ ई - अंक ♦ वर्ष पंधरावे ♦ २५ डिसेंबर २०२५ ♦ संपादक ख्रिस्तोफर रिबेलो



Design : Paul Dmello


BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
(SCHEDULED BANK)
"Celebrate the Joy of Giving with
Bassien Catholic Co-operative Bank
this Christmas Season!
Invest in moments that matter and
gift a prosperous future to your loved ones.
Merry Christmas
And Happy New Year
filled with financial security, growth, and joy!"
Board of Directors
Mr. Benauld Dias
Chairman
Mr. Simon Soares
Vice Chairman
www.bccb.co.in
Helpline no. 080 6942 0000
Corporate Add. - Catholic Bank Building, Papdy naka, Vasai west 401 207
For more details visit our

# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक वर्ष पंधरावे २५ डिसेंबर २०२५

**संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो**

**सहसंपादक : एडवर्ड डिसोजा**

**तांत्रिक सहकार्य : स्वप्रिल रिबेलो**

**मुखपृष्ठ : पॉल डिमेलो, गास**

**विशेष साहाय्य : स्मिता ख्रि. रिबेलो**

**मोबाईल ॲप – चार्ल्स क्लेमेंट गोम्स**

**संपर्क / अभिप्राय :** आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा.

chrisrtayan25online@gmail.com (9819436078)

**आभार : आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे " ख्रिस्तायन" तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

**© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन**

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९ / ८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

## *कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी*

**आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा**

*१३ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत*

**जीवन विकास दिर्घ मुदत ठेव योजना** ७.५० % (सरळव्याज)

ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर - **द.सा.द.शे. ७.३०%** व्याजदर

सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ७.०५ % व्याजदर

**८.५०% ते ११.७५%** व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**शैक्षणिक कर्ज किफायतशीर व्याजदरात - ८.९५%**

**वैयक्तिक तारण कर्ज - ९.७५%, दागिना कर्ज -८.७५**

**घरबांधणी कर्ज - ८.५०%, फ्लॅट खरेदी कर्ज - ८.५०%**

**सोलार पॅनल कर्ज - ८.५०%, व्यापारी वाहनासाठी - १०%**

**शॉप, गाळे, मशिनरी कर्ज - ९%, फर्निचर -९%**

(१ कोटीपर्यंत कर्ज वितरण करणारी एकमेव पतसंस्था)

**रू. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण**

नियमित कर्ज भरणा करणा-यांना व्याजात २% रिबेट

**३० नोव्हेंबर २०२५ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

* भागभांडवल रू. १४.४७ कोटी * कर्जे रू. २३८.६० कोटी
* ठेवी रू. ४२५.६७ कोटी * गुंतवणूक रू. २८१.७४ कोटी
* एकूण व्यवसाय रू. ६६४.२७ कोटी * सभासद संख्या १७९५४
* निव्वळ एन. पी. ए. ०%

* दि. ३१/०३/२०२५ अखेर नफा रू. ६.४२ कोटी

☞ आजच जवळच्या शाखेत भेट द्या

**सेवामयी शाखा -**

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा (प.) | नंदाखाल |
|---|---|---|---|---|---|---|
| मो.८००७९५५४३० | ७२६१९१९०१२ | ०८५५०९१०२६४ | ७२६१९१९०१३ | ०८५५०९१०६४३ | ७८७५८९५५०८ | ८४४६४०७७०५ |

✤ लता जे.फोस
मुख्य कार्यकारी अधिकारी

✤ संज्याव जे.रोझारियो
उपाध्यक्ष
व संचालक मंडळ

✤ नेल्सन पी. दोडती
अध्यक्ष

# या अंकाचे मानकरी ...

## संपादकीय...

## कथा / लेख / ललित :-

| | | |
|---|---|---|
| अक्षय शिंपी | ॲन्थनी परेरा | डॉ.अनुपमा उजगरे |
| ॲड. अतुल आल्मेडा | बावतीस पेडीकर | बॅप्टिस्ट एम वाझ |
| भरत वाळींजकर | कामिल पारखे | चिन्मय गवाणकर |
| क्लेमेंट डिमेलो | दीपक मच्याडो | दुर्गाप्रसाद खांडाळेकर |
| एमेल आल्मेडा | एडवर्ड डिसोजा | सौ. फ्लॉरी रॉड्रिग्ज |
| फा. असिस रॉड्रिग्ज | फा. मायकल जी. | फ्रान्सिस आल्मेडा |
| फ्रान्सिस डिमेलो | फ्रँक मिरांडा | इग्नेशियस डायस |
| आयवन क्रास्टो | जॅक गोम्स | जगदीश अनंत संसारे |
| जॉन कोलासो | जॉन गोन्सालवीस | जोसेफ तुस्कानो |
| ज्युलियस घोन्सालविस | लेस्ली डायस | मॅक्लिना रिबेलो |
| मॅटिल्डा डिसिल्वा | मॅक्सवेल लोपीस | मेलवीन डाबरे |
| मुक्ता अशोक टिळक | नेन्सी डिमेलो | नेहा सावंत |
| निशा सातपुते | पेट्रेशिया गोन्सालवीस | |
| पौलस वाघमारे | रिबेका दोडती | रेमंड मच्याडो |
| रिचर्ड नुनीस | सॅबी परेरा | सचिन मेंडिस |
| संगीता वाझ | संतोष गायकवाड | सायमन मार्टिन |
| स्टॅन्ली गोन्सालविस | स्टीफन आय. परेरा | सौ. सुनिता परेरा |
| डॉ. सुरेश पाटील | सिडनी जस्टीन मोरायस | विजय परेरा |
| विजु वाझ | झेविअर डिमेलो | |

## कविता / चारोळया :-

अमोल देशमुख, ब्रिनल क्रास्टो, फ्रँक डॉ. मिरांडा, हेडविजेस रुमाव, जॅकसन आल्मेडा, महेश लीलापंडित, मायकल लोपीस, संगीता अरबुने, शकुंतला पाटील, सुनिल बा. डिमेलो, वर्जेश सोलंकी.

## कलाकुसर :-

पॉल डिमेलो, रिचर्ड वाझ, लुएल लोपीस

# संपादकीय ...

प्रिय बंधुभगिनींनो, आपणास नाताळ सणाच्या अनेक हार्दिक शुभेच्छा.

दरवर्षीप्रमाणे पुन्हा एकदा साहित्यिक मेजवानी घेऊन आम्ही आपणापाशी आलो आहोत. मी नेहमी म्हणतो, आम्हा ख्रिस्ती धर्मीयांचा एकमेव सण म्हणजे नाताळचा सण. डिसेंबर महिन्यात एकदा आगमनकाळाला सुरुवात झाली की ख्रिस्ती घरामध्ये एक वेगळाच माहोल तयार होतो आणि त्याच उत्साहाने प्रेरित होऊन आम्ही तयारीला लागतो. मी प्रत्येक वर्षी संपादकीयामध्ये आवर्जून उल्लेख करतो आणि करत राहीन की दिवाळी सण आणि दिवाळी अंक हे जसे अतूट नाते आहे तसेच नाताळ सण व नाताळ अंक यांचे नाते व्हावे असे आमचे स्वप्न आहे आणि ते आम्ही २३ वर्षाअगोदर प्रथम छापील स्वरुपात अंक प्रकाशित करून प्रत्यक्षात आणि गेली पंधरा वर्षे हा अंक ऑनलाइन प्रकाशित करून ते पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत.

मंडळी, दरवर्षी वसई परिसरातले ज्येष्ठ लेखक- कवी ह्यांचा सहभाग या अंकात मला लाभतोच पण वसईबाहेरीलही साहित्यिक या उपक्रमात मनमोकळेपणाने सामील होत असतात. मी ऑक्टोबर महिन्याच्या सुरूवातीला अंकाच्या तयारीला लागलो की सर्वप्रथम माझ्याकडे असलेल्या लिस्टमधील सर्व लेखक-कवी-चित्रकार ह्यांना मेसेज करतो. मग लेख-कविता चित्रे यायला सुरुवात होते. पण काही व्यक्तींना माझ्या मनात विशेष स्थान आहेच आणि ते शेवटपर्यंत राहील, यावर्षी मी सर्वांची नावे इथे घेत नाहीय. पण त्यांचे हृदयातील स्थान नेहमीच अबाधित राहील. कारण त्यांचे फक्त लेखच येत नाहीत तर मार्गदर्शनपर सूचनाही येत असतात आणि कायम प्रोत्साहन मिळत असते, विशेष सांगायचे म्हणजे ह्यातील प्रत्येक जण साहित्यिक क्षेत्रात फक्त नावाजलेलच नाही तर आपले स्वत:चे असे खास स्थान निर्माण केलेले आहे.

ह्या माझ्या हितचिंतकांत फक्त वडीलधारी माणसेच नाहीत तर सर्व प्रकारच्या व्यक्ती आहेत. मी सदैव त्यांच्या त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. अंकातील लेखांविषयी मौलिक मार्गदर्शन करत सतत पाठीवर कौतुकाची थाप देणारे दिवंगत फा. फ्रान्सिस दिब्रिटो, साहित्यिक संपादनाचे बाळकडू पाजणारे फा. एलायस रॉड्रिग्ज, मला वाचनाची आवड निर्माण करणारे मामाकडील आजोबा ज्येष्ठ साहित्यिक सी. बी. दोडती, मला लिखाण

करण्यास ऊद्युक्त करणारे मामा मिल्टन दोडती, सामाजिक क्षेत्रातील आदर्श विजय मच्याडो व स्वत: अशिक्षित असूनही मी या अंकाची तयारी करायला बसलो की जागेवर सर्व आणून देणारी माझी आई, मर्सी ह्या सर्वांची विशेष आठवण करू इच्छितो. ह्या सर्वांबरोबर त्यांच्या उपस्थितीत काही न काही गोष्टी करायच्या राहून गेल्या आहेत. त्या गोष्टी मी नक्कीच पूर्ण करायचा भविष्यात प्रयत्न करणार आहे. तीच माझी त्यांच्यासाठी श्रद्धांजली असेल.

मंडळी, मला दरवर्षी आपल्या मौलिक सूचना येत असतात, त्याबद्दल खूप खूप धन्यवाद. दरवर्षी प्रकर्षाने येणारी सूचना म्हणजे छापील अंक. सध्याचा जमाना सोशल मीडिया आणि सर्व गोष्टी ऑनलाईन उपलब्ध करून देण्याचा असल्यामुळे ते शक्य होईल असे वाटत नाही. तरीसुद्धा पुढे यासाठी नक्कीच प्रयत्न करेन.

या अंकात सहभागी सर्व मान्यवर लेखककवी व चित्रकार यांचे मी विशेष आभार मानतो. दरवर्षी अंकाच्या तयारीला सुरुवात केली की व्हॉटसअप / फेसबुक मेसेजद्वारे मी त्यांना स्मरण करत त्रास देत असतो परंतु मला कोणाकडूनही आजपर्यंत नकार मिळाला नाही आहे. हे जे ऋणानुबंध जुळले आहेत हे असेच टिकून राहावे किंबहुना अधिक घट्ट व्हावेत अशीच मी प्रार्थना करेन. गेली चौदा वर्षे लेस्ली से. डायस हे ‘गीत’ हा छापील नाताळ अंक नियमितपणे प्रकाशित करत आहेत. सध्या विशेषांक सोडले तर फक्त नाताळ निमित्ताने प्रकाशित होणारे वसईतील ‘खिस्तायन’ ऑनलाईन व ‘गीत’ छापील हे फक्त दोनच नाताळ अंक आहेत.

गेली ८-१० वर्षे आपल्या या अंकाचे मुखपृष्ठ बनवून देणारे चित्रकार ‘पॉल डिमेलो, गास’ ह्यांना विशेष धन्यवाद. पॉल हे एक सत्कृत्य म्हणून विनामोबदला मुखपृष्ठ बनवून देत आहेत, त्यांचे खास आभार.

मंडळी, आम्ही हा अंक ‘पीडीएफ’ स्वरुपात देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. त्याचबरोबर या अंकाचे अँड्रॉईड ॲपही आहे. प्ले स्टोअर वरुन आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत.

**नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!**

**Merry Christmas & Happy New Year**

# वस्त्रहरण: 'Mass' आणि 'Class' जोडणारा साकव

■ अक्षय शिंपी, मुंबई

(अभिनेता, कवी, दास्तानगो)



मराठी रंगभूमी समृद्ध रंगभूमी आहे. सर्व प्रकारचं, सर्व प्रवाहातलं नाटक इथे होत आलेलं आहे आणि त्याला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसादही मिळालेला आहे, मिळतो आहे. त्याचप्रमाणे वेळोवेळी समीक्षकांकडून तिचं यथायोग्य मूल्यमापनही होत आलेलं आहे. तथापि मराठी व्यावसायिक आणि प्रायोगिक रंगभूमी ही आविष्काराचे मोजके काही अपवाद वगळता प्रमाण भाषेतच बोलत राहिली आहे. विविध बोलींचे आविष्कार तिच्यावर समर्थपणे घडल्याची उदाहरणं फारच कमी आहेत. एवढंच नव्हे तर भलतीच सरमिसळीची भाषा, बोली म्हणून आणि पात्राची ग्रामीण पार्श्वभूमी अधोरेखित करण्यासाठी वापरली जात राहिली. उदाहरणार्थ पूर्वीच्या काळात 'स्थळ: दिवाणखाना' नाटकात पडदा उघडताच, घरातला नोकर - बरेचदा ज्याचं नाव राजू किंवा रामू असे - त्या पात्राचा प्रवेश होई अन् ते फोनवर 'बाईसाहेब अंघुळ करत्यात, काय निरूप देऊ त्यास्नी?' वगैरे बोलून बोलीच्या आविष्काराचा आभास घडवे. किंवा वगनाट्यात कृष्ण-पेंद्याच्या प्रसंगात, त्या दोघांचा मावशी अन् गवळणींशी जो सामना चाले त्यात अन् पुढे येणाऱ्या बतावणीत बोली भाषेचा वापर ऐकायला मिळे. सर्वांत महत्वाचं म्हणजे पात्राचं गौणत्व वा कमतरता दाखवायची असेल, ते दुय्यम किंवा कमी प्रतीचं दाखवून हास्यास्पद करायचं असेल, तेव्हा त्या पात्रांसाठी बोलीची योजना केली जात असे.

ही बोली बव्हंशी कोल्हापूरच्या भागाशी (कोल्हापूरी नव्हे) साधर्म्य सांगणारी असे. मराठी ग्रामीण चित्रपट आणि तमाशापटांत असे तशी. वाईच, त्यास्नी-यास्नी, न्हाय-व्हय, हिथं-तिथं, चाय, सौभाग्याचं लेनं वगैरे शब्द आले की मराठी प्रेक्षक पुढ्यात चाललेला खेळ हा ग्रामीण आहे, हे लागलीच ताडत असत. संपूर्ण महाराष्ट्रभर ही सरमिसळ झालेली भलतीच भाषा, बोली म्हणून प्रचलित झाली. कदाचित सर्व ठिकाणच्या प्रेक्षकांना नाटकाच्या खेळातला आशय समजणं सुलभ व्हावं, म्हणूनही हे घडलं असेल पण त्यात अस्सलपणा नव्हता, हेदेखील नाकारता येत नाही. त्यात नागर पार्श्वभूमी असलेले नट या बोलीचा प्रयोग करू लागले की कृतकपणात आणखीनच भर पडे. असो.

तरीदेखील महाराष्ट्रातील दक्षिण कोकण भागाची पार्श्वभूमी असलेला, तिथल्या लोककलेची आणि बोलीची डूब किंवा झालर असलेला एक रंगप्रयोग, नागर मराठी रंगभूमीवर प्रचंड गाजलेला होता. गेल्या दोन पिढ्यांचं या रंगप्रयोगानं मजबूत मनोरंजन केलेलं आहे आणि दक्षिण कोकण प्रदेशातली स्थिती, तिथले प्रश्नदेखील लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजमितीस पाच हजारांहून अधिक खेळ झालेला आणि गेल्या अर्धशतकापासून रंगभूमीवर वेळोवेळी, वेगवेगळ्या नटसंचात सादर होत राहिलेला - 'वस्त्रहरण' हा तो रंगप्रयोग. शब्दश: 'एव्हरग्रीन' म्हणावं असं हे नाटक प्रत्येक पिढीतल्या मराठी प्रेक्षकाला ठाऊक आहे. 'इनोसन्स' आणि 'रॉनेस' या दोन्ही काठांना स्पर्श करत प्रवाही असणारी ठसठशीत उदाहरणं 'वस्त्रहरण' वगळता, 'जांभूळ आख्यान' आणि 'शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' यातच आपल्याला सापडतात.

गंगाराम गवाणकर लिखित आणि कै. रमेश रणदिवे दिग्दर्शित हे नाटक पुढे तालीम मास्तर म्हणून मंगेश कदम यांनी उभं केलं. त्यातल्या मोकळ्या जागा नव्यानं भरल्या. 'भद्रकाली' नाट्यसंस्थेचा भक्कम आणि भरवशाचा आधारस्तंभ म्हणून हे नाटक कायमच गणलं जात असलं तरी या नाटकाची महत्ता इथून पुढे सुरू होते. मराठी नागर रंगभूमी, जी बव्हंशी उच्चवर्णीयांच्या हातांत आहे, तिच्या अवकाशात, सर्वच अर्थानं गावकुसाबाहेर असलेल्या या नाटकानं आपला ऐसपैस अन् टोलेजंग बंगला उभा करावा अन् टिकवावा, हा एक देखणा अन् अर्थपूर्ण विद्रोह म्हणता येईल.

द. कोकण भागातल्या मालवणी बोलीचा बळकट आणि मोकळाढाकळा (शिव्यांसकट) वापर, नाटकातलं नाटक या आयुधाचा नेमका उपयोग, बरंचसं सरळसोट किंवा एकरेषीय कथानक असलं तरी अर्थाची बहुस्तरीयता, लोककलेच्या बलस्थानांचा वापर आणि बहुजन कलावंताच्या मातीतून उगवून आलेल्या ठसठशीत आविष्काराचा अनुभव - ही या रंगप्रयोगाची वैशिष्ट्य आहेत. मराठी नागर प्रेक्षकांना हा खेळ म्हणूनच केवळ आवडत नव्हे तर कायम भिडत आलेला आहे. स्वच्छ, प्रमाण भाषेतले अनुनासिक उच्चार अंगवळणी पडलेली मराठी नागर रंगभूमी या उंच आणि जवळजवळ किंचाळत उच्चारलेल्या संवादांनी प्रेक्षकांना अधिकच खेटली, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. सर्व वयोगटातला, आवडी-निवडचा प्रेक्षक या खेळानं नाट्यगृहांकडे खेचून आणला. अनेकांची नाटक पहाण्याची सुरुवात या नाटकानं झालेली आहे.

'वस्त्रहरण' मधले सोंगाडे किंवा खेळकरी हे वाचिक किंवा आंगिक अभिनयातून हास्यरस निर्माण करण्यापुरते न रहाता सबंध नाटक उभं करण्याची प्रक्रियाच प्रेक्षकांपुढे ठेवतात. गावातली साधी, निरक्षर, हातावर पोट असणारी कष्टकरी माणसं कला फार पोटतिडिकीनं करतात. मात्र त्यात त्यांचे स्वभाव, सवयी, विसंगती लुडबूड करायला लागल्या की जी धमाल उडते, त्याला तोड नाही. खरंतर ही आपलीच अर्कचित्र आहेत. पोटाची खळगी भरण्यासाठी, योगक्षेम चालवण्यासाठी गाव सोडून शहरात आलेल्या, अडी-अडचणीत जीवन कंठणाऱ्या आणि मनातून गावातच जगणाऱ्या माणसांची तर कांकणभर अधिकच.

त्यांना केवळ 'नॉस्टेल्जिया'ची सफरच हे नाटक घडवून आणत नाही तर त्यापलीकडेही बरंच काही देतं. तो अनुभव वर्णनातीत आहे.

सर्वसाधारणपणे गोष्टी दोन प्रकारच्या असतात. एक म्हणजे 'Windo' आणि दुसरी म्हणजे 'Mirror'. Windo म्हणजे जे जग आपल्या परिचयाचं नाही, ते जग वाचक- प्रेक्षक ज्या कलाकृतींतून, आविष्कारांतून बघतात, अनुभवतात त्या. आणखी सोपं करून सांगायचं झालं तर एखादी परदेशी कलाकृती वा आविष्कार आपल्यासाठी 'Windo' ठरतो कारण, त्या खिडकीतून आपण त्या देशाची संस्कृती, आचार-विचार-व्यवहाराच्या तऱ्हा, सामाजिक-राजकीय स्थिती जाणून घेतो. आणि 'Mirror' म्हणजे ज्या कलाकृती आणि आविष्कारांत आपल्याला आपलंच स्वच्छ प्रतिबिंब पाहिल्याचा आभास होतो त्या! 'वस्त्रहरण' हे 'Windo' आणि 'Mirror' हे एकत्रच असल्याचं दुर्मीळ अन् अपवादात्मक उदाहरण आहे. कोकण प्रांतातल्या तळाच्या भागातली लोकसंस्कृती आणि लोकजीवन ही विदर्भ-मराठवाडा-खान्देशमधल्या आणि महाराष्ट्राबाहेर कायमस्वरूपी स्थायिक झालेल्या मराठी प्रेक्षकांसाठी आणि त्यांच्या पुढल्या पिढ्यांसाठी 'Windo' ठरते. गाऱ्हाणं घालणे, दशावतारी खेळाची झलक, मालवणी माणसाच्या स्वभावाचे इरसाल नमुने, त्यांची रसरशीत बोली त्याला या खिडकीतून अनुभवतात येतात. खुद्द कोकणातून कमी कमी होत चाललेल्या एकेकाळच्या चालीरिती, विशिष्ट छापाचे वेशदेखील पहायला मिळतात. नाटकातला मास्तर कोट, सदरा, धोतर आणि विशिष्ट टोपीत आहे. तात्यादेखील सदरा, धोतर, जाकीट आणि गांधीटोपीत आहे. आता कोकणातल्या कुठल्या शाळेत कुणा शिक्षकाचा, असा मास्तराचा आणि कुणा सरपंचाचा, तात्यांसारखा वेश क्वचितच आढळेल. धोतरं सोडाच पण पायांकडे मोठी तोंडं असणारे लेंगे आणि गांधीटोपीदेखील आता कालबाह्य झाली. तरी या नाटकातला मास्तर आणि तात्या आपापला पारंपरिक वेश बऱ्यापैकी राखून आहेत. असो. तर वर म्हटल्याप्रमाणेच कोकण प्रांत सोडून पोटापाण्यासाठी महानगरांची वाट धरलेल्या माणसांना तीत आपलं प्रतिबिंब दिसतं, या अर्थानं 'वस्त्रहरण' हे 'Mirror' देखील ठरतं.

या नाटकाला सुरुवातीच्या मूळ नटसंचात झालेल्या खेळांना फारसा प्रेक्षक प्रतिसाद मिळत नव्हता आणि मग पुलंनी प्रयोग पाहून लिहिलेल्या पत्रामुळे चित्र पालटलं, वगैरे वगैरे इतिहास इथे लिहिण्याचं काहीच प्रयोजन नाही. सर्वांना तो ठाऊकच आहे. मराठी रंगभूमीच्या समकालीन परिप्रेक्ष्यात हे नाटक कुठे उभं आहे, हा महत्वाचा मुद्दा आहे.

पुस्तक प्रदर्शनात मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यानंतर सुरूवातीलाच अनेक लोकप्रिय लेखकांची गाजलेली पुस्तकं पहायला मिळतात. पुस्तक प्रदर्शन सर्वांसाठी असतं. तिथे पट्टीचा वाचक आणि ग्रंथसंग्राहकही येणार असतो तसाच नव्यानंच वाचायला सुरुवात केलेला वा करू पहाणारादेखील येणार असतो. हा दुसऱ्या गटातला वाचक अधिक महत्वाचा असतो. त्याला सुरूवातीलाच काम्यू, काफ्का, सार्त्र, बोदलेर वगैरे लेखकांची पुस्तकं दिसली तर वाचन वा पुस्तक नावाच्या गोष्टीचा तो धसका घेऊ शकतो. या सुरूवातीच्या टप्प्यावर तो साध्या, एकरेषीय, मातृभाषेतल्या गोष्टीच वाचायला केव्हाही प्राधान्य देईल. हा विचार करून

त्याच्या नजरेस कोणती पुस्तकं पडावीत त्याप्रमाणे पुस्तकांची जागा ठरवली जाते. या पुस्तकांना 'Entry Books' असं म्हणतात. नाटकाबाबतही हेच. नव्या प्रेक्षकाला 'वस्त्रहरण' सुरुवातीच्या टप्प्यावर दाखवणं हा त्याच्यासाठी उत्तम 'Entry Play' ठरू शकतो. नाट्य माध्यमातली उर्जा, त्यातला मोकळेढाकळेपणा, नटांचे पात्र होण्याच्या प्रक्रियेतले सायास, भाषिक वैभव, अस्सल मालवणी बोलीचं संगीत, साधं तरी सुदृढ कथानक हे सारं अनुभवायला मिळाल्यानं तो या माध्यमाकडे वळण्याची शक्यता जास्त बळकट होईल. मुरलेल्यांना हे नाटक दर खेळागणिक नव्यानं उमगू शकेल. लोककलांतला लवचिकपणा, थेट आणि नि:संदिग्ध भाष्य करण्याची ताकद, समकालीन सामाजिक-राजकीय व्यवस्थेवर केलेल्या अत्यंत चतुर टिप्पण्या / मारलेल्या कोपरखळ्या याचा पुन:पुन्हा आस्वाद घेता येईल.

'वस्त्रहरण' हे जितकं द. कोकणच्या प्रांतातलं रोपटं आहे तितकाच तो सबंध महाराष्ट्र आणि मराठी रंगभूमीवरचा महावृक्ष आहे. साहित्य, संगीत आणि नाट्य यांची घट्ट वीण या नाटकात घातली गेली आहे. अगदी नेमकी उपमा वापरायची झाली तर, कोकणात लहान लहान कालवे - ज्यांना ओहळ आणि बोलीत 'व्हावळ' म्हणतात - त्यांच्यावर लहान पूल, लाकडी साकव बांधलेले असतात. गंगाराम गवाणकर यांची ही कृती 'Mass' आणि 'Class' या दोन्ही टोकांना सांधणारा भक्कम साकव आहे, असं म्हणता येईल.

बहुजन कलावंतांनी नेहमीच मातीतल्या गोष्टी सांगितल्या. त्या सांगताना लोकभाषा वापरली, आपल्या जगण्याचा परिवेश त्यातून मांडला. परिस्थिती आणि 'स्व'शी झगडा करत असतानाही जीवनमूल्य जपली. म्हणूनच भाषा, प्रांत हे घटक भिन्न असले तरी ते उंबरे ओलांडून या कृती सर्वत्र पसरू शकल्या. कारण माणूस सर्वत्र सारखाच आहे. अर्थात नाटकासारख्या समूह माध्यमातून गोष्ट सांगताना अनेक विभागांचा सहभाग त्यात होत असतो. 'वस्त्रहरण' च्या रंगमंचावरील, पीटातील आणि रंगमंचामागील प्रत्येकाचाच ही कृती मोठी करण्यात समान वाटा आहे. किंबहुना या नाटकाचा प्रयोग हा एकजिनसीपणाचा अनुभव आहे. चहा वा कॉफी केल्यानंतर त्यांतले जिन्नस स्वतंत्र काढता येत नाहीत तसंच या नाटकातल्या नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा या घटकांबद्दल स्वतंत्रपणे बोलता येत नाही, हेच या नाटकाचं यश. सगळे जिन्नस एकजीव होऊन कायमस्वरूपी लक्षात रहाणारा एक धारदार, अविस्मरणीय अनुभव देतात.

द्रौपदीचं वस्त्रहरण हा महाभारतातला प्रसंग आपल्याला चांगलाच ठाऊक आहे. मात्र सोवळेपणा ल्यालेल्या नागर मराठी रंगभूमीचं वस्त्रहरण विजय तेंडुलकर यांनी आपल्या पद्धतीनं केलं तर 'वस्त्रहरण' कर्त्यांनी आपल्या पद्धतीनं केलं. हे दोन्ही आणि दोघांचेही प्रयत्न रंगभूमी मोकळी आणि उन्नत होण्यासाठी महत्त्वाचे आहेत. विजय तेंडुलकर आता हयात नाहीत पण नागर मराठी रंगभूमी पुन्हा सोवळेपणाच्या आलवणात गुंडाळली जाऊ नये म्हणून 'वस्त्रहरण' नाटकाचे खेळ सुरू रहाणं आवश्यक आहे. तो एक सजग प्रयत्न असेल.

'वस्त्रहरण' कर्त्यांना सलाम.

*अक्षय शिंपी*
*(अभिनेता, कवी, दास्तानगो)*
** २०१० पासून व्यावसायिक स्तरावर पूर्णवेळ अभिनेता आणि लेखक म्हणून कार्यरत.*
** 'काय डेंजर वारा सुटलाय', ' पुनश्च हनीमून', 'आधी बसू मग बोलू', 'अगदीच शून्य', ' बॅकस्टेजवाला कोणी' 'Mr. & Mrs.' ' मराठी वाङ्मयाचा घोळीव इतिहास', 'इन्विजिबल सिटी' या मराठी नाटकांतून, तर 'हॅलो फ़रमाईश', 'बस्ती में मस्ती' 'विरासत', 'हयवदन', 'राम सजीवन की प्रेमकथा' या हिंदी नाटकातून अभिनेता म्हणून काम*
*• '१९०९', 'चक्की', 'सेल्समन' 'हिजडा' आदी चित्रपटांमधून अभिनय.*
** सोनी मराठी वाहिनीवरील 'नवरी मिळे नवऱ्याला' या मालिकेतून अभिनय. (भूमिका: रवी भालेराव)*
** झी मराठी वाहिनीवरील 'लोकमान्य' या मालिकेतून अभिनय. (भूमिका: नामजोशी)*
** Drama School Mumbai या संस्थेतून नाट्यप्रशिक्षणातील महत्वपूर्ण आवाजसाधना या विषयाचा प्रशिक्षक म्हणून कार्यरत.*
** मुंबई शहरावरील 'दास्तान-ए-बड़ी बांका' आणि 'दास्तान-ए-रामजी' या मराठीतील दास्तानगोईचे प्रयोग सुरू आहेत.*
** 'दास्तानगोई' हा उर्दू कलाप्रकार मराठीत आणला.*
** 'बिनचेहऱ्याचे कभिन्न तुकडे'(२०२०) आणि 'अव्याकृत' (२०२५) हे कवितासंग्रह प्रकाशित.*
*• 'पीयूष बबेले' लिखित 'नेहरू: मिथक और सत्य' या पुस्तकाचा मराठी अनुवाद नुकताच प्रकाशित झाला आहे. मराठी पुस्तकाचे शीर्षक: नेहरू: मिथक आणि सत्य, मराठी अनुवाद: अक्षय शिंपी*
** 'शंकर शेष फाउंडेशन, मुंबई' ची शिष्यवृत्ती सलग तीन वर्ष जाहीर.*
** शरद पवार इन्पायर फेलोशिप साहित्य विभागात जाहीर.*
** साहित्य अकादमीची प्रवासवृत्ती प्राप्त. (२०२३)*
*• 'मैत्र जीवांचे' पुरस्कार, 'सूर्यांश साहित्य पुरस्कार', 'अक्षर कला वाड़्मय पुरस्कार, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई'चा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचा पुरस्कार, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा 'विशाखा' सन्मान, प्रकाश रसाळ भूमी काव्य पुरस्कार - आदी महत्त्वपूर्ण पुरस्कारांनी सन्मानित.*

# मोराचे पाय ओबडधोबड का?

## (बालकथा)

■ ॲन्थनी परेरा, नंदाखाल

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट, एकदा देवसभेत पक्ष्यांच्या नृत्याचा कार्यक्रम होता. अनेक पक्षी या कार्यक्रमासाठी जाणार होते. चिमणीला त्या कार्यकमासाठी जायचे होते. ती सुंदर नृत्य करायची परंतु तिचे पाय ओबडधोबड होते. मोरालाही त्या कार्यकमासाठी जायचे होते, त्याचे पाय सुंदर होते. तो सर्वांगाने सुंदर होता परंतु त्याला उडता येत नव्हते.

चिमणी ही मोराची भाची होती, ती आपल्या मामाकडे आली आणि म्हणाली, “मोर मामा, मला देवसभेतील नृत्याच्या कार्यकमात भाग घ्यायचा आहे, पण माझे पाय हे असे ओबडधोबड. सगळे बघून हसतील मला! तुझे पाय आजच्या पुरता दे मला. तो पर्यंत माझे पाय तू घे. देशील ना मामा? मला तर नृत्यात भाग घ्यायचा आहे, काय करू?”

मोराला चिमणीची दया आली. आपल्या भाचीची लाज राखण्यासाठी आपले सुंदर पाय मोराने तिला दिले व तो चिमणीच्या येण्याची वाट पाहू लागला. देवसभेत चिमणीचे नृत्य खूप बहारदार झाले. देवाने तिचे खूप कौतुक केले. तिच्या नृत्याचे व सुंदर पायाचेही खूप कौतुक केले. चिमणीला खूप आनंद झाला. कार्यकम संपल्यावर ती घरी आली पण मोराकडे गेलीच नाही. खूप दिवसांनी ती मोराला भेटली पण तिने पाय देण्यास नकार दिला.

मोराला खूप वाईट वाटले. आपली भाची आपल्याशी असे वागावी? त्याला खूप दुःख झाले. आजही मोर आपल्या ओबडधोबड पायांनी नाचतो तेव्हा सतत आसवे गाळत राहतो. आपल्याला त्याचे सुंदर नृत्य दिसते आकर्षक पिसारा दिसतो परंतु त्याच्या मनातील शल्य कोठे दिसते? आपणही कमी अधिक प्रमाणात असेच वागतो नाही का?

# ख्रिस्ती सासुरवाशिणीच्या जात्यावरच्या ओव्या

■ डॉ.अनुपमा निरंजन उजगरे, ठाणे

कोणे एकेकाळी घरोघरी जात्यावर रोजचं दळण दळलं जात असे. त्या काळात हातात खुंटा घेतलेल्या सगळ्याच समाजातल्या स्त्रियांची जीवनशैली पळसाला पाने तीन ह्या म्हणीसारखी म्हणण्यापेक्षा घरोघरी मातीच्या चुली ह्या म्हणीसारखी होती असं म्हणणं अधिक योग्य ठरेल.

अमेरिकन मराठी मिशनच्या मिशनरीनी शैक्षणिक आणि आरोग्य ह्या बाबींना प्राधान्य दिल्यामुळे ख्िस्ती कुटुंबांतल्या स्त्रिया अध्ययन-अध्यापन करू लागल्या होत्या आणि नर्सिंगकडेही वळल्या होत्या. तरीही कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या त्यांना पार पाडाव्या लागत. त्यातून त्यांना सुटका अशी नव्हतीच. पूर्वी आपलं मन मोकळं करायला माजघर आणि त्यातलं 'जातं' ही स्त्रीची हक्काची जागा असे. जात्यावरच्या ओव्यांमधून स्त्री आपल्या मनातलं सुख-दुःख निःसंकोचपणे व्यक्त करत असे. भरल्या घरात अश्रू ढाळणं अवलक्षण मानलं जात असे. त्यामुळे एकीकडे जात्यातून पीठ गळत असे आणि दुसरीकडे डोळ्यांतून धारा राहत असत. तिचं राबणं आणि तिचं रडणं फारसं कुणाच्या लक्षातही येत नसे आणि आलंच तरी त्याची दखल घेण्याची गरजही कुणाला वाटत नसे.

त्या काळात पिठाच्या गिरण्या अगदीच श्रीमंतांसाठी असत. सुनेने भल्या पहाटे किंवा दुपारच्या निवांतवेळी आडवं न होता जात्यावर बसणं हे गृहीतच धरलं जायचं. तिला जाग आली नाही तर सासू-सुनांमध्ये असा संवाद जात्यावर व्हायचा-निदान ओवीतली पहिली ओळ तर हमखास कानावर आदळलीच पाहिजे-

काय गं भवाने आताशी उठली!

व्हय सासूबाय रातच्याला पाठ लै तुटली

जात्यातून मऊ पीठ पडलं नाही तर तिच्या सात पिढ्यांचा उद्धार सासूकडून झालाच म्हणून समजा. त्यामुळेच ती सखीला सांगते,

धर सखे नीट जात्याचा खुट्टा

पडो मऊ पीठ, लागू नये बट्टा

माहेरचा उद्धार म्हणजे आईचा उद्धार ! आईचा उद्धार केलेला कोणत्याच स्त्रीला सहन होणं शक्य नाही. कारण-

पहिली माझी ओवी माझ्या ओवीचे चौदा फेर

सर्व गनगोतामध्ये आई माझी ती आहे थोर

ही सार्वत्रिक भावना. माहेरी जायचं तर एकत्र कुटुंबातल्या सगळ्या वडीलधाऱ्यांचीच नव्हे तर धाकट्या दीर-नणंदांचीही परवानगी तिला काढावी लागे. न्यायला आलेला भाऊ तेवढा वेळ ताटकळत बसे. सासूबाईंना अचानक सगळी 'पेंडिंग पडलेली' कामं आठवत. ती पूर्ण केल्याशिवाय तिची सुटका नसे. माहेरच्या ओढीने तीही अंगात बळ आणून सगळं आटोपे. माहेरहून आल्यानंतर माहेरचा वानवळा शेजारच्या सखीला राजरोसपणे तिला देता यायचा नाही म्हणून ती गुपचूप तिला म्हणते,

वाटीत दिला तुला माहेराचा वानवळा

सईबाई सांगू नको कुणा, पेटल वणवा

एकत्र कुटुंबात माणसांच्या राबत्याला ओहोटी नसायची. त्यामुळे दळण मोजकं दळून चालायचं नाही.

पाव्हण्यांचा बाई राबता संपेना

जातं मागतं घासावर घास त्याची भूक भागंना

तेव्हाच्या पुरुषांची भूकही जबरदस्त असायची. भाकरी थापताना बाईची मनगटं दुखायची. बरं, थापताना आणि भाकर तव्यावर टाकताना बाहेर आवाज जाणार नाही, ह्याची तिला काळजी घ्यावी लागे. नाही तर भिंतीला तुंबड्या लावून बसलेल्या पाहुण्याला किती भाकरी थापल्यात ह्याचा अंदाज येत असे.

ख्रिस्ती समाजात सणवार तसे एका हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकेच. त्यामुळे त्या दिवसांचं अप्रूप असतं. येशूजन्माच्या पूर्वी गर्भवती मरीयेचे ओव्यांमध्ये आलेलं वर्णन किती सुरेख करतेय पाहा-

पहिली: मरिया गव्हाळी झाली पिवळी पिवळी
चोळी अंगिचि गं तिच्या दाटू लागली।।
दुसरी: चंद्र आकाशामध्ये वाढू लागला
बाळ उदरी गं तिच्या खेळू लागला।।

सण म्हटला की पंचपक्वान्नं नसली, कितीही गरिबी असली तरी गोडधोड करणं आलंच.

तूप, साखर, मैदा उधार देई विसापूरवाला
करंज्या लाडू करू आता नाताळाला

१९४७ च्या फाळणीत विस्थापित झालेल्या सिंधी समाजासाठी तारकपूर ह्या ख्रिस्ती कॉलनीजवळ निर्माण झालेल्या सिंधी कॉलनीतल्या एका किराणा दुकानदाराचं इथे विसापूरवाला हे नाव ओवीत येतं. विस्थापित असूनही कष्टाने उद्योगधंदा करून गरजूंना उधार देण्याची ऐपत कमावणारा सिंधी समाज आणि ऋण काढून सण साजरा करण्याची मराठी (ख्रिस्ती) समाजाची वृत्ती हे सामाजिक वास्तव लक्षात येते.

आयांनो बायांनो तुम्ही देवळाला चला
येशूजन्माचा आनंद माझ्या मनी झाला।।

असे आनंदाचे क्षण वर्षातून एकदाच येणारे पण अडीअडचणी आणि इतर प्रश्न कायमचेच भेडसावणारे. त्यातून सोडवण्यासाठी देवाचा धावा करताना बायबलच्या २३व्या स्तोत्रातील 'परमेश्वर मला वाळवंटातून हिरव्यागार कुरणात वसवतो' हा आशय ख्रिस्ती स्त्रीच्या ओवीत अगदी सहज येऊन जातो-

ख्रिस्ता, तुझे कुठे आहे हिरवे कुरण ?
मी निराधार, धरिते तुझे चरण

वर्षातून एकदा मिशनरींच्या बंगल्याच्या मोठ्या आवारात 'सेल' भरायचा. त्यात निरनिराळ्या जीवनोपयोगीवस्तू आणि ताजे खाद्यपदार्थ माफक दरात विक्रीला असत. ते विकून येणारी रक्कम गरिबांच्या मदतीसाठी मिशनरी खर्च करीत. त्यामुळे स्त्रिया आपापल्या खर्चाने वस्तू आणि पदार्थ करून आणत. त्यासंदर्भातली ही ओवी-

पापड लाटा ग बायांनो पातळ नि गोल
देऊ प्रभूला तयाचे मोल

किंवा

सेल लाविला साहेबाच्या बंगली
नीट विका माल करू नका ग दंगली

मुलींनी शाळेत जाऊन शिकणं आणि मास्तरकी करणं ही त्यावेळी किती कौतुकाची बाब वाटावी-

गावची पोर मास्तरीण झाली

बाया बाप्यांनी धुळवड साजरी केली

धुळवड हा हिंदूंचा सण. पण म्हणून त्याचा उल्लेख ख्रिस्ती स्त्रीने आपल्या ओवीत करणं निषिद्ध मानलं गेलं नाही. उलट तो उल्लेख केल्याने आनंदाचं किती उधाण गावकऱ्यांना आलं, ते चित्र डोळ्यांसमोर उभ राहतं. ह्या पार्श्वभूमीवर मला इथे एक अनुभव सांगावासा वाटतो की, 'सांगी' ह्या माझ्या पहिल्याच काव्यसंग्रहातल्या 'लक्षात ठेव बाई माझे' ह्या गाजलेल्या कवितेत पारंपरिक शिकवण नातीला देताना आजी म्हणते,

लक्षात घे बाई माझे,
बासरी कृष्णाच्याच हातात असते
राधेच्या हाती फुंकणीशिवाय काहीच नसते.

खरं तर ह्या ओळी समाजातील स्त्री-पुरुष असमानतेकडे अंगुलिनिर्देश करणाऱ्या आहेत. कृष्ण आणि राधा ही स्त्री-पुरुषांची प्रतीकं आहेत. सदर कविता २००३ साली प्रकाशित झाली. त्यानंतर ह्या ओळींवर हरकत घेणार एक निनावी पत्र मला आलं. निनावी पत्राला उत्तर देणार तरी कसं? ह्या कवितेला आता बाबीस वर्ष झाली. आता तरी ह्या समाजाच्या मानसिकतेत काही परक फडला आहे काय-तर नाही. २०२५ सालच्या महिलादिनी ऑन लाईन चर्चच्या एका ग्रुपवर माझ्या सादरीकरणातल्या ह्या ओळी गाळून पुढच्या ओळी ऐकवण्यात आल्या. म्हणजे तिचा अर्कच गाळून टाकण्यात आला! त्याविषयी ना माझी परवानगी घेण्यात आली, ना मला कल्पना देण्यात आली. ह्या पार्श्वभूमीवर जात्यावरच्या ओवीतून व्यक्त होणारी ख्रिस्ती स्त्री ही लोकसाहित्यात धर्म-जातिभेद न पाळणारी, अशी अधिक विशाल मनाची म्हणायला हवी.

दारूपायी उद्ध्वस्त होणारे संसार पाहून ख्रिस्ती स्त्री पदर खोचून उभी राहत म्हणते-

उचला ईडा पळवा पीडा
सटव्या दारूला जिमिनीत गाडा

# पराक्रम: युद्ध कीं क्षमा! हिंसा किं अहिंसा!

-- ॲड. अतुल आल्मेडा, निर्मळ

१. पराक्रम या शब्दावर भाष्य करताना विनोबा भावे म्हणतात, 'पराक्रम' हा शब्द बघा. आपण पराक्रम करतो. त्याचं कौतुक करतो. पराक्रम म्हणजे काय तर पर+आक्रम. दुसऱ्यावर आक्रमण म्हणजे पराक्रम. इतर माणसांना 'पर' समजणं, पहिली हिंसा. त्यावर आक्रमण करणं म्हणजे दुसरी हिंसा. हिंसेचा गुणाकार म्हणजे पराक्रम. आणि त्या पराक्रमाचे आपण किती कौतुक करत असतो!" आज हे लिहिण्याचे कारण, कुटुंबांत, समाजात, देशात आणि जगात अशांतीचे वातावरण आहे. ईस्रायल व पॅलेस्टाईन आणि युक्रेन व रशिया यांच्यासह इतर काही ठिकाणी युद्धाचे तांडव चालू आहे. लोक म्हणजेच, स्त्री-पुरूष व बालकं अपराधाविना मारली जात आहेत. का? कधीपर्यंत हे चालणार? हे थांबणार कीं नाही? आम्ही माणसं यावर विचार करणार की नाही? विवेकी विचार व्हावा म्हणून हा प्रपंच (चिंतन). मारणारे बहुतांश पुरूष आहेत आणि असतात.

२. 'युद्ध नको, बुद्ध हवा' अशी मागणी आणि घोषणा शांतताप्रिय लोक, विचारवंत करत आले आहेत. युध्दांत लाखो लोक, विशेष करुन स्त्री-लहान मुले यांची हत्या होत आली आहे. केवळ दुसऱ्या महायुद्धात पाच ते सहा कोटी लोक मृत्युमुखी पडले आहेत. युद्धाची अनेक कारणे आहेत, तशीच युद्धाला विविध बाजू आहेत. राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्षामुळे मानवी जीवन उद्ध्वस्त झालेले आहे. युद्ध हे पुरूषप्रधान संस्कृतीचे धोरण आहे. युद्धखोरवृती निषेधार्थ आहे, तरीपण युद्ध का थांबत नाही. युरोपात स्त्रियांनी एकत्र येऊन युद्धा विरूध्द भूमिका व चळवळ उभी केली. त्यामुळेच २४ मे, हा दिवस जागतिक पातळीवर शांतता व निःशस्त्रीकरण दिन म्हणून पाळला जातोय. तरी राष्ट्रा-राष्ट्रातील युद्धे चालूच आहेत. अलीकडेच पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यात 26 निष्पाप भारतीयांना मृत्यूला सामोरे जावे लागले. संपूर्ण भारत देश यामुळे हादरला. भारतीयांनी नाही, तर पाकिस्तान वगळता सर्व जगाने या घटनेचा निषेध केला.

आपण दहशतवाद्यांना धडा शिकवण्याच्या उद्देशानेच 'ऑपरेशन सिंदूर' केले. आपण यावेळी कीती जवान गमावले, आपले कीती आर्थिक नुकसान झाले, हे सरकार आपल्याला सांगत नाही. सुड / बदला घेण्याच्या या मनोवृत्तीने आपण काय कमावले किंवा काय गमावले याचा हिशोब कधीच स्पष्टपणे कळणार नाही, मांडला जाणार नाही. मात्र ज्या कुटुंबातील तरुण जवान कामी आला आहे, त्या कुटुंबांची आणि विशेष करुन त्या कुटुंबातील, आई,

पत्नी, मुलं यांची मानसिक स्थिती काय असेल याचा विचार व्हावा. युद्धे थांबावीत, युद्ध नको बुद्ध हवा, युद्ध नको शांती हवी, या भूमिकेतून युनो (UNO) अस्तित्वात आली, तरीदेखील युद्धे चालूच आहेत. या वसुंधरेची उपजत असलेली ही मानवजात युद्धाच्या पराक्रमाने एकमेकांचे मुडदे आजही का पाडत आहे? कुणी विचार करील का?

३. मानवाची निर्मिती वसुंधरेमुळे झाली आहे. म्हणजेच वसुंधरा सर्व मानवाची जन्मदाती आहे. मात्र मानवाने स्वार्थासाठी व आपापसातील वर्चस्वासाठी या वसुंधरेची/पृथ्वीची अनेक विभागात वाटणी करुन त्या त्या भागाला राष्ट्रीयत्वाचा साज चढवला आहे. ही राष्ट्रीयत्वाची धारणा/भावना जोपासण्यासाठी मानवात पराक्रम ही वृती जोपासण्यात येऊन विकसित झालेली आहे. राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष मानवी जीवनावर अगणित अत्याचार करूनच राष्ट्रवाद वाढवित आहे. आंधळा राष्ट्रवाद मानवी जीवन उद्ध्वस्त करत आहे. या युद्धखोर मानवी समाजाला, युद्धाशिवाय या पृथ्वीवर शांततेने, प्रेमाने, समतेने, एकमेकांशी समंजसपणे व्यवहार व व्यवसाय करून जीवन जगणे शक्य आहे की नाही? रवींद्रनाथ टागोर यांनी राष्ट्रवाद नाकारला म्हणून स्वातंत्र्य चळवळीत त्यांना जनमताच्या टिकेचे धनी व्हावे लागले होते.

४. युद्धाची मानसिकता मानवाच्या रक्तात का व कशी विकसित झाली, याचा शोध घेताना असे दिसून येते की, टोळी-टोळीने राहणारा व आपला रोजचा उपहार, रानावनातील फळे, लहान-मोठी शिकार करून भागवत होता. मात्र शेतीचा शोध लागल्यावर, मानवाला सुपीक जमिनीचे महत्त्व प्रथम जाणवले. म्हणूनच नदीकाठावर असलेल्या सुपीक जमीनीच्या आसपास आदिमानवाच्या वसाहती उदयास आलेल्या अतिप्राचीन इतिहासावरून कळते.

संस्कृती नदीकाठावर विकसित झाली. कारण पाणी आणि जीव यांचा जगण्याशी अतूट संबंध आहे. त्यानंतर अग्नीच्या शोधामुळे मानवी संस्कृतीत आमुलाग्र बदल झालेले आहेत. अग्नीमुळेच मानवजात शिजवलेले अन्न खाऊ लागली व एकत्र कळपात स्थिरावली. अशा परिस्थितीत उत्पन्न देणारी जमीन, आपली जमीन मिळकत आपल्यानंतर आपल्याचकडे राहावी व आपल्या पश्चात आपल्याच मुलाकडे राहावी व त्यासाठी मुलाला जन्म देणारी बाई ही आपलीच असावी ही कल्पना सुचली. या कल्पनेतूनच लग्न व्यवस्था अस्तित्वात आली व त्यातून कुटुंब संस्था उदयास आली. त्यालाच अनुसरून वंशज परंपरा आणि घराणेशाहीचा उगम झाला. त्यानंतर राजा-राणी व राजघराणी आणि संपत्ती व सत्तेसाठी संघर्ष उभे राहिले.

तैगिरिस, युफ्राटीस, नाईल व सिंधु अशा अनेक नदीच्या तीरावर विविध मानवी संस्कृतीचा झालेला उदय, विकास आणि विनाश याची माहिती मिळते, मिळत आहे. दोन संस्कृतीत झालेल्या पहिल्या युद्धाची नोद इ.स.पूर्वी, २९००-२७०० मध्ये आढळून आलेली आहे. हे पहिले युद्ध/लढाई (सध्याच्या इराण देशात) सुमेरीयन राज्यकर्ते व ईलेमाइट जमातीचे लोक यांच्यातले युद्ध होते. हे युद्ध/लढाई सुमेरियन राजाने जिंकले होते. त्या पूर्वीही पॅलोलिथिक विरुद्ध न्युयोलिथिक असा संघर्ष घडून आल्याचे दिसते. यानंतर राजेशाही पुढे

विकसित होत होत राजा, सम्राट, सम्राटशाही, सुलतान, बिशप, ड्युक किंवा वसाहतिक गव्हर्नर याच्याच स्वरूपात राज्यव्यवस्था अस्तित्वात आली. राजेशाहीचे प्रथम ध्येय राज्य विस्तार व त्याकरीता युद्ध हाच एकमेव मार्ग. त्यामुळेच युद्धनीतीत मानव तरबेज होत गेला. वर्षोवर्षे, पिढ्या न पिढ्या युद्धनीती विकसित करणारे जणूक (gene) मानवाच्या रक्तात विकसित झालेले आहेत.

अलेक्झांडर द ग्रेट ते नेपोलियन बोनापार्ट हे दोन महान ऐतिहासिक सम्राट यांनी जवळ जवळ संपूर्ण जग युध्दांच्या माध्यमातून जिंकण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच प्रमाणे धर्माच्या उदयानंतर दोन धर्मात झालेली धर्मयुद्ध म्हणजेच क्रुसेड. धर्म प्रचाराकरिता झालेली युद्धे. पहिले व दुसरे महायुद्ध. थोडक्यात धर्माचा उदय होण्याअगोदर पासून युद्ध पराक्रम सुरू होते आणि धर्म आल्यावर युद्ध पराक्रम जोरात सुरु राहिले. मानवजातीत शांती करण्याच्या हेतूने व उद्देशानेच अलौकिक शक्तिमान देवाच्या संकल्पनेतून धर्माचा उदय झाला. पण धर्मचं अशांतीला व युद्धाला कारणीभूत ठरले. हा इतिहास आहे.

अलेक्झांडरच्या काळात एपिक्यूरस (इ. पू. ३४१-२७०) जन्मलेल्या तत्त्वज्ञानीने असे तत्व मांडले की ‘अलेक्झांडरसारखं जगाचे डोळे दिपवण्याचा अट्टाहास खरं सुख नसून सुखी जगायचं असेल तर अदृश्य जीवन जगा’ त्यांच्या मते ‘राज्यसंस्था, खाजगी संपत्ती, प्रसिद्धीचा प्रकाशझोत, दिखाऊपणा सारख्या गोष्टी मनाच्या शांतीसाठी आणि खऱ्या सुखासाठी अडथळा ठरतात’ एपिक्यूरसच्या अगोदर गौतम बुद्ध, सॉक्रटिस व त्यानंतर ख्रिस्ताने हेच तत्व मानवाला शिकवण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे दोन हजार वर्षाचा काळ जाऊन अनेक धर्माचा उदय होऊनही माणसावर या तत्त्वज्ञानाचा काहीच प्रभाव पडला नाही, याचाच पुरावा म्हणजेच सम्राट नेपोलियनचा उदय आणि अस्त.

काळाच्या ओघात राजेशाही/सम्राटशाही नष्ट होऊन साधारणत: सतराव्या शतकात राष्ट्रीयत्व ही कल्पना पुढे आली. त्यानंतर ही दोन जागतिक महायुध्दे झाली. दुसरे महायुद्ध संपले तेव्हा, जगभरातील ९० टक्के जनता लोकशाही नसलेल्या राष्ट्रांत राहत होती. दुसऱ्या महायुद्धानंतर लोकशाही व हुकूमशाही या राज्य/सत्ता करण्याऱ्या व्यवस्था/पध्दती विकसित झाल्या. दुसऱ्या महायुद्धांत सहा कोटी लोकांचा विध्वंस झाल्याची शक्यता आहे. ‘माणसाने माणसे मारणे थांबवावे’ याच विचारांतून आंतरराष्ट्रीय संघटना UNO अस्तित्वात आली. पण त्यानंतरही युद्धे थांबली नाहीत किंवा संघर्ष संपले नाहीत. उलट प्रजेच्या भल्याकरीता सत्ता आपल्याच कडे राहावी म्हणून हुकूमशाही राजवटीत रशियात पाच कोटी तर चीन मध्ये सात कोटी माणसे मारली गेली. आज युद्धे चालूच आहेत. कारण युद्धप्रेरणा मूलतः मानवी हृदयात असते.

माणसाची नखे का वाढतात? एक प्रसिद्ध विचारवंत, हजारी प्रसाद द्विवेदी म्हणतात, "नाक, दात, हात, पाय ही माणसाची नैसर्गिक शस्त्रे आहेत. माणसात हिंसा हा स्थायीभाव आहे. संयमानेच त्यावर विजय शक्य आहे. माणसाची नखे ही त्याच्यातील हिंसा नि हिंस्त्रतेची

प्रतिके होत.  जोपर्यंत याचे समूळ उच्चाटन होणार नाही, तोवर नखे  वाढणारच. कितीदातरी कापा."

५. मनुष्य/मानव/माणूस किंवा मानसाचा एकत्र झालेला गट, जमाव, समाज हा राष्ट्र युद्ध का थांबवू शकत नाही? माणूस युद्ध करणे सोडून देईल का? विचार करू या. युद्ध म्हणजेच हिंसा तर अहिंसा म्हणजेच युद्ध नव्हे तर शांती व युद्धाचे कारण ठरलेल्या बाबीवर संवाद-सुसंवाद करून मार्ग काढणे. प्रश्न आहे, हा संवाद न होता युद्ध का होते? कारण विनोबानेच सागितले आहे. विनोबा म्हणतात, 'हिंसेचं, युद्धाचं शास्त्र मानवजात हजारो वर्षांपासून निर्माण करीत आहे. त्यामुळे विध्वंसाचा पुरेसा अनुभव आपल्याकडे आहे. तर अहिंसेचे शास्त्र तर आता नुकतंच होऊ घातलं आहे. त्याचा अंतिम शब्द अद्याप कुणी सांगितलेला नाही. It is a science in evolution.'

महात्मा गांधीनी हे शास्त्र वापरण्यास सुरुवात केली. परिणाम पराक्रम न करता, शस्त्रक्रांती न करता आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले. गांधीजींवर श्रद्धा ठेवून जगातील काही नेत्यांनी ते शास्त्र वापरून कर्म केलेल्याच आपण नेल्सन मंडेला व बराक ओबामा यांच्या उदाहरणावरून जाणतो. गांधीजींनी हे तत्वज्ञान गौतम बुद्ध व येशूख्रिस्त यांच्या शिकवणीनूसार स्विकारले. गांधीजी म्हणतात, 'सत्य हेच ईश्वर' आणि बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'समता हाच धर्म'. युद्ध होण्याची कारणे, सत्ता, धर्म, भाषा, संस्कृती, राष्ट्रीय अस्मिता, विचारधारा (ideology) इत्यादी. गांधीजींनी दोन गटांत/ राष्ट्रांत किंवा भिन्न धर्मात निर्माण झालेला पेच किंवा समोर उभे ठाकलेले संकट सोडविण्यासाठी 'सत्याग्रह' हा मार्ग सांगितला आहे. मात्र सत्याग्रह अहिंसक असणे आवश्यक आहे. मात्र 'सत्याग्रह' हा शब्द/मार्ग अडचणीचा ठरू शकतो. कारण सत्याचं आकलन प्रत्येक माणसाचं वेगळं असू शकतं. पण सत्य हे सत्यचं असणार! त्यामुळे सत्य काय हे दोघांनी संवादाच्या मार्गातून शोधले पाहिजे. विनोबा म्हणतात की, 'सत्याग्रही' ऐवजी आपण दोघांनी 'सत्य-ग्राही' असणं आवश्यक आहे. सत्यग्राही सरळ मान्य करेल की, सत्य माझ्या प्रतिपक्षाकडेही असू शकतं. आणि ते तसं असेल तर मला ते स्विकारले पाहिजे. दोघे मिळून सत्य शोधले पाहिजे. यासाठी अहंकार अडथळा निर्माण करू शकतो.

६. आज समाजात, राज्यांत, राष्ट्रात संघर्ष वाढत असलेले आपण पाहत आहोत. संघर्ष वाढण्याची अनेक कारणे आहेत. एक मुलभूत कारण आर्थिक विषमता आहे. हे नाकारता येणार नाही. दुसरी विविध जी कारणं आहेत, त्यापैकी प्रमुख कारण संस्कृती होउ शकते. या संस्कृतीत, भाषा, धर्म, वंश व राष्ट्रीय अस्मिता अशी विविध अंगे असू शकतात. त्याप्रमाणेच, चीनी, ईस्लामिक व भारतीय संस्कृती, शिवाय लोकशाही आणि हुकूमशाही या विचारधारा. अशी संघर्षाची आणि पर्यायाने युद्धाची कारणे होऊ शकतात. कोव्हिड काळात संपूर्ण जग मानवतेसाठी या एकाच विचाराने एकरूप झालं होत का? नसेल कदाचित, पण एकत्र आलं होतं. त्याच धर्तीवर संपूर्ण जग म्हणजेच जगातील संपूर्ण मानवजात एका विचाराने, हेतूने, उद्देशाने व ध्येयाने परस्परांवर विश्वास ठेवून धोरण ठरवू शकणार नाहीत का? मला ते कठीण

वाटत असले तरी अशक्य वाटत नाही. याचा पाया 'माणसाने माणसाला मारू नये'. याच तत्वावर असेल.

७. वर उल्लेख केलेल्या, संघर्ष निर्माण करण्याऱ्या विविध कारणांपैकी, विषमता हे एक प्रमुख कारण आहे, तर सत्तेची स्पर्धा हे, हे दुसऱ्या विविध संघर्षाचे मुळ आहे. स्पर्धा, मित्राला देखील शत्रू म्हणून पाहते. मलाच सगळ्यात जास्त मिळायला पाहिजे, असं म्हणत तिला स्पर्धा म्हणतात. याला उत्तर म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीतून उदयास आलेली त्रिसूत्री होऊ शकते. समता, स्वतंत्र आणि बंधूभाव, liberty, equality and fraternity. अनेक लोकशाही मानणाऱ्या राष्ट्राच्या संविधानात याची तरतूद आहे. एवढेच नाही तर आंतरराष्ट्रीय जागतिक पातळीवर मुलभूत मानवतावादी तत्वे म्हणून ती स्वीकारली आहेत.

आपल्या संविधानाने ही तत्वे पुर्णपणे अंगीकृत केलेली आहेत. याचा पाया मानवाची उत्पत्ती काही धर्म मानतात तशी ईश्वरीय असेल तर सर्व मानवजात एकाच देवाची लेकरे आहेत शिवाय उत्पत्ती विज्ञान मांडते त्यानुसार उत्क्रांतींतून होत आली असेल तर मानवजातीची प्रथम आफ्रिकेत जन्मास आली, त्यानुसार सर्व मानव एकाच वर्गात येतात. याचा सांप्रत पुरावा म्हणजेच आज या पृथ्वीवर असलेल्या सुमारे आठशे कोटी मानवात फक्त आणि फक्त चार रक्तगट आहेत. ए, बी, एबी व ओ.

८. आपल्याच या आधुनिक जगात इतिहासांत ज्या महान व्यक्ती होऊन गेल्या, उदा. अब्राहम लिंकन, रूझवेल्ट, जेफरसन, नेपोलियन, हिटलर, स्टॅलिन, लेनिन इ. यांच्या पाठीशी सरकारची शक्ती होती. याउलट कार्ल मार्क्स या व्यक्तीने कुठलीच सत्ता हाताशी नसताना सर्व माणसाच्या कल्याण केंद्रित समाज व्यवस्था म्हणजे समाजवादी तत्वज्ञान मांडले. या दोन्ही म्हणजेच शासन/सरकार आणि समाजवाद यां दोन्ही विचाराला समजून,महात्मा गांधीजींनी, गौतम बुद्ध व येशूख्रिस्त यांच्या शिकवणीनूसार माणसाच्या सदसद्विविवेक बुद्धीला अंतःकरणपूर्वक आवाहन केले. गांधीजींना बुद्ध आणि ख्रिस्त यांच्या शिकवणीनूसार पृथ्वीवर स्वर्गीय म्हणजेच समतेचे राज्य व्हावे असे वाटत होते. म्हणूनच गांधीजींनी स्वतःच वागणूक व वर्तणुकीतून तशाच जीवन जगण्याचा आदर्श देण्याचा प्रयत्न केला. १९२४ मध्ये गांधीजीं 'God is one' असा सूचक शिर्षक असणारा लेख लिहून लिहून, ते सांगतात, "इस्लाम, ख्रिस्ती, व झोरोस्टरीयन धर्म भारताबाहेर हुसकावून लावण्याचे स्वप्न हिंदूने बाळगणे निष्फळपणाचे आहे. तसेच मुसलमांनानी केवळ त्यांच्या कल्पनेतील इस्लाम जगावर राज्य करील असे स्वप्न बाळगणे निष्फळपणाचे ठरेल. सत्य ही कोणत्याही एका धर्मग्रंथाची अनन्य मालमत्ता नसते.' माणसाने माणसावर प्रेम करावं हा धर्म, तर माणसाचा माणसाने द्वेष करणं हा अधर्म. द्वेषामुळे मिळणारा त्वेष माणसाला विनाशाकडे नेतो, तर प्रेमापोटी मिळणारी प्रेरणा ही माणसाला विकासाकडे घेऊन जाते." हे गांधीजींच्या जीवनाचे तत्वज्ञान आहे.

९. गांधीजींच्या मते, दोन व्यक्ती किंवा गटांत निर्माण होणाऱ्या विषमतेचा पाया, आर्थिक, सामाजिक व धार्मिक या तीन मुद्यावर आधारित आहे. ही विषमता कमीत कमी

करून समानता हे मूल्य वाढीस लागणे आवश्यक आहे. उदारीकरण व व्यक्ती स्वातंत्र्य यामधून भांडवलशाही प्रचंड विकसित झाली आहे. याचाच परिणाम म्हणून जगातील ५० टक्के उत्पन्न हे एक टक्का लोकांचे आहे, ९० टक्के मालमत्ता ही २ टक्के लोकांकडे आहे. केवढी प्रचंड आर्थिक विषमता आपण अनुभवत आहोत. अशा परिस्थितीत स्वतंत्र, समता व बंधूभाव कसा निर्माण होणार किंवा अंमलात आणणार हा प्रश्न महत्त्वपूर्ण व कळीचा आहे.

गांधीजींना ही विषमता कमी करून समता स्थापनासाठी संघर्ष किंवा सशस्त्र लढा अभिप्रेत नाही. कारण त्यांच्या अहिंसा या तत्वावर ते बसत नाही. गांधीजींना संपूर्ण मानव समाजात एकात्म हवी आहे. भांडवलशाही संपवून समाजात समानता येणार नाही. पण भांडवलदार व धनवान यांच्या मनात संपत्तीविषयी विश्वस्तपणाची भावना जागृत करून, ती संपत्ती समाजांतील गरजवंताकरीता वापरली पाहिजे. हे गांधीजींचे तत्वज्ञान आहे. शोषण ही केवळ व्यवस्था नाही, ती वृत्ती आहे. असे मार्क्स सांगतो. गांधीजी म्हणतात, भांडवलशाही व्यवसायातून भांडवलदाराकडे जमा झालेली संपत्ती, ही त्याच्याच मालकीची न समजता, समाजाची आहे, ती त्याच्याकडे विश्वस्त म्हणून आहे, (कारण ती निर्माण करण्यात समाजांतील सर्व घटकांचा समावेश आहे) असे मानून ती समाजाच्या हितासाठीच उपयोगात आणली पाहिजे. गांधीजी म्हणतात, 'घाम गाळील त्याला दाम, श्रम करील त्याला मोबदला व कसेल त्याची जमीन असे धोरण/तत्व मान्यताप्राप्त झाले तर विषमतेवर इलाज होऊ शकतो.

या तत्त्वानुसार बापाची (भांडवलदार) संपत्ती फक्त मुलालाच न मिळता ती समाजात विखुरली पाहिजे. "माझ्या मते समस्त विश्व नैसर्गिक नियमांनी बांधलेले आहे. सर्व वस्तुमात्रांत श्रेष्ठ असलेल्या मानवाने सर्वांचाच योग्य आदर व उपयोग करून, निसर्गनियमांचे सर्वांपेक्षा अधिक उत्तम पालन केले पाहिजे. पृथ्वीतलावर स्वतःला ज्या तऱ्हेने जगावेसे वाटेल, जीवन इतरांना जगू देण्याची काळजी घेणे हेच निसर्गतः मानवाच्या हिताचे आहे. जेव्हा सर्व मानव या नियमाचा आदर करतील तेव्हा सर्वांचेच जीवन सुखमय होईल, मग ते कोणत्याही देशधर्माचे असोत. विश्वाला एका कुटुंबात सुखासमाधानाच्या कक्षेत गोवण्याला ही विचारधारा आचरणात आणणे आवश्यक आहे."

ख्रिस्ताने देव स्वीकारून सर्वांप्रती प्रेमाचा, क्षमेचा व समतेचा संदेश दिला. महम्मद पैगंबराने सुध्दा समानतेची शिकवण सांगितली. ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण मानवतेसाठी पसायदान मागितले. आपले संत-महात्मे, स्वामी विवेकांनद यांनी तर जगातील सर्व लोकांना आपले भाऊ-बहीण म्हणून संबोधले आणि आपले राष्ट्रपिता महात्म्य गांधीजींनी अहिंसेचे तत्व व महत्त्व शिकवून सर्व मानवजात एकाच कुटुंब जगावे जीवन अर्पण केले. आपण या सर्वांना आदरणीय मानतो, काहींना आपल्यापैकी देव मानतात. त्याची पुजा-आर्चा करतो. आपण त्यांचे भक्त आहोत. शिष्य कधी होणार म्हणून ते आपली वाट पाहतात. कधीतरी व्हावे हीच विनंती."I can't teach you anything but to think" said Plato.

# माझे चिंतन...

■ बावतीस पेडीकर, नंदाखाल

## अ) माझा कुणा म्हणू मी?

आजच्या समाजाची धाटणी आणि मांडणी पाहता 'नाते' म्हणून जो काही प्रकार आहे तो राहणार अगर इतिहास जमा होणार एक चिंतेची बाब होऊन राहिलेली आहे, त्या नात्यांची नावे तरी डोळ्यासमोर आणा, कितीतरी ऊर भरून येतो, मनाला किती दिलासा मिळतो. एकाकी पडलेल्या मनाला माझा कोणीतरी आहे अशी आशा, आधार निर्माण झाल्यापासून राहत नाही. ताई, दादा, मामा, मामी, काका, काकी, मावसा, मावशी, आतेभाऊ, मामेभाऊ, भावोजी, वहिनी अशी विविध प्रकारची नाती भविष्यात ऐकावयास मिळतील की नाही? आणि जी काही नाती आहेत ती तरी खऱ्या स्वरूपात व मनापासून आहेत का? "तऱ्हेवाईक तुझे नातेवाईक" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जे नातेवाईक आहेत ते आपल्या कार्यात सहकार्य करण्याचे सोडाच पण त्या कार्यात कोळदांडा कसा घालता येईल अशा प्रकारचा प्रयत्न करण्यात आनंद मानणारे असतात, असा काही ठिकाणी अनुभव येत असतो, पूर्वीचे काळी आपल्या उपवर कन्येला स्थळ पाहताना त्या स्थळाचे नातेवाईक कोण कसे याचा विचार केला जात असे, कारण त्या पोटी विश्वासाचा आधार होता, पण आज?

आजच्या विज्ञान युगात आपण अगदी काही मिनिटाच्या नवे तर सेकंदाच्या अवधीने जवळ आलो आहोत पण मनापासून मात्र दूर दूर जात आहोत, करोडो मैलांच्या दूर असलेल्या अंतराळात अवकाशयानातून भ्रमण करणाऱ्या व्यक्तींचे संगणकावर ठोकताळे मोजू शकतो पण एकाच घरात राहणाऱ्या बहीण भावंडांच्या मनात आपल्याविषयी किती ओलावा व माया आहे याचा बाकी थांगपत्ता लागत नाही. ज्यांच्यावर आपण आयुष्यभर विश्वास ठेवला त्याच व्यक्ती प्रसंगी विश्वासघातकी निघाल्याची अनेक उदाहरणे आज पहावयास मिळत आहेत.

ज्यांनी हाडाची काडे करून, प्रसंगी मोल मजुरी करून आपल्या कच्च्याबच्च्यांना मायेची पाखर देऊन लहानाचे मोठे केले व मार्गाला लावले त्याच मायबापांची आता अडगळ होऊ लागली आहे, अगदी ठेवणीतला शब्द म्हणजे या म्हाताऱ्यामुळे आम्हाला (Privacy) खाजगीपणा मिळत नाही अशी सबब पुढे येत आहे, तसेच विभक्त कुटुंब पद्धत आकार घेत असल्याने आई-वडिलांची एखाद्या जमिनीच्या तुकड्याप्रमाणे वाटणी होऊ लागली आहे तर काही ठिकाणी आई-वडिलांसाठी काही रुपयांचा "मायबाप कर" दिला की आम्ही कर्तव्यमुक्त झालो, काही ठिकाणी तर "बाळाकडे नीट लक्ष द्या, कुठे पडेल म्हणून काळजी

घ्या, भलतंसलतं खायला देऊ नका, औषधाचे डोस काळजीपूर्वक द्या“ असे फर्मान ज्यांनी आपली उभी हयात बालनातवंडांना व मुलांना वाढविण्यात घालविली त्यांना आपल्या पोरसवदा सुनबाईकडून ऐकावी लागते त्यावेळी हसावे की रडावे हा प्रश्न या आजोबा-आजी पुढे उभा राहतो, “मेरे घर, मेरे बच्चे” असा संकुचित विचार आपल्या समाजात रूढ होत चालला असल्याने शेजारधर्म जवळजवळ लुप्त होत चालला आहे, शेवटी विचार करता हे असं का घडतं आहे याचीही कारणमिमांसा करायला पाहिजे.

प्रथम म्हणजे “कुटुंब नियोजन”... “हम दो, हमारे दो“ किंबहुना एक बस्स, हा विचार नवतरुणांमध्ये मूळ धरू लागला आहे, त्यामुळे वर नमूद केलेली नाती नाहीशी होण्याच्या मार्गावर आहेत, दोन्ही मुलगे मग ताई कुठची? दोन्ही मुली मग दादा कुठचा? आता तर इंग्लंडसारख्या प्रगत देशात महिलांमध्ये कृत्रिम गर्भधारणेद्वारे कुमारी माता (वर्जिन मदर) हा प्रकार रूढ होऊ लागला आहे. हाच विचार अगर प्रकार दिवसेंदिवस वाढत गेला तर “बाप“ या संज्ञेला अगर नात्याला अर्थ तो काय राहणार? निसर्गातील इतर प्राणी व मानव जात यांच्यातला फरक तो काय राहणार? तसेच आर्थिक सुबत्ता आल्याने चंगळवाद वाढत जात आहे. “माझा बंगला, माझी बायको व माझी मुले” हाच काय तो ध्येयवाद..

घरातली माणसे कधी नसली तर वेळप्रसंगी शेजारची माणसे जीवन मरणाच्या प्रसंगी सहकार्य करतील हा प्रसंगच स्वप्नवत वाटू लागला आहे. आता जवळीक झाली आहे ती मित्र मैत्रीण, कार्यालयातील सहकारी, शाळेतील शिक्षक शिक्षिका यांची, अर्थात जागेअभावी कुटुंब विभागली गेली आहेत, येणारा शेजारी आपल्या रक्ताच्या जिव्हाळ्याचा असेल याची शाश्वती ती कशी देता येणार? म्हणूनच वरील व्यक्तीशी सहकार्य व अगदी जवळीक करावी लागत आहे, त्यातच माणसाची प्रतिष्ठा पैशावर केली जात आहे, जो सधन तो जवळचा नातेवाईक ही कल्पना समाजामध्ये रूढ होऊ पाहत आहे.

अर्थात या घठीत अघटीत घडणाऱ्या घटना आहेत, जे जे होईल ते पाहत राहावे व आपण बाकी स्वतः स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करावा. “कर्मण्ये व्याधिकारास्ते मा फल्ेषू कदाचन“ या गीतेतील वचनाप्रमाणे आपले आचरण ठेवावे व एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या न्यायाने वागण्याचा प्रयत्न करूया म्हणजे माझा कुणा म्हणून मी ? असा म्हणण्याचा प्रसंग आपणावर येणार नाही...

## ब) सामाजिक वाटचाल

२२ मे १९९८ रोजी पोप जॉन पॉल दुसरे ह्यांनी मुंबई सरधर्मप्रांतातील काही भाग म्हणजेच ठाणे जिल्ह्यातील नऊ तालुके ( वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, शहापूर, भिवंडी, वाडा, मोखाडा, त्यात विक्रमगड) वेगळे करून वसई धर्मप्रांताची निर्मिती केली आणि रा. रे. डॉ. थॉमस डाबरे ह्यांची धर्मप्रांताचे प्रमुख, बिशप म्हणून नेमणूक केली.

त्यावेळी या संपूर्ण विभागाची लोकसंख्या 23 लाख 15 हजार पैकी कॅथॉलिक लोकसंख्या ११०९०० होती. आदिवासी व हरिजनाची संख्या ८३१४०० होती. ते बरेच अशिक्षित, गरीब व दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत होते. उपासमार, कुपोषण यामुळे बालमृत्यूचे प्रमाण ही खूप होते. त्यावेळी संपूर्ण भागात ७० धर्मगुरू, १५ ब्रदर्स व ३०५ सिस्टर्स सेवाकार्य करत होते.

या धर्माप्रांताच्या पश्चिम बाजूला अरबी समुद्र किनारा असून बाकी बराचसा भाग डोंगर दऱ्याचा, जंगलाचा होता. मधून एक मुंबई अहमदाबाद नॅशनल हायवे आहे. २०१७ मध्ये या भागाची लोकसंख्या ३१ लाख तर ख्रिस्ती लोकसंख्या १२६००० (यामध्ये मुंबई व इतर ठिकाणाहून, नायगाव,वसई, नालासोपारा, विरार स्टेशन जवळील भागात स्थलांतर झालेले. स्वस्त फ्लॅट मिळत होते म्हणुन). त्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक गरजा भागविण्यासाठी १०८ + ७२ धर्मगुरु व ४३२ सिस्टर्स सेवाकार्य करत होते. अनेक ठिकाणी शाळा सूरु झाल्या, कॉलेजसुद्धा सुरु झाले.

पालक वर्ग सुशिक्षित झाल्यामुळे व शिक्षणाचे महत्व व आवश्यकता समजू लागल्यामुळे विद्यार्थ्यांपेक्षा पालकांमध्ये शैक्षणिक चुरस निर्माण झाली आहे. अगदी ज्युनिअर केजी पासून ते उच्च शिक्षणापर्यंत पालक जागरूकतेने लक्ष घालीत आहेत. भविष्यातील अपेक्षित गुणवत्ता लक्षात घेऊन आजपासूनच त्या दृष्टीने प्रयत्नाची पराकाष्टा करत आहेत. केजी पासून क्लासेस, ट्युशन, आणि काय काय., टिफिन बॉक्स, युनिफॉर्म, बूट, बॅग्स,पॉकेट मनी, जाण्या-येण्यासाठी बस, रिक्षा इ.

हल्ली इंजिनियर, डॉक्टर, सी.ए, वकील, शिक्षक, प्राध्यापक, नर्सेस,बँकेत, सरकारी निमसरकारी कार्यालयात नोकऱ्या करू लागले तसेंच निरनिराळ्या क्षेत्रातील नैपूण्य मिळवून, उद्योग व्यवसाय करून स्वतःबरोबर समाजाची प्रगती उंचावत आहेत. पूर्वी शेती बागायतीच्या कामामुळे म्हणा, लोकांचा ओढा अध्यात्मिकतेकडे कमी होता. त्यानंतर केळीच्या, भाजीपाला, फुलांच्या बागा सुरु झाल्या.

आता शेती बागायती कामे जवळ पास बंदच होत आहेत, त्यामुळे लोकांना भरपूर मोकळा वेळ मिळतो विशेष करून ज्येष्ठ मंडळी. त्यामुळे चर्च, आणि इतर कार्यक्रमात ते हजेरी लावतात. सामुदायिक रित्या एकत्र येण्याचा योग असतो. त्यावेळी अनेकांची भेट होते आणि गप्पा गोष्टी करायला मिळतात. त्यासोबत व्यायाम, शरीराची हालचाल होते. अनेक चालीरिती रूढी परंपरा, शैक्षणिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोन यावरून समाजाची शान वाढत असते.

आपला समाज सुखदुःखात आजारात, अडी अडचणीच्या वेळी, अपघाताच्या वेळी एकमेकांच्या उपयोगी पडत असतो. आर्थिकदृष्टया मदत करण्यात सुद्धा मागे पुढे पाहत नाही. निरनिराळ्या सामाजिक उपक्रमात सहभागी होत असतो. तसेंच काही सामाजिक

कार्यकर्ते समाजाच्या हितासाठी सतत झटत असतात..रक्तदान, अवयव दान चळवळीत सक्रिय होत आहेत.

वसई धर्मप्रांताच्या निर्मिती अगोदरची पूर्वीची परिस्थिती आठवू लागल्यास ती फारच वाईट होती. लोकांकडे पैसा नव्हता.. घरी असलेले लोक संपूर्ण दिवसभर शेती बागायतीची कामे करूनही उदरनिर्वाह करीत असत. साधी राहणी, घरे कौलारू, शेणा मातीने सारवलेली, धुराच्या काळोखात स्वैपाक करणारी, जेमतेम कपडे, राहण्यासाठी झोपण्यासाठी अपुरी जागा, विहिरीवरून डोक्यावरून हंड्याने पाणी, घराच्या मागीलदारी उघड्यावर आंघोळ करणारी, शाळेत पायी जाताना पायात बूट सोडा चप्पलसुद्धा नव्हती. गणवेश नव्हता, कुणीही शाळेत न्यायला आणायला नव्हतं, मग रिक्षा, डमडम, बसबद्दल न बोललेलं बरं. बरोबर टिफिन बॉक्सचे नावच नव्हते. अशी विश्वास न बसणारी परिस्थिती होती.

आता संपूर्णपणे काया पालट झाला आहे... केशभूषा, वेशभूषा बदलली आहे. जुन्या कौलारू घरांऐवजी आलिशान, सर्व सुखसोयी असलेले, हायफाय बंगले. पूर्वी सायकल विकत आणणे मोठे समजत असत. आता स्कुटर, मोटर सायकल काय मोठया ब्रँडच्या कार बंगल्यापुढे आणणे प्रतिष्ठेचे झाले आहे. नातेवाईकांपेक्षा मित्र परिवार वाढत आहे.
कॅथॉलिक बँकेने सुरुवातीला पुष्कळ कार्य केले, लोकांनी कर्ज घेऊन मुलांना उच्च शिक्षणासाठी परदेशीं पाठविले. आज तेच आपले लोक बँकेकडे करोडोनी ठेवी ठेवत आहेत. हे सर्व आपण प्रगती पथावर जात असल्याचे दिसत असले तरी आपण भ्रमात आहोत का ?

अनेक रूढी परंपरा पुन्हा डोकं वर काढू लागल्या आहेत. निरनिराळे सोहळे ( बारसे, पहिला ख्रिस्तप्रसाद स्वीकार विधी, ५०/६०/७५/८० वर्षाचे वाढदिवस साजरे करणे, नवीन घराचे उदघाटन, इ.) किती लोकांना आमंत्रित करायचं, काय काय करायचं, कुठे कुठे करायचं, किती दिवस करायचं, किती खर्च करायचा यावर काहीही निर्बंध राहिले नाहीत. हातात पैसा आहे खर्च करा. बस. पण त्यामुळे आरोग्याच्या समस्या उदभवत आहेत. निरनिराळे गंभीर आजार, कितीतरी लाखात खर्च होतो याचाही विचार करणे, त्यासाठी तरतूद करून ठेवणे आवश्यक झालेले आहे.

आपली मुले, नातवंडे परदेशीं जात आहेत, काही मुंबईसारख्या शहरांत जाऊन राहात आहेत. अनेक मोठया घरात, बंगल्यात, एक किंवा दोनच व्यक्ती राहात आहेत. आयुष्यभर काबाडकष्ट केलेली ज्येष्ठ मंडळी स्वस्थ, आरामशीर बसून राहणं त्यांना कठीण जात आहे. सगेसोयरे भेटायला येत नाहीत. त्यांनी वृद्धाश्रमात जाणं आपल्याला पसंत नाही. त्यांच्याबरोबर बोलायला मुलांना, नातवंडांना वेळच मिळत नाही. पूर्ण जीवनशैलीच बदलली आहे. एवढया झटपट ही परिस्थिती बदलेल असं त्यांना वाटलंच नव्हतं. हा सर्व काळाचा महिमा. काळापुढे नतमस्तक होणं हाच पर्याय...

# मिंगू काका

■ बॅप्टिस्ट एम वाझ, दारसेंग, गोम्सआळी

मिंगू व मी समवयस्क. आम्ही एकाच आस्थापणात काम करत होतो. सद्या आम्ही दोघेही निवृत्त झालो आहोत. परंतु आमच्या मैत्रीमध्ये काही अंतर पडले नाही. मी त्याला मिंगू ह्या नावाने संबोधीत असलो तरी गावात व नातेवाईकात त्याला मिंगूकाका ह्या नावाने ओळखले जात असे. तसा मिंगूकाका जात्याच हुशार होता. गावातला तो पहिला पदवीधर. बँकेतील नोकरी करणारा तो पहिलाच! त्यामुळे त्याचा रुबाबही खूप मोठा होता. गावातले लोकही त्याला चांगला मान देत असत. परंतु त्याच्याकडे जायला ते बिचकत असतं. त्याला कारण होत त्याचा स्वभाव!

मिंगूकाका सत्य वचनी होता. तो कधीही कुणाची भिडमुर्वत ठेवत नव्हता. आपले बोलणे कितीही कटू असले तरी ते सत्य तेच बोलणार. आपलं मत तो परखडपणे मांडत असे. एकदा मिंगूकाकाच्या पॅरिसमधील चर्चचे नूतनीकरणाचे काम चालू होते. त्याचा निधी जमविण्यासाठी पॅरिस कौन्सिलचे सभासद फादरांसोबत घरोघरी फिरत होते. मिंगूकाकाचे घर आल्यावर फादर त्याच्या घरी जाण्यासाठी वळले, तेव्हा पॅरिस कौन्सिलच्या सभासदापैकी एक जण बोलले "त्यांच्याकडे जाऊ नका. देणगी तर मिळणार नाही पण दोन शहाणपणाच्या गोष्टी ऐकायला लागतील.”

तरीही फादर आपल्या कार्यकर्त्यासहीत त्यांच्या घरी गेले. फादरांनी त्यांना चर्चचे नूतनीकरणाचे काम हाती घेतल्याचे सांगितले व त्यासाठी आम्ही निधी गोळा करत आहोत व आपणाकडूनही भरघोस देणगीची अपेक्षा आहे असे म्हणाले. फादरांचे सर्व म्हणणे त्यांनी शांतपणे ऐकून घेतले व फादरांना म्हणाले "फादर, तुम्ही वाईट वाटून घेऊ नका परंतु आज आपल्या पॅरिसला चर्चची नाही तर चांगली सुविधा असलेल्या शाळेची गरज आहे. चर्चमध्ये चांगली कुशनची बाकं आणण्याचं तुम्ही सांगता. पण चर्चमध्ये किती तास भाविक प्रार्थनेसाठी बसणार आहेत? जास्तीत जास्त एक तास. परंतु तुम्ही आपल्या शाळेतील बाकडी पाहिलीत का? तुटलेल्या बाकड्यावर दिवसभर मुलं बसतात. प्रयोगशाळेत प्रयोगाची उपकरणं नाहीत म्हणून आधी शाळेचे नूतनीकरण करा. मी सढळ हाताने त्यासाठी मदत करेन". फादर जाता जाता फक्त एवढेच म्हणाले की "जेव्हा कधी शाळेचे नूतनीकरण हातात घेऊ तेव्हा आम्ही नक्कीच तुमच्याकडे येऊ.” पुढे काही कालावधीत चर्चच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले.

कालांतराने फादरांची बदली झाली. पण शाळेचे नूतनीकरण काही झाले नाही. काळही पुढे पुढे धावत होता .पुन्हा तेच फादर प्रिन्सिपॉल म्हणून त्याच पॅरिसमध्ये आले. वर्गात फिरताना तुटलेली बाकडी पाहताना फादरांना मिंगूकाकांची आठवण झाली. व मनोमन त्यांनी शाळेचे नूतनीकरण करण्याचे ठरविले. पुढे विद्यार्थ्यांच्या पालक-शिक्षकासमवेत फादरांनी सभा घेऊन शाळेचे नूतनीकरण करण्याचे निश्चित केले व निधी जमवायला सुरवातही केली. गावात फिरताना फादरांना मिंगूकाकांची आठवण झाली व कार्यकर्त्यांना घेऊन ते मिंगूकाकांच्या घरी गेले. मिंगूकाकांनी फादर व कार्यकर्त्यांचे स्वागत केले.

फादरांनी शाळेच्या नूतनीकरणाचे काम हाती घेतल्याचे सांगितले व तुमच्याकडून देणगी अपेक्षित असल्याचे सांगितले. त्यावर मिंगूकाका म्हणाले, "तुम्ही खूप चांगला निर्णय घेतला आहे. त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. माझ्याकडून तुम्हाला काय अपेक्षा आहे?" फादरांना, मिंगूकाकांनी तुटलेल्या बाकड्यांची जाणीव करून दिली होती त्याची आठवण झाली व फादर बोलून गेले की "तुटलेल्या बाकडांच्या जागी नवीन बाकडी घेण्याचे ठरले आहेत. त्यासाठी तुम्ही मदत कराल ही अपेक्षा आहे.” फादरांचे म्हणणे ऐकताच मिंगूकाका आत गेले. सगळे जण एकमेकाच्या तोंडाकडे पाहू लागले. मिंगूकाका आत कशासाठी गेले असतील त्याचा कोणाला अंदाज येईना. ते फादरांकडे प्रश्नार्थक चेहऱ्याने पाहात असतानाच मिंगूकाका चेक घेऊन बाहेर आले व सही केलेला एक कोरा चेक फादरांकडे देऊन म्हणाले "हा चेक तुटलेल्या बाकड्यांच्या जागी नवीन बाकडी खरेदी करण्यासाठी व हा दुसरा चेक चर्चच्या नूतनीकरणा ऐवजी शाळेतील प्रयोगशाळेच्या उपकरणे खरेदीसाठी देत आहे. आज माझे दान सत्पात्री पडल्याचे मला समाधान लाभत आहे". ते ऐकून फादरांसहीत सर्व कार्यकर्ते स्तिमित झाले. असा होता माझा मित्र मिंगू!

एके सायंकाळी दारावरची बेल वाजली. मी पेपर वाचत हॉलमधे बसलो होतो. पेपर बाजूला ठेवला व नाराजीने दरवाजा उघडला. समोर पाहतो तर मिंगूकाका उभा. तो आत येऊन म्हणाला, "अरे चल मित्रा, आपल्याला एका अनाथालयात जायचे आहे.” कशासाठी? माझा बाळबोध प्रश्न! "ते तेथे गेल्यावर सांगतो.” आम्ही अनाथलयात पोहचलो. तिथल्या सिस्टरांनी आमचे स्वागत केले. सिस्टर आम्हाला एका प्रशस्त हॉलमधे घेऊन गेल्या. तिकडे ५०-६० खुर्च्या मांडल्या होत्या. समोरच्या स्टेजवर तयार भोजन व ताटं मांडली होती. सिस्टरांनी सर्व मुलाना बोलावले. त्यांनी मुलांना मिंगूकाकांची ओळख करून दिली. प्रार्थना म्हटली व आम्ही त्या अनाथ मुलांबरोबर सिस्टरांसमवेत एकत्र जेवण घेतलं. जेवण संपल्यावर सर्व मुलांनी मिगूकाकांना धन्यवाद म्हटले.

घरी परतताना मी मिंगूकाकाला विचारले की "त्या अनाथ मुलाना जेवण देण्याचे प्रयोजन काय? काही good news आहे का"? त्यावर तो म्हणाला "मी केले ते फक्त माझ्या आनंदासाठी. जेवताना मुलाच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मी ही सुखावलो". त्यावेळी मला वाटले धर्माचा खरा अर्थ मिंगूकाकांना कळला आहे. बायबल मधील वचन ते खऱ्या अर्थाने जगत आहे हे मला कळून चूकले.

मिंगूकाकाच्या लेखी गरीब श्रीमंत, लहान मोठा सर्व सारखेच. एखादा श्रीमंत व्यक्ती आपली श्रीमंती मिरवू लागला तर त्याला तो म्हणत असे "तुऑ बाबा धारॉ कोडॉ भरते" असे म्हणून त्याला जमिनीवर आणण्याचे काम तो करत असे. कारण त्यावेळेला जास्त जमीन असलेल्या जमीनदाराला धारा भरावा लागत असे. साहजिकच नवश्रीमंती व्यक्ती ही जमीनदार नसल्यामुळे त्याची मान आपोआप खाली जात असे.

मिंगूकाकाचे वाचन अफाट होते. महिन्याला दोन तीन पुस्तकाचा फडशा ते सहज पाडत असे. त्यामुळे समाजकारण, राजकारण व धर्मकारण ह्या विषयावर तो अधिकारवाणीने बोलत असे, परिणामी त्याच्याशी वाद घालायला कोणी धजत नसे. सरळ माणसाबरोबर सरळ व वाकड्या माणसाबरोबर वाकड्यात जायला त्याला आवडत असे व तीच त्याची खरी ओळख होती...!

# माझा 'ऑक्सिजन'

■ भरत वाळींजकर, नालासोपारा प.
फोन - 9869461011

जसं शरीरासाठी सुयोग्य प्रमाणात ऑक्सिजनची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे मनालासुद्धा योग्य प्रमाणात ऑक्सिजनची नितांत गरज असते. ज्यावेळेस शरिर व मन एकत्रितपणे एकमेकांच्या हातात हात घालून एकोप्याने नांदतील, त्यावेळेस खऱ्या अर्थाने आपण सुखीसमाधानी आणि निरोगी आयुष्याचा उपभोग घेवू शकतो.

मनस्थिती स्थिर असली की परिस्थिती आपोआप स्थिर होते. ज्याच्यामुळे मनाला सुख लाभतं, मन प्रफ्फुलित होतं, ती स्थिती म्हणजे आनंद आणि तोच आपल्या सुखी जीवनाचा ऑक्सिजन. मानसिक स्वास्थासाठी आपल्याला एखाद्या चांगल्या छंदाचा ऑक्सिजन हवा असतो.

माझ्या बाबतीत मला लाभला आहे वाचन व लिखाणाचा ऑक्सिजन. माझ्या शिक्षकी पेशातल्या आईमुळे मला लहानपणीच वाचनाची, लिखाणाची व वक्तृत्वाची आवड निर्माण झाली. मे महिन्यातील सुट्टी म्हणजे फक्त खेळ जो माझ्या किसनदादा मुळे बहरत गेला आणि उरलेल्या वेळेत भरपूर वाचन व लिखाण. ऐतिहसिक पुस्तकांचा मला जास्त जिव्हाळा... शिवाजी महाराज व बाबासाहेब आंबेडकर माझे दैवत. खऱ्या अर्थाने युगपुरुष. पुस्तके वाचायची व आवडीचे उतारे वहित लिहून ठेवायचे.

ह्याच प्रेरणेतून माझ्या कडून 'मी' लिहिले गेले. जवळजवळ विस दोनशे पानी वह्या 'मी' ह्या सदराखाली माझ्याकडून लिहिल्या गेल्यात. 'मी' म्हणजे काही प्रमाणातील माझी दैनंदिनीच. आयुष्यातल्या काही महत्वाच्या घटनाचे शब्दरूप. मनातल्या विचारांचे भाव- भावनांचे शब्दात विणकाम करायचे. एखादं छानसं तलम मलमली रेशमी वस्त्र तयार करायचं ही एक प्रकारची साहित्यिक उर्मीच म्हणावी लागेल. मनातलं कागदावर उमटावयाचे ही प्रक्रियाच किती आनदांची.. मनाला सुखावणारी..

आपले लेख दिवाळी अंकात, ख्रिस्तायन ह्या नाताळ विशेषाकांत, सृजन मासिकात, स्वेद ह्या अंकात प्रसिद्ध होतात, आपलं लिखाण लोकांपर्यंत पोहोचून त्याची पावती मिळणं आप्तस्वकियांच्या, मित्रांच्या बोलण्यातून "छान लिहितोस, लिहित रहा" असं प्रोत्साहनरूपी टॉनिक मिळणं ही खरंच सुखावणारी, समाधान देणारी गोष्ट आहे. मनाला लाभलेला ऑक्सिजनच आहे.

अनेक साहित्यिक वाचनाबरोबर वृत्तपत्र वाचन हा ही माझा बौद्धिक प्रकारातला ऑक्सिजन मिळवण्याचा हक्काचा स्तोत्र. महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्र वाचल्याशिवाय मला चैनच पडत नाही मग त्यासाठी रात्रीचे अकरा वाजले तरी मला चालते. निर्भिडपणे, निष्पक्ष, परखडपणे लिहिले जाणारे संपादकिय अग्रलेख तर माहितीचा उत्तम नमुनाच असतो. किती सखोलपणे पण तरीही विनम्रतेची किनार लाभलेले अग्रलेख मनाला खूप सकारात्मक दृष्टी देतात. सगुण-निर्गुण ही सात्विक व जीवन आनंद ही आनंदमयी लेखमाला मनाची खूप छान मशागत करतात.

ख्रिस्तायन ऑनलाईन नाताळ विशेषांक तसेच सुवार्ता नाताळ विशेषांक म्हणजे साहित्यीक मेजवानीच. जुन्या नविन लेखकांचा उत्तम मेळ जमलेले हे अंक. नवोदितांना प्रोत्साहित करणारे, उमेद देणारे, सात्विक उपदेश, उत्तम मांडणी ह्यामुळे माझ्यासाठी हे अंक म्हणजे वाचनीय खुराकच. एक प्रकारचा प्रेरणादायी ऑक्सिजनच.

एकत्र कुटुंबा साठी झटणं हाही तसा माझा मानसिक समाधानासाठी मिळत असलेला प्राणवायूच आहे. कुणाचा तरी मुलगा असणे, कुणाचा तरी भाऊ, मग कुणाचा तरी पती, मग वडिल होण्याचे भाग्य मिळणे आणि नंतर आजोबा होण्याचे परमभाग्य लाभणे... आयुष्यातल्या ह्या आनंदमयी, हव्याहव्याश्या वाटणाऱ्या पायऱ्या आपल्याही वाट्याला याव्यात आणि आपण ह्या प्रत्येक पायरीला योग्य तो सन्मान द्यावा, त्यांचा मान राखावा, त्या नात्यासाठी आपलेपणाने झटावे आणि आनंद मिळवावा म्हणजेच आपल्या जीवनाचा ऑक्सीजनच आहे...

सकाळचा माझा सर्वधर्मसमभाव हे तत्व अंगिकारलेल्या जवळजवळ पन्नास जणांचां गुड मॉर्निंग क्लब म्हणजे मानसिक आनंदासाठी लाभलेला मोठ्ठा ऑक्सिजन टँकच म्हणावा लागेल. प्रत्येकाच्या सुख दुःखात सामिल होणारा, वाढदिवस आनंदसोहळा उत्साहात साजरा करणारा , धम्माल मस्तीत पिकनिक काढणारा, नालासोपारा येथील हिरवाईच्या वनराईत भरपूर मॉर्निंग वॉक करणारा, वादविवादा सहित बॅडमिंटन खेळणारा हा क्लब म्हणजे सकाळचा प्राणवायूचा खजिनाच...

तेव्हा वाचन-लेखन, एकत्र कुटुंब आणि मित्रांबरोबरचा मॉर्निंग वॉक हाच मी जोपासलेला माझ्या मानसिक स्वास्थासाठीचा माझा ऑक्सिजनच आहे.

श्री. भरत काशिनाथ वाळिंजकर
प्रभूकृपा, समेळपाडा, म. फुले नगर
नालासोपारा (प)
9869461011

# ख्रिस्ती साहित्य संमेलने - काही गोड, काही कडू

■ कामिल पारखे
मोबाईल - ९९२२४१९२७४
camilparkhe@gmail.com

मुंबईत १९१५ साली भरलेल्या नवव्या मराठी साहित्य संमेलनात 'खिस्ती लोकांनी भाग घेतला पाहिजे' असा आग्रह रेव्ह. टिळकांनी धरला होता. "आम्हांला एक लहानसे सुंदरसे तळे किंवा सरोवर बनायचे नाही" असे प्रतिपादन रेव्हरंड नारायण वामन टिळकांनी त्याच संमेलनात केले होते. त्या पाठोपाठ कवि टिळक नाट्यसंमेलनाचे अध्यक्षसुद्धा झाले. टिळकांच्या अशा आग्रही प्रतिपादनामुळे महाराष्ट्रीय ख्रिस्ती साहित्य संमेलनाचा विचार टिळकांच्या कवितेचे संपादक रेव्ह. भास्करराव उजगरे यांच्या मनात किमान दहा वर्षे तरी आला नाही असे सुनील आढाव यांनी ‘धर्म ख्रिस्ताचा, विचार साहित्याचा’ या पुस्तकात लिहिले आहे.

टिळकांच्या निधनानंतर काही वर्षांनी पहिले मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन १८ आणि १९ एप्रिल १९२७ रोजी नाशिकमध्ये शरणपुरातल्या चर्च मिशनरी सोसायटीच्या मराठी शाळेत येथे पार पडले. त्यानंतर आजतागायत सव्वीस मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलने आणि १९९२ पासून दहा मराठी दलित ख्रिस्ती साहित्य संमेलने झालेली आहेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आणि मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलने यांच्यात तुलनात्मकरित्या पाहू गेल्यास काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात.

मराठी साहित्यात महिलांचे योगदान फार पूर्वीपासून आहे, आठ शतकांपूर्वी होऊन गेलेल्या संत मुक्ताबाईंपासून ही स्त्रीसाहित्याची परंपरा आहे. सव्वाशे वर्षांपूर्वी सुरु झालेल्या आणि आता शंभरीच्या जवळ आलेल्या मराठी साहित्य संमेलनांचे अध्यक्ष होण्याचा मान मात्र सहाच स्त्रियांना मिळाला आहे. कुसुमावती देशपांडे (ग्वाल्हेर), दुर्गा भागवत (कऱ्हाड), शांता शेळके (आळंदी ), विजया राजाध्यक्ष (इंदूर) आणि अरुणा ढेरे (यवतमाळ २०१९) आणि आताच्या संमेलनाध्यक्षा तारा भवाळकर या त्या सहा महिला संमेलनाध्यक्ष.

याउलट केवळ पस्तीस संख्येच्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनांच्या मात्र आतापर्यंत सहा महिला संमेलनाध्यक्षा झालेल्या आहेत, यापैकी पाच मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाध्यक्ष होत्या आणि एक मराठी दलित ख्रिस्ती साहित्य संमेलनाध्यक्ष होत्या.

आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यापैकी काही संमेलनाध्यक्ष एकाच घरातील वा कुटुंबातले आहेत. लक्ष्मीबाई टिळक आणि त्यांचा मुलगा देवदत्त टिळक असे मायलेक, सत्यवान नामदेव सूर्यवंशी आणि त्यांच्या बहिण रुपकुंवर सूर्यवंशी असे भाऊ-बहीण, मनोहर कृष्ण उजगरे आणि त्यांच्याच घराण्यातले निरंजन उजगरे आणि अनुपमा उजगरे हे दाम्पत्य इत्यादी.

पुण्याच्या फादर फ्रान्सिस दिब्रिटोंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष विद्याभवन हायस्कुलचे प्रिंसिपल फादर नेल्सन मच्याडो होते तर मालवणच्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष स्थानिक रोझरी चर्चचे फादर गॅब्रिएल डिसोझा होते. अहिल्यानगर येथील संमेलनाचे स्वागताध्यक्ष बिशप प्रदीप कांबळे होते. त्याचप्रमाणे दलित ख्रिस्ती साहित्य संमेलनांचे स्वागताध्यक्ष बिशप पॉल दुपारे (नागपूर), श्रीरामपूरच्या दहाव्या दलित ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष जेसुईट फादर जेम्स शेळके होते. मराठी ख्रिस्ती साहित्यप्रवाह अजूनही ख्रिस्ती धर्म आणि धर्मगुरू यांच्याच प्रभावाखाली आहे, हेच यातून दिसून येते.

मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनांत मराठी साहित्यक्षेत्रातील अनेक दिग्गज्जांनी हजेरी मांडली आहे.

पुण्यात फादर फ्रान्सिस दिब्रिटो संमेलनाध्यक्ष असलेल्या संमेलनावेळी शांता शेळके उदघाटक होत्या, मालवणच्या निरंजन उजगरे अध्यक्ष असलेल्या संमेलनाचे उदघाटक त्यावेळचे शिवसेनेचे स्थानिक आमदार नारायण राणे होते. समाजवादी विचारवंत ग. प्र. प्रधान उपस्थित होते. मुंबईच्या विजया पुणेकर संमेलनाध्यक्ष असताना कविवर्य नारायण सुर्वे प्रमुख पाहुणे होते. जालना येथील १९९३च्या दुसऱ्या दलित ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे मुख्य वक्ते समाजवादी नेते, माजी मंत्री भाई वैद्य होते. नागपूरच्या मराठी दलित ख्रिस्ती साहित्य संमेलनात साहित्यिक वामन निंबाळकर हे एक व्याख्याते होते.

वादविवाद, आरोपप्रत्यारोप नाही तर मराठी साहित्य संमेलन नाही. ख्रिस्ती साहित्य संमेलनेही यापासून लांब राहिलेली नाही, 'ख्रिस्ती साहित्य' या शब्दाची व्याख्या, येशू ख्रिस्ताला विद्रोही संबोधने योग्य आहे का, दलित ख्रिस्ती हा अमंगळ शब्दप्रयोग अशा अनेक वादांनी ही संमेलनेही गाजलेली आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि विद्रोही साहित्य संमेलन यांच्यांमध्ये जसे विळ्या-भोपळ्याचे सख्य किंवा छत्तीसावा आकडा आहे. तसे मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन आणि मराठी दलित ख्रिस्ती साहित्य संमेलन यांच्याबाबत म्हणता येणार नाही. इथे इकडून तिकडे आणि तिकडून इकडे येणाऱ्या साहित्यिकांचे प्रमाण भरपूर आहे. या दोन्ही प्रवाहांमध्ये कडेकोट अभेद्य भिंती कधीही राहिल्या नाहीत.

विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेले य. दि. फडके नंतर अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. तसेच नव्वदच्या दशकात ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेले फादर फ्रान्सिस दिब्रिटो २०२० साली अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे

अध्यक्ष झाले. याचप्रमाणे सत्तरच्या दशकात दोन मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषवणारे सत्यवान नामदेव सूर्यवंशी हे नव्वदच्या दशकात दलित ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनले.

यांउलट दलित ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे आधी अध्यक्ष झालेल्या ग्रामीण साहित्यिक देवदत्त हुसळे यांची नंतर मराठी ख्रिस्ती साहित्य संमलेनाचे अध्यक्षपदी निवड झाली होती. त्याचप्रमाणे रामकुंवर सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगर येथे १९८१ साली झालेल्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष असलेले डॉ. एस. के. हळबे दशकानंतर त्याच शहरात अरविंद निर्मळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या मराठी दलित ख्रिस्ती साहित्य संमेलनाचेसुद्धा स्वागताध्यक्ष होते.

संमेलनाध्यक्ष निवड पद्धत, संमेलनांसंबंधी विविध वाद याबाबत मुख्य प्रवाहाच एक छोटासा प्रवाह असलेले मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन याबाबतीत काय म्हणून मागे राहिल? मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाध्यक्षांच्या निवडीबाबत १९७२ पासून एक अलिखित संकेत आहे, तो म्हणजे एकदा कॅथोलिक आणि त्यानंतर प्रोटेस्टंट असे साहित्यिक या पदासाठी आलटूनपालटून निवडले जातात.

आलटूनपालटून कॅथोलिक आणि प्रोटेस्टंट संमेलनाध्यक्ष या अलिखित संकेताचे मध्यंतरी काहीकाळ इमानेइतबारे पालन करण्यात आलेले नाही. नाशिक येथील संमेलनाध्यक्ष सिसिलिया कार्व्हालो या कॅथोलिक साहित्यिकाने भूषवल्यानंतर अहिल्यानगर येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रोटेस्टंट पंथीय देवदत्त हुसळे झाले. त्यानंतर लागोपाठ झालेल्या दोन साहित्य संमेलनांचे अध्यक्ष - अनुपमा निरंजन उजगरे आणि सुभाष पाटील - हे दोघेही प्रोटेस्टंटच होते.

त्याआधीसुद्धा असाच प्रकार एकदा झाला होता. कॅथोलिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्यानंतर प्रोटेस्टंट निरंजन उजगरे संमेलनाध्यक्ष झाले, त्यांच्यानंतर लागोपाठ दुसरे प्रोटेस्टंट सुधीर देवीप्रसाद शर्मा संमेलनाध्यक्ष झाले होते.

आलटूनपालटून कॅथोलिक आणि प्रोटेस्टंट संमेलनाध्यक्ष या पायंड्यातून वास्तवात अजाणता आणखी एक वेगळाच अलिखित संकेत निर्माण झालेला असतो. तो म्हणजे कॅथोलिक म्हणजे वसईकडचा साहित्यिक आणि प्रोटेस्टंट म्हणजे वसई उर्वरीत महाराष्ट्रातील प्रोटेस्टंट संमेलनाध्यक्ष बनलेले आहेत. आतापर्यंत होऊन गेलेल्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर वसईबाहेरच्या महाराष्ट्रातील एकही कॅथोलिक साहित्यिकाची निवड झालेली नाही.

मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाध्यक्ष हे पद भूषवलेल्या व्यक्तींच्या नावावर एकही पुस्तक नाही वा संमेलनाध्यक्षपदावर निवड होईपर्यंत एकही पुस्तक नव्हते असे अनेकदा झाले आहे. याचे कारण म्हणजे निवडणुकीशी निगडित असलेले हितसंबंधींचे राजकारण, संमेलनाध्यक्षपद आलटूनपालटून आपापसांत वाटून घेण्यासाठी ख्रिस्ती साहित्य परिषदेत सक्रिय असणाऱ्या व्यक्तींनी वेळोवेळी केलेली हातमिळवणी.

याच कारणास्तव पात्र असलेले अनेक व्यक्तींनी निवडणुकीच्या फडातून सपशेल माघार घेतली आहे. याचा फायदा साहित्यिक योगदानाच्या निकषावर अपात्र असलेल्या व्यक्ती संमेलनाध्यक्षपदी आरूढ झालेल्या दिसतात. रमण रणदिवे, जोसेफ तुस्कानो, फ्रान्सिस कोरिया आणि अनिल दहिवाडकर अशी मोलाची साहित्यिक सेवा करणारी माणसे या संमेलनाध्यक्षपदापासून लांब राहिली आहेत.

मराठी ख्रिस्ती साहित्यविश्वात अनेक वर्षांपासून सातत्याने लिहित असलेल्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागांतल्या बार्देसकर मंडळींचा मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनांत आजपर्यंत पुरेसा सहभाग झालेला नाही. त्याचप्रमाणे कोकणातील सिंधुदुर्ग, मालवण आणि वेन्गुर्ला परिसरातील मोठ्या संख्येने असलेला आणि मूळचा गोवन असलेला ख्रिस्ती समाज आजही या साहित्यिक चळवळीपासून लांब राहिलेला आहे.

मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलने अनेकदा ठराविक काळानंतर होत नसल्याने या संमेलनांचा हा प्रवाह अधूनमधून डबके, सरोवर होते कि काय अशी शंका येते. गेली अनेक वर्षे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने दरवर्षी भरवली जातात, तसे मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनांचे नाही. सन १९२७ नंतर वेगाने लागोपाठ चार साहित्य संमेलने झाली, त्यानंतर पन्नासच्या दशकात पुन्हा तीन संमेलने एक वर्षांच्या अंतराने झाली. मात्र पुन्हा १९७२ सालापर्यंत या आघाडीवर एकदम सामसूम होती. सुरुवातीच्या काळात आणि स्वातंत्र्यानंतर पन्नाशीच्या दशकात ख्रिस्ती साहित्य संमेलने दरवर्षी लागोपाठ आयोजित केली जायची. आता ही परंपरा खंडित झाली आहे. सोलापूर येथे झालेल्या २०१४ साली झालेल्या संमेलनानंतर पुढचे संमेलन तब्बल नऊ वर्षानंतर २०२२ साली घेण्यात आले.

याआधीचे मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन पौलस वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बीड येथे २०२२ साली झाले होते, त्यानंतर तीन वर्षे साहित्य संमेलने झालीच नाही. आता नाशिक येथे २०२६च्या वर्षारंभात सायमन मार्टिन यांच्या अध्यक्षतेखाली सत्ताविसावे साहित्य संमेलन होत आहे. मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनांचे यजमानत्व स्विकारण्यात राज्यातील विविध शहरांतील साहित्यप्रेमी, हौशी कार्यकर्ते आणि संस्था हिरीरीने पुढे येत असतात. त्याशिवाय साहित्य संमेलनाध्यक्ष होण्यास अनेक जण रांगेत असतात. या संमेलनांचे डबके किंवा सरोवर होऊ नये यादृष्टीने नियमीतपणे दरवर्षी साहित्य संमेलने घेणे आवश्यक आहे. मराठी ख्रिस्ती साहित्य विश्वात त्यामुळे चैतन्य निर्माण होईल. मात्र दरवर्षी ही साहित्य संमेलने भरवण्यात मराठी ख्रिस्ती साहित्य परिषदेचे पदाधिकारी नाखूष असतात हे योग्य नाही.

# कृत्रिम बुद्धिमत्ता (AI): भारताच्या नागरी प्रशासनाची नव्याने कल्पना

**■ चिन्मय गवाणकर, वसई**



"या रस्त्यांवरचे खड्डे कधी भरणार?", "श्वास घ्यायलाही त्रास होतोय, इतके प्रदूषण का वाढले आहे?", "आज परत नळाला पाणी आले नाही!", "सरकारी दवाखान्यात नंबरच लागत नाही...", "बस वेळेवर येत नाही आणि आली तरी गर्दीने खचाखच भरलेली असते...", "घरासमोरचा कचरा उचलून न्यायला कोणी येणार आहे की नाही?"

ही वाक्ये भारतातील कोणत्याही शहरात राहणाऱ्या नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. आपली शहरे संधी आणि प्रगतीची केंद्रे असली तरी, ती नागरिकांसाठी दररोजच्या संघर्षाची ठिकाणे बनली आहेत. या समस्या केवळ गैरसोयीच्या नाहीत, तर त्या सार्वजनिक आरोग्य, आर्थिक उत्पादकता आणि सामाजिक न्यायाच्या मार्गातील मोठे अडथळे आहेत. या समस्यांचे मूळ केवळ वरवरच्या त्रुटींमध्ये नाही, तर ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (ULBs) म्हणजेच महानगरपालिकांच्या प्रणालीगत, आर्थिक आणि कार्यात्मक अपयशामध्ये खोलवर रुजलेले आहे.

या निराशाजनक चित्रात, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) एक आशेचा किरण म्हणून उदयास येत आहे. AI केवळ एक नवीन तंत्रज्ञान नाही, तर ते नागरी प्रशासनाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून, आपल्या शहरांना खऱ्या अर्थाने 'सुजाण' बनवण्याची क्षमता ठेवते.

**'स्मार्ट सिटी मिशन': एक अपूर्ण स्वप्न आणि त्यातून मिळालेला धडा**

२०१५ मध्ये भारत सरकारने मोठ्या उत्साहात 'स्मार्ट सिटी मिशन' (SCM) सुरू केले. याचा उद्देश १०० निवडक शहरांना तंत्रज्ञानाच्या मदतीने राहण्यासाठी अधिक सुलभ, टिकाऊ आणि प्रगत बनवणे हा होता. या मिशनने AI, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) आणि डेटा ॲनालिटिक्स यांसारख्या 'स्मार्ट सोल्यूशन्स'चा वापर करून शहरांना अधिक कार्यक्षम बनवण्याचे स्वप्न पाहिले.

परंतु अंमलबजावणीतील त्रुटी, संकल्पनात्मक अस्पष्टता आणि प्रशासकीय अपयशामुळे ते आपल्या उद्दिष्टांपासून भरकटले. 'स्मार्ट सिटी' म्हणजे नेमके काय, याची कोणतीही स्पष्ट व्याख्या मिशनमध्ये नव्हती. मिशनच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक शहरात एक विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle - SPV) स्थापन करण्यात आले, ज्यामुळे लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था बाजूला सारल्या गेल्या आणि एक समांतर, उत्तरदायित्व नसलेली प्रशासन व्यवस्था निर्माण झाली. या मिशनने शहर-व्यापी उपायांपेक्षा 'क्षेत्र-आधारित विकासा'वर अधिक भर दिला, ज्यामुळे शहरांमध्ये आधुनिकतेची छोटी-छोटी बेटे तयार झाली, परंतु शहरातील पाणीपुरवठा, वाहतूक किंवा कचरा व्यवस्थापना सारख्या मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष झाले. खासगी गुंतवणूक आकर्षित करण्यातही हे मिशन अपयशी ठरले. 'स्मार्ट' होण्याच्या नादात, तंत्रज्ञान स्थापित करणे हेच एक उद्दिष्ट बनले आणि त्यातून कोणत्या ठोस नागरी समस्या सुटतात याकडे लक्ष दिले गेले नाही.

स्मार्ट सिटी मिशन हे एक अपूर्ण स्वप्न असले तरी, त्यातून मिळालेला धडा मौल्यवान आहे. केवळ तंत्रज्ञान आणून शहरांचा कायापालट होत नाही. त्यासाठी स्पष्ट दृष्टीकोन, मजबूत स्थानिक प्रशासन आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. भविष्यात AI चा वापर करताना या चुका टाळणे महत्त्वाचे ठरेल.

**कृत्रिम बुद्धिमत्ता (AI): नागरी समस्यांवर एक प्रभावी उपाय**

AI केवळ कार्यक्षमता वाढवणारे एक साधन नाही, तर ते प्रशासनाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता ठेवते. तक्रार-आधारित आणि प्रतिक्रियात्मक (reactive) प्रशासनाकडून डेटा-आधारित आणि पूर्वानुमानित (proactive) प्रशासनाकडे होणारे हे स्थित्यंतर, शहरांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी एक नवीन मार्ग दर्शवते.

**१. रस्त्यांची दुरवस्था आणि वाहतूक कोंडी:**

सध्या, रस्त्यांवर मोठे खड्डे पडल्यानंतर आणि नागरिक तक्रार केल्यानंतरच ते दुरुस्त केले जातात. AI या पद्धतीत बदल घडवू शकते. उपग्रह प्रतिमा, ड्रोन आणि वाहनांवर लावलेले सेन्सर्स यांच्याद्वारे गोळा केलेल्या डेटाचे विश्लेषण करून, AI अल्गोरिदम रस्त्यांवरील लहान भेगा आणि खड्डे मोठ्या समस्या बनण्यापूर्वीच ओळखू शकतात. यामुळे महानगरपालिकांना वेळेवर दुरुस्ती करता येते, देखभाल खर्च कमी होतो आणि अपघात टाळता येतात.

शहरातील वाहतूक कोंडीवर AI-आधारित 'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' (ITMS) एक प्रभावी उपाय देऊ शकते. शहरातील CCTV कॅमेरे आणि सेन्सर्सकडून मिळणाऱ्या रिअल-टाइम वाहतूक डेटाचे विश्लेषण करून, AI वाहतूक सिग्नलच्या वेळा

आपोआप समायोजित करते. यामुळे वाहनांचा प्रवाह सुरळीत राहतो आणि अनावश्यक गर्दी टाळता येते.

**२. कचरा व्यवस्थापन:**

कचरा संकलनाची सध्याची पद्धत निश्चित मार्गांवर आणि वेळापत्रकानुसार चालते. AI या प्रक्रियेत क्रांती घडवू शकते. GPS-सक्षम ट्रक आणि स्मार्ट कचराकुंड्या (ज्या भरल्यावर आपोआप सिग्नल देतात) यांच्या डेटाचे विश्लेषण करून, AI कचरा संकलनासाठी सर्वात कार्यक्षम मार्ग तयार करू शकते. यामुळे इंधनाची बचत होते आणि परिसर स्वच्छ राहतो. प्रक्रिया केंद्रांवर, AI-सक्षम संगणक दृष्टी (computer vision) प्रणाली ओला, सुका, प्लास्टिक, धातू यांसारख्या विविध प्रकारच्या कचऱ्याचे स्वयंचलितपणे वर्गीकरण करू शकते, ज्यामुळे पुनर्वापराचे प्रमाण वाढते.

**३. पाण्याची टंचाई आणि प्रदूषण:**

भारतीय शहरांमध्ये पाणीपुरवठा नेटवर्कमधील गळतीमुळे ५०% पर्यंत पाणी वाया जाते. AI या समस्येवर मात करू शकते. पाणीपुरवठा नेटवर्कमध्ये IoT सेन्सर्स बसवून, संपूर्ण प्रणालीचा एक 'डिजिटल ट्विन' (Digital Twin) तयार केला जाऊ शकतो. AI अल्गोरिदम या रिअल-टाइम डेटामधील विसंगती ओळखून, पाण्याची गळती जमिनीवर दिसण्यापूर्वीच तिचे अचूक ठिकाण शोधू शकते. तसेच, AI-सक्षम सेन्सर्स पाण्याच्या गुणवत्तेवर रिअल-टाइममध्ये लक्ष ठेवू शकतात आणि कोणत्याही प्रकारच्या प्रदूषणाचा धोका निर्माण झाल्यास त्वरित इशारा देऊ शकतात.

**४. अपुरी आरोग्यसेवा:**

AI आरोग्य नोंदी, बातम्या आणि हवामान डेटा यांसारख्या विविध स्त्रोतांकडून मिळणाऱ्या डेटाचे विश्लेषण करून, डेंग्यू, मलेरिया किंवा इतर सांसर्गिक रोगांच्या साथीचा अंदाज अधिक अचूकपणे आणि वेळेवर लावू शकते. यामुळे सार्वजनिक आरोग्य यंत्रणांना प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. राष्ट्रीय टेलिमेडिसिन प्लॅटफॉर्म 'ई-संजीवनी' मध्ये AI-आधारित 'क्लिनिकल डिसीजन सपोर्ट सिस्टीम' (CDSS) समाविष्ट केली आहे, जी डॉक्टरांना संभाव्य निदानांची शिफारस करते.

**भारतातील यशस्वी AI प्रयोगांच्या प्रेरणादायी कथा**

AI ची क्षमता केवळ सैद्धांतिक चर्चेपुरती मर्यादित नाही. भारतातील अनेक शहरांनी आधीच AI चा वापर करून आपल्या गंभीर नागरी समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्यास सुरुवात केली आहे.

**सुरत: स्वच्छता आणि सुव्यवस्थेसाठी AI-सक्षम प्रहरी**

रस्त्यांवरील मोकाट जनावरे आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकणे या समस्यांवर सुरत महानगरपालिकेने आपल्या CCTV नेटवर्कचा वापर करून एक अभिनव AI प्रणाली तैनात केली. हा AI अल्गोरिदम मोकाट जनावरांना ओळखतो आणि जमिनीवरील पथकाला सतर्क करतो. तसेच, सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकणाऱ्या किंवा थुंकणाऱ्या वाहनांच्या नंबर प्लेट ओळखून स्वयंचलितपणे चलन जारी करतो. या प्रणालीमुळे १,५४५ पेक्षा जास्त मोकाट जनावरांच्या घटना शोधण्यात आल्या आणि कचरा फेकण्यासाठी व थुंकण्यासाठी लाखो रुपयांचा दंड वसूल करण्यात आला, ज्यामुळे सुरतला 'स्वच्छ सर्वेक्षण' क्रमवारीत उच्च स्थान मिळवण्यात मदत झाली.

**पुणे : 'डिजिटल ट्विन'द्वारे पाण्याची नासाडी रोखणे**

पुणे शहराने आपल्या पाणीपुरवठा नेटवर्कचा AI-सक्षम 'डिजिटल ट्विन' तयार केला. ही प्रणाली सेन्सर्सकडून मिळणारा रिअल-टाइम डेटा वापरून पाण्याच्या गळती आणि अनधिकृत नळजोडण्या त्वरित ओळखते. या प्रयोगामुळे प्रायोगिक क्षेत्रातील 'विना-महसुली पाणी' (Non-Revenue Water) चे प्रमाण ५०% वरून २५% पर्यंत खाली आले.

**जबलपूर : AI आणि ड्रोनद्वारे महसूल वाढवणे**

मालमत्तांच्या अनधिकृत विस्तारांमुळे महानगरपालिका मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर महसुलाला मुकतात. जबलपूर प्रशासनाने ड्रोनद्वारे हवाई सर्वेक्षण करून आणि AI अल्गोरिदम वापरून अनधिकृत बांधकामे स्वयंचलितपणे ओळखली. यामुळे असे आढळून आले की शहरातील २०% मालमत्तांचा बेकायदेशीरपणे विस्तार झाला होता. या माहितीच्या आधारे, महानगरपालिकेने अतिरिक्त ३० कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला, ज्यामुळे शहराची आर्थिक स्थिती थेट मजबूत झाली.

**बंगळूरु आणि अहमदाबाद : वाहतूक कोंडीवर मात**

या शहरांनी 'अनुकूल वाहतूक नियंत्रण प्रणाली' (Adaptive Traffic Control Systems) लागू केली आहे. ही प्रणाली चौकांमधील वाहनांच्या घनतेच्या रिअल-टाइम डेटाचे विश्लेषण करून वाहतूक सिग्नलच्या वेळा आपोआप बदलते, ज्यामुळे वाहतूक कोंडी कमी झाली आहे.

या यशस्वी प्रयोगांमधून एक महत्त्वाचा धडा मिळतो. AI चा खरा फायदा तेव्हा होतो, जेव्हा त्याचा वापर विशिष्ट, मोजता येण्याजोग्या आणि नागरिकांच्या जीवनावर थेट परिणाम करणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी केला जातो.

**भविष्यातील महानगरपालिका: AI-चालित, कार्यक्षम आणि नागरिक-केंद्रित**

AI च्या मदतीने भविष्यातील महानगरपालिकेचे चित्र कसे असेल, याची कल्पना करणे रोमांचक आहे. ही महानगरपालिका प्रतिक्रियात्मक (reactive) आणि तक्रार-आधारित नसेल, तर ती पूर्वानुमानित (proactive) आणि डेटा-आधारित असेल. ती समस्या निर्माण होण्यापूर्वीच तिचा अंदाज घेईल.

शहराच्या कानाकोपऱ्यात बसवलेले IoT सेन्सर्स, कॅमेरे, ड्रोन आणि नागरिकांच्या मोबाईल ॲप्समधून डेटा अविरतपणे एका केंद्रीय AI इंजिनमध्ये प्रवाहित होईल. हे AI इंजिन शहर व्यवस्थापकांना संपूर्ण शहराचे एक समग्र चित्र देईल. कचरा व्यवस्थापन प्रणाली कचराकुंड्या भरण्याच्या वेगाचा अंदाज घेऊन संकलनाचे मार्ग आपोआप निश्चित करेल. पाणीपुरवठा प्रणाली पाण्याच्या वापराच्या पॅटर्ननुसार दाब नियंत्रित करेल आणि संभाव्य गळतीचा इशारा देईल.

AI प्रशासनाला अत्यंत पारदर्शक बनवू शकते. कोणते रस्ते दुरुस्त करायचे किंवा कोणत्या भागात गुंतवणूक करायची, हे निर्णय राजकीय सोयीनुसार नव्हे, तर सत्यापित डेटाच्या आधारे घेतले जातील. महानगरपालिकेच्या कामाची प्रगती सार्वजनिक डॅशबोर्डवर रिअल-टाइममध्ये प्रदर्शित केली जाऊ शकते, ज्यामुळे अधिकारी थेट नागरिकांना जबाबदार राहतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, AI समानतेचे एक शक्तिशाली साधन बनू शकते. शहरातील सेवा वितरणातील तफावत रिअल-टाइममध्ये मॅप करून, AI प्रशासनाला संसाधने सर्वात जास्त गरज असलेल्या आणि दुर्लक्षित भागांकडे वळवण्यासाठी मदत करू शकते.

हे भविष्य प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही, त्यासाठी संस्थात्मक सुधारणा आणि राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना हे नवीन तंत्रज्ञान वापरण्यासाठी प्रशिक्षित करणे, शहरांमध्ये मजबूत डेटा पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आणि डेटाची गोपनीयता व AI च्या नैतिक वापराबाबत स्पष्ट धोरणे तयार करणे आवश्यक आहे.

भारताच्या शहरांना संधी आहे की ते जुन्या, कुचकामी प्रशासकीय पद्धतींना मागे टाकून, AI च्या मदतीने एक नवीन, उज्ज्वल आणि न्याय्य भविष्य घडवू शकतात. हे भविष्य केवळ 'स्मार्ट' नसेल, तर ते खऱ्या अर्थाने 'सुजाण' असेल, जिथे प्रत्येक नागरिकाला स्वच्छ हवा, पुरेसे पाणी, सुरक्षित रस्ते आणि एक उत्तम दर्जाचे जीवन मिळेल. ही केवळ एक तांत्रिक क्रांती नसेल, तर ती सुशासनाची आणि नागरिक-केंद्रित सेवेची एक नवीन पहाट असेल.

# रमाचा शिक्षक दिन

■ क्लेमेंट डिमेलो, नंदाखाल
9082318532/9011574814

रमा ही माझी मुलगी. सर्व जिल्ह्यात उत्तम जलतरुणपटू म्हणून नाव कमावलेली व आता इयत्ता बारावीत कला शाखेत शिकत असलेली. काही  दिवसांपूर्वीच तिने माझ्याकडे गावी जाण्याचा हट्ट केला. तसे आम्ही गणपतीच्या सुट्टीत गावी कोकणात जातोच. पण ह्यावेळेला तिच्या मनात काहीतरी बेत होता हे नक्की! पण काय ते मला कळेना! मी तिला तसे विचारलेदेखील; पण तिने मला काही सांगितले नाही. मग मी ही जास्त खोलात शिरलो नाही. ज्या दिवशी आम्ही गावी जाणार होतो, त्याच्या आदल्या दिवशी तिने भरपूर खरेदी केली होती. ह्या वेळेला मात्र तिने खरेदीसाठी स्वत:चा पॉकेटमनी व तिला निरनिराळ्या ठिकाणी मिळालेली बक्षिसाची रक्कम वापरली होती.

प्रवासात असताना मी न राहवून तिला विचारलेच, "रमा, काय चाललंय तूझं? इतकी खरेदी का?" तेव्हा तिने माझ्याकडे पाहत दोन शब्द उच्चारले, "गुरूदक्षिणा"  अन मग पुढे म्हणाली, "आता आणखी काही विचारू नका?" तिने विचारांचा भुंगा माझ्या डोक्यात सोडून दिला. तो आता गावी पोहचेपर्यंत माझा मेंदू पोखरणार होता हे नक्की!

शेवटी एकदाचे गावी पोहचलो. गावच्या घरात स्थिरस्थावर झालो. मोठ्या भावाकडे दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू होती. तिथेही जाऊन आलो. सगळे देवाची मूर्ती आणायला जाण्यासाठी जय्यत तयारी करत होते. मी आणि रमानेही त्यात सामिल व्हायचे ठरवले. सगळे संध्याकाळी निघणार होते. तो पर्यंत दुपार हाती होती. मी घरी आल्यावर रमाने विचारले, "बाबा, आपण वाडीत जाऊ या का?" मी क्षणात होकार दिला. गावी आल्यावर मी आणि रमा पाय मोकळे करायला आमच्या वाडीत जायचो. तिथल्या आमराईत फिरायला आम्हांला आवडायचे. जाताना रमाने सोबत अनेक पिशव्या घेतल्या. तिने खरेदी केलेल्या सर्व वस्तू त्यात होत्या.

"अगं, ह्या सर्व वस्तू का सोबत घेते आहेस?"

"म्हादू काकांसाठी!" तिने माझा अंत न पाहता गौप्यस्फोट केला.

वाडीत म्हादू काकांच्या झोपडीसमोर पोहचलो; तेव्हा म्हादूकाका शेतीच्या अवजारांची काहीतरी डागडुजी करत होते. आम्हां दोघांना पाहून ते उठले. त्यांनी हात जोडून नमस्कार केला. रमाने त्यांच्या पायांना स्पर्श केला, अन तिच्या हातातल्या पिशव्या माझ्याकडे देत त्या

म्हादूकाकांना द्यायला सांगितल्या. मी त्या पिशव्या म्हादूला दिल्या. तिने म्हादूचे हात हातात घेऊन म्हटले, "म्हादूकाका, शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!" मी आणि म्हादू ताडमाड उडालो. मी गोंधळलो होतो त्याच्या कितीतरी पटीने म्हादू गोंधळला होता. अन मग रमाने आमचा गोंधळ दूर केला.

"बाबा, म्हादूकाका माझे पहिले शिक्षक! ज्यांनी मला विहिरीत पोहायला शिकवले. तुम्हांला आठवते...? मी पोहायला शिकावे ही तुमची इच्छा होती. मला ही आवड होती. मे महिन्याच्या सुट्टीत तुम्ही शहरातल्या स्विमींगपूलवर माझी नाव नोंदणी केली. मी ही उत्साहाने तुमच्या सोबत पोहायला शिकायला निघाले. मात्र  स्विमींगपूलवरील बाकीच्या मुलांचे ते रडणे, पाण्यात उतरायला भीतीने किंचाळणे.. आणि पाण्यात टाकलेले ते ट्यूबस् पाहून मी ही घाबरले.. अन भोकांड पसरले.. स्विमींग शिकवणाऱ्या त्या माणसाने माझी खूप समजूत घातली पण मी माघार घेतली... पण तुमच्या मनात मात्र होते की, मी शिकले पाहिजे....

अन मग आपण दिवाळीच्या सुट्टीत गावी आल्यावर, तुम्ही मला वाडीत घेऊन आलात. इथल्या एका खोल विहिरीतून अनेक मुलांचा आवाज येत होता. पण त्यात भीती व रडणे नव्हते. उत्साह, आनंदाचे चित्कार होते. तुम्ही मला इथे घेऊन आलात. विहिरीत म्हादूकाका देखील पोहत होते. नवख्या मुलांना पोहायला शिकवत होते. आपण काठावरून आत डोकावत होतो. ते म्हादूकाकाने पाहिले. त्यांना काय वाटले कुणास ठाऊक? ते विहिरींच्या पायऱ्या चढून वर आले. त्यांनी तुमची परवानगी घेतली. पण मी घोरपडीसारखी तुम्हांला चिकटुन बसली होती. म्हादूकाकाने मला प्रेमाने जवळ घेतले. मगरीच्या पाठीवर बसलेल्या माकडाची गोष्ट सांगितली. तसे तुला माझ्या पाठीवर बसायला आवडेल का? म्हणून विचारले, ती गोष्ट ऐकून मी खुदकन हसले. आणि म्हादूकाकांच्या गळ्याला मिठी मारली.

ते मला त्या स्विमींगपूलवरच्या शिक्षकापेक्षा जवळचे वाटले. त्यांच्या गळ्याला मिठी मारून विहिरीतल्या पाण्यात त्यांच्यासोबत चार पाच गोलाकार फेऱ्या मारुन झाल्यावर मला हिंमत आली. श्यामची आई पुस्तकात वाचलेली, सुकडी कंबरेला बांधून पोहायला शिकवणारी पद्धत व गंमत प्रत्यक्षात अनुभवली व गावच्या मातीतला एक आत्मविश्वास घेऊन शहरात परतले....."

रमा बोलत होती. मी आणि म्हादू दिग्मुढ होऊन ऐकत होतो. शिक्षक दिनाला अद्याप वेळ होता... तोपर्यंत आम्हांला गावी थांबता येणार नव्हते; पण माझ्या रमाने मात्र एक अनोखा शिक्षकदिन आजच साजरा केला होता. माझे व म्हादूचे डोळे भरून आले होते.

# पाकीट गेले, पण कॅमेरा मिळाला, आणि मुलगीही!

## काही परदेशानुभव

■ दीपक मच्याडो, पाली

जुलै २०२४ या महिन्यात मी आणि पत्नी युरोपच्या दौऱ्यावर होतो. त्यापैकी आमचा दहा दिवसांचा दौरा जर्मनीत होता. जर्मनीला इतका वेळ देण्यामागचे कारण म्हणजे डोईचबान (जर्मन रेल्वे) ह्यांची एक योजना होती ज्यायोगे ४९ युरो (अंदाजे ४४०० रुपये) भरून महिनाभर अख्ख्या जर्मनीमध्ये तुम्ही रेल्वेने कुठेही प्रवास करू शकत होता. (सुपरफास्ट आईस (ICE) ट्रेन वगळून) इतकेच नव्हे, एखाद्या शहरात गेल्यावर तेथील ट्राम, मेट्रो आणि बस प्रवाससुद्धा त्यात तुम्ही करू शकत होता. अर्थात माझ्या मुलाने जर्मनीच्या उल्म ह्या शहरात वास्तव्य केल्यामुळे आणि जर्मनीभर केलेल्या भ्रमंती मुळे त्याला तेथील सर्व गाड्यांची आणि स्थळांची इत्यंभूत माहिती होती. आम्ही त्याच्याबरोबरच प्रवास करत होतो.

डुसेलडॉर्फ, आखेन, ट्रीअर, कोलोन, मानहाइम अशी ऐतिहासिक शहरे पाहिल्यानंतर आम्ही उल्म या शहराकडे जात होतो. उल्म हे स्टुटगार्ट-म्युनिक मार्गावर वसलेले एक छोटेखानी शहर आहे. जर्मन रेल्वेचे जाळे विस्तीर्ण आहे परंतु त्या यंत्रणेला सध्या मात्र एका त्रुटीने ग्रासले आहे. ते म्हणजे अनेक गाड्यांना विलंब होत असतो. आम्ही मानहाइमहून गाडी पकडली आणि कार्ल्सरुहे ह्या स्टेशनवर आम्ही स्टुटगार्ट मार्गे उल्मकडे जाणारी दुसरी गाडी पकडणार होतो. परंतु आमची गाडी जवळ जवळ वीस मिनिटे उशिरा धावत होती. कार्ल्सरुहे स्टेशनवर आम्ही जी गाडी पकडणार होते ती सुटायची वेळ झाली होती. आमच्या गाडीतले बहुतेक प्रवासी तसेच होते. सर्वांनी या गाडीतून उतरून धावत जिना उतरून आणि शेजारच्या फलाटावर चढून जाण्याची तयारी केली होती. आम्ही उतरलो. हातात बॅगा घेऊन धावपळ करीत जीना चढणे उतरणे जरा जिकिरीचे होते पण धापा टाकत आम्ही ती दुसरी गाडी पकडली. आता संध्याकाळी उल्मला पोहोचून माझ्या मुलाच्या मित्राच्या घरी निवांत तीन दिवस काढायचे होते. गाडीतून जर्मन ग्रामीण भागाच्या रमणीय भूप्रदेशाचे अवलोकन करता करता मी माझ्या पॅन्टच्या मागील खिशाला हात लावला आणि एकदम धस्स झाले. माझे

पाकीट गायब झाले होते. सीटखाली वगैरे शोधले पण नाही सापडले. आता ते गाडी बदलण्याच्या घाईगर्दीत पडले की खिसेकापूने मारले ते समजण्याचा मार्ग नव्हता. पण एक आठवले. गाडीच्या दाराजवळ तीन पुरुष आणि एक स्त्री, गाडीत बसायची जागा असून देखील सतत उभे होते ते आम्ही पाहिले होते. ती पाकीटमारांची टोळी असावी का? मुलांने सांगितल्याप्रमाणे आम्ही लागलीच पुढच्या स्टेशनवर उतरलो.

**आणि आम्ही पोहोचलो जर्मन पोलीस स्टेशनमध्ये**

परंतु आपल्या येथील स्टेशन्स सारखी तेथील छोट्या स्टेशन्सवर चोवीस तास कर्मचारी तैनात नसतात. दुपारच्या एक वाजेपर्यंतची वेळ होती आणि आम्ही दोन वाजता पोचलो होतो. शेवटी स्टुटगार्ट शहराच्या हद्दीत तो विभाग असल्यामुळे पुढच्या गाडीने स्टुटगार्ट येथे गेलो. तिथे रेल्वेच्या "लॉस्ट अँड फाउंड" विभागात पाकीट हरवल्याची नोंद करून घेतली. परंतु पाकिटात फक्त पैसेच नव्हते तर माझे भारतीय क्रेडिट कार्ड आणि दोन डेबिट कार्ड होते. त्या करता पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवणे आवश्यक होते. स्टुटगार्ट स्टेशनच्या जवळ असलेल्या पोलीस स्टेशनचा पत्ता मुलाने जीपीएसद्वारे शोधला आणि आम्ही निघालो. पर्यटन करताना पोलीस स्टेशनची वारी करण्याचा हा पहिलाच अनुभव होता.

येथे पहिल्यांदा 'कल्चर शॉक' काय असतो तो नजरेस आला. बाहेर पानाच्या पिचकाऱ्या टाकीत आणि "काय काम आहे" असे खोचकपणे विचारणारा कोणी हवालदार बसला नव्हता. बंद दाराच्या बाहेर आपण बेल दाबल्यावर दारावरच्या स्पीकरफोन वरून आपले काम काय ते विचारले जाते. नंतर रिमोट कंट्रोलने तो दरवाजा उघडला जातो. आम्ही आतमध्ये गेल्यावर आम्हाला बसण्यास सांगितले गेले. महत्त्वाचे म्हणजे सर्व पोलिसांना इंग्रजी भाषा समजत होती आणि चांगली बोलताही येत होती. थोड्याच वेळाने साधारण २५ ते ३० वर्षे वयाची एक स्मार्ट आणि सुंदर अशी महिला कॉन्स्टेबल आली आणि तिने सर्व काही वृत्तांत लिहून घेतला. पासपोर्ट मागितला आणि काही वेळाने तुमचा रिपोर्ट जनरेट करते असे आश्वासन देऊन आतमध्ये गेली. साधारण वीस मिनिटांनी तिने बाहेर येऊन तो एफआयआर फॉर्म दाखवला. त्या वरचे नावाचे वगैरे तपशील बरोबर आहेत की नाही याची माझ्याकडून खात्री करून घेतली. आणि मग पाच मिनिटात इन्स्पेक्टरची सही घेऊन दोन प्रती मला दिल्या. या सर्व सोपस्कारांदरम्यान तिचे बोलणे अत्यंत नम्र होते. चेहरा हसतमुख होता आणि कोणत्याही वांशिक भेदभावाचा लवलेशही नव्हता. आमच्यासाठी रिमोट कंट्रोलद्वारे परत बाहेर जाण्याचा दरवाजा उघडला गेला आणि एक अविस्मरणीय असा अनुभव घेऊन त्या पोलीस स्टेशनमधून आम्ही बाहेर पडलो. होय, पाकिट, पैसे आणि इतर ऐवज गेल्याचे दुःख जरूर जाणवत होते पण शेवटी तो देखील एक अनुभवच होता. पोलीस

स्टेशनमध्ये जाण्याआधी स्टुटगार्ट स्टेशनच्या "लॉस्ट अँड फाउंड" विभागामध्येही टाकणार नोंदवली होती. परंतु त्यानंतर एक दोन महिन्यांपर्यंत वाट पाहून सुद्धा (अर्थात मुलाद्वारे) पाकिटचा शोध लागला नाही.

**पण हरवलेला कॅमेरा मात्र सापडला.**

त्या अगोदरच्या काळात गोथेनबर्ग, स्वीडन, येथे मुलगा पदव्युत्तर शिक्षण घेत होता तेथे पत्नीसह जाऊन आलो. गोथेनबर्ग, हे स्वीडनचे दुसऱ्या मोठ्या क्रमांकाचे शहर! गोथेनबर्गहून डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगेन फक्त काही तासांवर आहे म्हणून तेथे एक दिवसाचा दौरा काढायचे आम्ही ठरविले. एक दिवस जाऊन दुसऱ्या दिवशी परतायचे असा आमचा बेत होता. फ्लिक्सबस ह्या जर्मन प्रवास कंपनीच्या बसने आम्ही दोन्ही वेळचा प्रवास आरक्षित केला होता. ठरलेल्या दिवशी सकाळी सातला आम्ही मुलासोबत निघालो आणि कोपेनहेगेन येथे दुपारी बाराच्या सुमारास पोहोचलो. हॉटेलमध्ये चेक इन करून आम्ही त्यानंतरचा संपूर्ण दिवस आणि दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत सारी प्रेक्षणीय स्थळे बघण्यात घालवला. जगप्रसिद्ध "लिटल मरमेड", आमालीएनबोर्ग राजवाडा, नीहवेन कालव्याचा परिसर आणि ह्या सर्वांची छायाचित्रे आम्ही आमच्या कॅनन एसएलआर कॅमेऱ्यात टिपत होतो, एका रम्य प्रवासाची आठवण म्हणून.

**अरे, आपला कॅमेरा कुठेय?**

दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजता आम्ही गोथेनबर्गला परत येणारी बस पकडली. ही बस हॅम्बर्ग, जर्मनी येथून आली होती आणि कोपेनहेगेन मार्गे गोथेनबर्गला जात होती. प्रवास निर्विघ्नपणे पार पडला आणि आम्ही रात्री दहा वाजता गोथेनबर्गला पोहोचलो. ते भले मोठे बस स्थानक पार करून आम्ही मुलाच्या राहण्याच्या ठिकाणी जाणाऱ्या ट्राम मध्ये बसलो आणि मला काहीतरी चुकल्यासारखे वाटले. आणि माझ्या छातीत धस्स झाले. आमचा कॅमेरा! आमचा कॅमेरा बसमध्येच राहिला होता. प्रश्न नुसता पन्नास हजारांचा ऐवज गमावल्याचाच नव्हता. गेल्या दहा दिवसाचे आमचे स्वीडन आणि ऑस्ट्रिया मधले फोटो आणि आता हे कोपेनहेगेनचे, सगळ्या आठवणींचा चुराडा झाला होता. शेवटी मोबाईल मधले फोटो आणि एसएलआर चे फोटो ह्यात फरक असतोच की. आम्ही त्वरित ट्राम मधून उतरलो. उलट दिशेची ट्राम घेऊन परत बस स्टॅन्ड वर आलो. तोवर अर्धा तास निघून गेला होता. स्टॅन्ड वरच्या हेल्प काउंटरवर मी तक्रार नोंदवली पण माझ्यात मुलाच्या मते त्याचा काहीही उपयोग होणार नव्हता. तीन महिन्यांनी, तुमचा ऐवज मिळाला नाही असे उत्तर येण्याची शक्यताच जास्त होती. आम्ही बस ज्या फलाटाला लागली होती तेथे गेलो. बस तर

तेथे नव्हती. बस उलट दिशेने परत जर्मनीच्या मार्गाला गेली असेल तर संपलेच सारे म्हणून मी सारी आशा सोडून दिली. मुलाने चौकशी केली असता ती बस शहरात असलेल्या त्यांच्या पार्किंगच्या जागी गेली असावी असेही सांगण्यात आले. कारण त्यावेळेला फ्लिक्सबसची कुठलीही रात्रीची ट्रिप नव्हती असे आम्हाला कळले.

त्या रात्री अत्यंत विमनस्क अवस्थेत आम्ही झोपी गेलो. आता फक्त एक आशेची तार राहिली होती. आम्ही ज्या सकाळच्या ७.०० च्या बसने कोपेनहेगेनला गेलो होतो त्याच ट्रिप वर दुसऱ्या दिवशी ती बस जाणार असेल तर निदान बसमध्ये विचारता आले असते. पण हाती लागलेल्याने तो कॅमेरा सोडला असेल तरच ना? दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच माझा मुलगा आपली सायकल काढून बस स्टॅन्ड वर गेला. हात हलवीत तो परत येईल ह्याची वाट बघत असतानाच, पावणे सातला मुलाकडून "तो" व्हॉट्स ऍप मेसेज आला. कॅमेरा सापडला! आमचा जीव एकाच नव्हे तर शंभर भांड्यांत पडला.

झाले होते ते असे. तो कॅमेरा बस कंडक्टरला मिळाला होता. माझा मुलगा त्याला सांगायला गेला तेव्हा असे दिसले की जर्मन आणि तुर्की सोडून त्या बिचाऱ्याला कुठलीच भाषा येत नव्हती. बसमध्ये चढणाऱ्या आणि तुर्की भाषा येणाऱ्या एका युवतीच्या साहाय्याने त्याची समज घालावी लागली. कॅमेऱ्यामधील माझ्या मुलाचे असलेले फोटो पाहून तो कॅमेरा आमचाच होता ह्याची ओळख पटली. शेवटी, जवळजवळ ज्याची आशा सोडूनच दिली होती अशी अनेक दृष्टीने मौल्यवान अशी वस्तू परत मिळाल्यामुळे आमच्या दौऱ्यावर जे निराशेचे सावट आले होते ते दूर झाले आणि आम्ही तो दिवस व्यवस्थित "सेलेब्रेट" केला.

**विमानातली ती मुलगी आमची ?**

त्या अगोदर चार दिवसांसाठी मी व माझी पत्नी व्हिएन्ना-साल्झबर्गचा दौरा करून आलो होतो. व्हिएन्नातून परत गोथेनबर्गला जाताना आम्हाला फ्रँकफर्टला फ्लाईट बदलायला लागली. विमानात आमच्या रो मध्ये, मी, माझी पत्नी आणि खिडकीला एक सुन्दर पंचविशीतली युवती बसली होती. नेहेमीच्या सवयीप्रमाणे माझ्या पत्नीच्या हातात एक रोजरी होती. (प्रवासात आपत्ती येऊ नये म्हणून तिचे नेहमीचे अस्त्र) त्या युवतीच्या गळ्यात सोन्याची रोजरी होती. गप्पागोष्टीच्या ओघात कळले की ती मूळची लेबॅनॉन देशातील होती आणि तिचे आईवडील स्वीडन मध्ये स्थायिक झाले होते. ती भारतातही येऊन गेली असल्यामुळे गप्पा रंगल्या. थोड्यावेळाने ती गाढ झोपी गेली. एअर हॉस्टेसने नाश्ता आणून दिला. ती युवती झोपली असल्याचे पाहून तिला न उठवता तिच्या वाट्याचा नाश्ता माझ्या पत्नीच्या हातात देऊन ती उठल्यावर तिला दे, असा प्रेमळ आणि साळसूद सल्ला देऊन गेली. तेव्हा मला एक

शंका आली. मी पत्नीला म्हटले, बहुतेक त्यांना ती आपली मुलगीच वाटली असावी. माझी शंका खरी ठरली.

विमान गोथनबर्गला उतरल्यानंतर, आमच्या सीट्स सर्वात मागे असल्यामुळे बाकीचे प्रवासी उतरेपर्यंत, मी त्या एअर हॉस्टेसशी बोलत होतो. तू इजिप्शियन वाटते असे मी तिला म्हटल्यावर, मी मोरोक्को-ट्युनिसिआ-जर्मनी अशा मिश्र भट्टीची निर्मिती आहे असे ती हसत हसत म्हणाली. ती कबुल झाली की त्यांना ती आमची मुलगीच वाटली होती. परंतू नंतर मग तिच्या पोलिश असलेल्या पर्सरबरोबर विचारविनिमय करून (तो पोलंडचा असे चर्चेअंती समजले होते.) त्यांनी आमच्या चेहेऱ्याशी त्या मुलीच्या चेहेऱ्याची तुलना केली होती आणि निष्कर्ष काढला होता की बहुदा ती आमची मुलगी नसावी. आम्हाला दोन मुलगेच आहेत आणि दोन तासांकरिता का होईना तुम्ही आम्हाला एका मुलीचे आईवडिल बनवले त्याबद्दल मी एअर हॉस्टेसचे आभार मानले. ह्या विषयावरून आम्ही खूप हसलो. आम्ही गोथनबर्गला का चाललोय ह्याचीही तिने आवर्जून चौकशी केली. आणि मुलाला भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

**भारतीयच धावले मदतीला**

काही वर्षांपूर्वी आम्ही हाँगकाँग आणि मकाऊच्या दौऱ्यावर गेलो होतो. आम्हा कुटुंबियांपुरती कस्टमाइज्ड दौरा आमच्या टूर ऑपरेटरने मॅनेज करून दिला होता. सकाळी हाँगकाँगच्या विमानतळावर उतरलो. ठरल्याप्रमाणे त्या कंपनीने नेमून दिलेला माणूस आम्हाला घ्यायला येणार होता. पण आम्ही पोहोचलो तरी त्या माणसाचा पत्ता नव्हता. त्या विशाल विमानतळावर आम्ही त्या माणसाची शोधाशोध करत होतो. अस्वस्थ होऊन येरझारा घालत होतो. तिकडचं सिमकार्डही आमच्याकडे नव्हतं. त्यामुळे त्या माणसाला फोनही करता येत नव्हता. तितक्यात आगमनकक्षातच कोणाच्या तरी प्रतिक्षेत असलेल्या एका भारतीय तरुणाने आम्हाला पाहिलं. त्याने आमच्याकडे येऊन चौकशी केली. आमची अडचण जाणून घेतल्यावर त्याने त्या एजन्सीचे फोन नंबर आहेत का हे विचारलं. ते दिल्यावर स्वतःच्या फोनवरुन त्या एजन्सीला फोन लावला. इतकंच नव्हे तर हॉटेलकडे घेऊन जाणाऱ्या बस कंपनीच्या काऊंटरपाशी आम्हाला सोडायलाही आला. मी त्याला पैसे देऊ केले. पण त्या भल्या माणसाने नम्रपणे नकार दिला. त्याच्यामुळेच आम्ही सुखरूप आमच्या हॉटेलवर पोहोचलो. त्या एजन्सीने प्रतिनिधी न पाठवल्यानेच हा गोंधळ झाला होता. त्याबद्दल मी परत आल्यावर त्यांची खरडपट्टी काढली. पण त्या भल्या तरुणाने केलेल्या मदतीमुळे आम्ही खरंच गहिरवरुन गेलो होतो. ऐनवेळी, कोणतीही ओळख नसताना केवळ भारतीय या एकाच नात्याने त्याने आम्हाला मदत केली. योगायोगाने मकाऊला फेरीने पोहोचलो

तेव्हाही असाच एक प्रसंग ओढवला. जेटी ते हॉटेलपर्यंत मोफत बससेवा असते, असं सांगण्यात आले होते. पण प्रत्यक्षात बसचा पत्ता नव्हता. त्यावेळी जेटीच्या सिक्युरिटी गार्डने आमची हिंदीमध्ये चौकशी करून स्वतःचा फोन वापरू दिला. तो एक नेपाळी होता. त्याने यापूर्वी भारतात काम केलं होतं. फोन केल्यावर कळले कि हॉटेलवर घेऊन जाणारी बस ठराविक वेळेलाच असते. त्या गार्डने आम्हाला टॅक्सी घेण्याचा सल्ला दिला, किती पैसे होतील हेही सांगितले आणि आम्ही हॉटेल कडे रवाना झालो. आधी एक भारतीय आणि नंतर भारताचाच एक शेजारी (नेपाळी) या दोघांनी आम्हाला जी मदत केली, त्याबद्दल खूप कृतज्ञता वाटली.

इतरांकडून मिळालेल्या ह्या चांगुलपणाच्या वागणुकीमुळे मी सुद्धा माझ्या परीने अडचणीत असलेल्या पर्यटकांना मदत करण्याचा प्रयत्न करतो. व्हिएन्ना मध्ये दोन दिवस काढल्यावर मी तिकडच्या वाहतूक पद्धतीशी चांगला समरस झालो होतो. तिकडच्या मेट्रो स्टेशन मध्ये मी प्रवेश करीतच होतो इतक्यात एका इराणी माणसाने मला एक विनंती केली. तो, त्याची पत्नी आणि दोन लहान बालके ह्यांच्या साठी मेट्रोची तिकिटे काढायचा प्रयत्न करीत होता. ऑटोमॅटिक मशीन असल्यामुळे त्याला ते जमत नव्हते. मी त्याला तिकिटे काढून दिली. परंतु दुसरा सल्लाही दिला. अशा अडचणीत आलेल्या पर्यटकांना लक्ष्य करून इकडचे भुरटे मदत करण्याच्या निमित्ताने गंडा घालतात किंवा पाकीट मारतात त्याबद्दल त्याला सावध केले. त्याला स्टेशनवर नेऊन कुठल्या दिशेने जाणारी गाडी घ्यायची तेही दाखवले. तसेच, आदल्या वर्षी रोम मध्ये प्रवास करताना बसची किंवा ट्रामची तिकिटे कुठे मिळतात, ती बसमधल्या मशीनमध्ये व्हॅलिडेट कशी करतात ह्याबद्दल मी अनेक गोऱ्या पर्यटकांनाही मार्गदर्शन करीत होतो. थोडक्यात, आंतरराष्ट्रीय प्रवास करीत असताना "एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ" हा मंत्र मी नित्य पाळत असतो.

लेखक : दीपक मच्याडो

(Email: deepak.machado@yahoo.com )

फोन: ९९६७२३८६११

# जाणीव

■ दुर्गाप्रसाद खांडाळेकर, 9969347106

पावसाळ्याचे दिवस होते. नेहमीप्रमाणे ऑफिसला निघतेवेळीच पाऊस पडण्याची चिन्हे दिसत होती. घरात बसूनच मस्तपैकी पावसाची मजा घ्यावी असा एक उनाड विचार मनाच्या कोपऱ्यात येत होता. पण ऑफिसमध्ये ऑडिट चालू असल्याने कामाचे काळे ढग नजरेआड करता येत नव्हते. शिवाय सौ. देखील तीच्या ऑफिसला निघून गेल्याने पाऊस एकट्यानेच एन्जॉय करण्यास मजा आली नसती या सर्व विचारांती मोठ्या नाखुशीनेच घराबाहेर पडलो.

घर स्टेशनपासून तसे लांब नाही. पण पावसामुळे रीक्षाची जरुरी होती. पावसात रीक्षाची वाट पहाणे म्हणजे देवाची वाट पाहाण्यासारखेच होते. त्यामुळे डोक्याला छत्रीचा आधार या विचाराने छत्री घेऊनच स्टेशनात पोहोचलो. तेव्हा गाड्या सुमारे ३० मिनीटे उशीराने धावत असल्याची उदघोषणा ऐकली. स्टेशनवर गर्दीचा महापूर उसळला होता. दोन तीन गाड्या सोडल्या. नंतरच्या गाडीत शिरण्यास यशस्वी ठरलो व अस्सल मुंबईकराच्या चापल्याने सुरक्षित कोपरा पकडून उभा झालो. आता दादर येईपर्यंत पाउणतासाची निश्चिंती होती. पुढे मधेमधे 'रुकावट' घेत गाडी एकदाची दादरला पोहोचली. तेथे देखील थोडाफार पाऊस चालूच होता. आलिया भोगासी म्हणून पाण्याचे खड्डे चुकवत ऑफिसमधे पोहोचलो.

या सर्व प्रकाराने ऑफिसला जाईपर्यंत डोके सोडता मी बऱ्यापैकी भिजलो होतो. त्यामुळे हातपाय कोरडे करुन शिपायाला लगेच उत्साहवर्धक अशा गरम चहाची ऑर्डर दिली. चहा घेण्याआधी थोडे पाणी प्यावे म्हणून बघितले तर ऑफिसमधे पाणीच नव्हते. बाहेर एवढा पाऊस पडत असताना ऑफिसमधे साधे पाणी पिण्यास मिळू नये याबद्दल संताप व्यक्त होत होता. मी देखील त्यात सामील झालो. मी माझा मित्र अजयला म्हणालो, "सरकारने मुंबईत Water harvesting सक्तीचे करावे." आमच्या नंदा मॅडम म्हणाल्या "सरकारने छोटी धरणे बांधली पाहिजेत, म्हणजे कमी खर्चात सर्वत्र पाणी उपलब्ध होईल." तेवढ्यात नाडकर्णी साहेबांचे आगमन झाले. पाऊस, गाड्यांचा विलंबाने वेळ वाया गेला म्हणून ते आधीच कावले होते त्यामुळे आल्याआल्याच त्यानी एकेकाला बोलावून कामाविषयी सूचना देण्यास सुरवात केली. तेवढ्यात शिपायाने ऑफिसमधे पाणी नसल्याचे सांगितल्याने त्यांच्या वैतागात आणखीच भर पडली. त्यांनी महानगरपालिकेला दोष देण्यास सुरवात केली. सर्व नगरसेवक कुचकामी असल्याचे सांगितले.

एकूणच ऑफिसमधे पाणी नसल्याने जणू राष्ट्रीय प्रश्न निर्माण झाल्याप्रमाणे सरकार, महापालिकेने काय करावे याबद्दल जो तो सूचना करीत होता. चर्चा रंगात आली होती. या सर्व गडबडीत पाणी का येत नव्हते याचा मात्र कोणीच शोध घेतला नव्हता. अकाउंटस डिपार्टमेंटने पाणीपट्टी भरली का याचीही खात्री करण्यात आली. तेवढ्यात खालच्या टाकीतील पाणी वर चढविण्यासाठीचा पंप बंद पडल्याचे कोणाच्यातरी लक्षात आले. तेव्हा पंप दुरूस्त करणाऱ्याला बोलवण्यात आले नंतर तासाभरात पंप दुरुस्त झाला व पाणी पूर्ववत चालू झ़ाले. तेव्हा सर्वानी सुटकेचा निश्वास सोडला.

एवढा वेळ या गोंधळात गेल्याने थोड्याच वेळात लंच टाइम झाला. लंचमधे मात्र वेगळेच चित्र दिसले. केवळ तासाभरापूर्वी पाणी साठविण्याच्या गोष्टी करणारे आम्ही जेवणाचे डबे व तोंड धुण्यासाठी प्रत्येकी किमान ६/७ लिटर पाणी वापरत होतो. आमच्या ऑफिसमधे सुमारे ३० जण आहेत. केवळ डबा व तोंड धुण्यासाठी आम्ही खूपच पाणी वापरत होतो व त्याची आम्हाला जाणीवच नव्हती. परत घरी जातानाचा फेस वॉश वेगळाच! सरकारी यंत्रणेने काय केले पाहिजे हे आम्ही जोराने सांगत होतो. पण सुजाण नागरीक म्हणून आमची कर्तव्ये आम्ही साफ विसरलो होतो.

आमच्याच ऑफिसमधील शिपाई नथू नवरे यानी नम्रपणे पण हसतच ही गोष्ट आमच्या नजरेला आणून दिली. कारण पाण्याची टंचाई काय असते याचा त्याला रोजचाच दाहक अनुभव होता. त्याचे घर पालघर येथील एका वाडीत आहे. त्यांची जुनी विहीर आटून गेली होती. नव्या विहीरीला फारसे पाणी लागले नव्हते. त्यामुळे त्यांच्या ६/७ जणांच्या कुटुंबाला कसेबसे ३/४ बादल्या पाणी मिळते. उरलेली पाण्याची गरज गावातील दुसऱ्या विहीरीवरून अथवा टँकरच्या पाण्याने भागवावी लागते. त्यासाठी मोठ्या कष्टाने डोक्यावर हांडे ठेवून पाणी आणावे लागते. याची जाणीव असल्याने त्यांच्या घरात पाण्याचा वापर खूपच काळजीपूर्वक होतो.

त्याच्या हसण्यानेच त्याने आम्हा सर्वांच्याच डोळ्यात जणू अंजन घातले होते व आमच्या बोलण्यातील व वागण्यातील तफावत आमच्या लक्षात आणून दिली. थोडा वेळ पाणी आले नाही म्हणून आम्ही, सरकारवर महानगरपालिकेवर दोषारोप करून मोकळे झालो होतो. भरीसभर म्हणजे दोष ऑफिसच्या यंत्रणेतच होता. परंतु पाणी किती अमूल्य आहे व ते किती काळजीपूर्वक वापरले पाहिजे याचा आम्हाला विसरच पडला होता. किंबहुना याबाबतीत आपलेही काही कर्तव्य आहे याची जाणीवच आम्हाला राहिली नव्हती.

आता मात्र हे लक्षात आल्यावर ऑफिस मधील सर्वांनी पाणी काळजीपूर्वक वापरण्याचा निर्धार केला. वाईटातून चांगले होते ते असे!

# अडसूळ - एक दुर्दम्य इच्छाशक्तीची कहाणी

**■ एडवर्ड डिसोझा, वाघोली**

**"कधी तुम्हाला डोंगररांगांनी आकर्षित केलं आहे का? असे वाटले का की त्या शिखरांवर चढून जाव?"**

बालपणापासून डोंगराची ओढ. कधी लांब पल्ल्याच्या सहलीसाठी जाताना बस प्रवासात खिडकीजवळची जागा न चुकवता घेत असे. खंडाळा-लोणावळा, कसारा, आंबोली असे बरेच घाट खिडकीजवळ बसल्याने पाहिलेत. त्यांचं ते आक्राळविक्राळ रूप, खोल दऱ्या, दाट जंगल साऱ्यांनी मनावर अक्षरशः गारुड केलंय. ह्या निसर्गरम्य सौंदर्याची लयलूट करताना मनाला भुरळ घालायचे ते उंच सुळके. का कोण जाणे पण सुळक्यांकडे पाहून असं वाटायचं जणूकाही ते मला आपल्याकडे खुणावत आहेत, एक आव्हान देत आहेत. डोंगर-सुळक्यांबाबतीतला एक अनामिक ओढा आजही तसाच कायम आहे. ट्रेकिंग सुरवात केल्यापासूनच्या गेल्या १०-१२ वर्षांत ४०-५० ट्रेक नक्कीच झाले असतील. प्रवासात एखादा डोंगर – सुळका दिसला की माझे डोळे त्याचं निरीक्षण करू लागतं. टोकावर जाणारी वाट शोधू लागतं.

**डोंगर पाहण्याच्या आवडीपासून ते त्या सुळक्यांवर चढण्याच्या धाडसापर्यंतचा हा प्रवास आयुष्यभर लक्षात राहील असाच आहे.**

प्रवासाला जवळ म्हणून आम्ही कुपारी ट्रेकर्स पालघर जिल्ह्यातील गड किल्ल्यांची निवड करीत असू. जवळपास ज्ञात असलेले सर्व गड डोंगर झाले होते. ह्यातील सर्वात सुंदर, आणि १२ महिने सहज करता येणारा सोपा ट्रेक म्हणजे अशेरी गड. जेव्हा केव्हा अशेरी ट्रेकला गेलो तेव्हा तेव्हा त्याच्या विरुद्ध बाजूला पूर्वेला असलेल्या सुळक्यांची रांग नेहमी लक्ष वेधून घेत असे. एकदा फ्रँकला बोललो सुद्धा, 'चल, आपण ह्याचा प्लॅन करूया.' हो हो चालले होते पण प्लॅन काही होत नव्हता. दरम्यान यूट्यूबवर मुंबईतल्या एका ट्रेकरचा व्हिडिओ पाहिला. तो व्हिडिओ त्या डोंगररांगेबद्दलच होता, जी रांग मनात कित्येक महिने रेंगाळत होती. त्यांनी ट्रेक सुरू केला होता, पण रस्ता न सापडल्याने त्यांना तो अर्धवट सोडावा लागला.

गेल्यावर्षी महालक्ष्मी डोंगर ट्रेक करून घरी परतत असताना वाडा-खडकोणा जवळ आलो तेव्हा फ्रँकला बोललो, 'चल, ह्याचा प्लॅन करूया'. फ्रँकचा ठाम आणि उत्साही प्रतिसाद, 'नक्की करू' आणि अखेर ह्यावर्षी अडसूळ मोहिमेचा मुहूर्त निघालाच. सहयाद्रि TTMM ट्रेकिंग ग्रुपवर एकाने अडसूळ ट्रेकचा प्लॅन पोस्टला होता, मी लगेच त्या ग्रुपला जॉइन केले आणि नंतर फ्रँकशी नक्की करून त्याला ग्रुप जॉइन करायला सांगितले. दुर्दैवाने आयोजकाने ट्रेक कॅन्सल केला पण फ्रँकशी बोलून आपण हा ट्रेक एकट्याने करूच असे ठरवले. फ्रँकनेच लोकल गाईडला शोधून काढले. ट्रेकसाठी लागणारे साहित्य नव्हतेच म्हणून फ्रँकला सांगून एक ३० ते ३५ मीटर ट्रेकिंग रोप आणला. कुपारी ट्रेकर्स ग्रुपवर ट्रेक संबंधी पोस्ट केली आणि १०-१२ ट्रेकर्स तयार झाले. दीड तासांची जंगलातील वाट पूर्ण करून आम्ही सुळक्याच्या पायथ्याशी आलो होतो. एकदम २०-३० फुटांचा खडा चढ. दोर बांधण्यासाठी वर जायचे असल्याने मी प्रथम क्लाइंम्ब करत वर चढलो आणि दोर वर दगडाला बांधून टाकला. फ्रँकला दोर खालून खेचायला सांगितले ज्यामुळे गाठ पक्की बसली आहे ह्याची खात्री केली. मग फ्रँकने दोराला बटरफ्लाय गाठी मारल्या आणि एकेक ट्रेकर ने सुळका सर करायला सुरवात केली. **"प्रत्येक शिखर चढत असताना आपण स्वतःलाही उंचावतो."** एका साध्या दोराच्या साथीने, दृढ निश्चय आणि जिद्दीच्या जोरावर आम्ही हा ट्रेक यशस्वीरित्या पूर्ण केला.

**"अखेर, जी इच्छा बऱ्याच काळापासून मनात होती, ती प्रत्यक्षात पूर्ण झाली होती. हा अनुभव, त्या क्षणी अनुभवलेल्या आनंदाची, यशाची, आणि समाधानाची भावना शब्दांत पकडणं खरोखरच कठीण आहे."**

रॉक क्लायंबिंग आणि रॅपलिंगचा अनुभव घेण्यासाठी अडसूळ सुळका म्हणजे अगदी योग्य ठिकाण. या अविस्मरणीय अनुभवाचा आनंद आपल्या सहकारी ट्रेकर्सना घेता यावा यासाठी पुन्हा ट्रेकचे आयोजन करायचे ठरले तेही प्रॉपर ट्रेकिंगचं टेक्निकल साहित्य घेऊन हा ट्रेक करू असे फ्रँकशी बोलून त्याला लागणाऱ्या सामग्रीचा अंदाजे खर्च काढायला सांगितले. त्याने लगेच कोटेशन काढले. दुपारी कुपारी ट्रेकर्स ग्रुपवर सदर सामग्री खरेदी करण्यासाठी आर्थिक मदतीची पोस्ट केली, विश्वास बसणार नाही पण रात्री १०-११ वाजेपर्यंत कोटेशनपेक्षा जास्त रक्कम जमा झाली. ह्या सहकाऱ्यांमुळे एक अवर्णनीय हुरूप आनंद माझ्या आणि फ्रँक च्या मनात संचारला. दुसऱ्या दिवशी फ्रँकने जाऊन आवश्यक ते सामान खरेदी करून आणले. आता सुरू झाली होती ट्रेकची पुढील टप्प्याची योजना. कुपारी ट्रेकर्सच्या सहकाऱ्यांसोबत टेक्निकल ट्रेकची योजना आखली गेली. १३ एप्रिल २०२५ हा दिवस नक्की केला आणि तशी ग्रुपवर पोस्ट टाकली. आता फक्त त्या अनोख्या दिवसाच्या

प्रतीक्षेत आम्ही होतो-जिथे प्रत्येक पाऊल नव्या शिकवणीसाठी आणि नव्या आव्हानासाठी तयार असणार!

२५ मार्च ला फ्रॅंकने कुपारी ट्रेकर्स ग्रुपवर अडसूळ सुळका ट्रेकची पोस्ट केली आणि ८-१० दिवसांत १८ जणांचा चमू तयार झाला. सर्वांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या होत्या.

ट्रेक म्हटलं की मनात एक अनामिक हुरहूर लागून जाते. ट्रेकच्या आदल्या रात्री नीटशी झोप ही लागत नाही. असे अनुभव कित्येक वेळा आलेत. १२ एप्रिलच्या रात्रीचे प्रसंग नेहमीसारखेच होते. पहाटे ४:०० चा पहिला आणि ४:१० चा दुसरा अलार्म लावून मी रात्री १०:३० च्या सुमारास बेडवर पडलो. मागच्या ट्रेकचा रीकॅप आणि उद्याच्या नियोजनाच्या विचारांनी मनात फेर धरला होता. त्या विचारांमध्ये कधी निद्रेच्या सागरात बुडून गेलो ते कळलेसुद्धा नाही. जाग आली तेव्हा सहज मोबाईल वर टाइम चेक केले. पातेरातीचे ३.४० वाजले होते. अजून १५ मिनिटे झोप काढू असा विचार करून पडून राहिलो पण मेंदूत झोपेच्या जागी अडसूळ सुळका स्वार झाला होता. आता उठण्याशिवाय पर्याय नव्हता. सवयीप्रमाणे पाऊण लिटर पाणी पोटात ढकलून फ्रेश झालो. सॅलवीनला गुड मॉर्निंगचा मेसेज केला. ४.२५ ला तुला घेण्यासाठी येतो असे सांगून ट्रेकसाठी आवश्यक ते पाणी, चॉकलेटस कॅप, गॉगल, ट्रेकिंग पोल, ग्लुकोन डी सॅक मध्ये भरून ४.२५ ला गाडीला किक मारली.

ठरल्यानुसार पहाटे बरोब्बर ४.४५ला मी आणि सॅलवीन उमराळ्यात सिझरच्या घरी पोहोचलो. त्याच्या कारमधून आम्ही ५.१०च्या आसपास विवा कॉलेज ह्या आमच्या ठरलेल्या मिटिंग पॉइंटला पोहोचलो. फ्रँक, आल्फ्रेड, सचिन, राहुल, रूथ आधीच पोहोचले होते. आमच्या २ कार नियोजित वेळेत पोहोचल्या होत्या. मात्र तिसरी, रोहनच्या कारला उशीर होणार होता म्हणून रोहनशी चर्चा करून मस्तान नाक्यावर चहासाठी भेटू असे ठरवून ५.२०ला, आम्ही उत्फुल्लतेने ट्रेकसाठी प्रस्थान केले.

नियोजित वेळेच्या १०-१५ मिनिटे उशिराने आमचे मार्गक्रमण सुरू झाले होते, त्याची किंमत आम्हांला कशी चुकवावी लागेल. याची यत्किंचितही कल्पना कुणाला नव्हती. खानिवडे टोल पार केल्यावर ट्रॅफिक जॅमने आमच्या ट्रेकच्या वेगाला वेसण घातले. मॅपवरील ७ मिनिटांच्या ट्रॅफिकमधून आम्ही १५-२० मिनिटांनी बाहेर पडलो. ६.२०च्या आसपास आम्ही मस्तान नाक्यावर चहासाठी थांबलो. रोहन-नीलेश ह्यांच्या कार येणे बाकी असताना जमलेल्या १० जणांची अनौपचारिक ओळखदेळख आम्ही करून घेतली. मागे असलेल्या २ कार ट्रॅफिक मधून बाहेर पडल्याचे कळताच आम्ही चहाची ऑर्डर केली. चहा घेऊन थोडे

फ्रेश अप होऊन आम्ही मस्तान नाक्यापासून ७-८ किमी अंतरावरील, दृष्टीक्षेपात असलेल्या आणि आमची वाट पाहत शांतपणे धुक्याआड लपलेल्या अडसूळ सुळक्याकडे निघालो.

सकाळी ७:१५ वाजता आम्ही अडसूळच्या पायथ्याशी पोहोचलो आणि कार पार्क केल्या. सर्व सहभागी ट्रेकर्स पुन्हा एकदा एकत्र जमलो आणि एकमेकांची ओळख पुन्हा नव्याने करून घेतली. फ्रँकने सुरुवातीला कुपारी ट्रेकर्सबद्दल थोडक्यात माहिती दिली. त्याने ट्रेकदरम्यान पालन करावयाच्या काही महत्त्वाच्या सूचनाही दिल्या, ज्या आमच्यासाठी खूप उपयुक्त ठरल्या. "त्यानंतर फ्रँकने वर्षातील २-३ महिने हिमालयात व्यतित करणाऱ्या ज्येष्ठ ट्रेकर सतीश दादांची समूहाला ओळख करून दिली. त्यांची अनुभवसंपन्नता आमच्यासाठी प्रेरणादायी होती, आणि त्यांनी आमच्यावर चांगलाच प्रभाव पाडला."

क्लायंबिंग आणि रॅपलिंगचं थ्रिल आज अनुभवता येणार, या विचाराने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उत्साहाची एक वेगळीच झळक दिसत होती. रोमांचाचा हा क्षण जणू प्रत्येकाचा आनंद अधिक खुलवून गेला होता. आमचा गाईड रोहन आणि अनुभवी सतिश दादा सर्वात पुढे. त्यांच्या पाठोपाठ आल्फ्रेड, त्यामागे मी, माझ्या मागे फ्रँक, आणि शेवटी गॉडफ्री अशी आमची ३-४ ट्रेकर्सची बॅच बनवण्यात आली. गटाचा हा समन्वय आणि एकत्र येणं, आम्ही उंच शिखरावर चढण्याच्या मोहिमेसाठी तयारीत असल्याची जणू झलकच होती.

नितळ निळसर आकाश. डोंगराने स्वतः भोवती छानसा धुक्याचा मऊशार मफलर लपेटून घेतलेला. अडसुळच्या उत्तर पूर्वेला असलेल्या सुळक्यांच्या डोंगररांगेवर सूर्याची कोवळी किरणं सोनेरी झाली होती. त्यांनी ती डोंगररांग एव्हाना सर केली होती. ४-५ शेतजमिनींचा पसरट टप्पा पार करून केवळ ५-७ मिनिटांनी आम्ही अडसुळच्या जंगली पोटात प्रवेश केला आणि सुकलेल्या नानाविध झाडांच्या पर्णांनी आमचं आभाळ आच्छादुन गेलं. ह्या साऱ्यांत फार उकडत होतं. अवघी १०-१५ मिनिटांची पायपीट आणि अंग घामेजून गेलेलं. तरीही त्या जंगली सौंदर्याच्या साक्षीने हा थकवा आनंददायीच वाटत होता.

पावसाळ्यात डोंगराचं पाणी वाहून जाण्यासाठी असलेला बंधारा पार केल्यावर खड्या चढणीला सुरवात झाली. अगदी ८-१० मिनिटांत राहुल रनआउट झाला. राहुलचं आणि ट्रेकचं एक अजब नातं आहे. हा सुरवातीलाच 'आउट' होतो पण DRS चा वापर करून 'बेनेफिट ऑफ डाउटचा' फायदा घेत शेवटपर्यंत खेळात टिकून राहतो. इथे आमच्यात आणि पुढच्या २ ग्रुपमध्ये अंतर पडले. येणारा प्रत्येक क्षण आता जणू एक नवीन आव्हान आणि रोमांच घेऊन येणार होता.

त्याला आराम मिळावा, ह्या विचाराने एकमताने मी आणि ॲसलीनने राहुलची सॅक घेतली आणि पुढे निघालो. गॉडफ्री निलेश जयश्री रूथ त्याच्या मदतीसाठी मागे थांबले.

मोठ्या झाडांची सुकलेली सावली. खाली सुकलेलं कारवीचं बन, पायवाट अशी नव्हतीच. दिशाभूल होण्याची शक्यता जास्तच. थोडेसे वर गेल्यावर पुढे गेलेले दृष्टीपथात आले होते. मागे पाहिले तर मागच्या ग्रुपने चालायला सुरुवात केलेली. मी ऍसलीन आल्फ्रेड पहिल्या ग्रुपला जॉईन झालेलो. फ्रॅंकने विचारलं, 'इतका वेळ का लागला?' त्याला हकीकत सांगितल्यावर तो खाली जाण्यासाठी उठला, परंतु मागचा ग्रुप अगदी जवळ आलाच होता म्हणून थांबला. थांबलेल्या सर्वांच्या चेहऱ्यावर थकवा जाणवत होता. टमाटर फ्रेश दिसावेत म्हणून विक्रेत्याने त्यावर पाण्याचे शितोंडे मारावेत, तसेच काहीसे सर्वांच्या चेहऱ्यावरून दिसत होते. काहींनी विचारलं, 'अजून किती जायचे आहे?' तेव्हा गमतीदारपणे म्हणालो 'आता कुठे शाळा सुरू झालीय, पहिली टेस्ट, सेमिस्टर, दुसरी टेस्ट, प्रिलीम आणि मग फायनल परिक्षा' सर्वजण हसू लागले. आता ऊन तापायला लागलेलं आणि वारा कुठे दडून बसलेला कुणा ठाऊक. दोनचार मिनिटांच्या आरामानंतर पुन्हा उत्साहाने चढाईला सुरवात झाली.

**'डोंगर चढायची जिद्दच आयुष्यातल्या प्रत्येक समस्येवर मात करण्याचा आत्मविश्वास देतो.'**

उष्णतेची तीव्रता जरी प्रत्येक पावलासोबत जास्त जाणवू लागली असली तरी सर्वजण चालत होते. थांबत होते पुन्हा चालू लागत. १५-२० मिनिटांच्या अंतराने आम्हांला पहिल्या छोट्या खड्या चढाईला सामोरे जावं लागलं. सतीश दादा, गाईड रोहन आणि सचिन नवीन ट्रेकर्सना ती चढाई पार करण्यात मदत करीत होते. मी आणि रोहन सीबलला प्रत्येक टप्प्यावर मदतीचं काम करीत होतो आणि त्याचवेळी माझं सॅलविनला गाईड करणेही सुरू होतं. सर्वांची एकजूट आणि मेहनत यामुळे एकदाचा हा टप्पा पार झाला. आम्ही आता वरच्या टप्प्याकडे कूच करत होतो पण ह्या घाईगडबडीत मागे असलेल्या भारदस्त लोकांना मागचा टप्पा पार करण्यासाठी दोर आवश्यक होता ह्याचा आम्हाला विसर पडला.

पुढचा प्रत्येक टप्पा ज्यांचा स्वतःच्या पायांवर भरवसा नव्हता त्यांच्यासाठी खडतर होता. ह्या टप्प्यावर सीबलला मदतीचा हात दिल्याशिवाय ती पुढे येत नव्हती आणि पुढे गेलेला तिचा मित्र रोहन आपल्या शैलीत तिची मजा घेत होता. या मजेशीर व गंभीर क्षणांमध्येही एक समन्वयाची भावना दिसून आली. असे ३-४ टप्पे पार केल्यावर आम्ही एकदाचे अडसूळ सुळक्याच्या क्लायंबिंग पॉईंटला पोहोचलो. सुळक्याच्या आडोश्याला सावलीत काही जण आराम करत होते. मागचे येईपर्यंत आपण रोप बांधून तयारी करून ठेवू ह्याविचाराने मी सुळका क्लायंबिंगला सुरवात केली, पण ती करताना सोबत असलेल्या नवीन ट्रेकर्सना क्लायंबिंग करता ग्रीप शोधणे, तिची पकड कशी घ्यायची, पाय रेस्ट कसे करायचे

याचे प्रात्यक्षिक २-३ वेळा दाखवून मग क्लायंबिंग पूर्ण केले. वर जाऊन दोर दगडाला घट्ट बांधून खाली असलेल्याना खेचून घ्यायला सांगितले. या माझ्या प्रात्यक्षिकाने सगळ्यांचा आत्मविश्वास जणू नव्याने उंचावला.

मागे असलेले फ्रॅंक निलेश जयश्री राहुल रूथ गॉडफ्री अजून काही दृष्टीस पडत नव्हते. नियोजित वेळेपेक्षा खूपच उशीर झाला होता. वेळेचा अपव्यय कमी व्हावा ह्या शुद्ध हेतूने मी खाली उभे असलेल्यांना विचारले, 'ज्याप्रमाणे मी दाखविले होते त्याप्रमाणे चढू शकाल का?' त्यावर सीझर तयार झाला मागोमाग स्टेरिना देखील आली. सचिनने तयारी केली होतीच की फ्रॅंक आणि ग्रुप वर पोहोचले होते आणि हारनेस न लावता चढाई सुरू केल्याचे पाहून आधीच उन्हाने लालबुंद झालेला फ्रॅंक अजून लाल झाला. कडाडला. अर्थातच माझ्यावर. जे स्वाभाविक होते. मी क्षणातच खाली उतरून हारनेस लावण्याच्या कामाला लागलो. त्याच वेळी, सतीश दादा बिले रोप घेऊन, मी बांधलेल्या रोपचा उपयोग करत वर गेला. त्याच्या हालचालींमध्ये एका अनुभवी ट्रेकरचा आत्मविश्वास दिसत होता. काही वेळातच त्याने बिले रोपची बांधणी पूर्ण केली. त्याच्या मदतीसाठी मी पुन्हा वर आलो होतो, रोपवर येणाऱ्या ताणाला समर्थपणे सांभाळण्यासाठी. आता सर्व तयारी पूर्ण झाली होती. फ्रॅंकने प्रत्येक घटकाची बारकाईने तपासणी केली-प्रत्येक बांधणी, उपकरण, आणि सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली. या काळजीपूर्वक तयारीने संपूर्ण टीममध्ये एक विश्वास, उत्साह निर्माण केला. मग, एका पाठोपाठ एक ट्रेकर्सनी चढाई सुरू केली. पहिला टप्पा गाठल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि थ्रिल स्पष्ट दिसत होतं. निसर्गाच्या कुशीत, दगडांवर पाय ठेवत, उंचीवर चढत असताना, प्रत्येक टप्प्यावर रोमांचक अनुभूतींनी प्रत्येकाला भरून टाकलं. टीमवर्क आणि धाडसाची खरी परीक्षा अशाच प्रसंगांमध्ये होते, आणि त्या दिवशी ती टीमने अगदी यशस्वीरीत्या पार पाडली.

**पायथ्यापासून शिखरापर्यंतचा प्रवास आपल्याला आयुष्याच्या कठीण वाटांवरही यशस्वी होण्याचा धडा शिकवतो.**

प्रत्येक ट्रेकर क्लायंबिंग करताना त्यांचा हारनेस व्यवस्थित राहील आणि बिले रोप ढिला होऊ नये, याची सतीश दादा आणि मी दोघांनीही पूर्ण दक्षता घेतली. वर आलेल्या ट्रेकर्सचे हारनेस सोडून, कॅराबीनर, हेल्मेट, आणि ग्लोव्हज नीट खाली पाठवले जात होते, जेणेकरून पुढच्या ट्रेकर्ससाठी सगळं तयार असावं. AMK ट्रेकच्या अनुभवातून आलेला आत्मविश्वास रूथच्या चढाईत स्पष्ट जाणवत होता; तिने सुळका सहज सर केला. त्यानंतर AMK ट्रेकचं स्वप्न उराशी बाळगून आलेल्या एमीने, तिच्या क्लायंबिंगच्या पहिल्याच अनुभवाला सुरुवात केली. मागोमाग जसिंता, जयश्री, सचिन, सॅलवीन, ॲसलीन, स्टॅनियल,

रोहन, सीबल या सर्वांनीही एकेक करत उंचीवर येऊन मोहिमेला अधिक रोमांचक बनवलं. फ्रँक वर आल्यावर खाली फक्त आल्फ्रेड, राहुल, निलेश आणि गॉडफ्री बाकी होते. खाली उरलेल्या चारही जणांनी एकमेकांकडे पाहत आत्मविश्वास गोळा केला, कारण आता त्यांचा क्षण जवळ येत होता. फ्रँक वरून धीर देत प्रत्येकाला वर येण्यासाठी प्रेरित करीत होता.

सुरवातीला आलेल्यांना वर येऊन दीड तासाहुन अधिकचा वेळ झालेला. उन्हाचे चटके खात बसून बसून कंटाळलेले. आणलेला पाणी देखील संपलेला. सर्वांच्या घशाला कोरड पडलेली. अशात सतीश दादाने नाशत्याला आणलेल्या तांदळाच्या - नाचणीच्या भाकऱ्या आणि चण्याची चविष्ट भाजी हिचाच काय तो आधार होता. मी एक भाकरी-भाजी घेतली आणि अर्धी करून फ्रँकला दिली पण त्याने खाण्याची इच्छा नसल्याचे सांगितले.

दुपारचे १२.३० वाजून गेले होते नियोजित वेळेनुसार आम्ही रॅपलिंग सुरू करायचे होते, मात्र अजून निलेश आणि गॉडफ्री ह्यांचं क्लायंबिंग बाकी होते. ते पूर्ण झाल्याशिवाय रोपच्या गाठी सोडता येत नव्हत्या. उन्हाची झळ सहन होत नव्हती पण इलाज नव्हता. संयम हाच आमचा साथी होता. पुढच्या ५-१० मिनिटांत निलेश-गॉडफ्रीने त्यांचे क्लायंबिग पूर्ण केले. एक सामूहिक फोटो काढला, जो या **जिद्द, चिकाटी धाडस, साहस आणि संयमाचा सर्वांसाठी एक अमूल्य आठवण बनला.** फ्रँकने रोपच्या बटरफ्लाय गाठी अत्यंत काळजीपूर्वक सोडून, रॅपलिंगची तयारी सुरू केली. त्या दरम्यान, सतीश दादा आणि मी खाली सुरक्षितपणे उतरून आलो. मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण होत होती, आणि प्रत्येकासाठी हा अनुभव प्रेरणादायी होता.

**तळपती भर दुपार. डोंगरावरील दगडांनी जणू तव्याचे स्वरूप धारण केलेलं. उन्हाच्या तीक्ष्ण बाणांचा मारा अंगावर झेलत प्रत्येकजण त्या उष्णतेशी झुंजत होता.**

सुरुवातीला डॉ. रूथ, सीझर, आणि स्टेरिनाने धाडसी रॅपलिंग करत खाली येण्यास सुरुवात केली. त्यांचा आत्मविश्वास त्यांच्या हालचालीत दिसून येत होता. खाली आल्यानंतर रूथने सर्वांसाठी सँडविच तयार करायला सुरवात केली. मदतीला स्टेरिना आली होतीच. नंतर रॅपलिंगसाठी जयश्रीची वेळ आली. तिच्या म्हणण्यानुसार तिला रॅपलिंगचा कोणताही पूर्वानुभव नव्हता. पण तिच्या प्रत्येक अचूक हालचाली, अगदी नियंत्रित आणि आत्मविश्वासपूर्ण, पाहून कोणीही विश्वास ठेवू शकणार नाही की हा तिचा पहिल्यांदा रॅपलिंगचा अनुभव होता. मागोमाग सीबल, ॲसलीन, आणि एमी रॅपलिंग करत खाली आले. त्यांच्या प्रयत्नांमुळे ते क्षण अधिक धाडसी वाटत होते. रॅपलिंगच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना माझ्याकडून देण्यात आलेल्या मार्गदर्शनाने त्यांचा रॅपलिंगच्या आत्मविश्वासाला अधिक बळ मिळालं. एमीनंतर जसींता रॅपलिंगसाठी सज्ज झाली.

रॅपलिंग करत खाली उतरणाऱ्या जसिंताला खाली उभा राहून गाईड करीत असतानाच, सुळक्याच्या उत्तरेला आडोशाला सावलीत गप्पा मारत बसलेल्या रूथ, जयश्री, सीबल आणि स्टेरिना अचानक धावत आल्या. मागोमाग सतीश दादा. त्यांच्या चेहऱ्यावर भीती स्पष्ट जाणवत होती. "माश्या .. मधमाश्या ..! " कुणीतरी ओरडले. क्षणांत वातावरण बदलले.

"आ ... ममा ... आ ... ममा .. ममा .. ई .. ई ... जोरात किंचाळण्याचा आवाज." एकच गोंधळ उडालेला. काहीच कळत नव्हते. फक्त किंकाळ्या .... मी हातातला दोर सोडून गर्रकन मागे वळलो. व्हिडिओ शूट करीत असलेल्या सीझरने तोंडावर नेकबॅड लपेटला होता आणि जोराने ओरडत होता. स्टेरिनाने घाबरून त्याच्या दोन्ही पायांत आश्रय घेतला होता. पुढे बसलेल्या जयश्रीच्या पाठीवर केसांत २५-३० मधमाश्या चिकटल्या होत्या. हातात ग्लोव्हज असल्याने मला त्या झटकून टाकता आल्या. सर्वजण ह्या अनपेक्षित हल्ल्याने घाबरून गेले होते. "सर्वजण शांत रहा! कुठलीही हालचाल करू नका .. पॅनिक होऊ नका! त्या काहीच करणार नाहीत' असे मी ओरडून सांगत होतो. पण किंकाळ्या काही केल्या थांबत नव्हत्या. त्या आवाजाने हृदय पिळवटून जात होते. मी रूथला सांगत होतो, 'रूथ, ओरडू नका शांत रहा. जी ओरडते आहे तिला शांत करा.' पण नाहीच. ओरडणे सुरूच होते. त्याक्षणी मान वर करून आजूबाजूला पाहिले तर रूथ पुढे डोके कव्हर करून पिंडासणात बसली होती. तिच्या बाजूला सीबल. दोघेही शांत. मग कोण किंचाळते आहे ..? डोळ्यांसमोर जसं आलं तसं मी मागे पाहिलं. "शिट एमी!" त्या क्षणी लक्षात आलं की, एमी आणि ॲसलिन - लहान मुलं-दरीच्या कडेला एकटी होती. मागे पाहिले सतीशदादा हातातील टॉवेल ने माश्यांना पळविण्याचा प्रयत्न करीत होते आणि त्यांचा सहकारी वसंताला, 'वसंत ठीक आहेस ना, वर येऊ नको खाली जा' असे सांगत होते. परिस्थिति जितकी धोकादायक तितकीच आव्हानात्मक देखील .. लहान मुले आणि दरी ह्या विचारानेच मनात धडकी भरली आणि कुठलाही विचार न करता त्यां दोघांकडे धावलो. त्यांना सुरक्षितपणे सर्वजण बसले होते तिथे आणलं. एक मोठा धोका टळला होता. सीझर हातातील छोटा रुमाल गोलगोल फिरवत होता, ज्यामुळे माश्या काही प्रमाणात कमी झाल्या.

ह्या ५-१० मिनिटांच्या गडबडीत जसिंता रॅपलिंगच्या दोराला लटकत होती .. फ्रँकने बिले रोपचं नियंत्रण बिलकुल ढळू न देता तिला पकडून ठेवलेलं. अजूनही माश्या घोंघावत होत्या. अजूनही तणावपूर्ण वातावरण होतं. "आहात तसेच पडून रहा, शांत रहा, हालचाल करू नका" माझ्या सूचना देणे सुरूच होते. उठून मी जसिंताला खाली उतरवून घेतले .. मदतीला सतीश दादा देखील आले. जसिंताला माश्यांचा बराच डंख बसला होता. हारनेस

मधून सुटका होताच जसिंताने एमिला गच्च मिठीत घेतले. आईचं हृदय ते प्रेमाने ओथंबून वाहणारं.

**संकटं ही नेहमीच आपल्याला घाबरवण्यासाठी येत नाहीत, ती आपल्यातील धैर्य, संयम सहकार्य आणि जिद्द जागवण्यासाठी येतात."**

एका अनामिक भीतीचं वलय अडसूळ सुळक्यावर दाटून आलं होतं. वातावरणात एक अंधुक घाबरलेपण जाणवत होतं. 'राहुल! राहुल! ठीक आहेस का? रूथने आपल्या सहचाराला साद घातली. तिच्या आवाजात काळजीच आवर्त दाटलं होतं. "फ्रँक! ऑल ओके ..? तिचा पुढचा प्रश्न .. "डॉक्टर मला चक्कर येतेय" ह्या प्रतिसादाने पायाखालची जमीन हादरली. 'कुणीतरी पाणी द्या' गॉडफ्री ने आवाज दिला. पाण्याची शोधाशोध, पाणी नव्हतंच'. स्टेरिनाने 'मामा! मामा! नीट पकडून बस. मागे दगडाचा आधार घे' असे फ्रँकला सांगितले. 'माझ्या बॅगेत एक बॉटल आहे' राहुलने सांगता बरोबर रूथने त्याच्या बॅगमधून बॉटल काढली. त्यात फक्त ३००-४०० मिलि पाणी होतं. ते घेऊन मी भराभर वर गेलो. फ्रँकच्या चेहऱ्याकडे पाहून धस्स झालं. किती डंख. डोळे, कान, कपाळ, हात, अजून कुठे माहित नव्हतं. त्याचा आवाज जड झालेला. डोळे झोपू लागलेले. त्याला पाणी पाजले. शरीरात रूतलेल्या नांग्या काढू लागलो. गॉडफ्री त्याला धीर देत होता. मी आणलेल्या पाण्यामधून गॉडफ्री, नीलेश, राहुल, सॅल्विन घोटभर पानी प्यायले. पाणी संपले. फ्रँकला स्थिर होण्यासाठी अजून वेळ लागणार होता. तो आम्ही त्याला दिला. 'फ्रँक! तू फक्त हारनेसला गाठी मार, गॉडफ्री बिले रोप पकडून बाकीच्यांना हळूहळू खाली सोडा' अशी सूचना करून मी खाली उतरलो. नीलेश रॅपलिंगसाठी सज्ज झालेला.

खाली उतरून आल्यावर पहिल्या ग्रुपला विनंती केली की तुम्ही आता थांबू नका, तुम्ही एकेक करून हळूहळू खाली उतरा. खाली जंगलात गेल्यावर ऊन जाणवणार नाही. आराम करता येईल. सतीश दादाने संमती दर्शविली पण कुणीच तयार होईना. माझ्या वारंवार विनंतीनंतरही वातावरणात एक प्रकारची अनिश्चितता होती. "पिण्यासाठी पाणी नाही, खायलाही नाही. अशा परिस्थितीत इथे थांबणं अशक्य आहे," मी स्पष्टपणे सांगत होतो. शेवटी रूथ जयश्री आणि सीबल ह्यांनी थांबण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे सतीश दादा, सीझर, स्टेरिना, स्टॅनियल, ॲसलीन, जसींता आणि एमी ह्या पहिल्या ग्रुपने खाली उतरण्यास सुरवात केली. अचानक ब्रेक लागलेली आमची मोहीम पुढे सरकू लागलेली. वातावरण हलकं होऊ लागलेलं.

दरम्यान नीलेश रॅपलिंग करून आलेला. उतरल्यावर त्याने अंग टाकले .. त्याच्या कपाळावर केसांत खुपश्या प्रमाणात डंख मारण्यात आले होते. जयश्री रूथ सीबल ह्यांनी

नांग्या काढायला सुरवात केली. हळूहळू डोळे बंद करून नीलेश निशब्द निश्चल पडून राहिला. सचिन रॅपलिंग करून खाली आला. 'रूथ! माझ्या बॅगेत अॅलेग्रा टॅब्लेट आहे, ती आणि पाणी वर पाठव'. राहुलचीवरून हाळी कानावर आली. पण राहुलची बॅग गायब होती. खाली गेलेल्या पहिल्या ग्रुपमधील कुणीतरी चुकीने राहूलची बॅग बरोबर नेली होती. दरम्यान रूथ ने खाली गेलेल्या ग्रुपशी कॉन्टॅक्ट करून राहुलच्या बॅगची चौकशी केली, त्यांना ती रस्त्यात मध्ये सोडून पुढे जा असे सांगण्यात आले. बॅग आणण्यासाठी खाली एकट्याने जाणे आव्हानात्मक असले तरी गरजेचे होते. मी विचार केला होता पण सुळक्यावर फ्रॅंक आणि खाली निलेश गपगार. काही बिकट प्रसंग उन्भवला तर ..? सुरक्षिततेच्या दृष्टीने मी वरच थांबण्याचे ठरवून. खाली आलेल्या रोहन आणि रूथ ह्यांना खाली जाण्यासाठी सांगितले. सामंजस्य आणि गटाची ऊर्जा वाढवण्यासाठी हा क्षण महत्त्वाचा होता.

सॅलविन रॅपलिंगसाठी सज्ज झालाच होता की मधमाश्यांचा दुसरा हमला केला. मात्र ह्यावेळी त्याची तीव्रता कमी होती. सॅलवीन च्या पायांवर बऱ्याच माश्या बसलेल्या दिसत होत्या त्याला वर स्वतः ला सांभाळून बसण्यास सांगितले. ५ मिनिटांनी माश्या निघून गेल्यावर तो रॅपलिंग करीत उतरला. पाठोपाठ सचिन मग राहुल एकामागोमाग एक संयमाने आणि आत्मविश्वासाने उतरत गेले. प्रत्येक पावलागणिक अनुभवाची कसोटी, आत्मविश्वास अधिक सुरक्षित आणि प्रभावी बनवत होती. पाण्याची गरज लक्षात घेऊन त्याची व्यवस्था करण्यासाठी राहुल आणि सचिन न थांबता पुढे निघाले. आल्फ्रेड मागोमाग गॉडफ्री रॅपलिंग करीत उतरले. आम्ही खाली असलेल्या, हेल्मेट, ग्लोव्हज, हारनेस, कॅरेबिनर ह्या सामानाची जमवाजमव-बांधाबांध करू लागलो होतो. ह्या तंद्रीत फ्रॅंकला रॅपलिंग करण्यासाठी बिले रोपच्या सपोर्टची गरज असल्याचे मी विसरून गेलो. जेव्हा लक्षात आले तोपर्यंत फ्रॅंक कॅरेबिनरच्या मदतीने उतरून येत असल्याचे पाहिले. हा क्षण एक महत्वाची चूक ठरू शकला असता. ज्यापद्धतीने फ्रॅंक उतरत होता ते पाहून तो काही प्रमाणात रिकव्हर झाला आहे ह्या विश्वासाने मनाची समजूत घालून, सुरक्षा समानाची बांधाबांध-पॅकिंग सुरू केली. फ्रॅंकला ऊर्जा मिळावी म्हणून त्या साठी ठेवलेलं सॅंडविच त्याला खाण्यासाठी दिले. थोडा वेळ आराम केल्यावर आम्ही सर्वांनी एकमेकांच्या साथीने, चिकाटीने आणि उत्साहाने डोंगर उतरायला सुरवात केली. खाली उतरल्यावर मस्तान नाक्यावरून पाणी घेऊन ये, बेस ला पोहोचला की मला कॉल कर, मी खाली येतो पाणी घेण्यासाठी असे सीझरला सांगितले होते त्याने तसा होकार दिला होता पण त्याचा काही संपर्क झालाच नाही.

जशी खडी चढाई अगदी तसाच खडा उतार. एक अनपेक्षित लढाई संपली होती पण दुसऱ्या अधिक जोखमीच्या लढाईला सामोरे जायचे होते. ती लढाई म्हणजे मधमाश्यांच्या डंखांनी कोमेजून गेलेले फ्रॅंक-निलेश, सॅलविन सिबल जयश्री ह्यांना सुरक्षित खाली

उतरवायची. फ्रँक-निलेशच्या चेहऱ्यावरील वेदना, थकलेलं शरीर. ह्या दोघांच्या काळजीपोटी जयश्री सिबल हयांचं हादरलेलं मन सांभाळत मोहिमेचा आत्मा जीवंत ठेवायचा होता. संकटकाळी एकमेकांसाठी उभे राहण्याची जिद्द, संयम राखत प्रत्येकाला सुरक्षित नेण्याची जबाबदारी आता माझी गॉडफ्रि आणि आल्फ्रेडची होती.

फ्रँक उसणे अवसान आणून काही झालेच नाही असे भासवित इतरांना प्रोत्साहित करीत असला तरी त्याची चालच सारं बोलत होती. हळूहळू आम्ही एकमेकांना आधार देत खाली येऊ लागलो. पाण्याची तीव्र गरज होती पण आम्ही हतबल होतो. सुळक्यानंतर लागणारे ३-४ आव्हानात्मक उतार आम्ही पार केले. पुढचा प्रवास हा सुके गवत त्याखाली दगड मिश्रित माती असा निसरडा होता. मी सॅल्विन आणि सिबल ह्यांना आधार देत पुढे चालू लागलो. मागे जयश्री निलेश गॉडफ्री फ्रँक आणि शेवटी आल्फ्रेड आणि गाईड रोहन असा क्रम होता. फ्रँक आणि निलेश टप्प्याटप्प्यांवर थांबत होते त्यांच्या मदतीला जयश्री आणि गॉडफ्री त्यांना धीर आणि आधारासाठी थांबत असत. आल्फ्रेडच्या पाठीवर बिले रोप हारनेस आणि इतर साहित्याचे वजन असल्याने तो पुढे झाला. जणू तो मोहिमेचा वाहकच. निसरड्या वाटेवरून आमचे हळूहळू उतरणे सुरू होते. एकदाचे जंगलात आल्यावर आम्ही सर्वच विश्रांतीसाठी थांबलो. मंद वारा आणि झाडांची सावली जणू निसर्गाने आम्हां सर्वांना कवेत घेतलं.

थोडा वेळ विश्रांती करून चालायला सुरवात केली खरी पण काही अंतर उतरलो होतोच तोच फ्रँकने एका पडलेल्या झाडाचा आधार घेत आपले अंग टाकून दिले. चेहऱ्यावर एक प्रकारची शून्यता. काहीच सुचत नव्हतं. जयश्री आणि गॉडफ्री त्याच्या हातापायाला घासून आराम देण्याचे काम करीत होते. पाण्याची गरज होती पण ते नव्हतेच. आमचा गाईड हे सर्व पाहत होता. मी आता आल्फ्रेडला म्हटले आपण भराभर खाली जाऊन कुठूनतरी पानी आणूया. आम्ही आमचा उतरण्याचा वेग वाढवला. पाठीवरील वजनामुळे आल्फ्रेड दमला आणि थांबला. मी माझा वेग कमी होऊ न देता उतरत होतो. बऱ्यापैकी खाली आल्यावर एका सपाट जागी एक माणूस येताना दिसला, त्याच्या हातात पाणी होते. माझ्या आशा पल्लवित झाल्या आणि धावत त्याला गाठले आणि धक्काच बसला. तो रोहित होता. (आमच्या आधीच्या अडसूळ ट्रेकचा गाईड. तब्येत बरी नसल्याने त्याने रोहनला पाठवले होते.) रोहनने त्याला पाणी घेऊन येण्यासाठी सांगितल्याचे बोलला आणि तो ४ लीटर पाणी घेऊन आला होता. काय ती माणुसकी. कित्येक महिने पाण्याविना असलेल्या कोरड्या जमिनीवर पाणी पडल्याने त्याचा मागमूसही दिसत नाही तशीच काहीशी अवस्था रोहितने आणलेल्या पाण्याच्या 2 बाटल्या पाहून माझी आणि नंतर इतरांची झाली. त्याच्या हातातील २ लीटरची एक बाटली घेऊन घटाघटा पाव लीटरभर पाणी पोटात ढकललं. रोहितला तिथेच

थांबायला सांगून भरलेली बाटली घेऊन मी त्वरित वर जायला सुरवात केली. मध्ये सॅल्विन-सिबल-आल्फ्रेड भेटले त्यांना अर्धा लीटर पाणी देऊन उरलेले पाणी घेऊन वर असलेल्या टीमकडे धावलो. पाणी पिऊन थोडी तरतरी आली. फ्रँकने मसलपेन ची गोळी घेतली त्यामुळे त्याला बरे वाटू लागले. इतक्यात रूथचा फोन आला की पार्किंग जवळ पाण्याच्या काही बाटल्या ठेवल्या आहेत. त्या आणण्यासाठी मी पुन्हा वेगाने खाली उतरण्यास सुरवात केली. पार्किंग कडे येऊन जो पाणी होता त्यातली एक बॉटल मी संपवून टाकली. उरलेल्या १००ml च्या २ बॉटल घेऊन मी पुन्हा चढाईला सुरवात केली.

जाताना सॅल्विन-सिबल-आल्फ्रेड रस्ता भरकटून दुसऱ्या रस्त्याने हायवेवर चालताना दिसले. त्यांना पार्किंग कुठे आहे हे सांगण्यासाठी मी त्यांच्या दिशेने वळलो. त्यांना रस्ता दाखवून मी फिरणार इतक्यात रोहनची फोर्च्युनर आमच्या बाजूला थांबली. आतमध्ये रूथ आणि राहुलही होते. खाली उतरून पहिलाच प्रश्न, "फ्रँक कसा आहे?". मी त्यांना हकीकत सांगितली आणि रोहनला विनंती केली की शेतं संपतात तिथपर्यंत कार घेऊन येऊ शकतोस का ..? फ्रँक आणि निलेशला घेण्यासाठी', त्याने क्षणाचाही विचार न करता लगेच होकार दिला. मित्रत्वाचा एक सुंदर झरा त्या उत्तरात होता. मग मी त्यांनी आणलेले पाणी-कोल्डड्रिंक घेऊन वर जाण्यासाठी निघालो तर रूथ आणि राहुल ही मागोमाग येऊ लागले. 'तुम्ही नका येऊ, आराम करा, मी जातो' असे सांगून त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला पण ते काळजीपोटी हळूहळू मागे येतच राहिले.

एव्हाना सूर्य अशेरीच्या डोंगरामागे लपायला लागलेला. त्याच्या सोनेरी किरणांनी जंगलाला अलवार झळाळी आलेली. पण ते सौंदर्य डोळ्यांत साठविण्याइतका निवांतपणा नव्हता. घाई करणे महत्त्वाचे होते. एकुनच झालेल्या धावपळीचा परिमाण आता मला जाणवू लागला होता. पायात क्रेम्प्स येऊ लागलेले. पाय झटकत मी वर जात होतो. एका टप्प्यावर मी फ्रँक आणि गॉडफ्री यांना गाठले. त्यांना हातातील पाणी आणि कोल्डड्रिंक दिले. फ्रँक आधीपेक्षा खूपच फ्रेश दिसत होता. निलेश आणि जयश्री बरेच मागे होते आणि रोहन त्यांच्यासोबत. एक मोठा ओहोळ पार करून मी वर गेलो आणि ते तिघे नजरेस पडले.

त्यांना पाणी आणि कोल्डड्रिंक दिले. जयश्री म्हणाली. 'तुम्ही जा पुढे, आम्ही येतो' पण मी नकार दिला. त्याक्षणी पुढे जाण्यापेक्षा त्यांच्या सोबत थांबणे महत्त्वाचे वाटलं. आतापर्यंत निलेश ठीक आहे अशी माझी समज होतो, पण निलेशला त्रास होऊ लागलेला. त्याच्या हालचाली मंदावू लागलेल्या. कडक उन्हाचा मारा, मधमाश्यांचा डंख, शरीरातील पाण्याची घटलेली पातळी- या सगळ्यांचा परिणाम आता दिसू लागलेला. त्यात लुज मोशन सुरू झाल्यामुळे त्याचा विकनेस वाढू लागलेला. चेहऱ्यावर थकवा. चालण्याच त्राण संपलेलं.

अगदी थोडे चालल्यावर 'थोडा वेळ थांब,' असे तो आता विनंती करू लागला होता. अंधार आता जंगलाला कवेत घेण्यासाठी सज्ज झालेला. त्याआधी पार्किंगपर्यंत पोहोचायचं होते. निलेशला धीर-आधार देत आम्ही चालत होतो. ओहोळ पार केल्यावर मी रोहनला पुढे जाण्यास सांगितले. आता शेवटचा ओहोळ पार केल्यावर सपाट शेतं येणार होती, जिथून रोहनच्या गाडीत निलेशला नेता आले असते. माझे त्याला चियरअप करणे सुरूच होते. पण आम्ही शेवटच्या ओहोळाशी आलो आणि निलेश खाली बसला. झोप अनावर झाल्यावर जशी डोळ्यांची हालचाल होत असते तसे निलेशचे सुरू होते. जयश्री निलेशच्या स्थानिक डॉक्टर मित्राशी मेडिकल हेल्प मिळते का याची विचारपूस करण्यात व्यस्त होती. मी त्याच्या चेहऱ्यावर पाण्याचे शितोंडे मारत होतो. त्याच्या डोक्यावर हातातील थंड पाणी हळूहळू टाकत त्याला फ्रेश करायचा प्रयत्न सुरू होता आणि अचानक निलेश जमिनीवर झोपला. हळू आवाजात काही सांगू पाहत होता. त्याने डोळे बंद केले. कदाचित त्याला चक्कर आली होती. अंधार होत आला होता. हातात अगदी थोडा पाणी शिल्लक होता. लगेच सचिन आणि आल्फ्रेडला फोन केला आमचे लोकेशन सांगून लवकर पाणी घेऊन येण्यासाठी सांगितले. मी त्याच्या चेहऱ्यावर असलेला पाणी शिंपडत होतो .. पाचच मिनिटांनी मला एक धक्काच बसला कारण गॉडफ्रीचा मुलगा ॲस्लीन ज्याला मधमाश्यांचा खुप डंख बसला होता तोच निलेश करता पाणी घेऊन समोर आला होता. मागोमाग आल्फ्रेड. रोहनची फोर्च्युनर ओहोळाच्या दुसऱ्या अंगाला अगदी वर आलेली दिसली. जोडीला गॉडफ्री रूथ राहुलही होते. निलेशच्या चेहऱ्यावर अंगावरून थंड पाणी टाकून त्याला उठवले. आधार देऊन ओहोळ पार केला आणि रोहनच्या गाडीत बसवले. मी आणि इतर पार्किंगकडे मार्गस्थ झालो. शरीर थकलेलं पण एक मानसिक समाधान होतं. सर्वजण सुखरूप खाली उतरले होते. अंधारात गड्प होऊ लागलेल्या अडसूळच्या पायथ्याशी एक प्रकाश उगवला होता- साथीचा, धैर्याचा आणि माणुसकीचा.

पार्किंगजवळ आलो तर सर्वजण हसत खेळत आणि दुपारच्या घटनेवर चर्चा करत होते. सतीशदादाने सर्वांसाठी गरमागरम कॉफी आणि नाश्ता आणला होता. त्याचा आस्वाद घेतला. निलेशला थोडा आराम आला होता पण त्याला ट्रीटमेंटची गरज होती त्यासाठी वसईला न थांबता मुंबईला जाण्याचा पर्याय आम्ही एकमताने घेतला. सतीशदादा, रोहन आणि रोहितचे विशेष आभार मानून आम्ही ७ वाजता घरच्या रस्त्याला लागलो.

हा प्रवास फक्त जंगलातून नव्हता- तो माणसांच्या मनातून होता. संकट, थकवा आणि काळजी ह्यांच्या छायेतुन एकमेकांना आधार देत पुढे जाण्याची ही कहाणी होती.

# उपा(हा)स

■ एमेल आल्मेडा, चौकाळा

आता बस झाले. एकदम निश्चितपणे ठरवले की ही पोटाची ढेरी कमी करायची. कितीही प्रयत्न करावे लागले तरी मागे हटायचे नाही. मोह टाळायचा, संयम म्हणजे संयम!

गेले कित्येक दिवस मी हे मनाशी ठरवत होतो, परंतु उद्यापासून सुरुवात करू ह्या एका वाक्याच्या जोरावर मी इथपर्यंत पोहोचलो होतो. ३६ची कंबर आणि ८८ किलो वजनाचा मी फारच बेढब दिसत होतो. शर्टांच्या बटणांना मनोगत व्यक्त करायची संधी मिळाली असती तर त्यांनी माझ्या पोटाचा निश्चितच उपहास केला असता.

शेवटी मोबाईलवर सदर विषयाशी निगडित अनेक रिल्स पाहून मी एकदाचे मनावर घेतले आणि ऑक्टोबर महिन्यात मॉर्निंग वॉक पासून सुरुवात करून मी माझ्या आरोग्यदायी प्रवासास आरंभ  केला. अपेक्षा होती की न्यू ईयर पर्यंत एकदम फिटम फाट व्हायचे. डॉ.दिक्षित ह्यांचा फंडा वापरण्याचे मी ठरवले. दिवसातून दोनच वेळा खायचे, बाकी वेळा खायचा मूड झाला तरी फक्त पाणीच प्यायचे. सलग आठवडाभर मी हा कार्यक्रम फॉलो केला. अपवाद फक्त एकदा मित्राबरोबर ताडी प्यायचा कार्यक्रम झाला व एकदा वडापाव खाण्याचा योग आला तसेच एकवेळा विनीतमध्ये तंदूरी खायचा बेत पार पडला. बाकी पूर्ण आठवडा मी काटेकोरपणे नियमबद्ध वागलो म्हणजे दिवसातून दोनदाच खाल्ले.

सात दिवसातच मला हलके वाटायला लागले. पोटाचा आकार काहीसा कमी झाल्यासारखे वाटले. अंगाला टाईट येणारा शर्ट आता प्रमाणात दिसू लागला. ऑक्टोबरचा महिना हे सगळं व्यवस्थित सुरू होते पण नोव्हेंबर उगवला आणि माझ्या संकल्पास धक्के बसू लागले. लग्नसोहळे, कार्यक्रम, जेवणावळी ह्या चक्रव्यूहात मी पुरता रमून गेलो आणि माझा संकल्प धारातीर्थी पडला. स्टार्टर, ड्रिंक, चखणा, मेनकोर्स, डेझर्ट सगळं मनमुराद उपभोगताना मी काहीच उणीव ठेवली नाही. फारसा अभ्यास न करताही वजनाचा आकडा डिस्टिंक्शन मिळवत वरच्या इयत्तेत पोहोचला. मनाला कितीही आवरले तरी जीभ काही बाधत नव्हती. बुफेमधील प्रत्येक पदार्थ ताटात घेतल्याशिवाय पाय पुढे सरकत नव्हते. थोडे थोडे चाखू मनात चमच्याने व्यंजन भरत होतो. पोट भरत होते पण मन काही भरत नव्हते. महिनाभर जवळजवळ हा रोजचा शिरस्ता होता आणि पुढे डिसेंबर जानेवारी पर्यंत हे चालणार होते. शरीर कुरकुरत होते. कळत होते पण वळत नव्हते. आता मी जवळजवळ 'मेजवानीडिक्ट' झालो होतो. ह्यावर मीच माझ्यापुरता उपाय शोधला. कोणत्याही

कार्यक्रमाला जायचेच नाही. एकदोन वेळा तसा प्रयत्न केला पण त्यामुळे वैयक्तिक नातेसंबंध दुरावण्याची शक्यता आहे ह्याची मला अनुभूती आली. तसेच समस्येपासून पळणे हा काही समस्या सोडवण्याचा मार्ग नव्हे आणि इकडे समस्या ही माझी व्यक्तिगत होती. सोशल गॅदरिंग हा समाज जीवनाचा एक महत्वाचा घटक आहे त्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नव्हते.

हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावावा तसे माझ्या पोटाच्या मदतीला माझे दात धाऊन आले. ह्या काळात माझे दात माझ्या मनापेक्षा जास्त संवेदनशील झाले होते. माझ्या दाढांमध्ये गॅप झाले होते. घेतलेला मांसाहार दातात अडकत होता त्यामुळे मला त्रास होत होता. परिणामी मी मांसाहारापासून दूर राहू लागलो. मांसाहार नाही त्यामुळे मग आपोआपच मधू आणि सुधाही टाळता आली. सुंठेवाचून खोकला गेला आणि मला समस्येतून मोकळा केला.

डेंटिस्टकडे जाऊन दाताचा ईलाज करावा म्हणून ओळखीच्या डॉक्टरकडे जाऊन दाखवले तर मॅडम म्हणाल्या बरंच डॅमेज झाले आहे. सिजन थांबेपर्यंत थांबला असता तर कदाचित दोन दाढा काढव्या लागल्या असत्या. ट्रीटमेंटचा अपेक्षित खर्च २५ हजार इतका होता. इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती होती. घरी विचारून दोन दिवसांनी ट्रीटमेंट सुरू करू म्हणत मी डॉक्टरला कट मारला.

अहो पुढे सरकताय ना? मागच्या व्यक्तीने सांगताबरोबरच माझ्या विचारांची तंद्री भंग पावली. आता मी बुफे काउंटरवर पोहोचलो होतो. आज डेझर्टमध्ये जिलेबी रबडी पाहून मी मनोमन निश्चय केला. आज जेवल्यावर फक्त सहा जिलेब्या आणि थोडीशी रबडी ह्यांचा आस्वाद घ्यायचा. आईस्क्रीमच्या बाजूला अजिबात जायचे नाही दाताचे दुखणे एक बाजूला पण संयम नावाची काही गोष्ट आहे की नाही. स्वतःला बजावत मी प्लेट हातात घेतली.

# कुमारी छटस्फोटीता...

■ सौ. फ्लॉरी विल्यम रॉड्रिग्ज
ओरभाट, पापडी, Ph: 9764163495

नाताळच्या सणानिमित मी व माझी पत्नी समंथा आमच्या दोन्ही मुलांना घेऊन रजेसाठी मायदेशी आलो होतो. परदेशी स्थायिक झालेल्या व नोकरीनिमित्त परदेशी वस्ती करणाऱ्या वसईकरांसाठी एका ग्रुपने नाताळच्या आठवडयात एक भव्य गेटटुगेदरचा कार्यक्रम आयोजित केला होता. मुलांना आजी-आजोबांकडे ठेवून मी व समंथा त्या सोहळ्यासाठी गेलो.

भल्या मोठ्या पटांगणावर सोहळ्यासाठी सूटबूट घातलेली पुरुषमंडळी व झगझगीत चमकणाऱ्या गाऊनमध्ये महिलांची येजा चालू होती, परदेशी सेंटच्या सुगंधाचा दरवळ सगळीकडे पसरला होता. लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या झगमगटामध्ये बऱ्याच वर्षानी भेटणारे मित्र, नातेवाईक एकमेकांना आलींगन देऊन नाताळच्या शुभेच्छा देत होते. उच्चभ्रू व्यक्तींच्या ह्या सोहळ्यामध्ये माझी नजर तीच्यावर पडली आणि तीला पाहिल्याबरोबर जमीन मला आपल्या पोटात सामावून घेईल तर बरं होईल असे मला वाटू लागलं.  मी विचलीत झालो, कुठे जाऊ, कुठे लपू हेच मला कळत नव्हतं. समंथा बऱ्याचा वर्षानी भेटलेल्या तिच्या मैत्रिणींबरोबर गप्पा मारण्या-साठी त्यांच्या टेबलवर जाऊन बसली होती.

वॉशरूमला जातो असा बहाणा करून मी देखील माझ्या मित्रपरिवारातून सटकलो व एका अंधाऱ्या कोपऱ्यात जाऊन बसलो पण तेथूनही ती मला दिसत होती. तिच्याबरोबर जो पुरुष होता तो बहुतेक तीचा नवरा असावा पण त्याच्या पेहरावावरून व त्याच्यासोबत असलेल्या व्यक्तींशी बोलताना त्याच्या चेहऱ्याच्या हावभावावरून तो कुठल्यातरी परदेशी कंपनीत मोठ्या पोस्टवर नोकरी करीत असावा एवढं नक्की ! तिच्याबरोबर तो खुप अदबीने वागत होता. त्याला भेटायला येणाऱ्या व्यक्तींना तो तीची फार आदराने ओळख करून देत होता. ती मात्र तीच्या सवयीप्रमाणे हळूवार स्मित करून “तुम्हाला भेटून खूप आनंद झाला” असं काहीसं पुटपुटत असावी, ज्याप्रमाणे मला ती पहिली भेटली होती अगदी तशीच....

मला आठवतं, मुंबई विद्यापीठातून डिग्री घेतल्यानंतर वेगळ्या क्षेत्रात करीअर करण्यासाठी मी परदेशी जाऊन उच्चशिक्षण घेतले. परदेशी संस्कृतीने मला भूरळ घातली. चांगली नोकरीदेखील मिळाली. आता लग्न करून येथेच स्थायिक व्हायचं असं मी ठरवलं. माझ्या आईने मला बऱ्याच मुली लग्नासाठी सुचवल्या पण परदेशी येऊन नोकरी करील अशा मुलीच्या मी शोधात होतो.

एक दिवस माझ्या बहिणीने एका मुलीचा फोटो व तीचं प्रोफाईल मला पाठवलं. मुलगी दिसायला सुंदर होतीच पण त्याबरोबर ती परदेशात नोकरी करायला तयारही होती व फिट होती. बहिणीकडून फोननंबर घेऊन तीला व्हिडिओ कॉल केला व तिच्यासोबत बोललो तेव्हा ती अशीच स्मित करीत, "तुम्हाला भेटून आनंद झाला” असं म्हणाली होती. त्यानंतर आम्ही ऑनलाईन चॅट करीत होतो. मी दोन वर्षानंतर ख्रिसमससाठी वसईला येणार होतो तेव्हा आल्याबरोबर कोर्ट मॅरेज व पंधरा दिवसात लग्न करून तीला माझ्याबरोबर परदेशात घेऊन यायचं असं सर्व निश्चित झालं. माझ्याकडे PR असल्यामुळे तसा कुठला अडथळा नव्हता.

तीने चर्चमध्ये जाऊन व मी ऑनलाईन लग्नाचा फॉर्म भरला. पत्रिका छापून आल्या. चर्चमध्ये लग्नाचा पहिला बॅंड (चिठ्ठी) वाचणार होता, त्याच्या दोन दिवस आधी मी वसईला आलो. आमच्या दोघांची पहिली भेट झाली. दोघंही एकमेकांना शोभून दिसत होतो. रविवारी पहिला बॅंड वाचला. नातेवाईकांना, मित्रमंडळींना लग्नाची आमंत्रणे केली. तिची मोठी बहीण, आत्या व मामेबहिणींनी येऊन आमचं लग्नाचं कपाट भरलं. माझ्या बहीणींनी गाणी वगैरे बोलून त्यांचं आदरातिथ्य केलं. परदेशी स्थायिक व्हायला मिळणार म्हणून ती खूप खूष होती. परदेशातील जीवन शैलीविषयी मला खूप काही विचारत होती. स्वप्नांचे इमले रचले जात होते. पहिला बॅंड वाचल्यानंतरच्या आठवडयात आम्ही ठरल्याप्रमाणे रजिस्टर मॅरेज केलं, त्याचा आनंद साजरा करण्यासाठी दोन्ही कुटुंबं संध्याकाळी माझ्या घरी एकत्र बसलो होतो. सर्वजण खूपच आनंदात होतो. त्यावेळी तिच्या वडिलांनी बोलता बोलता सहज सांगितलं "माझ्या एकुलत्या एक मुलाचा घटस्फोट झाला आहे हे आपणास माहितच आहे. लग्न झाल्यानंतर माझी सून आमच्याबरोबर फक्त पंधरा दिवसच राहिली होती. नंतर माहेरी गेल्यावर तीने कुठल्याही प्रकारचे भांडण-तंटा नसताना आमच्या कुटुंबातील चौघावर FIR नोंदवली होती. त्यांचा घटस्फोट झाला पण ती FIR तशीच राहिली आहे, म्हणून हिला कदाचित परदेशी जाण्यासाठी तात्पुरती परमिशन मिळेल. मात्र माझे वकील म्हणाले, दोन-तीन महिन्यात आमच्यावरील केस बरखास्त झाली की ती कायमची तुमच्याबरोबर परदेशी स्थायिक होईल"

मी तिच्या वडिलांना तेथेच म्हणालो, “एवढी मोठी गोष्ट तुम्ही मला आतापर्यंत का सांगितली नाही? तुमची मुलगी गेले चार महीने माझ्याशी ऑनलाइन बोलते, तीने देखील मला हे सांगितलं नाही. तुम्ही आमचा विश्वासघात केला आहे. मला आता पूढ़े जायचंच नाही. मी हे नातं येथेच मोडतो, तुम्ही जाऊ शकता.”

त्यांनी माझी खूप मनधरणी केली. माझ्या मुलीचा ह्यामध्ये काही दोष नाही, आता तर तुमचं रजिस्टर मॅरेज झालं आहे. आता हे लग्न तुटलं तर ती कुमारी घटस्फोटीता होईल. परत कोण करील तीच्याशी लग्न? आधीच तिच्या भावाच्या घटस्फोटामुळे समाजात आमची अप्रतिष्ठा झाली आहे. आत्ता ह्या वयात एवढा मोठा आघात मी नाही पचवू शकत हो! कृपया हे लग्न मोडू नका. आमंत्रण गेली आहेत, कपाट भरलंय, लग्नाच्या रिसेप्शनची सर्व बुकिंग

झाली आहे. आम्ही पार कोलमडून जाऊ, आमची मुलीची बाजू आहे. प्लीज समजून घ्या.... एकट्या पडलेल्या बापाचा जीव पोरीसाठी तुटत असलेला मला दिसत होता पण समजून घेण्याच्या मनस्थितीत नसलेला मी रागाने पेटून उठलो होतो.

माझ्या हृदयाला पाझर फुटला नाही, मी माझ्या मतावर ठाम राहिलो. घटस्फोटासाठी सहा महिन्याचा अवधी होता त्यामध्ये तडजोड होईल ह्या आशेवर ती वाट पाहत असावी पण मी कधी मागे फिरुन पाहिले नाही, दोन वर्षांनंतर आमचा रीतसर घटस्फोट झाला. शाळेपासून माझ्यावर एकतर्फी प्रेम करणारी समंथा हे सर्व ऐकून होती. तीने मला लग्नासाठी विचारलं. पर्यायी विचार न करता मी तिला होकार दिला. आम्ही लग्न केलं, कधीही मागे वळून न पहाता मी माझ्या संसारात स्वत:ला गुंतवून टाकलं, आम्हाला दोन मुलं झाली. कटू आठवणींचा तो कप्पा मी कायमचा बंद करून टाकला होता. तिचं पुढे काय झालं असेल, काय नाही हे देखिल जाणून घेण्याचे कष्ट घेतले नाहीत पण आज अचानक ती माझ्या समोर आली व मनाच्या खोल कप्प्यात बूजवलेल्या आठवणींचं दार जणू सोसाट्याच्या वाऱ्याने खाडकन उघडावं त्याप्रमाणे तो कप्पा उघडला आणि त्यातून नको असलेल्या आठवणींचा लोंढा ओसंडून वाहणाऱ्या धरणाप्रमाणे वाहू लागला...

तेवढ्यात कुणीतरी माझ्या खांद्यावर हळुवार थाप मारली, मी चमकून मागे पाहिलं तर माझा जीवाभावाचा मित्र ऑल्वीन उभा होता. त्याला माझा सर्व पूर्वइतिहास माहित होता. मला म्हणाला, "पाहिलं का ती सुद्धा आली आहे. मी तुला बोललो नाही पण तीचं माइया बॉसबरोबर लग्न झालं आहे. तो उत्तर वसईतला आहे. काही वर्षापूर्वी त्याचाही घटस्फोट झाला होता. तिची मैत्रीण आमच्याच ऑफिसमध्ये काम करते. तिच्यामार्फत ह्या दोघांची ओळख झाली. हिच्याविषयी सर्व कळल्यानंतर तिच्या आजारी वडिलांना भेटून त्यांनी तिचा हात मागितला. बरीच वर्ष लग्न न करण्याचा निर्णय घेतलेल्या तीने बापाच्या आग्रहास्तव त्याच्या विश्वासाला हुंकार दिला व आज ती परदेशात एका मोठ्या कंपनीच्या CEOची पत्नी आहे. तुझ्याबरोबर लग्न तुटल्यानंतर तीने फायनान्समध्ये MBA केले व पूढे PHD करून आता ती आमच्याच कंपनीसाठी काम करते. तो तीला जीवापाड जपतो व सांगतो, “योग्य माणसाशी लग्न झालं की त्याच्याकडून मिळणारं प्रेम आपणास परिपूर्ण बनवते. तीचं प्रेम व समजूतदारपणा आपल्याला आनंदात जगायला शिकवतो.”

ऑल्वीनचं बोलणं ऐकून मला मेल्याहून मेल्यासारखं झालं, मनापासून तिची क्षमा मागायची खूप इच्छा होती, पण ते आता शक्य नव्हतं कारण काही चूका दूरूस्त करता येतात पण काही दुरुस्तीपलिकडच्या असतात, त्या नाही दुरूस्त करता येत ! त्यामुळे मी मनोमन परमेश्वराची क्षमा मागितली व तिच्या सुखी वैवाहिक जीवनासाठी प्रार्थना केली. तेवढ्यात समंथाचा “निघू या” असा फोन आला. ती जीवनात स्थिरस्थावर झाली आहे त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद देत मी मित्राचा निरोप घेतला. व जाता जाता असहाय्य नजरेने तिच्याकडे कटाक्ष टाकून मनोमन तिला नाताळच्या शूभेच्छा दिल्या...

# गरिबांवरील प्रेम

■ **फा. असिस रॉड्रिग्ज (जेज्वीट)**

(पोप लिओ यांचे पहिले परिपत्रक Dilexi Te च्या प्रकाशात नाताळ चिंतन)

नाताळचा सण म्हणजे देव प्रेमाचा (१ योहान ४:८) सत्य आणि जिवंत अनुभव. दरवर्षीप्रमाणे पुन्हा एकदा आपण "शब्द देह झाला, आणि त्याने आम्हामध्ये वस्ती केली" (योहान १:१४) या अद्भुत रहस्यात प्रवेश केला आहे.

पोप लिओ यांच्या परिपत्रकात दिल्याप्रमाणे (Dilexi Te "गरिबांवरील प्रेम") "नाताळचा आत्मा पुन्हा प्रकट होतो: देवाचे प्रेम हे केवळ भावना नसून, ते कृतीत उतरलेले प्रेम आहे. प्रेम देह धारण करते आणि गरीबांपर्यंत पोहोचते."

या परिपत्रकाचे शीर्षकच "मी तुझ्यावर प्रेम केले आहे." या प्रभुशब्दांची आठवण करून देते.

पोप लिओ सांगतात की, ख्रिस्ताने देह धारण करताना मानवी गरिबीचा, दुर्बलतेचा, वेदनेचा स्वीकार केला. ख्रिस्ताचा गोठ्यातील जन्म हा फक्त इतिहास नाही, तो देवाच्या प्रेमाचे जिवंत रूप आहे. नाताळ आपल्याला शिकवतो की देव श्रीमंतीत नव्हे, तर साधेपणात, तुटपुंजेपणात आणि करुणेत अनुभवायास मिळतो. हे परिपत्रक आपल्याला आठवण करून देते की, चर्च जेव्हा गरीबांकडे झुकते तेव्हा ते आपली सर्वोच्च ओळख प्रकट करते. गोठ्यातील बालकाकडे नतमस्तक होणे, म्हणजेच आपल्या समाजातील गरिब-दुर्बळांमध्ये देवाला ओळखणे.

**नाताळातील गरिबी**

पोप लिओ म्हणतात की गरिबीचे अनेक प्रकार आहेत. ते म्हणजे भौतिक गरिबी, सामाजिक गरिबी, आध्यात्मिक रिक्तता, सांस्कृतिक गरिबी. नाताळच्या उपासनेच्या शुभवर्तमानात आपण पाहतो की प्रभूला सर्वप्रथम ज्या लोकांनी पाहिले, ते म्हणजे गरीब मेंढपाळ, परके आणि नम्र लोक (लूक २). देवाने त्यांनाच पहिले आमंत्रण दिले. म्हणून आपले नाताळ साजरे करणे हे फक्त प्रकाश, सजावट, झगमगाट नसून आपल्या परिसरातील एकाकी, वयोवृद्ध, स्थलांतरित किंवा दुर्लक्षित लोकांना प्रेमाने सामावून घेणे आहे.

**नाताळ: आनंदाचा आणि आव्हानाचा सण**

नाताळ आपल्याला आनंद देतो. गीत, प्रार्थना, सामूहिक जेवण, भेटवस्तू हे सर्व देवाच्या प्रेमाचे प्रतीक आहे. पण Dilexi Te सांगते की श्रद्धा आणि गरीबांवरील प्रेम यांची ताटातूट होऊ शकत नाही. नाताळचा उत्सव म्हणजे न्याय, करुणा आणि एकात्मतेचा उत्सव. देव गरीब झाला, जेणेकरून आपण श्रीमंत होऊ-प्रेमात श्रीमंत! पोप लिओ आठवण करून देतात की अन्यायकारक रचना ओळखून त्यांना चांगुलपणाच्या शक्तीने तोडले पाहिजे.

नाताळ म्हणजे देवाची उपस्थिती गरिबांमध्ये आहे ; याचा पुरावा. Dilexi Te आपल्याला खात्री देते की चर्चची खरी ओळख म्हणजे गरीबांच्या जवळ असणे. नाताळच्या या पवित्र काळात आपण Dilexi Te च्या संदेशाने आपली अंत:करणे खुली करू या. देवाचे प्रेम हे गोठ्यात उतरले आणि आपल्याला प्रेमात जगण्याचे धडे दिले. आपण दिवे लावताना, कॅरल सिंगिंग करताना आणि भेटवस्तू देताना हे लक्षात ठेवू या कि खरा नाताळ तेव्हाच साजरा होतो जेव्हा आपण दुसऱ्यांच्या जीवनात प्रकाश आणतो.

यंदाचा नाताळ आपल्यासाठी देवाचे प्रेम प्रत्यक्षात उतरलेले ठरो. याद्वारे आपणही आपल्या कृतीतून म्हणू शकू -

“प्रभू, मी तुझ्यावर प्रेम केले आहे, कारण तू आधी माझ्यावर प्रेम केलेस.”



# मी स्वर्गात आहे! (एक चिंतन)

■ फादर मायकल जी.

प्रति संपादक 'खिस्तायन',

यंदा लांबलचक लेख नाही पाठवत. एक माझं चिंतन पाठवतो आता हया वयात मी 'देवाधर्माला' लागलो आहे, असे समजा. आजच्या चिंतनात मला आलेला संदेश आपल्याला सांगू इच्छितो. तो तुम्हा तरूणांना नक्कीच विचार करायला लावील.

येशू म्हणालाच आहे, "अरे मागत काय बसलात? तुमच्या गरजा पित्याने तुम्ही मागण्याआधीच देऊन ठेवल्या आहेत. (मत्तय ६.८) योगासनांचा अभ्यास करताना मला येशूच्या हया शब्दांची खात्री पटली. ईश्वराने आपल्याला केवळ शरीर दिले नाही तर शरीर-मनाच्या गरजा भागविणाऱ्या शक्तीदेखील त्यातच देऊन ठेवल्या आहेत. उदाहरणार्थ रोज रात्री आपण झोपलो असताना एक आंतरिक डॉक्टर आपले हिलिंग करत असतो!

त्यासाठी मी सकाळी जाग येताच बिछान्यातच श्वसनाचे प्राणायाम करतो. दीर्घ श्वास घेतो. त्यातून प्राणवायूच नव्हे तर प्राणशक्ती घेतो. सारं शरीर आणि मन दिव्य शक्तींनी स्वच्छ करून घेतो आणि चार्ज करून घेतो. गेली अनेक वर्षे नैसर्गिक शक्तींचा अनुभव घेता वाटते, दैवी चमत्काराची वाट का बघा? स्वर्ग, स्वर्ग म्हणतात तो हाच नाही का?

**मी आज स्वर्गात आहे.**

मी ८३ वर्षाचा झालो. आज माझ्या शरीरात कोणतीच दुखापत नाही की दुखावा नाही. सगळं शरीर स्वस्थ आहे. मेंदू, हृदय, किडनी, हात, पाय, हाडे, रक्तवाहिन्या, इंद्रिये, सगळे अवयव त्याच्या नियमाप्रमाणे काम करतात. दिरंगाई नाही, गैर व्यवहार नाही. साऱ्यांचे सारे काम चोख चालले आहे! काहींच्या अस्तित्वाची मला जाणीवदेखील होत नाही.

माझ्या मनात कसलीही खंत नाही. भूतकाळात झाल्या आहेत चुका, पण त्यांचा एक तर पश्चाताप करून मी हिशोब चुकता केला आहे, किंवा त्यांच्या मागची कारणे जाणून मीच स्वतःला क्लीन चिट दिली आहे. एरवी मनात चांगल्या भावनाच निर्माण होतील, ह्याची दक्षता घेतो. सर्वांप्रति सद्भावना बाळगतो आणि व्यक्त करतो, "सबका मंगल, सबका मंगल, सबका मंगल होय रे!" हे गाणं गुणगुणतो. दुष्ट भावना नाहीत. मन सारं स्वस्थ आहे. एकाग्र आहे अलर्ट आहे, जागरूक आहे.

निवृत्त असलो तरी खूप कामात व्यग्र आहे. समाजशुध्दी अभियानाची अनेक प्रकरणे हाताळतो. सर्वांबरोबर माझे चांगले संबंध आहेत. काहींना मी विरोध करतो पण तो सत्यासाठी न्यायासाठी. तोदेखील शांतपणे. कधी जाणीव होते, 'आपलं चुकलं'! पण ती जाणीव म्हणजेच पश्चाताप! त्यानेच पुढे आचरण सुधारणार. स्वर्गाचा अधिक अनुभव घेणार. परवा गोव्याहून अपंग बांधवांसोबत बसने परतत होतो. वाटेत रात्री पोलिसांनी बस उगाच अडवली. खाली उतरलो, शांतपणे विचारले, "मी फादर मायकल जी. काय अडचण आहे?"

उत्तर आले, "तुम्ही फादर का? मग जा जा. काही अडचण नाही!"

**मरणाची भीती नाही.**

मी मरणपंथाला लागलोय, पण मरणाची भीती नाही. मरणाला तयार आहे. कारण मरणाने काही बदलणार नाही. शरीरातून प्राण जाताच माझी पंच तत्वे: पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही मूळ पंच तत्वांत विलीन होतील. माती मातीत, पाणी पाण्यात, अग्नि अग्नीत, हवा हवेत, आणि अवकाश अवकाशात. ती तत्वे अमर आहेत आणि अमर राहातील. माझं चित्त, त्याला प्राण किंवा आत्मा म्हणा, तो परमात्म्यामध्ये विलीन होईल. अहंकार संपेल पण 'मी' संपेन? नाही! मी व्यापक होईन. माझी जाणीव व्यापक (Universal consciousness) होईल. आयुष्यभर 'सोहम'चा जप करत आलो आहे. मी सगळ्या विश्वाचा आत्मा होईन. मी ब्रह्मांड होईन. तो स्वर्गाचा अधिक व्यापक असा अनुभव येईल. ईश्वरा, या सगळ्याबद्दल धन्यवाद!

सद्या जीवनातच स्वर्ग मानण्यात मी फार अल्पसंतृष्ट आहे, असे वाटते? मरणोत्तर काही नको? नाही, मरणोत्तर स्वर्गात जादा काही मिळेलच. ज्याची कधी ऐहिक जीवनात रुची घेतली नाही अशा अध्यात्मिक दशेची स्वर्गामध्ये मला अनुभूती मिळणार आहे. ईश्वराशी एकरूप झाल्याने असाधारण असं सुख, समाधान, शांती लाभणार आहे; पण त्याच्याविना आज मी दुखी नाही.

बुद्ध म्हणालाय, सर्व दुःखाचे कारण अभिलाषा आहे. म्हणून मरणोत्तर स्वर्गाची इच्छा सद्य जीवनात नको. ख्रिस्त म्हणालाय, "उद्याची चिंता करू नका." हे माझे व्रत कठीण वाटते का? म्हाताऱ्याचे वाटते का? पण त्याशिवाय दुसरा सुखाचा मार्ग नाही. स्तोत्र (८.३१) म्हणते, ईश्वर जर आपल्या बाजूने असेल तर आपल्या विरोधी कोण उभा राहू शकेल?" हा जर विश्वास पक्का झाला तर सगळे आशेने कामाला लागतील, निराश होणार नाहीत, कोणी दुःखी राहाणार नाही. पण विश्वास ठेवतो कोण? विश्वासाची प्रार्थना म्हणतो जोरात पण हृदय राहाते कोरडेच.

**तरूणांनाच खरी चिंतनाची गरज**

तरुणानो, तुम्हीच पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करावयाचा आहे. तेव्हा माझं ऐका, Believe as if everything depends on God, and act as if everything depends on you! नुसते देवदेव करत बसू नका, हरी खाटल्यावर देणार नाही. प्रयत्नवादी असा. आणि देवालाही विसरू नका. He helps those who help themselves! हा नियम पाळाल तर स्वर्ग इथेच अनुभवाल! नाही तर बसाल, Sing and pray, live on hay for the pie in the sky when you die!

एकदा एका वर्गात फादर मुलांना म्हणाले, "कोणाकोणाला स्वर्गात जायचे आहे?"

एक सोडून सर्व मुलांनी हात वर केले.

त्या एकाला फादरांनी विचारले, "तुला स्वर्गात नाही जायचे तर कुठे जाणार?" मुलाने उत्तर दिले, "मला ह्या पृथ्वीवरच राहायचे आहे,. कारण हे स्वर्गात जायला निघाले आहेत त्यांनी इथे नरक करून टाकलाय. तो मला साफ करून ह्या इथेच स्वर्ग बनवायचा आहे!"

असे प्रयत्न आपण सर्वांनी केले तर मग सर्वच म्हणतील, "मी आजच स्वर्गात आहे. स्वर्ग हाच आहे!

माझी नजर लागली पैलतीरी

पण आहे पाय रोवून ह्या तीरी!

बनविण्या स्वर्ग ह्या पृथ्वीतलावरी

दैवी नव्हे नैसर्गिक चमत्कारांनी!

# तंत्रज्ञान : काल, आज आणि उद्या

**■ फ्रान्सिस आल्मेडा, निर्मळ, वसई**

मानवाच्या उत्क्रांतीचा प्रवास हा केवळ जैविक मर्यादेत अडकलेला नव्हता; त्याने आपल्या कुतूहल आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर नवनवीन साधने, यंत्रे व पद्धती शोधून काढल्या. या शोधांचा एकत्रित परिणाम म्हणजे तंत्रज्ञान. तंत्रज्ञान हे मुळात मानवी समस्यांचे निराकरण करणारे आणि जीवनमान उन्नत करणारे साधन आहे. परंतु त्याचा परिणाम केवळ भौतिक सोयीपुरता मर्यादित न राहता, मानवी जीवन, समाजरचना आणि संस्कृतीवरही खोलवर होत आला आहे.

प्राचीन काळातील अग्नीचा शोध, चाकाचा शोध, शेतीसाठी नांगर व सिंचन यंत्रणा, लिपीचा उदय हे सर्व तंत्रज्ञानाच्या प्रारंभीच्या पायऱ्या होत्या. या शोधांमुळे मानव भटक्या अवस्थेतून स्थिर समाजाकडे वळला. कृषी क्रांतीने वसाहती निर्माण केल्या आणि त्यातून संस्कृतीचे बीजारोपण झाले. लेखनकलेमुळे ज्ञान टिकून राहिले, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा पिढ्यानपिढ्या पुढे गेल्या. औद्योगिक क्रांती हा पुढचा टप्पा होता. वाफेचे इंजिन, यंत्राधारित कारखाने, रेल्वे आणि विजेचा शोध यामुळे ग्रामीण जीवन विस्थापित झाले, लोक शहरांकडे खेचले गेले आणि आधुनिक शहरी संस्कृतीचा पाया घातला गेला.

आज आपण माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जगतो. संगणक, इंटरनेट आणि मोबाईलने मानवी जीवनाचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे. माहितीचे आकाश उघडे झाले आहे, जागतिक संपर्क क्षणात साधता येतो. ई-कॉमर्स, डिजिटल बँकिंग, ऑनलाईन शिक्षण आणि सामाजिक माध्यमे ही आजच्या जगाची ओळख बनली आहेत. वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम अवयव, जीन संपादन आणि रोबोटिक शस्त्रक्रिया यामुळे मानवी आयुष्य अधिक सुरक्षित झाले आहे. अवकाश संशोधनाने मानवाला पृथ्वीच्या सीमा ओलांडण्याची संधी दिली आहे. या प्रगतीचा थेट परिणाम संस्कृतीवरही झाला आहे. परंपरागत सण-समारंभ आता आभासी जगतात साजरे होतात. सामाजिक माध्यमांमुळे संवादाचा वेग वाढला, परंतु गोपनीयतेचे प्रश्न आणि खोट्या माहितीचे संकट निर्माण झाले. रोजगाराची रचना बदलली आहे—गिग इकॉनॉमी, घरून काम, आणि तंत्रज्ञानाधारित उद्योजकता वाढली आहे.

भविष्यकाळातील तंत्रज्ञान मानवी जीवन आणि संस्कृतीला नवे वळण देईल. कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी निर्णयप्रक्रियेत महत्त्वाची ठरेल, परंतु रोजगार बाजारात मोठे बदल घडवेल.

क्वांटम संगणक माहिती प्रक्रियेच्या गतीत क्रांती घडवतील. बायोटेक्नॉलॉजी आणि जनुक संपादन मानवी आयुष्य वाढवतील, परंतु नैतिक प्रश्नांना जन्म देतील. रोबोटिक्स घरकाम, आरोग्यसेवा आणि संरक्षण क्षेत्रात महत्त्वाची भूमिका निभावतील. अवकाशात वसाहती निर्माण झाल्यास मानवी संस्कृती पृथ्वीच्या पलीकडे पसरू शकते. याचबरोबर आभासी वास्तव आणि मेंदू-संगणक जोडणीमुळे शिक्षण, कला, नाती आणि मूल्यांचे स्वरूप बदलण्याची शक्यता आहे. स्थानिक संस्कृती जपणे, मानवी ओळख टिकवणे आणि तंत्रज्ञानावर अनावश्यक अवलंबित्व टाळणे ही भावी समाजासमोरील गंभीर आव्हाने असतील.

अशा प्रकारे तंत्रज्ञान ही दुधारी तलवार आहे. विवेकाने वापर केल्यास ते मानवजातीला प्रगतीच्या शिखरावर नेऊ शकते; चुकीच्या वापरामुळे विनाशाला कारणीभूत होऊ शकते. कालचे तंत्रज्ञान सभ्यता घडवणारे होते, आजचे तंत्रज्ञान जगाला एकत्र आणणारे आहे, आणि उद्याचे तंत्रज्ञान मानवी संस्कृतीला नव्या, अज्ञात क्षितिजांकडे घेऊन जाणारे असेल. म्हणून तंत्रज्ञानाचा प्रवास नेहमीच मानवी मूल्यांच्या प्रकाशात, जबाबदारीच्या चौकटीत आणि विवेकाच्या नियंत्रणाखाली व्हावा, हाच खरा मानवजातीच्या प्रगतीचा पाया.

# मोरयाचे लाडू

■ फ्रान्सिस डिमेलो, नंदाखाल

पूर्वीच्या काळी श्रावण महिना उजाडला की लोकांना जरा निवांतपणा मिळत असे. कारण तोपर्यंत बहुतेकांची भातलावणी आटोपून रिकामी झालेली बागायत जमीन नांगरून झालेली असायची. भाद्रपदात भादवडी केळींची लागवड करेपर्यंत फारसं काम नसायचं. घरातील पुरुष मंडळी अधूनमधून हातात लांब काठीची विळी घेऊन केळीच्या बनात फेरफटका मारून येत असे. कुठे एखादी केळ वाऱ्याच्या धक्याने लवंडली असेल, कुठे केळीचं एखादं लोंगरच खाली लटकलं असेल तर ते पाहायचं, तर केळीला आधारासाठी बांधलेला एखादा बांबू वाऱ्याने फिरला असेल तर तो पुन्हा व्यवस्थित बांधायचा, नाहीतर केळीला सुंभाने घट्ट गाठ देऊन ती केळ दुसऱ्या केळीला बांधायची अशी किरकोळ कामं करून येताना कोणी गावकरी दोस्त भेटला की त्यांच्यासोबत गुत्त्यावर जाऊन नवटाक पावशेर मारून हलत डुलत घरी परतायचं यापलीकडे त्यांना फारसं काम नसायचं.

घरातील बाईमंडळींनाही चांगली सवड असायची. रोजचा केरकचरा काढणे, शेणपाणी, स्वयंपाक पाणी आणि कपडालत्ते धुणे याशिवाय फारशी कामं नसत. शेतीवाडीत फारसं जावं लागत नसे. सबंध वर्षात याच महिन्यात त्यांना थोडी सवड मिळत असे. अर्थात विसावा फार नसायचा! घरातील बायका अगदी निवांत बसल्या आहेत असं आम्ही कधीच पाहिलं नाही. दुपारची जेवणं आटोपली, भांडीकुंडी करून झाली की लगेच त्यांनी काथ्या घेऊन ओटीवर त्यांच्या सुंभासाठी लोळ्या वळत बसायचं ! म्हटलं तर विश्रांती, म्हटलं तर काम !

अशाच निवांत दिवशी पाऊसही निवांतपणे पडू लागला तर मग काही बघायलाच नको. ओटीवरून कोणी खाली पाय टाकत नसे. सगळे घरी ! दुपारी बायका लोळ्या वळत बसायच्या आणि पुरुषांचा पत्त्यांचा खेळ रंगात यायचा ! अशातच कित्येकांच्या स्वयंपाकघरातून कांद्याचा घमघमाट सुटला की समजायचं, ‘आज मोरयाच्या लाडूंचा बेत आहे म्हणून !’

आपल्या कुपारी संस्कृतीमध्ये जे जे खाद्यपदार्थ प्रसिद्ध आहेत त्यात मोरयाच्या लाडूचा नंबर खूप वरचा आहे. त्या काळी कोणता खाद्यपदार्थ कधी करायचा याचं वेळापत्रक ठरलेलं असायचं. म्हणजे करंज्या नाताळच्या सणाला, शिंगोळ्या सेंट जॉनच्या सणात,

थंडीच्या दिवसात तांदळाची भरड आणि गूळ, तीळ वगैरे घालून लाडू किंवा वड्या केल्या जायच्या, तर पावसाळ्यात मोरयाचे लाडू, तांदळाच्या पिठाच्या शेवया, उपवासकाळात तिखट धापट्या आणि शुभ शुक्रवारी खरपूस भाजलेला तिखट केक (ढेसकं) असे संपूर्ण वर्षाचे मेनू जणू ठरलेले असायचे. हो, चामटपोळ्या मात्र मनात येईल तेव्हा कधीही केल्या जात असत. तसेच नवविवाहित माहेरवाशीण सासरी जायच्या वेळी दोदाल आणि रेवाळा (रवळी) हमखास होत असत. म्हशी व्यातील त्यानुसार खरवस, दुधाचं गूळ घालून पक्वान्न तसेच कच्च्या दुधाचे शिताडू ही पक्वान्नेही होत असत. भाद्रपद महिन्यात हे प्रकार मोठ्या प्रमाणात असत.

मोरयाच्या लाडूंसाठी मेहनत खूप लागत असली तरी खर्च फार येत नसे. हिरव्या मिर्च्या आणि कोथिंबीर सोडली तर काहीच विकत आणावं लागत नसे. तांदळाचे पीठ घरचं, सफेद कांदे घरीच पिकत आणि उडदाची डाळही घरचीच! हां, मेहनत बाकी भरपूर लागे !

साधारणपणे पावसाचा जोर पाहून मोरयाच्या लाडूचा बेत पक्का होत असे. शिवाय हे बायका बायकाच ठरवत असत. पुरुषांचं त्या बाबतीत काही म्हणणं नसायचं. पण एखादा कर्ता पुरुष जर “आपण आज मोरयाचे लाडू केले तर...“ असं सहज म्हणून गेला तर मग काही बघायलाच नको. बायकांच्या उत्साहाला उधाण येत असे.

नक्की केलेल्या दिवशी जेवण खाणं आणि भांडीकुंडी जरा लवकर आटोपून घरातील बायका लाडूच्या तयारीला लागत असत. सासू नाहीतर घरातील कारभारीण प्रथम काम करीत ते म्हणजे उडदाची डाळ शोधून, साफ करून भिजत घालत असे. सगळ्यात मोठं जिकिरीचं काम म्हणजे नारळ किसणे आणि कांदे चिरणे! त्यातल्या त्यात जरा अर्धवट तयार झालेले बरे दहाबारा नारळ घ्यायचे. ते सोललेले नसतील तर एखाद्या पुरुषाकडून सोलून घ्यायचे. नारळ फोडताना त्यातील गोड पाणी पिण्यासाठी अवती भोवती मुलांचं कोंडाळं जमायचं. कोणी कितीदा जरी हाकलून लावलं तरी माशा कशा पुन्हा पुन्हा येऊन तिथेच बसतात त्याचप्रमाणे जमायची पोरं ! मग सर्वांना थोडं थोडं पाणी दिलं जायचं. वर आणखी खोबऱ्याचा लहान तुकडा देऊन त्यांना कायमचं शेपाटून लावत असत. नाहीतर ती पोरं बायकांना नारळ किसूनच देत नसत. जेवढा किसला तेवढा पोरांच्या तोंडात !

मोरया लाडूंसाठी कांदा जरा बारीकच चिरावा लागतो. सगळ्याच गृहिणींना तो विळीवर हवा तसा चिरायला जमतोच असं नाही. म्हणून दोन जरा ज्येष्ठ गृहिणी ते काम स्वतःकडे घेत असत. घरात बांबूवर लटकवलेल्या कांद्याची बरी संपूर्ण माळ चिरावी लागत असे. त्यातही कुटुंब मोठं असेल तर मात्र दोन तीन माळी म्हणजे टोपलीभर कांदे लागत असत. दुसरं असं की सफेद कांदे बोंबिल वगैरे मच्छीसोबत कच्चे खाण्यासाठी आणि

मोरयाच्या लाडूंसाठीच वापरले जात असत. त्यासाठी नाही वापरले तर पावसाळ्यात ते कुजून खाली गळून पडत असत. कुजलेल्या कांद्याला अशी काही दुर्गंधी सुटायची ! आई आई आय !! ती दुर्गंधी जणू आजही नाकात भरून आहे!

घरातल्या दोन दोन बायका नारळ किसायच्या कामी लागत असत. मोठी परातभर नारळ किसता किसता बिचाऱ्यांच्या पाठी भरून येत असाव्यात पण त्याचा विचार कोण करत असत? महिलांच्या बाबतीत एवढी सहानुभूती होतीच कुठे? कांदे आणि नारळाची तयारी होईपर्यंत कोणीतरी चूल पेटवलेली असे. पावसाळ्यात चूल पेटवायची म्हणजे मोठे दिव्यच! पाणी चांगलं उकळलं की त्यात तांदळाचं पीठ उकडलं जायचं. हे कामही तितकंच जिकिरीचं ! नेमकं किती पीठ घ्यायचं, पाणी किती उकळायचं , त्यात मीठ किती घालायचं हे सगळं ठरवायचं ते सासू किंवा मोठ्या सुनेनेच ! पीठ उकडून झालं की तो थंड होईपर्यंत थांबतां येत नसे. तो मळायला घ्यायचा. पिठाची मळणी जितकी जास्त तितकं लाडूचं कवट चांगलं पातळ ! पिठाची उकडन आणि मळणी चांगली झाली नाही तर लाडू फुटून जात आणि त्याचा सगळाच कालवा होत असे. किती जपावं लागायचं ना !

एकदा का सगळी पूर्वतयारी झाली की सासूने किंवा थोरल्या जाऊने चिमूटभर पुरण तोंडात टाकून मीठ, मिर्ची बरोबर आहे अशी बोटानेच ओकेची खूण केली की सगळ्या लाडू बनवायच्या कामाला लागत असत. कोणी पिठाची कवटं करीत तर कोणी त्यात पुरण भरून लाडूला मोदकाचा छान आकार देण्याचं काम करीत. अनेक लहानमोठे हात यात गुंतलेले असल्यामुळे लाडूंचा आकारही लहानमोठा होत असे. पण ते चालत असे.

एका भट्टीचे लाडू तयार होईपर्यंत ते उकडण्यासाठी चुलीवरील विशिष्ट भांड्यात पाणी उकळलेले असायचे. त्याच्यावर एक विशिष्ट आकाराचं भांडं ठेवलं जाई त्याला कुबड्डुर म्हणतात. त्यात कथलाच्या ताटात लाडू व्यवस्थित रचायचे आणि त्याला छान उकड काढली जायची. उकडून ते खाली उतरेपर्यंत पुरुषमंडळी आणि मुलं एकदोनदा तरी स्वयंपाकघरात चक्कर मारून अंदाज घेत असत.

केळीची हिरवीगार पानं आधीच आणलेली असायची. चटईवर केळीची मोठी पानं ठेवून त्यावर उकडलेले मोरायाचे लाडू एकदाचे पडले की पुरुष आणि पोरांची त्यावर उडी पडत असे. प्रत्येकाने एकेक लाडू जरी उचलला तरी म्हणता म्हणता सगळे लाडू संपून दुसऱ्या भट्टीची वाट पाहत पुरुष मुलांची स्वयंपाक घरात झुंबड उडायची.

पुढच्या तासाभरात लाडूंची मोठी रास पडायची! कोणी चार चार तर कोणी सहा सहा लाडू गपागप मट्ट करून टाकत असत. पुरुषमुलांचे मनसोक्त खाऊन झाले की मग बायका एक एक दोन दोन लाडू खाऊन समाधान मानत असत. तेवढ्यात चहा व्हायचा. मोरयाचे

लाडू म्हणजेच मोदक आणि चहाचं छान सूत जमायचं. पण काहींना मात्र ॲसिडिटी होत असल्यामुळे ते चहाच्या भानगडीत पडत नसत. मोदक आणि चहाचा कार्यक्रम आटोपला की घरातली कारभारीण बशीत नाहीतर केळीच्या पानात दोन दोन चार चार मोदक घालून मुलांना शेजारी पाजारी पाठवायची. तसेच सगळ्या बायकांना दोन चार मोदक घेण्याची मुभा देत असे. सगळ्यांनी हवे तेवढे उचलून घेतले की केळीच्या पानावर फुटलेले मोदक तेवढे निराश्रीतासारखे पडून राहायचे. कच्चा कांदा असल्यामुळे मोरयाचे लाडू फार काळ टिकत नसत. शिवाय त्या काळी कुठलं आलं फ्रिज ब्रिज? म्हणून संध्याकाळपर्यंत लाडूंची विल्हेवाट लावणं भाग असे. रात्र पडेपर्यंत मोरयाच्या लाडूचा वार्षिक कार्यक्रम समाप्त होत असे.

बिचाऱ्या महिलावर्गासाठी भांड्याची ही मोठी रास पडलेली असायची. पण "वा! छान लाडू जमले आहेत!" एवढ्या कौतुकाच्या दोन शब्दापुढे त्यांना भांडीकुंडीचं काम अगदीच क्षुल्लक वाटत असे. दुसरं असं की त्या रात्री स्वयंपाक नसायचा ! तेवढीच बायकांना आणि चुलीला सुट्टी! आम्हा मुलांना उकडीचे गोडगोड मोदक खूप आवडायचे म्हणून शेवटचं एक भांड भरून उकडीचे मोदक केले जायचे. आम्ही मुलं सगळे फस्त करून टाकत असू.

मी लहान असताना या लाडूंचं मोरांशी काही नातं आहे का हे पडताळून पाहत असे. पण जरा मोठा झाल्यावर आजूबाजूच्या गावात प्रसादाच्या आशेने गणपती दर्शनाला जात असे तेव्हा गणरायाच्या हातावर मोदक पाहिले, 'गणपती बाप्पा मोरया' हे शब्द कानावर पडले तेव्हा लक्षात आलं की हे मोराचे लाडू नव्हेत तर बाप्पामोरयाचे म्हणजे गणपती बाप्पांचे आवडते मोदक होय ! आपल्या पूर्वजांना उकडीचे मोदक परवडणं शक्य नव्हतं म्हणून त्यांनी पर्याय म्हणून हे तिखट मोदक शोधून काढले असावेत. 'वेळ तसा खेळ' हेच खरं !

या मोरयाच्या मोदकासोबत माझी एक आठवण जोडली गेली आहे. ती सांगितल्याशिवाय हे मोरयाचे लाडू पुराण संपणार नाही.

७ की ८ ऑगस्ट १९६४ चा तो दिवस होता. बहुदा शुक्रवार होता त्या दिवशी! गटारी अमावस्या होती. सकाळपासून पावसाळी वातावरण होतं पण पाऊस फारसा जोरदार नव्हता. आम्ही तर छत्री न घेताच शाळेत गेलो होतो. त्यानंतर मात्र पावसाचा जोर वाढत वाढत गेला. चांगला पावसाचा दिवस आहे असं समजून आई काकीने वगैरे मोरयाच्या लाडूचा घाट घातला होता. सगळ्या बायका स्वयंपाकघरात मोदकाच्या तयारीत इतक्या गुंतल्या होत्या की बाहेर वादळी वाऱ्याने कधी थैमान घातलं त्यांना कळलंच नाही. साधंसुधं वादळ नाही तर चक्री वादळ, तेही अत्यंत वेगवान! पाऊस आणि वाऱ्याची जणू स्पर्धाच लागली होती. दुपारनंतर तर वादळाचा वेग भलताच वाढला. केळीच्या बागा धडाधड आडव्या होऊ लागल्या. अर्धवट तयार झालेली लोंगरी पाठीवर घेऊन केळी भुईसपाट झाल्या. जणू

झोपलेल्या आईच्या पाठीवर बाळं पहुडली होती ! सगळीकडे पाणीच पाणी! तलावे भरून पाण्याचे लोंढे गावातून वाहू लागले. पंचक्रोशीत केळीचं एक झाड शिल्लक राहिलं नाही. लोकांचं उपजीविकेचं एकमेव साधन जमीनदोस्त झालं होतं. लोकांच्या तोंडचं पाणी पळालं होतं. सगळ्यांच्या चेहऱ्यावर नैराश्य पसरलं होतं.

शाळा लवकर सोडल्या होत्या पण कंबरभर पाण्यातून मुलं घरांपर्यंत पोहोचणार कशी? पावसाचा जोर जरा कमी झाल्यावर घरातील पुरुषमंडळी हातात छत्र्या घेऊन शाळेकडे धावली. वाडीत जायची कोणाचीच हिंमत राहिली नव्हती इतकी अवकळा पसरली होती.

आमच्या घरातील बायकांची अवस्था मोठी बिकट झाली होती. मोरयाच्या लाडूंचा पसारा बेवारशासारखा तसाच पडून होता. कोणीच त्यांच्या मुडमध्ये नव्हतं. शाळेतून आलेल्या आम्हा मुलांच्या हातावर आमच्या काकीने गुपचुप एकेक लाडू ठेवून तो गुपचूप खायला सांगितलं. आमचं लक्ष पुन्हा पुन्हा तिकडे जात होतं पण... घरात सुतकी वातावरण होतं. बायकांनी सगळा पसारा हळूच आवरला आणि गोठ्यात गुरांच्या स्वाधीन केला. संध्याकाळी सारं शांत शांत झालं होतं. कोणी कोणाशी काही बोलत नव्हतं. मोरयाच्या लाडूचा बेत करणाऱ्या आई काकींच्या चेहऱ्यावरील अपराधी भाव आजही मला दिसत असल्याचा भास होतो. घरात जेव्हा केव्हा मोरयाच्या लाडूंचा बेत होतो तेव्हा एकसष्ठ वर्षांपूर्वीचा तो भयाण वादळी दिवस आठवल्याशिवाय राहत नाही.

# प्रतिक्षा...

■ **फ्रँक मिरांडा, उमराळे**

वॉकरच्या साह्याने लंगडत राज पश्चिम रेल्वेच्या माटुंगा रोड रेल्वे स्थानकावर पोहचला. दशकाअगोदर दिवसाची सुरुवात ज्या स्थानकावरून व्हायची, आज त्याच ठिकाणी राज तब्बल सात वर्षांनी परत आला होता. त्या स्थानकात असे काही होते जे राजला फार अस्वस्थ करत होते. फलटावरील सिमेंटच्या बाकावर निपचित बसून तो शून्य नजरेने समोर पाहत होता. त्याच्या डोळ्यात वेगळीच दहशत होती; त्या गजबजलेल्या प्लॅटफॉर्मवर त्याची नजर कोणालातरी शोधत होती आणि शोधत राहिली...

राज वानखेडे, एका मराठी घराण्यात जन्मलेला गोड मुलगा, शिक्षण पूर्ण करून एका नामांकित कंपनीत उच्च पदावर नोकरी करीत होता. तेथे त्याची भेट झाली आयेशा मेमन ह्या मुलीशी. सुरुवातीला आयेशाला राजचा स्वभाव पसंत पडला नाही, पण ऑफिसमध्ये एकमेकांजवळ बसल्यामुळे त्यांची मैत्री जुळली. त्यांचा संबंध मैत्रीपूर्ण असला तरी आयेशा राजपासून जरा लांबच राहत होती. राज धर्माने हिंदू असला तरी ऑफिसमध्ये त्याचा माणुसकी हा धर्म होता. तर आयेशा एका मुस्लिम घरात जन्मल्यामुळे काही गोष्टीत ती मोकळी नव्हती. खूप वेळा ती राजपासून, किंबहुना ऑफिसच्या सर्व पुरूष सहकाऱ्यांपासून लांब राहायची. तिचे असे आखूड वागणे राजला खटके देत असे, पण तो गप्प राही. त्या दिवशी ऑफिसमधून घरी येताना योगायोगाने राज आणि आयेशा एकत्र बाहेर आले. संधी सोनेरी होती, जी राज सहजतेने सोडणार नव्हता. हिंमत सारून, घाबरत-चाचरत राजने आयेशाकडे मोबाईल क्रमांक मागितला. क्षणासाठी त्याला वाटले, “गालावर थाप बसणार कि काय?” पण सुदैवाने तसे काही घडले नाही. आयेशाने एक हास्य दिले आणि त्यासोबत नंबरही दिला, आणि लाजत पुढे गेली.

बराच काळ एकत्र नोकरी करताना आणि रोज फोनवर संवाद साधत राहिल्यामुळे दोघांचे संबंध दृढ झाले. राजसोबत राहून आयेशा खूप मोकळी झाली होती. अत्यंत गोड आणि प्रत्येक मुलीला आवडेल असा स्वभाव असलेला राज, आयेशाच्या प्रेमाचा भाग झाला. वयाने आयेशा त्यापेक्षा एक वर्ष मोठी होती, तरी राजने तिचा स्वीकार केला. जसे दिवस सरत होते, तसे त्यांच्या नात्याला अडथळे येऊ लागले. धर्माची भिंतही त्यांच्या प्रेमात आली, पण राजने सर्व अडथळे पार करून आयेशाला आपले केले. त्यांच्या प्रेमाला धर्माचा बंध

गाठता आला नाही; प्रेम नावाच्या औषधाने सर्व अडथळे नष्ट केले. तरीही घराकडून विरोध सुरू होता. त्यांची जीवनाची अनेक वर्षे त्यांनी एकत्र घालवली, सर्व काही सुरळीत होण्याच्या मार्गावर होते, पण अचानक हे सर्व आयेशाच्या घरी कळले आणि अपेक्षेप्रमाणे, किंबहुना त्यापेक्षा भयंकर घडले. आयेशाला घरात फार मार सहन करावा लागला. प्रेम करणे तिच्या घरात गुन्हा होता, आणि इतरजातीय प्रेम म्हणजे मृत्युदंडीय गुन्हा. अशा ताणभरीत जीवनातही ते दोघे एकमेकांशी वचनबद्ध राहिले.

दिवस पुढे जात होते, पण परिस्थिती काही बदलत नव्हती. राजसाठी ती सर्व धोके पत्करण्यास तयार होती. घरच्या दबावामुळे तिला राजसोबत एकत्र नोकरी करण्यासही विरोध होता, परिणामी तिला दुसरी नोकरी बघावी लागली. त्यांचे नितळ प्रेम, एकमेकांसाठी सहानुभूती, समंजसवृत्ती आणि एकत्र राहण्यासाठी केलेले श्रम फारच कौतुकास्पद होते. चार वर्षांच्या अखंड सहवासानंतरही आयेशाच्या घरातून होकार मिळण्याची काही शाश्वती नव्हती. उलट, सत्यता कळली तर तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता होती. याच काळात आयेशासाठी स्थळं येऊ लागली. तिचे नातेवाईक तिचा झटपट निकाह करण्याच्या तयारीत होते. आता योग्य निर्णय घेण्याची वेळ आली. त्या दिवशी राजने ऑफिसमधून लवकर सुट्टी घेतली आणि माटुंगा रोड स्थानक गाठले; पण आयेशा अजून पोहचलेली नव्हती. अनेक फोन करूनही प्रतिसाद मिळाला नाही. एक अनामिक भितीची पाल राजच्या मनात चुक-चुक करु लागली.

घड्याळाचे काटे ६.३० वर पोहचले. दिवस मावळतीला झुकला होता. विरळ अंधार सृष्टीत पसरला. योगायोगाने त्याच वेळी आयेशाकडून फोन आला. फोनवर आयेशाचे नाव पाहून राजला हायसे वाटले. संभाषणात आयेशाने मरीन ड्राईव्हला जाण्याची इच्छा व्यक्त केली, पण वेळेअभावी राजने ती नाकारली. शेवटी माटुंगा रोड स्थानकात भेटण्याचे ठरले. आयेशा आणि राज लवकरच कोर्ट मॅरेज करणार होते, आणि आज त्यांची लग्नाअगोदरची शेवटची भेट होती. जीवनातील खरे प्रेम लवकरच प्राप्त होणार आहे, हा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. बराच वेळ स्थानकात रेंगाळल्यानंतर एक ट्रेन राजच्या समोर आली. ट्रेन जवळ येताच कर्णकर्कश भोंगा वाजला. ती तीच ट्रेन होती ज्यात आयेशा होती. ब्रेकच्या आवाजासह ट्रेन स्थानकात थांबली. लोकांची गर्दी पसरली. बराच वेळ डोळे भिरभिरल्यानंतर राजने गर्दीतून वाट काढली आणि आयेशा दिसली. आयेशाला पाहून त्याच्या चेहऱ्यावर हसू फुलले. आयेशा स्मित हास्य करत राजच्या दिशेने धावू लागली....धम्मम्म!!

आयेशा राजपाशी येणार तेव्हाच कानठळ्या बसवणारा आवाज झाला. होत्याचे नव्हते झाले. धुर, लोकांच्या किंचाळ्या, प्रेतांचे सडे, रक्ताच्या धारा आणि सर्वत्र मृत्युचा तांडव

पसरला. राजच्या कानात “कीईईई...” असा आवाज गुंजत होता. त्याला फार वेदना होत होत्या. डोळ्यापुढे अंधार पसरला, पण त्याचे डोळे आयेशाला पाहण्यासाठी आतुर होते. कठोर प्रयत्नांनंतरही तो अयशस्वी झाला आणि बेशुद्ध पडला.

तो अजूनही आयेशाला पाहण्याच्या प्रतीक्षेत आहे. त्या ११ जुलैच्या ट्रेन साखळी बॉम्बस्फोट हल्ल्यात राजच्या जीवनाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले. सात वर्षे रुग्णालयात व्यथित राहिल्यानंतर आज राजने पहिले पाऊल त्याच स्थानकात ठेवले, जिथे त्याच्या जीवनाचा पाला-पाचोळा झाला होता. राजच्या शारीरिक जखमांपेक्षा त्याच्या मनाची ओली जखम अजूनही भरलेली नव्हती आणि कधीच भरणारही नव्हती. राजच्या जीवनावर मोठा आघात झाला आहे. सर्व काही सुन्न झाले, तरीही त्याचे डोळे आयेशाला पाहण्याच्या प्रतिक्षेत होते, पण अनंताच्या प्रवासाला लागलेल्या आयेशाचे परत येणे शक्य नव्हते.

# आत्मविश्वास

■ इग्नेशियस डायस, भुईगाव

प्रचंड आत्मविश्वास असलेली माणसे मला का आवडत नसतील? उदाहरणार्थ मोदी, जावेद अख्तर, अंजना ओम कश्यप, सचिन पिळगांवकर, रोहित शर्मा. रोहित शर्मा मध्ये काय प्रचंड आत्मविश्वास होता यार! त्याच्या चेहेऱ्यावर तो लख्खपणे उठून दिसत होता. फोनवर तो ज्या पद्धतीने बोलत होता त्याच्यातूनदेखील ते दिसत होतं.

मॉलमधल्या या सरकत्या पायऱ्या उतरताना सुरूवातीला माझी जाम फाटायची. एकदा म्हणजे दहा वर्षांपूर्वी मी आणि माझी बायको बिग बाजारला गेलो होतो. कांदीवलीत. तेव्हा पहिल्यांदा माझ्यावर आणि माझ्या बायकोवरदेखील हा सरकता जिना चढायची पाळी आली होती. दोघांचीपण जाम फाटली होती. पण त्यातल्यात्यात मी नवरा असल्यामुळे मला तसं चेहऱ्यावर दाखवता येत नव्हतं. सोबत बायको नसती तर मी घाबरलोय असं चेहऱ्यावर दाखवायला मला काही अडचण आली नसती पण त्यावेळी सोबत बायको होती त्यामुळे तिचा नवरा घाबरट आहे अशी तिची कोणी अवहेलना करायला नको म्हणून मी चेहऱ्यावर आत्मविश्वास आणण्याचा प्रयत्न केला होता हे आता मला स्पष्ट आठवते. आता हा समोरचा सरकता जिना उतरताना मला बिलकूल भीती वाटत नाहीये. आता सवय झालीये.

उलट डोक्यात आणखी काही विचार म्हणजे रोहित शर्माच्या आत्मविश्वासाबद्दल विचार सुरू असताना मी सहजपणे जीने उतरतोय. त्यावेळी म्हणजे दहा वर्षांपूर्वी बिगबाजारमध्ये खरेदी करताना लोकांचा खरेदी करण्याचा आत्मविश्वास बघून देखील मी अचंबित झालो होतो. त्यामानाने मी आणि माझ्या बायकोने खूपच बिचकत बिचकत खरेदी केली होती. म्हणजे मी तिला एक साडी घेवून दिली होती 500 रुपयाची तर तिला केवढा आनंद झाला होता आतल्या आत. पण आतल्या आतच. तो आनंद चेहऱ्यावर दाखवायची सोय नव्हती. कारण खरेदीविषयी आत्मविश्वास असलेले इतर लोक तर दीड दोन हजारच्या साड्या खरेदी करूनदेखील त्यांच्या चेहऱ्यावर सहजभाव दिसून येत होते. म्हणजे त्यांना दीड-दोन हजारच्या एवढ्या महागड्या साड्या खरेदी करूनदेखील अजिबात आनंद झालेला त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत नव्हता. त्यामुळे पाचशे रूपयाच्या साडीबद्दल आनंद होवूनदेखील तो चेहऱ्यावर येवू देण्याची अजिबात सोय नव्हती.

हा एवढा आत्मविश्वास लोकांमध्ये येतो कुठून? खरेदी करण्याचा आत्मविशास, जगाचं सगळं ज्ञान आपल्यालाच आहे असा आत्मविश्वास. भाषणबाजीचा आत्मविश्वास, टीविवर अँन्कर बनून डीबेट कंडक्ट करण्याचा आत्मविश्वास, सरकता जिना चढण्या-उतरण्याचा आत्मविश्वास, टीव्हीवरील शोवर महागुरू बनण्याचा आत्मविश्वास. रोहित शर्माला कसला आत्मविश्वास आहे? माहीत नाही पण साल्यामध्ये काहीतरी विशेष होतं. दोन-तीन लाखाचा लॉस झाला पण हे सांगताना त्याच्या चेहेऱ्यावरची रेषासुद्धा हलली नाही. आपल्याला मोठं व्हायचं असेल तर आपल्यातपण आत्मविश्वास आला पाहिजे. आपल्यात आत्मविश्वासाची प्रचंड कमी आहे.

आपल्यात आत्मविश्वासाची प्रचंड कमी आहे, हे निदान होईस्तोवर मी सरकता जिना उतरून सिटी मॉलच्या गेटमधून कधी बाहेर आलो कळलंदेखील नाही. आता पुन्हा बस पकडून डीयन्नगर. मेट्रोमधून अंधेरी. लोकलमधून वसई. आणि मग ऑफिस. सिटीमॉल च्या समोर असलेल्या बस स्टॉपपर्यन्त गेलो.

भैय्या, डीयन्नगर स्टेशन तक कौनसा बस जाएगा.

305. अभी आयेगा. ईसी स्टॉपपे.

बसमधून जावूया का? की चालत जावूया? चालत एक पंधरा वीस मिनिटे लागतात. बसने दहा रुपये होतील.

असा विचार सुरू असतानाच मी डीयन्नगरच्या दिशेने चालायला सुरुवात देखील केली.

फेसबुकवर लिहिण्याबाबतदेखील लोकांमध्ये प्रचंड आत्मविश्वास असतो. रोज... जवळपास रोज काहीनाकाही लिहितंच असतात लोक. कसं सुचतं यांना? सुचलेलं लिहावं कसं वाटतं? लिहिलेलं आता फेसबुकवर टाकुया असा विचार करण्याची हिम्मत यांच्यात येते कुठून? आणि ते टाकतातसुद्धा! रोहित शर्माला काय कोटेशन पाठवायचं? महिनाभर कॅम्पेन चालवायचिये म्हणजे पाचेकलाख कोट करू. चारसाडेचारमध्ये डन झालं तरी चालेल. बऱ्याच दिवसांनी एक मोठं काम समोर आहे. हे काम कोणत्याही परिस्थितीत मिळवायचंच. रोहित शर्मा तसा चांगला माणूस दिसतोय. फ्रूटसॅलड खावूया का? वीस रुपये होतील. जावूदे बाहेरचं काही खायला नको. अँटो थॉमस सांगायचा पैसा किदर कर्चा करोगे ये आपको पातं ओना चाइये. तबी आपके पास पैसा आ सकता है. आउर पैसा कर्चा करनेकं इम्मत करो. पैसा कर्चा करोगे, पैसा आयेगा. नई करोगे, वो क्यु आयेगा? पण मी पैसे खूप जपून वापरतो. कारण राजेश टागोर सांगतो आज तूम पैसा सम्हालोगे, कल पैसा तुमको सम्हालेगा... आज तूम पैसा सम्हालोगे, कल पैसा तुमको सम्हालेगा... आज तुम पैसा उडाओगे... आज... तुम

पैसा उडाओगे, कल पैसा तुमको उडाएगा. कधीकधी माझा खूप गोंधळ होतो. अँटो थॉमसचं ऐकायचं की राजेश टागोरचं? दोघंदेखील खूप महत्वाचं काहीतरी सांगत असतात. दोघांमध्येही मला भरपूर आत्मविश्वास दिसून येतो.

हा आत्मविश्वास कसा कमवायचा? आत्मविश्वास कमवायचं खास ट्रेनिंग कुठे मिळत असेल का? मोदीमध्ये एवढा आत्मविश्वास कुठून आला? अंजना ओम कश्यप मध्ये? सचिन पिळगावकर, जावेद अख्तर, रोहित शर्मा या सर्वांमध्ये कुठून आला एवढा आत्मविश्वास? आत्मविश्वास या विषयावर आपण सखोल संशोधन करूया का? संशोधनात समोर आलेले फाईण्डींग्ज मग कुठेतरी भाषण देवून लोकांसमोर मांडायचे. लोक खूप कौतुक करतील. त्यांना आपलं संशोधन आवडेल. टाळ्यांचा कडकडाट.

आत्मविश्वास हा न्यूनगंडाचाच एक आविष्कार आहे. ज्यांच्या मनात काहीएक न्यूनगंड आहे त्यांनाच सतत आत्मविश्वासाने भरून राहण्याची गरज असते. आपल्या आतील न्यूनगंड लपवण्यासाठी ते आत्मविश्वासाचा मुखवटा पांघरतात. हे रस्त्याच्या मधोमध खड्डे करणं कधी थांबेल? जेव्हा बघावं तेव्हा कूठे ना कुठे रस्ते खोदलेलेच! रोहित शर्मा प्रचंड महत्वाकांक्षी दिसून येत होता. आत्मविश्वास चेहऱ्यावर येण्यासाठी आपल्यात महत्वाकांक्षा असणेदेखील गरजेचे आहे. काहीतरी करण्याची महत्वाकांक्षा. मोठं होण्याची महत्वाकांक्षा. श्रीमंत होण्याची, यशस्वी होण्याची, परीक्षेत पास होण्याची, प्रसिद्ध पावण्याची, प्रतिष्ठेची, मानसन्मानाची, मोठमोठी टेंडरं, कोटेशनं पास करून घेण्याची,  सर्व प्रकारच्या भौतिक सुखाची काहीनाकाही महत्वाकांक्षा असल्याशिवाय चेहेऱ्यावर आत्मविश्वासाची गरजच काय? आपल्यात कसली महत्वाकांक्षा आहे? आपण लेखक आहोत आणि व्यावसायिक. पण आपण आपली ओळख करून देताना काय करून देतो? तर लेखक. आपल्या व्यवसायाविषयी आपण फारसे बोलत नाही. एखाद्या ठिकाणाहून बिझनेस मिळण्याची शक्यता असेल तर गोष्ट वेगळी नाहीतर आपण व्यवसायाविषयी फार बोलत नाही. मग आपली महत्वाकांक्षा काय? आपल्याला मोठा लेखक व्हायचय? की मोठा उद्योजक? कधीकधी वाटतं मोठा उद्योजक. म्हणजे इथल्या चारबंगला एरियात हे जे समोर लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट दिसतेय तिथे आपलं एक आलीशान ऑफिस असावं. आपल्या ऑफिसमध्ये एक चाळीस पन्नास जणांचा स्टाफ असावा. आपण दिवस रात्र तिथे मेहनत करून आणि मेहनत करवून घेवून हळूहळू मिलिओनेर, किंवा बिलिओनेर बनावं.

सालं पण मग लिखानाचं काय? ते तर होतेच. लिखाण करण्यासाठी मला ठरवावंदेखील लागत नाही. आपोआप मी लिहायला लागतो. लिहिलंच पाहिजे असं वाटायला लागतं आणि आपण लिहायला लागतो. कधी कधी मेहिंनोंमहिने आपण काहीच

न लिहिता जगू शकतो. लिहिण्याविषयी काहीही प्रेडीक्ट करता येणे निव्वळ अवघड आहे. लिहिणे ही गोष्ट महत्वाकांक्षेच्या कक्षेत येत नसावी काय? लेखक बनणे ही गोष्ट निखालसपने महत्वाकांक्षेतून येते. पण प्रत्यक्ष लिहिणे ही महत्वाकांक्षेतून येणारी गोष्ट नव्हे. उगाच चालत निघालो. बसने आलो असतो तर एव्हाना आपण मेट्रोमध्ये असतो. जावूदे आता विचार करून काही फायदा नाही. आपण जवळपास पोचलोच आहोत डियन्नगरला. लिफ्टमधून वर जावूया की जिन्याने? अनेक लोक लिफ्ट मधून जातात. काहीजन जीने चढतात. जीने चढून जाणाऱ्यामध्ये आत्मविश्वास जास्त आहे की लिफ्ट मधून जाणाऱ्यामध्ये? लिफ्टसाठी रांगेत उभं राहावं लागणार. त्यापेक्षा जीने चढून जावूया. साला चार पायऱ्या चढलो नाही तरी धाप लागते. आपण म्हातारे झालो का? पस्तीशि ओलांडली म्हणजे उतरणीचा काळ सुरू झाला का? योगा करत होतो तेव्हा एवढं थकायला होत नव्हतं. पुन्हा योगा सुरू करायचा का? योगा करून आपलं शरीर फूल लवचिक करायचं. रामदेवबाबासारखं. मघाशी आपण रामदेवबाबाचा विचार केला नाही पण रामदेवबाबामध्ये प्रचंड आत्मविश्वास आहे. योगा केल्याने आपल्यात कदाचित आत्मविश्वास येवू शकतो.

सुब्रमन्यम सरांच्या डोळ्यात काय तेज दिसून येत होतं. केवळ योगामुळेच हे शक्य आहे. योगा करायचा तर सुब्रमन्यम सरांसारखाच! छे! झाटभर पायऱ्या चढलो नाय चढलो तर एवढी धाप. आणि फुल्ल घामाघूम! घाम पुसायची सोय नाही. नाहीतर अख्खा रुमाल ओला होतो. आता इथे कॉईन टाकला की तो घरंगळत परत येईल तो घ्यायचा आणि मध्ये जायचं. परत येईल ना कॉईन? अडकला तर काय करायचं? आला. अडकला नाही. आजवर कधीच अडकला नाही. तरी प्रत्येक वेळी आपल्या मनात ही भीती निर्माण होतेच. कदाचित सर्वांच्याच मनात हे येत असेल का? पण कोणीच आपल्या चेहऱ्यावर भीती दाखवत नाही. उलट प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास दिसून येतो. आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेला माणुसचं मेट्रोने प्रवास करतो. मी मेट्रोने प्रवास करतो. माझ्यात आत्मविश्वास असावा.

(हे लेखकाच्या आगामी कादंबरीतील एक प्रकरण आहे.)

# खाण्याचे खेळ

■ आयवन क्रास्टो, उमराळे

या जगात सगळ्यात कठीण असे काही असेल तर तो आहे मनावर ठेवावा लागणारा ताबा. मग तो आपण सगळ्यांनी डोक्यावर बसविलेल्या अगदी टुकार नेत्याच्या, त्याच्या अगणित कारनाम्यासाठी कानफटीत मारायच्या इच्छेवर असो, बनवलेल्या एखाद्या आवडीच्या पदार्थाला दाद देण्यासाठी बायकोचा मुलांसमक्ष घ्याव्याशा वाटणाऱ्या मुक्याच्या इच्छेवर असो अथवा नाक्यावर उभ्या वडापावच्या गाडीवर कढत तेलातल्या वड्याचा तो पावात शिरून आपल्या पोटात पडेल या इच्छेवर असो! त्या पावात, तळलेल्या एकदोन मिरच्या, थोडी गोड, थोडी तिखट आणि जमली तर लसणाची चटणी कशी मावेल अन मावली जावी या इच्छेवर असो.

वरील नमूद तीनांपैकी पहिल्या दोनांची गोष्ट नको कारण तो ताबा तुम्ही ठेवा अगर न ठेवा; मात्र त्यायोगे तुम्ही ताब्यात जायची शक्यता जास्त आहे कारण कानफटीत मारणे अन मुका घेणे हे अनुक्रमे हिंस्र आणि अश्लील सदरात मोडून त्यावरून तुम्ही संस्कृती भक्षक आणि लवकरच देशद्रोहीही ठराल. पण खाण्याचे काय ? त्याच्यावर ताबा का ठेवायचा ?

विचार करा ! तुम्ही खाऊ गल्लीतून जात आहात. सकाळची वेळ आहे. तुम्ही लोकलची जंग लढून या जागेवर पोहचला आहात. तुमचे कामाचे ठिकाण आणि ही खाऊ गल्ली योगायोगाने एकाच प्रक्षेपात आहेत. म्हणजे ऑफिस वातानुकुलित आहे म्हणून बंद कुंद असते नाहीतर या खाऊ गल्लीत रांधल्या जाणाऱ्या अनेकानेक पदार्थांचा घमघमाट तुमच्यापर्यंत पोहचण्यास कोणी अडवू शकणार नाही. तर् तुम्ही लोकलने प्रवास करून पोहचला आहात. सकाळी मोघम चहा आणि मस्का खारीवर भलामण झालीय. ती खारी आणि तो चहा या खाऊगल्लीत पोहचण्यापर्यन्तच्या प्रवासात पिळवटून निघालाय. पोटात जागा आहे आणि जीभेवर लाळ जमा होऊ लागलीय, यावेळी मनावर ताबा ठेवणे आणि त्या गरीब दुकानदारांची विक्री अडवणे बरोबर आहे का ?

तुम्ही संध्याकाळी ऑफिसमधून परतताना ही खाऊ गल्ली महत्प्रयासाने चुकवून आपल्या घरानजीकच्या नाक्यावर पोहचला आहात अन नाक्यावर उभ्या हातगाडीवर गरमागरम भज्यांची चळत ताटात मांडलेली आहे. तुम्ही त्या हातगाडी समोरूनच आपल्या

घरी जाणार आहात पण तुमची काय बिशाद की ती गरम भजी तुमचा तळहात आणि बोटांना जळवून, जिभेला चाळवून पोटात विराजमान होणार नाहीत ?

लग्नसराई आहे, चार दिवसाच्या या सोहळ्यात एका सकाळी तुमच्या घरी वाटणीस आलेल्या तळणाच्या चार रोट्या पोहचल्या आहेत. ह्या रोट्या अगडबंब आहेत. आतापर्यंत पाहिलेल्या अन खाल्लेल्या रोट्यांच्या आकाराला छेद देणाऱ्या आहेत. वाटणी घेताना तुम्ही विचारता "ह्या घरी तळल्या का ? नाही, एक रोटी रुपये १८ नगाप्रमाणे विकत घेतल्या. बाप रे ! ही काय पद्धत चालू झालीय, अशाने गरिबाकडे लग्नाचे म्हटले तर म्हैस विकावी  लागेल. पण चुलीवर चहाचे आंधण पडले आणि वाफाळता चहा समोर आला तर या कुरकुरीत तेलसुंदर रोटीला तुम्ही अव्हेरनार का ?

तुम्ही लग्नाला पोहोचलात ! अगणित पदार्थांची रेलचेल टेबलावर आरासी-सारखी मांडली आहे. सगळे पदार्थ तुम्हाला आवताण देतायेत या हिशेबाने तुम्ही ताटात घेता आणि अन्न नासाडू नये या हिशेबाने ताटातले फस्तही करता. ताट धुणाराही अचंबित की पाहुण्याने काही खाल्ले की नाही! त्याला धुण्यास मेहनत होत नाही आणि तुम्हालाही दिलेला आहेर सार्थकी लागल्याचे सुख लाभते. तुमच्यासारखे असे दिलेल्या आहेराला जागले तर यजमानचे दिवाळे निघण्यास त्याच्या घरी दुसऱ्या लग्नाची गरज नाही !

आणि मग तुम्ही सांगता की तुमचे वजन वाढलेय. हा साक्षात्कार बरीच वर्षे खाऊ गल्ली रिचवून, लग्ने गाजवून, अरबट चरबटाची मजा घेऊन झालेला असतो. तुम्हाला दोन मजल्याचे जिने चढताना धाप लागते, पोट दुचाकीच्या पेट्रोल टाकीवरून घरंगळू लागते, तुमानीचा तंबू व्हायची वेळ येते, हाड हा प्रकार तुमच्या कोणत्याच प्रत्यंगातून जाणवत नाही. तुमची हनुवटी आणि मान एकजीव होतात, बुटांची दोरी बांधताना तुमच्या डोळ्यांसमोर तारे चमकतात, कमोडची रुंदी तुमच्या बुडास पुरत नाही, सोफ्याच्या गादीवर तुम्ही नेहमी बसणाऱ्या एका ठिकाणी खड्डा पडतो. तुमची अर्धांगिनी तुमच्या घोरण्यापायी सकाळी उठण्याचा गजर लावीत नाही. लोकल-मधल्या खरेतर चार सिटांतल्या दोन सिटांवर तुम्ही मावत नाही, तिसराच कसा बसा बसलाय अन उभा चौथा तुम्हास दूषणे देतोय पण तुम्ही सावरून बसता आणि लागलेल्या डुलकीत खाऊगल्लीची स्वप्ने बघता.

बस झाले ! आपल्याला डाएटची गरज आहे, डाएट करू या ! तुम्ही शोधू लागता, मोबाईलला डोळे लावता, मग तत्सम रील्स तुमच्या मागेच लागतात, तुम्ही ऐकता, हजार पद्धती तुमच्यासमोर आहेत आणि त्या एकजात अघोरी आहेत असा तुमचा समज होतो. तुम्ही ठरवता, कस्टमाइज काहीतरी जमेल तर करू या. गेल्या हजार वर्षात कोणी केले नसतील अशा हजार कस्टमाइज डाएट तुम्ही अंगिकारण्याचा प्रयत्न करता.

तुम्ही सकाळी न्याहारी वगळता. तुम्ही ती वगळता अन ऑफिसाच्या बाजूला खाऊ गल्लीत पोहचता. कसे होणार पुढे !

तुम्ही दुपारच्या जेवणात फळे खाता. खाता म्हणजे ओरपता पण तेवढे खाणे तुम्हास पुरत नाही. त्याचा परिणाम कि काय तुमचा पारा ऑफिसच्या थंड वातावरणात चढू लागतो. तुमचा आतापर्यंत चांगला वागणारा साहेब तुमच्या डोक्यात जातो, तुमची टीम तुमच्याशी फटकून वागते. तुम्हास जाणीव होते की हा कमी खाण्याचा आणि परिणामी भुकेचा परिणाम आहे. तुम्हास पटते की सकाळी अन दुपारी जेवण व्यवस्थित घ्यावे अन रात्रीचे बघावे! तुम्ही ते व्यवस्थित घेण्याची व्यवस्था करता. तुम्ही रात्री जेवण बंद करता अगर सूप घेऊन सांगता करता. उकडलेले खाता, पण त्या नंतर तुम्ही रात्री झोपण्यावेळेस देणाऱ्या जांभया तुमच्या बायकोस मोजाव्या लागतात. तुम्हास चांगली झोप येत नाही, झोपेत खाण्याविषयी बरळता, घास घेतल्यासारखे, चावा मारल्यासारखे आवाज तुमच्या तोंडातून निघू लागतात. बायको म्हणते बस्स झाले. तुम्ही हतबल होता, तुमच्या खवय्येपणाचे, खादुगिरीची तुम्हास लाज वाटू लागते.

तुमची कंबर एव्हाना कमऱ्यात रूपांतरित झालेली असते, शर्टाची बटणे त्रिकाळ व्हिव्हळत असतात. कंबरेच्या तुमानीस बांधणाऱ्या पट्ट्याची छिद्रे एकेक इंच पुढे सरकत जातात.

काही दिवसांनी या सगळ्या गोष्टींची जाणीव होऊन तुम्ही जागे होता आणि जागृतही. काहीतरी केलेच पाहिजे. डायेटीशनकडे जाऊ या ! हा हमखास उपाय ! या एका विचाराने तुम्ही उर्जित होता, मन त्या विचारात रमू लागते, स्वप्नात तुम्हाला तुम्ही स्लिम झाल्याचे दिसू लागते. प्रौढ झालेल्या वयावर जवानी आल्याचे तुम्हास भासू लागते, बायकोची नजर जरा जास्तच धास्तावल्याची तुम्हास जाणीव होते.

तुम्ही हिय्या करून डायेटिशियनकडे जाता. काय माहित, हा व्यवसाय बायकांकडेच जास्त वर्गीत असतो म्हणजे पुन्हा आपल्या वजनाचे धिंडवडे निघणार! त्या सर्वप्रथम तुम्हाला वजन काट्यावर उभ्या करतात. वजनकाटा मालकिणीच्या जणू मनातलेच वजन दाखवतो. त्याचा लंबक एवढा कलतो की पुढे जागा असती तर काट्याबाहेर आला असता. डाएटिशियनही डोळे विस्फारते. एव्हाना तिला ह्याची सवय व्हायला हवी होती पण तिच्या डोळ्यांत या आणखी एका जाड्याला काय करू याची झाक दिसते.

ती प्रश्न विचारते, तुम्ही उत्तर देत जाता प्रत्येक प्रश्न काळजाला तिळतिळ तोडत जातो. उत्तर जिभेवाटे, तोंडातुन बाहेर येण्यास महत्प्रयास लागतात. इथे उत्तरे प्रामाणिकपणे द्यावी

लागतात नाहीतर रोग भलताच आणि उपाय भलताच. आणि हो ! इथे द्यावी लागणारी फीची वसुलीही व्हायला हवी.

तुम्ही घरी येता. एक लांब लचक यादी बायकोच्या हाती देता. ती बिचारी कपाळाला हात मारते कारण या डाएटपायी तिचे मरण आलेले असते. सकाळी तिच्या कामाची जंत्री वाढते. कुटुंबासाठी वेगळे आणि तुमच्यासाठी वेगळे प्रकार करता करता तिच्या नाकी नऊ येतात. तुम्ही यामुळे धास्तावता पण खरी धास्ती हा डाएट प्लान आपल्यापासून पलायन तर करणार नाही ना याची असते.

तुम्ही विचार करता कि लोक एवढे खातात तरी आटोक्यात राहतात. तुम्ही कित्येक जणांची खावटी लग्नाच्या पंगतीत पहिली असते. टेबलावर बुफे पद्धतीने सजावट केलेले पदार्थ जेव्हा यांच्या ताटात जमू लागतात म्हणजे चमचा हा चमची वाटू लागते एवढे त्याने ओढले जाते. ताटात डोंगर उभा राहतो. ते किंचाळते. अरे ! आता तरी बस कर. आणि हे महाशय ताटात अजून कुठे जागा आहे का ते शोधत असतात. एक डोळा दुसऱ्याच्या ताटावर पण असतो त्या ताटात काही पदार्थ घ्यावयास सांगू या का ? अशी आशाळभूत नजर ठेवत हे ताटाला हातावर सांभाळत खुर्च्यांच्या गर्दीतून एखादी खुर्ची शोधतात. अजून एखादी खुर्ची समोर ठेऊन त्यावर ताट ठेवूता येईल का ? आणि आपण पाहतो हा माणूस तरीही शिडशिडीत अंगांचा आहे. नक्की एवढे खाऊन घालतो कुठे ?

म्हणजे खाण्याचा आणि तुमानीच्या घेराचा काहीच संबंध नाही. मी अशी घरे ऐकलीयेत जी पाच लिटरचा खाद्यतेलाचा डबा एक दीड महिन्यात खाली करतात म्हणजे या घरातील लोकांना घाण्याला पिळले तर तेलाचा पाट वाहील पण त्या घरात जाडेपणाची किंवा हृदयाच्या चलबिचलीची कोणतीच वार्ता नसते.

म्हणजे खात्या पित्या घराला दोष द्यावा की नियतीने दिलेल्या सर्व पचवून मेद साठवणाऱ्या पोटाला. पण तुम्ही डाएट प्लॅन मनाचा हिय्या करून सुरु ठेवता. सकाळी प्लॅन नुसार, दुपारी प्लॅन नुसार, रात्री प्लॅन नुसार. तुम्ही कमालच करता. डॉक्टर डोस देतात तशी बायको जेवण वाढते आणि तुम्ही घाणेंद्रिय, रुची केंद्र तूर्तास बंद करून ते पोटात ढकलता.

शनिवार रात्र तुमच्यासाठी वैऱ्याची असते. मित्रांबरोबर वीकएन्ड निमित्ताने आत्म्यासाठी एखाद दोन पेले रिचवायची तयारी असायची अन ही तयारी आणि त्याजबरोबर पुढ्यात ठेवलेले चकणा नामक पदार्थाचे काय करायचे ? पण तुम्ही तेही अव्हेरू लागता. सॅलड, उकडलेले  चणे आणिक असे काही उकडलेले तुम्ही एन्जॉय करू लागता. हे सगळे जमतेय याचे तुम्हास अप्रूप वाटते आणि तुमच्या अर्धांगिनीस नवल!

ऑफिसमध्ये कोण्या निमित्ताने येणारे गोडधोड तुम्ही साभार परत करता. नाक्यावरच्या वडापाववाल्याची तुम्हाला आता घृणा येते. हा किती तेल वापरतो आणि तेच तेच तेल वापरतो याचा तुम्हाला राग येऊ लागतो. घरी तळलेल्या बांगड्याऐवजी त्याचे कालवण ताटात रुजू होते, तुमची खावटी कमी होते.

तुमची आई मात्र याने दुखी होते, तिला वाटते सुनबाईने ही सगळी नाटके तुमच्या भोवती बसवली आहेत. एखाद्या दिवशी वेळ बघून ती तुमच्यासाठी अगदी तेलसुंदर पक्वान्न बनवून आणते पण तिला तुम्ही समजावता आणि त्या पक्वांनाच्या बाजूलाही जात नाही. पत्नीने मात्र हात टेकलेले असतात हे सर्व निस्तरता निस्तरता ; पण तुमचे कमी होणारे आकारमान पाहून तिलाही हुरूप येतो. संपूर्ण घर डाएटमय होऊन जाते.

तुम्हाला अगदी हलके हलके वाटू लागते, गालफाटे आटोक्यात येतात. नवीन तुमानीसाठी बायको मागे टुमणे लावते. जवळचे मित्र सांगू लागतात अरे जवान दिसतोस अगदी. खूप जवळचे मित्र बोलू लागतात आजार नाही ना रे ! एकदा साखर चेक करून घे पण माझे मला माहित मी या दिवसात घरातली किती साखर वाचवली ते !

पण घरचे आता बोलू लागलेयेत, बस झाले डाएट. खायला चालू कर रे तुझे ते अरबट चरबट! नाही... पण आता हे तुमच्या अंगवळणी पडलेय. तुम्ही पोटावरून बुटावर बघू शकता, खाली मांडी घालून बसू शकता.

पण कधीतरी, जाड जुड समोश्याची, तेलात बुडालेल्या खिम्याची, कळीदार लाडूंची, भरलेल्या बांगडा फ्रायची, बटर चिकन बरोबर गार्लिक नानची आठवण येते. मन द्विधेत पोहोचण्या अगोदरच स्वतःवर ताबा मिळवते अशी साठा उत्तराची कहाणी आता पर्यंत तरी सफल दिसते.

# एक अविस्मरणीय अनुभव

■ जॅक गोम्स, 'आई', चुळणे, वसई.
फोन - 9028195888

सकाळपासून पावसाची रीपरीप चालू झाली. विजा चमकत होत्या. वसईचा एवढ्या वर्षात जो विकास झाला आहे त्यामुळे वसई पून्हा बुडणार तर नाही ना? अशी शंका मनात येत होती. आम्हाला अमेरिकेत जाण्यासाठी ब्रिटीश एअरवेजचे सकाळी ९.३० वाजताचे विमान पकडायचे होते. त्यामुळे आम्हाला विमानतळावर जाण्याची घाई होती. प्रथमतः प्रवासासाठी गुगल दीड तास दाखवत होतं. एवढ्यात मुलीचा फोन आला व तिने विमान पाऊण तास लेट आहे असे सांगितले. आमची तयारी सुरू असताना जावयांचा फोन आला, त्यांनी सांगितले, "डॅडा, ट्रॅफिक जॅम आहे, लवकर निघा." आम्ही घरून निघालो, खड्ड्यातील रस्त्यामुळे गाड्या सावकाश चालल्या होत्या, तरी आम्ही सात वाजता टर्मिनल २ वर पोहोचलो. विमान आता अर्धा तास उशिराने उडणार असा संदेश मिळाला. आमचे चेकइन, इमिग्रेशन आटोपून आम्ही गेट वर बसलो होतो. विमानाचा कुठे अतापता नव्हता. शेवटी ९ वाजता विमान आले, त्याची सर्व स्वच्छता करणे, बॅगा भरणे व ज्वलन भरल्यानंतर त्यांनी बोर्डिंग सुरू केलं. शेवटी साडेनऊचे ब्रिटिश एअरवेजचं विमान दुपारी साडे अकरा नंतर रवाना झालं.

दुपारी चार वाजून अठरा मिनिटांनी विमान लंडन शहरातील हित्रो विमानतळावर उतरले. विमानातून उतरून पुढचे विमान पकडणे अशक्य होते. आम्हास विमानतळावरील कर्मचाऱ्याने सांगितले, "तुमचे पुढचे विमान तुम्हाला मिळणार नाही, कारण हित्रो विमानतळ मोठं आहे व इथून टर्मिनल तीनवर जायला जवळजवळ अर्धा तास लागतो तरी तुम्ही प्रयत्न करू शकता." आम्ही धावत जाऊन टर्मिनल तीनवर जाणारी बस पकडायला गेलो तर ती चार मिनिटाने येईल असे समजले. जेव्हा आम्ही टर्मिनलवर पोहचलो तेव्हा आम्हास सांगितले गेले की तुमच्या विमानाचे दरवाजे बंद झाले आहेत. आता तुम्ही ब्रिटिश एअरवेजच्या कार्यालयाशी संपर्क साधा.

आम्ही त्या कार्यालयाकडे गेलो तेव्हा विमान चुकलेले बरेचशे प्रवाशी रांगेत उभे होते व रांग काही हलत नव्हती. जेव्हा आमचा नंबर लागला तेव्हा तेथील महिला कर्मचाऱ्याने आमचे म्हणणे ऐकून घेतले व आम्हास सांगितले, "तुम्हाला वेगासला जायला कोणतेच

विमान नाही, तुम्ही आजची रात्र इथेच काढा व उद्याच्या विमानाने पुढे जा.” लेक व जावई आमच्याशी सतत संपर्कात होते व मार्गदर्शन करत होते. कोचने कितीही धडे दिले तरी मैदानावर खेळाडूला आपले कसब दाखवावे लागते ना? असा बाका प्रसंग प्रथमच आम्हास आला होता. त्यात त्या गोऱ्यांचं इंग्रजी, वेस्ट इंडिज गोलंदाजाप्रमाणे आमच्या डोक्यावरून केव्हा केव्हा बाऊन्स होऊन जायचं. तीने शेवटी दुसऱ्या दिवसाचे वेगासला जाणाऱ्या पाचच्या विमानाचे बोर्डिंग पास, हॉटेलसाठी, बससाठी, जेवण आणि नाश्त्यासाठी पत्रे दिली आणि ‘डावा घ्या, उजवा घ्या’ असे सांगत हॉटेलचा पत्ता दिला.

काही वर्षांपूर्वी आम्ही स्कुटरवरून पडलो होतो व आमच्या अर्धांगिनीच्या कमरेच्या माकडहाडाला त्रास झाला होता. तेव्हापासून आम्ही व्हीलचेअरचा आधार घेतो. त्या सहाय्यकास मी विनंती केली, तो आपल्या गोव्याचा होता, त्याच नाव येल्टन, गोव्याचे बरेच लोक ब्रिटिश विमानतळावर भेटले. त्याने आम्हास थोड्या अंतरावर सोडले, तिथून दुसरा काळा सहायक मिळाला, त्याने अर्ध्या रस्त्यात सोडले. आम्हाला बस काही मिळाली नाही, आम्ही टॅक्सी करून हॉटेलवर पोहचलो.

आमच्या विमानतळावरील बरेच विमानचुके अगोदरच हॉटेलच्या लॉबीमध्ये पोहोचून रांगेत उभे होते. आमचा नंबर लागला, हॉटेल मर्क्यूरी, फोर स्टार हॉटेल होतं. कपड्याचा एक जोड केबीन बॅगेमध्ये ठेवायची सवय कामी आली. अंघोळ करून जेवण केलं व उद्याचा संपुर्ण दिवस काय करायचे ह्या विचारात झोपून गेलो. पण झोप काही लागली नाही. मुलीने व जावयाचे सांगितले, २४ तासाचा व्हीजा घ्या व लंडन फिरून या. जेव्हा आम्ही हॉटेलच्या बाहेर उतरलो तेव्हा इमिग्रेशनवाल्यांनी २४ तासाचा व्हीजा काही न सांगता दिला होता.

लंडनमध्ये असलेल्या काही भारतीय मित्रांशी संपर्क साधायचा प्रयत्न केला पण कुणाशी संपर्क होऊ शकला नाही. इथे रात्री अकरापर्यंत सूर्यप्रकाश होता व सकाळी चार वाजता सूर्यप्रकाश दिसत होता. इथला सूर्य मे-जून महिन्यात कमी झोपतो, असे समजले.

पहाटे ४.३० वाजता उठलो कारण आपल्या व ह्यांच्या वेळेमध्ये साडेचार तासाचा फरक आहे. प्रातर्विधी आटोपून प्रभातफेरीसाठी बाहेर पडलो. रिसप्शनवर हॉटेलचे मॅनेजर भेटले, त्यांनी गुड मॉर्निंग केले, त्यांच्याकडे चौकशी करून फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडलो. अर्धा तास भ्रमंती केली. छोटी छोटी साचेबद्ध घरं. पूर्ण नियोजन करून उभं केलेलं शहरं. ऐतिहासिक शहर.

हॉटेलवर परतल्यावर भुपेंद्र सिंग नावाचा पंजाबी टॅक्सी चालक भेटला. त्याच्याशी बातचीत केली, लंडन पाहण्याची मनीषा व्यक्त केली. तो तयार झाला. विमान चुकल्यामुळे कुढत बसायचे की मिळालेल्या संधीचं सोनं करायचं हे प्रत्येकानी ठरवायचं.

मस्तपैकी भरपूर नाश्ता केला व सकाळी ८.३० वाजता आमची लंडन भ्रमंती चालू झाली. भुपेंद्र सिंग त्याच्या बॉलिवूड ते हॉलिवूड मैत्रीचे किस्से सांगत होता. आज शनिवार आहे म्हणून ट्रॅफिक कमी आहे, नाहीतर सेंट्रल लंडन जायला दीड तास तरी लागतो, असे त्याच्या बोलण्यावरून समजले. खूप वर्षाची इच्छा होती, क्रिकेटची पंढरी ज्याला संबोधलं जाते असे लॉर्ड्स मैदान. जिथं भारताने १९८३ साली वेस्ट इडिजला हरवून  कपिल देव ह्यांच्या नेतृत्वाखाली वर्ल्ड कप पटकावला, जिथे नेटवेस्ट ट्रॉफी जिंकली होती, जिथे वेंगसरकरांनी तीन शतके मारली होती व जगातील मोठमोठ्या खेळाडूंच्या पदस्पर्शानं पावन झालेलं लॉर्ड्स मैदान पाहायचं होतं आणि काय संयोग बघा… आजही भारताने रोहीत शर्माच्या नेतृत्वाखाली T20 चा वर्ल्ड कप जिंकला. मैदान बाहेरून व आत डोकावून जेवढ पाहता येईल ते पाहिलं. जिथे ग्रॅहम गुच ह्यांच्या त्रिशतकांचा ठळक 333 हा आकडा लिहला आहे. लोकांना त्या दिवशी मैदान पाहणे बंद होतं.

नंतर आम्ही निघालो ज्या राणीच्या नावाने संपूर्ण इंग्रजांची मान आदराने खाली जाते, ज्या किल्ल्यावरून जागतिक निर्णय घेतले गेले होते, त्या बर्घिंघम पॅलेसला भेट दिली, मनसोक्त फोटो काढले. त्या फोटो काढण्याच्या नादात एक तरुण व तरुणी आमच्याशी जवळीक साधू पाहत होते, त्यांनी माझ्या नकळत माझ्या बॅगेला हात लावला. आमच्या अर्धांगिनींच्या नजरेतून व त्यांच्या हालचालीवरून आम्हाला त्यांचा संशय आला, आम्ही त्यांच्याकडे पाहू लागलो तितपर्यंत ते माना खाली घालून पतली गलीसे भाग गये.

नंतर आम्ही हुजूर व मजूर पक्षाच्या नेत्यांच्या संवादाने भारलेल्या, जागतिक राजकारणाचे माहेरघर असलेल्या व जागतिक यश अपयशात कारणीभूत ठरलेल्या पार्लमेंटमध्ये ज्यांच्या साम्राज्याचा सूर्य केव्हा मावळत नाही अशा ब्रिटीश पार्लमेंटला भेट दिली. भारतीय वंशाची व्यक्ती आज पंतप्रधान आहे व काल परवा रोहीत सेनेने सेमी फायनलला पराजित केले. हे सूर्य मावळत चालल्याचे जिवंत उदाहरण. बाजूलाच राजघराण्याचं भव्य दिव्य चर्च आहे, त्याला भेट दिली. तेथून आय लंडन पाहायला गेलो. वाटेत मॅडम तूसॉ संग्रहालय, जिथे जगातील सेलेब्रिटीजचे व्हॅक्सचे पुतळे उभारले आहेत ते बाहेरून पाहिलं. नंतर आमची सवारी लंडन ब्रिज इज फॉल्लिंग डाउन - लंडन ब्रिज पाहायला गेली. ते पाहता पाहता दुपारचे बारा केव्हा झाले ते समजले नाही. ट्रॅफिक असल्याने हित्रो विमानतळावर जायला गुगलची मॅडम दीड सांगत होती, कालचा आमची चुक नसताना विमान चुकलंच.. अनुभव ताजा होता. आमच्या हिने सांगितले, आता बस झाले. मग तिथून आम्ही काढता पाय घेतला व आमची कार विमानतळाच्या दिशेने धावू लागली. बरोबर दीड वाजता आम्ही आमच्या जीवाचं लंडन करून परतलो.

विमान चुकल्याचा मनस्ताप डोक्यातून जात नव्हता पण अपघाताने का होईना आम्ही लंडन पाहून घेतलं. कारण मे महिन्यात आम्ही युरोपला गेलो होतो पण मुद्दाम लंडनला जाण्याचे टाळले होते. २३ दिवसाची सहल खूप मोठी होती. आम्ही कमी (१८) दिवसाची सहल बुक केली, वास्तविक त्यामुळे केव्हा तरी लंडन पाहून घेऊ, ते एवढ्या लवकर होईल असे वाटले नव्हते. निर्मितीपेक्षा निर्मात्याची स्तुती करणे महत्वाचे आहे, ह्या जगातील सर्व जीवजंतूंचा निर्माता जो प्रभू परमेश्वर आहे, ज्याच्या मर्जीशिवाय झाडाचं पानही हलत नाही, त्याच्या आशीर्वादाने व आमच्या प्रयत्नाने लंडन भ्रमंती शक्य झाली

अशा प्रकारे मिळालेल्या संधीचं सोनं करत, जो होता है वह अच्छे के लिये होता है, जो होगा वो भी अच्छे के लिये होगा असे बोलत ब्रिटिश एअरवेजच्या कार्यालयाकडे वळालो. तेथील अधिकाऱ्याला आमची कहाणी सांगितली, त्यांनी संपूर्ण सहकार्य केले व व्हीलचेअरच्या सहाय्याने आमची गेटपर्यंत जायची सोय केली. दुसऱ्या दिवशी वेगासला पोहचलो. इमिग्रेशन व कस्टम क्लिअर करून उतरलो तर आमची नात व लेक स्वागतासाठी गेटवर उभे होते, त्यांच्याबरोबर रात्री ९.३० वाजता आम्ही आमच्या हेंडरसन येथील घरी पोहचलो.

# आणि कॉफीचे पैसे वाचले

**■ जगदीश अनंत संसारे, मुंबई**

खिशात काही नसले तरी आमचे ख्वाब मात्र नवाबी होते. ही गोष्ट आहे जेव्हा आम्ही मित्र पदव्युत्तर पदवीचा अभ्यास करण्यासाठी मुंबई विद्यापीठात आलो आणि वाकोला ब्रीज (याविषयी नंतर कधीतरी सांगेनच) तिथे पत्र्याच्या चाळीमध्ये रहात होतो. आमच्या मध्ये एक मित्र अतिशय देखणा, उमदा होता पण तो आमच्या बरोबर राहत नव्हता. तो राहत होता किंग्ज सर्कलला आणि त्याचं नाव 'राजू'. नुकताच त्या वेळेला 'राजू बन गया जेंटलमॅन' हा पिक्चर आला होता. आम्ही त्याला चाळीतील शाहरुख म्हणत असू! सकाळीच नव्हे तर रात्री अपरात्री कधीही उठल्यानंतर सर्वात प्रथम आपण मोबाईल पाहतो तो मात्र केस विंचरायचा, पावडर लावायचा. कुठे जातोय पट्ट्या? असा प्रश्न झोपेतच आम्हाला पडायचा. पण मस्त वाटायचं त्याला पाहून. 'जगावं कसं मस्त मजेत'! याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे आमचा राजू! दिसायला चिकना-चोपडा असल्यामुळे महाविद्यालयात... लय फेमस होता.

अरे हो! हे सांगायचेच राहिले राजू आणि मी दिसायला बरेच सारखे होतो. पण माझ्यापाठी कोणी पोरी मात्र पडल्या नाहीत; चार हात लांबच राहिल्या. राजुला मात्र आज एक तर उद्या दुसरी असं त्याचं नशीब असायचं. महाविद्यालयात तो मला एक वर्षाने दादा (सिनियर) होता. आम्ही एकत्र फिरत असू. राजुच्या सगळ्या प्रकरणांचा मी साक्षीदार होतो. कधी ? कुठे ? कशी ? पोरगी पटवली हे माझ्याशिवाय कदाचित राजुलाही ठीक माहीत नसेल.(अतिशयोक्ती) आज मी तुम्हाला, अशा या राजूची 'फटकेदार' कहाणी सांगणार आहे.

पत्राचाळीत आम्ही जेव्हा राहत होतो तेव्हा राजू राहत होता किंग्ज सर्कलला. त्यांचं बी.एड. झाले होते. नोकरी मिळेपर्यंत मस्त कुठेतरी आपलं भटकायचं असा त्याचा उद्योग असायचा. आम्ही मुंबईत आल्यानंतर तो नित्यनियमाने संध्याकाळी वाकोल्यात यायचा. त्याला काही तिकीट काढायची आवश्यकता नव्हतीच. रेल्वेचा जावई असल्यासारखा तो तोऱ्यामध्ये किंग्ज सर्कल ते सांताक्रूझ व्हाया वडाळा रोड असा प्रवास करत असे. कधीच पकडला गेला नाही, हे विशेष! व्यक्तिमत्त्व बघा असं असावं लागतं की, समोरच्याला वाटलं पाहिजे, की याच्याकडे तिकीट असणारच.

तर मित्रांनो एका संध्याकाळी (रम्य म्हणावं की नाही हा तुमचा प्रश्न ) कारण ती संध्याकाळ मार खाण्याची होती, असे तुम्हाला पुढे कळणारच आहे. नित्यानंद नावाचं वाकोला ब्रिजच्या थोडं पुढे गेल्यानंतर एक हॉटेल आहे. आमच्या तिघांच्या म्हणजे राजू-संजू आणि मी आमच्या खिशात दमडी नव्हती. कॉफी प्यायची मात्र प्रचंड इच्छा निर्माण झाली होती. त्या नित्यानंद मधली 'नेसकॉफी' भारीच असायची. आज धाडस करून मी म्हटलं, "चला थोडे पैसे माझ्याकडे आहेत मी पाजतो कॉफी". दोघंही बागेतल्या कारंजासारखे उसळले आणि थुईथुई नाचायला लागले. मग वाकोल्यापासून रमत-गमत गप्पा मारत मारत दोघांच्या चेहऱ्यावरचा आनंद टिपत टिपत मी नित्यानंदपर्यंत पोहोचलो.

आम्ही आपल्या कोपऱ्यातलं टेबल पकडलं आणि तिथे जाऊन बसलो. राजूच्या म्हणण्यानुसार कोपऱ्यातलं टेबल म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेले जणू टेहाळणी बुरुज असतात. तिथून म्हणजे गडावरून जसं येणाऱ्या शत्रूवर लक्ष ठेवता येतं तसं या टेबलवरून अख्ख्या हॉटेलवर लक्ष ठेवता येतं. कोण? कुठे? बसलय, (म्हणजे कोण कुठेऽऽऽ बसली आहे.) किती चिकणी आहे? कोणाबरोबर आली आहे? याचं सगळं निरीक्षण हे तिथून करता येतं. थोड्या वेळाने वेटर आला. त्याला वाटले तीन बरे दिसणारे आपल्याकडे आले आहेत. जरा चांगली टीप  मिळेल. ऑर्डरशी तसं काही त्याच देणं घेणं नव्हतं. पण टीप मिळेल याची खात्री त्याला होती. अगदी अदबीने आम्हाला त्याने विचारलं, "साब जी क्या लाऊ आपके लिये?" (महाराष्ट्र सर्व भाषिकांना वाव देतो) त्याची अदब पाहून माझ्या मनाला गुदगुल्या होऊ लागल्या. मी बिल देणाऱ्या आवाजात म्हटले,"दो कॉफी लाओ, तीन मे!" (आम्ही अस्सल मराठी बरं का!) पाठमोऱ्या वळलेल्या वेटरचा चेहरा वाकडा झाला असेल, हे माझ्या लक्षात आले.

कॉफी यायला बराच वेळ होता म्हणून राजूला पोरी निरखून बघायला बराच वेळ मिळाला. अन्यथा हॉटेलमध्ये जास्त वेळ बसता येत नाही ऑर्डर मिळेपर्यंत आणि आपलं पुढ्यातलं खाऊन-पिऊन होईपर्यंत आपण नक्की बसू शकतो. पाच ते सात मिनिटं आम्ही (संजू आणि मी) आपल्या गप्पा मारत बसलो होतो. राजू कोणाकडे एकटक लावून पाहतोय? म्हणून मी वळून पाहिलं. मी वळून पाहताच आमच्या मागच्या टेबलवरची पोरगी जिच्यावर राजूचा नयन कॅमेरा रोखला गेला होता. 'ती' चवताळून उठली आणि म्हणाली, "हलकट, कुत्र्या, मेल्या काय बघतोस ? कधी पोरी बघितल्या नाय का ?" माझी भंबेरी वळाली. मी तर तिच्याकडे आताच बघितलं होतं, आली उठून सरळ राजूची कॉलर पकडली आणि राजुला अद्वातद्वा बोलू लागली.

आता राजूची बोबडी वळली. आपल्या मेहुणीकडे कोणीतरी बघतोय हे जेव्हा तिच्याबरोबर असलेल्या भाऊजींना कळलं तेव्हा त्यांनी थेट मोर्चा राजूकडे वळवला. आता हमरा-तुमरीचा प्रश्न आला. मध्यस्थी करण्या इतका प्रौढ, प्रगल्भ, थोर विचारवंत आमच्या तिघांमध्ये मीच होतो. (स्वतःची पाट थोपटून घेतली!) उठलो आणि उसने अवसान आणून विचारले, "काय झाले?""माझ्या मेहुणीकडे हा टक लावून पाहतोय मगाचपासून!" वकीली थाटात मी म्हटले,"भाऊ, एक प्रश्न विचारू का तुम्हाला? तुमच्या मेहुणीला कसं बरं कळलं, की तो टक लावून पाहतोय?" (काही पोरी काही कमी नसतात!) या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी मेहुणी आणि भाऊजी दोघेही गारच झाले. तेवढ्यात त्या मेहुणीची बहीण म्हणजे भाऊजीची बायको उठली आणि तिला म्हणाली, "आलीस तू मोठी पतिव्रता, सतीसावित्री! तू काही कमी नाहीयेस. चल उठ इथून. जिथे जाते तिथे तमाशा करते." जाता जाता बरंच काही माझ्या कानावर पडलं.

राजू चक्क माझ्या पाया पडला आणि म्हणाला, "जगू धन्य झालो. माझ्यावर फार उपकार केलेस. तू नसतास तर फटकेच खाल्ले असते." (संजू काही कामाचा नाही, राजूला असेच म्हणायचे असावे) 'मी' लगेच फुलटॉस पडलेल्या चेंडूवर हिटमॅनचा पूल शॉट षटकार ठोकला आणि राजुला कॉफीचे बिल भरायला लावले. त्यानेही शंभराची कोरी करकरीत नोट (कदाचित शेवटची असावी.) ती काढली आणि वेटरकडे सरकवली. मला खूप बरे वाटले.... राजूचा मार वाचला म्हणून नव्हे तर माझे कॉफीचे पैसे वाचले म्हणून!

या प्रसंगातून मी एक गोष्ट शिकलो! कुणाकडे (पोरीकडे) बघत बसण्यापेक्षा, निसर्गाकडे बघत बसावे, रस्त्याकडे बघत बसावे; वाहतुकीकडे बघत बसावे; आणि मस्त आनंद लुटावा. कॉफी पित पित 'जगावं कसं मस्त मजेत!'

# शेतीबागायती सोबत साहित्यनिर्मितीचा प्रयोग!!

**■ जॉन कोलासो, गिरीज**

या गोष्टीला खूप काही काळ लोटला नाही.... आजही ही वास्तवता डोळ्यासमोर सहज उभी राहते....! कल्याणमधील काळा तलाव येथील आमच्या मुबलक जागेत आम्ही शेती आणि बागायती करीत होतो, विविध प्रकारचा भाजीपाला, फळभाज्या पिकवत होतो त्याचबरोबर आम्ही मराठी साहित्यसेवा आणि पत्रकारीताही सांभाळत होतो...!!

भाजी व भातशेतीत अनेक नवीन नवीन प्रयोग करून यशस्वी केल्याबद्दल आमचे वडील श्री जोजेफ कोलासो यांना कृषी खात्याकडून अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

माझा मोठा भाऊ ॲन्ड्र्यू कोलासो आज त्याचे वय ८३ वर्षे आहे. तो रुपारेल कॉलेजला असताना कल्याणहून माटुंगा येथील या कॉलेजला जात असे. कॉलेज करीत असतानाच त्यास आचार्य अत्रे यांच्या मराठा वर्तमानपत्रात उपसंपादक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. प्रा. राम कापसे त्यावेळी रुपारेल कॉलेजला शिकवित होते. त्यांच्यांशी त्यांचा संबंध आला. कॉलेजमध्ये रामभाऊ सारख्या अभ्यासू प्राध्यापकांचे आणि मराठ्यात आचार्य अत्रे आणि त्यांची कन्या शिरीष पै या ज्येष्ठ पत्रकारांचे त्यास मार्गदर्शन लाभले. त्या संधीचा त्याने पुरेपूर फायदा उठविला आणि कथा, लेख, कविता लेखन सुरू केले. मराठा आणि शिरीष पै संपादन करीत असलेल्या ‘नवयुग’ या साप्ताहिकात त्याचे हे लेखन प्रकाशित होत असे. पुढे लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स इत्यादी वर्तमानपत्रातही त्यास लिहिण्याची संधी मिळाली.

अशाप्रकारे साहित्य क्षेत्रात माझा भाऊ रूळत असताना त्याच्या मनात स्वतः केलेले लिखाण प्रसिद्ध करून इतर नवोदित लेखकांचे साहित्य, पुस्तके किफायतशीर दरात छापून ती प्रकाशित करूया, असा विचार आला. म्हणून कल्याणच्या आमच्या जागेत प्रिटिंग प्रेस सुरू करण्याचा निर्णय त्याने घेतला आणि त्याने तो अमलातही आणलाही.

थोड्याच दिवसांत ‘सरोज प्रिंटिंग प्रेस’ सुरू झाली. याकामी त्यास कल्याणचे प्रिंटिंग प्रेस व्यवसायातील श्री. रमेश साठे आणि श्री. दिलीप काणे यांनी मोलाचे सहकार्य केले. प्रेस सुरू केली, परंतु पेपर कटिंग मशीन नव्हती. त्यामुळे श्री. रमेश साठे यांच्या किंवा अगरवाल प्रेसमध्ये कागदाची रीम भाजीपाला मार्केटमध्ये घेऊन जायच्या टोपलीत घेऊन शेतमजूर घेऊन जात असत.

योगायोगाने मीही १९७३ साली एसएससी उत्तीर्ण होऊन वसईहून कल्याणला कॉलेजच्या शिक्षणासाठी दाखल झालो. मला तर प्रिंटिंग प्रेस ही कल्पना नाविन्यपूर्ण वाटली. म्हणून मी प्रेसचे काम उत्सुकतेने पाहत असे!

असे करीत असताना मी या प्रेसमध्ये इतर कामगारांसमवेत कामही करू लागलो. कंपोझिंग आणि छपाईची ट्रेडल मशिन चालविणे मला जमायला लागले व काहीतरी आपण नाविन्य करीत असल्याचा आनंदही वाटू लागला...!!

कागदाची रीम उल्हासनगर येथून रिक्षाने मी घेऊन येत असे. उल्हासनगरहून रिक्षा सामान घेऊन कल्याणमध्ये शिरली की जकात नाक्यावर जकात भरावी लागत असे. त्यामुळे मला कागदावरही जकात भरावी लागत असे. एकदा एका रिक्षाचालकाने जकात चुकविण्यासाठी युक्ती सुचविली. तो म्हणाला रिक्षाच्या डिकीत कागद ठेवू, म्हणजे जकात भरावी लागणार नाही. मी त्याचा सल्ला मानला. पण माझ्या दुर्दैवाने जकात निरीक्षकाने रिक्षा थांबवली व चालकास डिकी खोलायला लावली. कागदाची दोन रिम सापडली. त्याने माझी विचारपूस केली व मला समज दिली. 'पुन्हा असं करू नकोस आणि सोडून दिलं. या निरीक्षकाचं नाव मला अजूनही आठवतं... बंडू सुखठणकर. त्यांना लिहिण्याची आवड होती... म्हणून कदाचित त्यांना प्रिंटिंग प्रेसबद्दल सहानुभूती असावी.

पुढे प्रेसचा जम बसत गेला आणि आमच्याकडे पुस्तकांचे व कल्याणहून प्रसिद्ध होणाऱ्या काही नियतकालिकांचे छपाईचे कामं येऊ लागली. त्यामध्ये विशेष उल्लेख करायचा म्हणजे ‘कल्याण नागरिक’ या साप्ताहिकाचा.

श्री. प. अ. घारे हे या साप्ताहिकाचे संस्थापक व संपादक होते. आग्रा रोडला एका चाळीत ते राहत असत. तेथून ते आमच्या प्रेसमध्ये मजकूर घेऊन आणि प्रूफ रिडिंग करायला वक्तशीरपणे येत असत. त्यांची लेखणी निर्भीडपणे चालत असे. काम करीत असतानाच ते कल्याणमधील काही राजकीय नेत्यांचे किस्से सांगत असत.

त्यावेळी काँग्रेस, शेकाप आणि जनसंघ हेच प्रामुख्याने असल्याने या पक्षनेत्यांचे किस्से त्यांच्याकडे भरपूर असत.

या साप्ताहिकामध्ये मी सध्या नियमित लिखाण करीत आहे. कल्याणमधील माझ्या मित्रपरिवारासोबत या साप्ताहिकाशी मी ऋणानुबंध राखून ठेवले आहेत.

'कल्याण नागरिक'ची छपाई चालू असतानाच मुरबाड रोडवर राहणारे शेकापचे कार्यकर्ते श्री. दिनेश मोरे यांचे 'दुर्गाडी' हे पाक्षिक आमच्याकडे छपाईसाठी आले. दिनेश मोरे यांच्यासोबत अनेक कार्यकर्ते असत. एक मोठी फौजच असे. त्यांच्या या पाक्षिकात राजकीय लेख व गुन्हेगारीविषयी बातम्या जास्त असत. त्यांचे कल्याणच्या पोलिसांशी कोणत्यातरी कारणामुळे बिनसले. त्यामुळे पोलिसांवर ते अधिक टीका करीत असत. तेव्हा पोलीस इन्स्पेक्टर म्हणून पंडितराव होते. योगायोगाने त्याच काळात पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी पुकारली आणि काही दिवसांनी श्री. दिनेश मोरे यांना 'मिसा'खाली अटक करण्यात आली. अनेक दिवस ते तुरुंगात होते. 'दुर्गाडी' पाक्षिक बंद पडले.

त्याच दरम्यान कोळसेवाडी येथे राहणारे आणि शहाडच्या सेंच्युरी रेयॉन कंपनीत कामगार कल्याण अधिकारी म्हणून काम पाहणारे श्री. नामदेव पाटील यांनी एक पाक्षिक सुरू केले होते. तेही आमच्याकडे छपाईला येऊ लागले. त्यांची विचारसरणी साम्यवादी होती, परंतु काँग्रेसशी अधिक निष्ठा असल्याने त्यांच्या बातम्या आणि लेख काँग्रेसच्या बाजूने अधिक झुकलेल्या असत.

अशा या नियतकालिकांमुळे आमच्या या सरोज प्रिंटिंग प्रेसचे ख्याती कल्याणबाहेर गेली. भिवंडी येथील पत्रकार श्री. जगन पाटील यांनी त्यांचे 'बंधमुक्त' साप्ताहिक आमच्याकडे छपाईकडे आणले. परंतु, श्री. पाटील यांचा पत्रकारितेपेक्षा भिवंडी निजामपूर महापालिकेच्या जाहिराती तसेच कामाची टेंडर मिळविणे हा मुख्य व्यवसाय होता. लेखनही त्यांचे फारच अशुद्ध असे, त्यामुळे त्यांच्या बातम्या व लेख यांचे पुनर्लेखन आम्हालाच करावे लागे. परंतु, अंक छापून झाला की ते गठ्ठा बांधून स्वत: भिवंडीला एसटी बस किंवा रिक्षाने घेऊन जात असत. पुढे पुढे त्यांची प्रकृती खालावली आणि 'बंधमुक्त' बंद पडलं.

इतरांच्या नियतकालिकांचे छपाई करणे चालू असतानाच वसईसाठी आम्ही 'जनपरिवार' हे साप्ताहिक चालू केले. त्याची छपाईही सरोज प्रिंटिंग प्रेसमध्ये करीत

असत. आज सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेले हे साप्ताहिक नियमितपणे वसईहून प्रकाशित होत आहे. या साप्ताहिकाद्वारे अनेक होतकरू तरुणांना लिखाण करण्याची प्रेरणा मिळाली.

मीही याच साप्ताहिकाद्वारे पत्रकार म्हणून घडलो गेलो. नवशक्तीत पाच वर्षे उपसंपादक म्हणून आणि त्यानंतर महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रथम उपसंपादक आणि नंतर ‘मुख्य उपसंपादक’ अशाप्रकारे एकूण तीस वर्षे जबाबदारी पार पाडली. या काळात मला अनेक लेख व बातम्या लिहिता आल्या. अनेक लेखांना व बातम्यांना विविध संस्थांचे पुरस्कारही मिळाले.

अशा या नियतकालिकांचे छपाईचे काम चालू असताना आम्ही पुस्तके छपाईचे कामही चालूच ठेवले होते. त्यामध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेत त्यावेळी अधिकारी म्हणून नोकरीत असलेले श्री. विश्वास नित्सुरे यांची ‘दर्द’ही कादंबरी आम्ही छापली आणि ‘शब्दपीठ’ या आम्हीच स्थापन केलेल्या प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध केली. या कादंबरीला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळाला.

आमचा भाऊ ॲन्ड्र्यू कोलासो याचे लेखन चालूच होते. त्याने ‘साईट देअर स्टोर्क’ या जर्मन कादंबरीचा मराठी अनुवाद ‘सुजान’ नावाने केला, त्यानंतर ‘ओले बिन कॉप’ या आणखी एका जर्मन कादंबरीचा ‘जय किसान’ नावाने अनुवाद केला. त्यापाठोपाठ दुसऱ्या महायुद्धावर आधारित कथांचा ‘याचि देही, याचि डोळा’ नावाने अनुवादित कथासंग्रह प्रसिद्ध केला. त्यानंतर स्वतंत्र लिखाण केलेले कथासंग्रहाचेही प्रकाशन केले. अशी त्याची साहित्य क्षेत्रात घोडदौड चालूच आहे.

माझीही वर्तमानपत्रातील लिखाणासोबत चार पुस्तकेही प्रकाशित झाली. अशाप्रकारे काळातलाव येथे प्रिंटिंग प्रेस, नियतकालिकांची छपाई, पुस्तके प्रकाशित करणे आणि मी व भाऊ अशा दोघांची पत्रकारिता यामुळे काळा तलावाचा पूर्वेकडील पट्टा आम्ही शेती व बागायतीमुळे अनेक काळ हरित ठेवला होता तसेच या पट्ट्यात शेती व भाजीपाला सोबत मराठी साहित्य निर्मिती चालू ठेवली होती...!!

# घराला शहाणीव देणारी पुस्तके

■ जॉन गोन्सालवीस, उमराळे

हिन्दी कवी सुभाष वर्मा ह्यांची पुस्तकांविषयीची एक कविता आहे,

‘किताबोंका अपना एक
वजूद होता है । वे न जाने
कितने दू:ख, दर्द न जाने
कितने जीवन समेटे रहती है ।
एक मूर्ख के लिए वह सिर्फ
कागज और शब्दों का पुलिंदा
हो सकता है ...
मगर एक विकासशील दिमाग
के लिए वह एक जीवन है
एक प्राणशक्ती है, जो उसे
रह दिखाती है ।

पुस्तक ही मानवजातीला लाभलेली एक अनमोल देणगी आहे. पुस्तकांचे महत्व केवळ शब्दांमध्ये व्यक्त करणे कठीण आहे. ज्ञानाचा सागर म्हणजे पुस्तके, विचारांचा डोंगर म्हणजे पुस्तके. पुस्तके आपल्याला विविध विषयांवरील माहिती देतात. इतिहास, भूगोल, तत्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, मानसशास्त्र, राजकारण आदि अनेक विविध ज्ञानाचे दरवाजे खुली करतात. पुस्तके आपल्या जीवनाला समृद्ध आणि प्रेरणादायी बनवतात. एक पुस्तक एक नवीन जग उघडते. प्रत्येक पुस्तक आपल्याला नव्या कल्पना, नवीन विचार, नवीन स्वप्ने, नवीन आशा देऊन अनुभवांच्या जगात फेरफटका मारून आणते.

आपले शरीर मजबूत, सुदृढ, सशक्त निरोगी राहण्यासाठी जशी संतुलित आहार आणि नियमित व्यायामाची गरज असते तशीच आपल्या मनोविकासासाठी, मनाच्या

मशागतीसाठी अविरत अखंड वाचनाची गरज असते. माणसाच्या वाट्याला एकच आयुष्य आलेले आहे. या एकाच आयुष्य अनेक जीवने जगण्याचा अनुभव केवळ पुस्तकेच देऊ शकतात. पुस्तके वाचणारा माणूस अनेक आयुष्य जगतो; तर न वाचणारा फक्त आपलेच आयुष्य जगतो.

प्रत्येक पुस्तकात वाचकांवर प्रभाव टाकण्याची क्षमता असते. पुस्तक वाचन हा साधा, सोपा, कमी खर्चिक सहज उपलब्ध मार्ग आहे. केवळ ज्ञानच मिळत नाही, मनोरंजन होत नाही तर जगण्याचे अनेक मार्ग गवसतात. जीवनाला योग्य दिशा मिळते. तनमनाची वृद्धी आणि धनाची समृद्दी मिळते. वाचनामुळे माणसाची कल्पनाशक्ती, विचारशक्ती, संवेदनाशक्ती, सृजनशक्ती वृद्धिंगत होते. पुस्तकांच्या सहवासात मनुष्य स्वत:ची दु:ख, वेदना, समस्या विसरून जातो. चरित्र-आत्मचरित्र वाचनाने संकटे, समस्या यावर जिद्दीने मात कशी करावी हे कळते. ललित साहित्याने माणसाचे भावनिक भरणपोषण होते, कादंबरी वाचनाने कल्पनाशक्ती विकसित होते. काव्यवाचनाने संवेदनशीलता सजग होते. वैचारिक साहित्याने माणसाच्या विचारसरणीची व्यापकता विस्तारते. संस्कृतीच्या संवर्धनासाठी आणि आपल्या मनाच्या उन्नतीसाठी पुस्तके साथीला हवीच म्हणून निसर्ग उपासक साहित्यिक हेन्री डेव्हिड थोरो म्हणतो, “ग्रंथ हे विश्वभंडारातले अमूल्य धन आहे. पिढ्यानपिढ्यांचा आणि राष्ट्रांचा अतिसंपन्न आणि समृद्ध असा वारसा आहे.”

ग्रंथांना देवरुप देऊन स्वच्छ मनाने त्यांची पुजा करण्याची परंपरा प्राचीन आहे. ‘ज्ञानेश्वरी’, ‘तुकाराम गाथा’, ‘रामायण’, ‘महाभारत’, ‘भगवदगीता’, ‘कुराण’, ‘बायबल’ आदि धर्मग्रंथांना कपड्यात गुंडाळून ठेवेलेले असते. शिखधर्मीय बांधवांच्या ‘गुरुग्रंथसाहेब’ या नावातच त्यांनी ग्रंथाला गुरूपद बहाल केले आहे. घरातील टिव्ही, फ्रीज, ऊंची फर्निचर घराला घरपण देतील पण घरात ग्रंथघर असेल तर ते घराला शहाणपण देईल. ज्या घरात पुस्तकांसाठी स्वतंत्र जागा असते, पुस्तके खरेदी करण्यासाठी पैसा खर्च केला जातो आणि खरेदी केलेली पुस्तके वाचण्यासाठी वेळ असतो, त्या घरात वाचनसंस्कृती सुखाने नांदत असते. म्हणूनच इतिहासकार प्रा. मा. मू. देशमुख म्हणायचे,

“ज्यांच्या घरी नाही पुस्तकांचे कपाट

त्यांचे घर केव्हाही होईल सपाट”

ज्या लेखकांनी आपल्या विलक्षण आणि विचक्षण लेखणीने वाचकांना समृद्ध आणि श्रीमंत केले त्यापैकी एक महत्वाचे नाव म्हणजे प्रतिभा रानडे. ‘अफगाण डायरी’,

‘बुरख्याआडच्या स्त्रिया’, ‘फाळणी ते फाळणी’, ‘अनुबंध धर्म संकृतीचे’, ‘मी नाही ख्रिस्ती, मुस्लिम, हिंदू’, ‘स्त्री प्रश्नांची चर्चा’, ‘एकोणीसावे शतक’ आदि अभ्यासपूर्ण ग्रंथांची निर्मिती करणाऱ्या सिद्धहस्त लेखिका, त्यांच्या जीवनातील ही घटना. त्यांचे वडील कोशकार श्री. गणेश रंगो भिडे. माहेर त्यांचे कोल्हापूर. त्या दरवर्षी आपल्या माहेरी कोल्हापूरला जात असत. माहेरून निघताना ‘मला साड्या नको, पुस्तके द्या’ म्हणून आग्रहाने सांगणाऱ्या, अफगाणीस्तानातून भारतात परत येताना सामान जड झालं, म्हणून विमानातळावर कस्टम चेकिंग झाले. त्यांनी तेथून बरोबर फ्रीज आणला होता. त्याकाळी लोक अफगाणीस्तानातून भारतात येताना सोनं आणायचे. कारण तेव्हा तेथे सोने स्वस्त मिळायचे. कस्टमवाल्यांनी फ्रीज उघडून बघितलं, मात्र फ्रीज उघडताच त्यांना आश्चर्य वाटलं. कारण फ्रीजमध्ये सोने नव्हते; तर सोन्याहून मौल्यवान पुस्तके भरली होती. ते पाहताच तो कस्टम अधिकारी म्हणाला, “लोक सोनं आणतात आणि तुम्ही पुस्तकं ?, आता पुस्तकासाठी काय घ्यायचं तुमच्याकडून!”

आपण देशा-परदेशात पर्यटक म्हणून जातो, येताना काय घेऊन येतो ? अनेक महागड्या दुर्मिळ वस्तु आणतो पण सोबत एक पुस्तक खरेदी केले असते का ?

तूप खाल्ल्यावर लगेच रूप येत नाही. त्यासाठी पुस्तके वाचनाचा अखंड ध्यास हवा. साधना हवी, चिकाटी हवी. सातत्य हवे, नियमितता हवी. दररोज स्नान केल्याने शरीर स्वच्छ होते. मनाच्या स्वच्छतेसाठी ग्रंथांचे नियमित पारायण हवे. आपल्या भारतीय संस्कृतीत आपट्याच्या पानाने दसरा, आंब्याच्या पानाने दिवाळीतील पाडवा सण साजरा करतो. आपले आयुष्य साजरे करण्यासाठी ग्रंथांची पाने उपयोगी पडतात. विड्याचे पान आपले तोंड रंगवते, पुस्तकाचे पान आपले जीवन रंगवते. भिंतीची शोभा वाढवणारी पुस्तके घरात नकोत, तर ती वाचायला हवीत, चाळायला हवीत, पाहायला हवीत. एक जपानी म्हण आहे, ‘भिंतीची शोभा वाढवणारे पुस्तक दुकानात काय आणि घरी काय सारखेच.’ याचाही विचार व्हावा. जमिनीत पुरून ठेवलेले धन जेवढ्या प्रमाणात निरुपयोगी तेवढ्याच प्रमाणात कपाटात कडी-कुलूपात ठेवलेले ग्रंथ होत. ग्रंथांचे अभिसरण खूप वेगात व्हायला हवे.

पुस्तकांचे नियमित वाचन करायला हवे. पुस्तके वाचण्यासाठी मला वेळ नाही ही सबब निरर्थक आहे. हावर्ड विद्यापीठातील इतिहासतज्ञ डॉ. अँलेक्झांडर गर्शेनक्रान यांनी म्हटले आहे की आठवड्यात जरी दोन पुस्तके वाचली तरी ५० वर्षे आयुष्यात सुमारे ५०००

पुस्तके वाचता येतील. बिल गेट्स दरवर्षी ५० पुस्तके वाचतात. वॉरेन बुफे दिवसातील बहुतांशी वेळ वाचनासाठी देतात, आपण पुस्तक वाचनासाठी किती वेळ देतो ?

पुस्तकाचे वाचन केल्यामुळे भाषेचे ज्ञान वाढते. शब्दसंपती वृद्धिंगत होते. विचार करण्याची आपली शैली सुधारते आणि संवाद साधताना आत्मविश्वासही वाढतो. कविवर्य विंदा करंदीकर यांनी आपल्या एका मुलाखतीत सांगितले आहे, “आपली मराठी भाषा बोजड होत चालली आहे असं वाटलं तर गद्यासाठी ‘स्मृतिचित्रे’ वाचावं, पद्यासाठी तुकाराम  वाचावा म्हणजे गंगेच्या प्रवाहात स्नान केल्यावर व्हावं तशी आपली भाषा शुद्ध होते. त्याप्रमाणे इंग्रजी स्वच्छ करून घेण्यासाठी ‘बायबल’ वाचावं.”

एकंदर जीवन संतूलित करण्यासाठी पुस्तके वाचता वाचता माणसे वाचू या, माणसे वाचता वाचता पुस्तके वाचू या. दोन्ही वाचता वाचता माणुसकी जपू या आणि मानवतेचे मंदिर उभारू या ! घर हे मानवतेच्या मंदिराचे लघु प्रतिरूप आहे आणि घराला घरपण देणारी पुस्तके वाचणे हाच त्यातला मौल्यवान विचार कृतीत उतरवू या!

म्हणूनच म्हणावेसे वाटते ---

पुस्तकातळी गोष्ट, खाऊ इतकीच गोड

जीवनाला देते ती आनंदाची जोड

पुस्तकातली कथा, समाजाची व्यथा

जीवनमार्गासाठी शिकविते ती धडा

पुस्तकातली कविता, शब्दांचा गर्भ

जीवनप्रवासातील अनुभवांचा तो अर्क

पुस्तकातला विचार, महानुभवांचे ते आचरण

जीवन अंगिकारण्या देते सदाचरण !

# शल्य

■ जोसेफ तुस्कानो, बोरीवली

ए शामाऽऽ किती रागावला आहेस रे! काल स्टेशनवर, चक्क बाजूने निघून गेलास, पण एक चकार शब्द तर सोडून दे, निदान तुझे ते 'खास' स्मित तरी! मी तुझ्या लग्नाला आले नव्हते... अगदी आमंत्रण केले नसते तरी मी येणार होते, नाही का?... त्यामुळे तू रुसलास, हे मी जाणते. काल प्लॅटफॉर्मवर तू लावून दिसलास नि मी हरखले. कितीतरी दिवसांनी तुझी नजरभेट होणार होती. आज मी तुझी खूप मस्करीदेखील करायची ठरवले होते. पण तू तर... तडक बाजूने चालत गेलास आणि माझ्या सगळ्या उत्साहावर पाणीच पडले.

तुला आठवतं, मी दहावीच्या परीक्षेत कमी मार्कस् मिळाले म्हणून तुला भेटायचे, प्रथम टाळले होते. मावशीच्या घरासमोरच्या रस्त्यावर तुला चुकवून मी भराभर निघून गेले होते. त्या दिवशी डायरीत तू लिहिले होतेस, 'ज्योती आज नागिणीगत सळसळत बाजूनं निघून गेली, इतका का बरे संकोच नि अबोला? अपयश का माणसाच्या माणुसकीचे माप करणारे मीटर आहे?'... कालदेखील तू असाच सळसळत गेलास. गाडी स्टेशनात येईस्तोवर मला हुंदका अनावर झालेला. गाडीत, भर मैत्रिणीत प्रदर्शन नको, म्हणून मी जरा मागे जाऊन चक्क गाडी चुकवली. एरवी, गजबजलेल्या त्या विरार स्टेशनवर मला किती एकाकी वाटू लागले. कॉलेजला गेले खरी, पण लेक्चर्समध्ये लक्षच लागेना. तशी सरळ घरी आले. भुरळ घालणारे तुझे डोळे. नाराजीयुक्त रुसव्याने मजकडे पाहत असल्याचा वारंवार भास होतो आहे. अन् सारखं गलबलून येतंय म्हणून हे पत्र लिहून मन गुंतविण्याचा प्रयत्न करतेय..... तूच सांगितलं आहेस ना, की दाटून आलं की कागद-पेन हातात घ्यायचं. मनातलं विचारांचं वादळ कागदबद्ध केलं की कसं मोकळं वाटतं.

पण श्याम, अरे वेड्या, तुझ्यासारख्या समंजस नि जबाबदार माणसाने असं भावनेच्या आहारी जाणं, बरं कारे? पटकन् तू उसळून म्हणशील... ज्यो, भावना आणि व्यवहार यात माझ्याबाबतीत तू गल्लत करू नकोस. ते खरं आहे रे ! पण आपल्या भोवतालचा समाज? या संक्रमणावस्थेतील समाजाच्या वेड्याखुळ्या बंधनापायी तर ना, आपण पदोपदी आपल्यात लक्ष्मणरेषा आखून घेत आलो आहोत. तूच शिकविलेला कठोर

संयम, तू स्वतः ढासळून जातोस, तेव्हा मी पार कोलमडून जाते रे. तुझ्याचकडून गिरविलेल्या धड्यांची तुला नाइलाजाने आठवण करून देताना, माझं संवेदनाक्षम मन खूप व्यथित होतंय. मग, आजच्यासारखी एकांतात बसले की मनात विचारांचे वादळ थैमान घालते. सगळा भूतकाळ भोवती फेर धरतो. आठवणींची भुते मनाच्या मोकळ्या प्रांगणात थयथय नाचू लागतात... कधी-कधी वाटते, कशाला ही ओळख झाली? पौगंडावस्थेतील मी नि गद्धेपंचविशी ओलांडणारा तू. पण आपली मनोभूमिका इतकी झकास जुळली की किती चटकन आपण एकमेकांत समरसून गेलो. अहो-जाहोची भिंत उभारायला तू मला पुरता वेळदेखील दिला नाहीस... तुझी एंगेजमेंट झाली आहे, लवकरच तू दुसऱ्या कुणाचा होणार आहेस, हे कळूनसुद्धा मी तुझ्याशी स्नेहबंध वाढविले. केवळ निष्काम मैत्रीखातर! तुझं संपूर्ण व्यक्तिमत्त्व मला सतत भुरळ घालीत आहे. तुझे विचार, तुझ्या नकळत मला मार्गदर्शक ठरले आहेत. तुझ्या छोट्या छोट्या कथा नि भावपूर्ण कविता, माझ्या वाचनवेड्या मनाला पोषक खाद्य ठरलंय. बोलता बोलता सुविचार प्रसविणारे तुझे वक्तृत्त्व सतत ऐकत राहावेसे वाटते. दुसऱ्यासाठी सतत झीज सोसण्याच्या तुझ्या वृत्तीमुळे तुझा देह चंदनाचा आहे की काय, अशी मला शंका येते. नोकरीव्यतिरिक्त इतके प्रचंड व्याप करूनसुद्धा तू जगतोस कसा - एखाद्या खळखळत्या झऱ्यासारखा!

एव्हाना तू डोळे वटारले असशील. तुला स्तुती आवडत नाही, हे माहित्येय मला. म्हणूनच जरासे थांबले मी. पण नको. आज तुझ्याशी मनमोकळेपणाने संवाद साधायचा आहे. एरवी, मी फक्त ऐकत असते, अशी तुझी तक्रार असते, ना ? मग आज माझी भूमिका तुला पार पाडावी लागेल... आमच्या घराशेजारी राहणाऱ्या तुझ्या विधवा मावशीला मदत करण्यासाठी तू यायचास, तेव्हा आपली भेट ठरलेली. मी तर अक्षरशः तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेली असायची... आपली पहिली भेट झाली, तेव्हा मी नववीत होते. तू मावशीच्या घरी आला होतास. नेहमीप्रमाणे, तू तिच्या प्रपंचाला हातभार लावण्यासाठी... तसं तुझं नाव मी ऐकून होते. 'सुवार्ता' 'जनपरिवार', 'वसई- टाइम्स'मधील तुझ्या कथा-कविता नि लेख वाचले होते.... मी एक निरोप घेऊन तुझ्या मावशीकडे आले होते. तेव्हा आपली ओळख झाली. तुझ्या बोलघेवड्या स्वभावानुसार, तू माझ्या अभ्यासाविषयी आपुलकीने चौकशी केलीस. एका मोठ्या माणसाची ओळख झाली, म्हणून मी किती हरखून गेले होते! पण तू तुझा मोठेपणा, जराही कुठे ओसंडू दिला नाहीस. ज्या जिव्हाळ्याने तू मावशीशी बोलत होतास, तितकीच तुझी आपुलकी, आपल्या पहिल्या भेटीत माझ्या वाट्याला आली होती. हळूहळू, तू मला अभ्यासात मदत करायला सुरुवात केलीस. नंतर ज्या ज्या वेळी अपयशामुळे माझे मन नैराश्याने गडद व्हायचे.. त्या त्या वेळी

तू तुझ्या पोक्त शब्दांनी मला उभारी देत होतास. माझ्या हळव्या मनाला तू किती खंबीरपणा दिलास. तू माझ्या जीवनात आलास, तीच वेळ मुळी अशी होती की मला कुणाच्या तरी धीराची नि आपुलकीची नितांत गरज होती.. त्यामुळे नकळत माझ्यासारख्या पोरक्या मुलीच्या उदास जीवनात तुला एक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. कळत-नकळत आपण किती जवळ आलो! शत्रू व जीवनसाथी, ही दोन रूपे सोडून, मी तुला बाकी सर्व रूपात पाहत आले. तुझ्या मावशीला देखील अडसर वाटावा, इतका आपला स्नेह वाढला होता. माझ्याकडून कसलीच अपेक्षा नव्हती तुझी अन् मी मात्र भरभरून तुझे विचारधन लुटत राहिले. कवितांचं माझं वेड जाणून, सायंकाळच्या कातरवेळी, तू मावशीच्या ओटीवर वाचून दाखविलेल्या, तुझ्या भावरम्य कविता अजूनही कानात गुंजत आहेत. एकदा मी कुठेशी वाचलेली एक काव्यओळ तुला ऐकवली :

'एक कळी दवबिंदूला म्हणाली, You touched me and I have grown'.

तू लगेच तत्परतेने उत्तरलास कसा :

'तेव्हा दवबिंदू कळीला म्हणाला असेल, I have touched you and become a peart

तुला आठवते, श्याम, एकदा तू मला "ऋता" नावाने हाक मारलीस, तेव्हा किती दचकले मी! नावाचा अपभ्रंश करणे आणि विविध नावाने एखाद्याला पुकारणे, हा तर तुझा छंद आहे. हे माहिती असूनसुद्धा मी क्षणभर चक्रावले. लगेच तुझं स्पष्टीकरण :

“ज्यो, (ज्योतीचं, 'ज्यो' देखील तूच केलंस नाही का?) निसर्गातील बदलणाऱ्या ऋतूप्रमाणे, तुझा संवेदनशील स्वभाव सतत बदलत असतो. मी खूप दिवस मावशीकडे फिरकलो नाही की तू चिडतेस. तेव्हा तू चटके देणाऱ्या उन्हाळ्यागत भासतेस. माझी एखादी नवी कविता ऐकताना फुलणारा तुझा तृप्त चेहरा, हिवाळ्यातील शीतल पहाटेसारखा शांत नि आल्हाददायक वाटतो आणि अनुभवलेली एखादी शोकान्तिका मी कथेत गुंफतो, तेव्हा टपटप घरंगळणाऱ्या तुझ्या अश्रूंच्या दर्शनाने मी पावसाळ्यातील संततधारा अनुभवितो.”

तुझे हे स्पष्टीकरण ऐकताच, मी खळाळून हसले होते. पण नंतर काही दिवस, 'तू माझी किती कदर करतोस' या विचाराने अंतर्मुख झाले होते. अर्थात हे प्रथमच कबूल करते आहे.

आणि एकदा तू आजारी पडलायंस असं तुझी मावशी बोलली. तिला बाजारात कुणीतरी ती बातमी सांगितली होती. किती सैरभैर झाले मी! आपलं तसं काही नातं नसल्यामुळे तुमच्या घरी हक्काने येणे मला शक्य नव्हते. तरीही मी मनाचा हिय्या करून, मी तुझ्या मावशीसोबत, तुझ्या घरी यायचे ठरवले. पण लगेच कानात तुझे शब्द गुंजू लागले. "ज्यो, आपला समाज संक्रमणावस्थेत आहे. तुझी-माझी पवित्र मैत्री, इथे विघ्नसंतोषी लोकांच्या अफवांचा विषय होऊ शकते. एकवेळ अडाणी, न शिकलेले लोक समजूतदारपणा दाखवतील; पण, तथाकथित शिकलेले लोक, अशा अफवा चघळण्यात आघाडीवर असतात आणि या समाजाने दुर्बल ठरविलेल्या घटकांची तू प्रतिनिधी आहेस. तेव्हा तू जपून अस. आपल्या जवळिकीने, तुझ्या वाटेला जराशी जरी व्यथा आली तर मी स्वतःला क्षमा करू शकणार नाही." मी मन कठोर केले, अन् काय आश्चर्य! अगदी तिसऱ्या दिवशी तू मावशीकडे तू आलास.

"काय झालं, श्याम तुला?" माझ्या आर्त पृच्छेला तू फक्त स्मित करीत उत्तर दिलंस. तुझी नेहमीची डायरी माझ्या हाती देत म्हणालास, 'नंतर वाच'.... तुझ्या आईने मावशीला तुझ्या तापासंबंधी खबर कळविली होती, म्हणून तू बिथरला होतास, हे मला नंतर मावशीकडून कळले... मी घाईघाईत घरी आले. उत्सुकतेने तुझी डायरी उघडली. वाटलं होतं, तुझी एखादी नवीन कविता असेल. पण, तू लिहलेला तो मजकूर वाचून मी आश्चर्यचकित झाले होते. तू लिहिलं होतंस-

स्वप्नः

रात्री उशिरापर्यंत लिहीत बसल्याने सकाळी उशिरा जाग येते. धावतपळत तयारी करतो. स्टेशनवर पोहोचतो, तो फ्लॅटफार्मवर शांतता. गाडी नुकतीच निघून गेलेली. आणि ज्यो एकटी फ्लॅटफार्मवर उभी. उदास, विमनस्क. हातात पुस्तकं. कॉलेजला निघालेली. बहुधा गाडी चुकली असेल. मी लगेच तिच्याकडे पोहोचतो. "हाय, ज्यो..." म्हणेपर्यंत, ज्यो वेगाने पुढे येते. नि चक्क खांद्यावर डोके ठेवून स्फुंदू लागते.

सत्य:

तोच घड्याळात पहाटेचा गजर होऊन जाग येते. मनात अस्वस्थतेचा प्रक्षोभ माजतो. तसा मी कधी प्रार्थना म्हणत नाही. पण बिछान्यावर बसल्याबसल्या पुटपुटलो, 'देवा, ज्योच्या वेदना नि यातना मला दे!' ऑफिसात कामावर लक्ष लागेना. अस्वस्थ होत होते. संध्याकाळपर्यंत सरसरून ताप आला होता. घरी येईपर्यंत पार ग्लानी आली होती. स्वप्नावर कधी विश्वास ठेवला नाही. पण हे सगळं कसं चमत्कारिक वाटलं.

तुझ्या डायरीतला तो मजकूर वाचून माझी मानसिक स्थिती काय झाली, शब्दात व्यक्तच करता येणार नाही. हे कोणत्या जन्मीचे ऋणानुबंध आहेत? किती सोसतोस, तू माझ्यासाठी माझ्या रा..., सॉरी!

पुढच्या भेटीत, मी खोटा आव आणून तुला खडसावले,

"देवाकडे असे काही वेड्यासारखे मागायचे नसते!" तेव्हा तुझे ते बेहोषी स्मित करीत, तू म्हणालास, "वेड्या माणसाकडून शहाणपणाची अपेक्षा करणारेच, खरे वेडे नव्हेत काय?" काय उत्तर देणार मी? मग, तू नेहमीसारखा बोलू लागलास, नि मी एरवीप्रमाणे श्रोता बनले....

श्याम, मी एकटी असले की तुझ्या आठवणींचा ओघ असा वेगाने माझ्या मनोसागरात थैमान घालतो. मग, तुला दुरावण्याचे माझे कृत्रिम प्रयत्न हतबल ठरवून, तुझी ओढ आणखीनच गडद होत जाते.

हं, आणखी एक आठवलं. उत्साहाचं उधाण असलेल्या, तुझ्या उसळत्या चेहऱ्याला मी एकदा उदासिन अवस्थेत पाहिले होते. खोदूनखोदून विचारले, तेव्हा कुठे कबूल झालास. तुझ्या भावी पत्नीला, तुझं तरुण मुला-मुलीत मिळून मिसळून वागणे, आवडत नव्हते. तुझ्या कर्तृत्वाची, मुलामुलीत विशेषतः तरुण मुलीत चर्चा व्हायची. तेव्हा ती अस्वस्थ होई. त्यातील कौतुकाचा भाग ध्यानात न घेता, तिच्या स्त्रीसुलभ नजरेत संशयाचे काजळ दाट होई. तू तिची समजूत काढलीस. पण, स्वतः मात्र नाराज झालास. तेव्हा, तुझी समजूत काढताना मी म्हटले होते, 'श्याम, अरे आम्हा स्त्रियांचा स्वभावच असा शंकेखोर असतो. आपला माणूस 'फक्त आपलाच असावा', असं आम्हाला वाटत असतं. तिच्या भावना तू समजावून घे. आणि एक सुचवू?”

"काय?" तू अधिरतेने विचारले .

“बघ, रागावणार नाहीस ना?" तू तुझे लोभस डोळे उंचावून माझ्याकडे बघितले. दटावण्याची तुझी ती स्टाईल माझ्या परिचयाची होती..

“शक्यतो पब्लिकमध्ये तू मुलींशी बोलत जाऊ नकोस. अगदी माझ्याशीसुद्धा.' तू डोळे विस्फारून माझे बोलणे ऐकलंस, नि स्मित केलंस. तू माझं म्हणणं समजावून घेतलंस, म्हणून मी खरंच हरखले- हुंदका गळ्यात दाटला असूनसुद्धा.

दोन-तीन वर्षांचा काळ किती भुरकन् निघून गेला. तुझ्या लग्नाचं आमंत्रण स्वीकारताना माझा हात थरथरला होता, हे तुला जाणवलं होतं का? त्यावेळी तुझ्या

चेहऱ्यावरचे भाव निरखायचे मी टाळले होते, हे तुझ्या लक्षात आले होते का? 'ही चलबिचल बरी नाही', मी स्वतःला समजाविण्याचा खूप प्रयत्न केला. तुझ्या लग्नाला येण्यासाठी, मी किती जय्यत तयारी करीत होते. अरे, तुझ्यासाठी भेटवस्तू खरेदी करायला गेले, तर माझा काय गोंधळ उडाला, म्हणून सांगू. दादरच्या मार्केटमधली एकही निर्जीव वस्तू, तुला देण्यासाठी खरेदी करायला मन धजेना.. शेवटी, रिकाम्या हाताने परतले. रविवारी तुझ्या लग्नाला येण्यासाठी माझा नट्टापट्टा चालला होता. आरशासमोर उभी राहून, तुझ्या आवडत्या गुलाबी रंगाची साडी, मी चापूनचोपून नेसले होते. वेशभूषा आटोपून पर्स उचलणार तोच, आरशातल्या माझ्या प्रतिबिंबाकडे माझे लक्ष गेले. ते किती अस्पष्ट दिसत होते. माझ्या आरशातल्या पाणावलेल्या डोळ्यात खूप दूरवर तुझी धूसर मूर्ती मला दिसत होती. मी अस्वस्थ होऊन डोळे घट्ट मिटले. माझ्या दृष्टीतून, तुला कायमचा काढून टाकण्याचा माझा केविलवाणा प्रयत्न चालला होता. पण अनावर झालेल्या हुंदक्याला आवरणं जमलंच नाही मला. मी सगळी वेशभूषा एका मिनिटात विस्कटून टाकली आणि स्वत:ला बिछान्यावर झोकून दिले.....

श्याम, तुला ही चिठ्ठी लिहिण्याचा मला काय हक्क नि अधिकार आहे? थोड्या वेळात, मी हा कागद फाडून टाकणार आहे. माझं मन, माझ्या समाधानाखातर तरी तुझ्या पुढ्यात कधी उघड करता येणार नाही, हे शल्य उराशी बाळगून, मला पुढची वाटचाल केली पाहिजे.

(कथासंग्रह – **बंध रेशमाचे,** प्रकाशन- जून 2000)

# चुळणे माणिकपुरची बोली

■ ज्युलियस घोन्सालविस, चुळणे
९००४०८९३३०

असं म्हणतात की, भारतात प्रत्येक किलोमीटरला भाषा बदलते, आणि ते तितकेच खरं सुध्दा आहे. त्यामुळे एकाच शब्दाचे अलग अलग उच्चार ऐकायला मिळतात. बऱ्याच वेळा त्यामुळं निरनिराळया गमतीजमती होत असतात. कारण एखादया ठिकाणी जो उच्चार आपल्याला ऐकायला मिळतो, त्याचा आपल्याकडे अर्थ निराळा होत असतो. पुर्वीच्या काळी साथीच्या रोगामुळे तसेच युध्दामुळे लोकांचे स्थलांतर मोठया प्रमाणात व्हायचे, त्यामुळे भाषा एकमेकांत मिसळू लागल्या व निरनिराळे शब्द तयार झाले. सर्व लोकाना आपापल्या भाषाचा गर्व व अभिमान आहे. एकाच भाषेचे दोन व्यक्ती जेव्हा एकत्र येतात, तेव्हा आनंदाने त्यांच्या भाषेत बोलू लागतात, मग ते ऑफिस असो, ट्रेन असो किंवा मार्केट.

चुळण्याच्या बोली भाषेचा विचार केल्यास, चुळण्याची भाषा व कादोडी भाषेत बरेच साम्य आहे किंबहुना तिथलीच ही लोकवस्ती आहे, असे काही इतिहासकारांचे म्हणणे आहे. तरी देखिल त्या भाषेत आणि उच्चारामध्ये बरेच साम्य तसेच काही प्रमाणात फरकही आढळतो.

चुळण्याच्या भाषेत फक्त एका अक्षराने प्रश्न निर्माण होतो, ते अक्षर म्हणजे 'के' मराठीत याचा अर्थ 'कशासाठी?' असा होतो, मात्र येथे फक्त 'के' या शब्दाने प्रश्नार्थ निर्माण होतो.

माणिकपूरच्या भाषेचा विचार केल्यास, फादर हिलरी फर्नांडिस यांनी 'चिमाजी' अंकात दिलेल्या माहितीनुसार, पुर्वी मारवाडी जमात ह्या विभागात काही काळ राहत असल्याने, त्यांच्या भाषेत काठेवाडी शब्द म्हणजे, अटे, तटे, कटे, हे माणिकपूर भाषेत समाविष्ट झालेले आहेत. अशाप्रकारचे शब्द आपण मारवाडी लोक एकमेकांत बोलतांना, आपल्या कानावर पडत असतात. निरनिराळया प्रकारचे लोक जेव्हा एकत्र राहतात किंवा संपर्कात येतात, तेव्हा अशा प्रकारे भाषा एकमेकांत मिसळतात व कधी कधी हशाही पिकतो.

चुळणे, माणिकपूरच्या भाषेच्या गमती म्हणजे... माणिकपूरच्या भाषेत तरुण मुलीना "गो" म्हटले जाते, "गो कटे चालली?" तेच चुळण्याच्या भाषेत 'गो' म्हणजे वयस्कर माणूस. तरुण मुलीना गो म्हणणे हा तर विनोदाचा भाग होतो. मुलीना गो कसं म्हणनार?, इथे हशा पिकतो. पण ती त्यांची बोलीभाषा आहे, त्याला आपण नाकारु शकत नाही. चुळण्यात मुलीना "लव" म्हटले जाते. "लव कडे सालली?"

तसेच चुळण्यात 'स' ला 'ह' म्हटले जाते, म्हणजे 'साखर' म्हणायचे असेल तर, त्याला चुळण्यात 'हाकर' असे म्हटले जाते. तसेच 'शि' ला 'हि' म्हटले जाते, म्हणजे शिंगाला माशाला तेथे 'हिंगाळा' म्हणतात. तसा दुसरा शब्द म्हणजे 'शिकणे' हा शब्द चुळण्याच्या बोली भाषेत म्हणायचे झाले तर मग त्याचा उच्चार भयंकर डबल मिनिंग होतो, तरी लोक सर्रास त्याचा वापर करतात, व त्यांना त्याचं काहीच वाटत नाही, पण जे वास्तव आहे, ते वास्तव आहे, ते आपण नाकारु शकत नाही.

काही शब्द असे आहेत, की ते इतरांना समजणे कठिण असते किंवा ते इतराना समजत नाहीत, अशा शब्दाचा विचार केल्यास, मराठीचे एक वाक्य "प्रिया भाजली" हे वाक्य माणिकपूरमध्ये "प्रिया हुडली" असं म्हटलं जातं. हुडली हा शब्द इतर भाषिकांना समजणे फारच कठिण आहे. तसेच मराठीचा "कोणी सांगितले" हे वाक्य, चुळण्याच्या भाषेत "कुणी हांगिला" असं म्हटलं जातं. "हांगिला" हा शब्द इतर भाषिकांना समजणे कठीण आहे.

काही शब्द असे आहेत, की जे रोजच्या वापरातले असतात, पण ते इतरांना समजणे कठीण असते. चुळण्याच्या भाषेत असे काही शब्द म्हणायचे झाल्यास "बिशितवार" बिशितवार म्हणजे "गुरुवार", "जांब" म्हणजे "ग्लास", 'किताल' म्हणजे शेताचा "कांडा", "आगोठ" म्हणजे "पावसाळ्यात", "लानी" म्हणजे कापणीचा हंगाम. "भय" म्हणजे म्हशी.

माणिकपूरच्या भाषेत असे काही शब्द म्हणायचे झाल्यास, "भुकी" भुकी म्हणजे "मसाला", जेवणात भुकी टाक म्हणजे मसाला टाक, असा त्याचा अर्थ होतो. वास्तविक चहा पावडरला इतर ठिकाणी भुकी म्हणतात. "धवन धुण्यासाठी चालली," म्हणजे कपडे धुण्यासाठी चालली. "वाम, बोय" या मासळीला "शेग" मासळी म्हटले जाते. ओला घाटा (मसाला) याला "चेर घाटा" म्हटले जाते.

हया सर्व भाषेंच्या गमती जमती आहेत.

# समुद्र! समुद्र !!

■ लेस्ली डायस, 'गीत'

'धोकादायक समुद्रकिनारा. कोणीही पाण्यात उतरू नये. दुर्घटना घडल्यास प्रशासन जबाबदार राहणार नाही. हुकूमावरून.'

धोक्याचे इशारे देणारे फलक स्थानिक प्रशासनाने त्या समुद्रकिनारी ठिकठिकाणी लावले होते. कारण कोकण विभागातील ती एक धोकादायक समुद्रकिनारपट्टी होती.

दुपारची वेळ. कुठे चिटपाखरूही दिसत नव्हते. भरतीच्या लाटा अखंडपणे खडकाळ किनाऱ्यावर येऊन आदळत होत्या. समुद्रातील लाटांचं नर्तन पाहत किनाऱ्यावरून मी फिरत होतो. पाण्यात जागोजागी काळेभोर पाषाण उभे होते.

भरतीचं पाणी हळूहळू वाढत चालले होते. खडकावर येऊन फुटणाऱ्या लाटांचे हवेत उडणारे तुषार, त्यात अधूनमधून सुरू असणारा ऊन-पावसाचा खेळ, इंद्रधनुष्याच्या रंगांची होत असलेली उधळण, त्या विविध रंगछटा... असे विशाल सागराचे रूप डोळ्यांत साठवत मी परत फिरणार इतक्यात, किनाऱ्यापासून बऱ्याच आत एका काळ्या कातळावर एक तरुण मुलगी बसलेली मी पाहिली. आपले दोन्ही पाय पाण्यात सोडून कातळावर ती विसावली होती. दिवसाउजेडी कसली तरी स्वप्न पाहण्यात ती दंग झाली असावी.

भरतीचं पाणी क्षणोक्षणी वाढत होते. तिला सावध करण्यासाठी मी ओरडलो. पण बेफान वाऱ्यामुळे माझा आवाज तिच्यापर्यंत पोहोचू शकत नव्हता.

तिला सावध करण्यासाठी पाण्यात उतरून कातळावरून उड्या घेत मी तिच्याजवळ पोहोचलो. माझ्या अस्तित्वाची जाणीव होताच ती चकित होत तिने माझ्याकडे पाहिले अन् अचानक कुठेतरी दिसेनाशी झाली.

गोंधळलेल्या स्थितीत मी तसाच बराच वेळ थांबलो. माझी नजर बराच वेळ तिचा शोध घेत होती. जेव्हा भानावर आलो तेव्हा पुष्कळ उशीर झाला होता. भरतीच्या पाण्याने मला चारही बाजूंनी घेरले होते. आता मागे फिरायचे कसे? मला प्रश्न पडला. कारण पोहणे मला जमत नव्हते. या मुलींचे काही सांगता येत नाही. पाण्यात सूर मारून तिने कदाचित

किनारा गाठलाही असेल व तेथून माझी फजिती पाहत असेल, या विचारात असतानाच ती समोर अवतरली.

"काय गं, स्वतःबरोबर इतरांना त्रास द्यायला बरे वाटते का तुम्हा मुलींना? ही काय स्वप्न पाहण्याची जागा आहे? पोहता येत असेल तर आताच किनारा गाठ. घाई कर. लाटांचा वेग वाढत चालला आहे," मी चिडलो. पण तिच्या अवखळ डोळ्यांची नजरानजर होताच, माझं भानच हरपलं गेलं. हे शांत रमणीय सरोवरातील 'पुष्पकमळ' या फेसाळत्या दर्यात कसं काय बरं उमललं? मी स्वतःलाच प्रश्न केला. तिच्या सौंदर्याने माझ्या तरुण मनाची दारे किलकिली झाली. क्षणभर मी स्वतःला विसरूनच गेलो.

"आभारी मित्रा, मला सावध करण्यासाठी तू इथपर्यंत आलास? अरे, हा समुद्रच माझं घर आहे. हा माझ्यासाठी नाही, तर तुम्हा माणसांसाठी धोकादायक आहे. चल, मी मदत करते. तुला किनाऱ्यावर नेऊन सोडते. तुझा हात माझ्या हातात दे बघू."

"आम्ही माणसे म्हणजे? तू कोण आहेस? स्वतःला पाण्यातील परी समजतेस की काय? माझा जीव कसा वाचवायचा ते मला चांगले माहीत आहे. जा पटकन किनारा गाठ. तुझ्यासारख्या अल्लड स्वभावाच्या पोरीला इथं सोडून मी माघारी फिरू शकत नाही."

माझं न ऐकता उसळत्या सागरात सहजपणे ती पोहत होती. मी तिची मदत घ्यावी म्हणून मला विनवित होती.

काय करावं? या पोरीची मदत घ्यायची का आपण? छे! ते शक्य नाही. आजवरच्या आयुष्यात कितीतरी अवघड गोष्टी मी साध्य केल्या आहेत. केवळ हाकेच्या अंतरावरील हा किनारा गाठण्यासाठी या पोरीच्या हाती मी माझा हात देणार नव्हतो. कारण माझा अहंकार दुखावला जात होता. तिची मदत सपशेल नाकारून म्हणालो, "माझा बचाव मी स्वतः करेन. माझी चिंता तू करू नकोस."

ती हतबल झाली, तिच्या डोळ्यांत दुःख स्पष्ट दिसू लागलं. काळजात उतरणारी तिची व्याकूळ नजर माइया हृदयातून आरपार जाऊ लागली. तरीही मी हेका सोडला नाही.

लाटांचा जोर वाढला होता. मी आधार घेतलेला सुळका कुठल्याही क्षणी पाण्याखाली जाणार होता. उसळत्या समुद्रात मी फेकला जाणार त्याआधी मी दीर्घ श्वास घेतला आणि तो रोखून धरला व किनाऱ्याकडे झेपावणाऱ्या एका मोठ्या लाटेत मी स्वतःला झोकून दिले व जीवाच्या आकांताने हातपाय मारू लागलो.

त्या लाटेने मला किनाऱ्याजवळ वाहून आणलंही. पण अखेर घात झाला. मार्गात आडव्या आलेल्या एका उंच खडकावर आदळून ती लाट फुटली व खोल पाण्याच्या दिशेने परत फिरली. आता खोल पाण्यात मी ओढला जात होतो. मी रोखून धरलेला श्वास सुटला, तसं सागराचं खारट पाणी माझ्या नाकातोंडात वेगानं घुसू लागलं.

पाण्याखाली प्रकाश अंधुक होत गेला. सर्वत्र काळोख पसरला आणि सगळं संपलं. जगण्याची आशा मी सोडून दिली. इतक्यात, कोणाच्या तरी नाजूक बाहूंचा विळखा माझ्याभोवती पडला व एकच उसळी घेऊन ती अज्ञात शक्ती मला पाण्याच्या पृष्ठभागावर घेऊन आली.

भानावर आलो तेव्हा किनाऱ्यावर मी पालथा पडलो होतो. सर्व घटना इतक्या वेगाने घडल्या की ती अज्ञात शक्ती कोण होती, हे मला काहीच कळले नाही. नाकातोंडात गेलेलं पाणी बाहेर पडत होतं.

"कसा आहेस रे तू?" कोणीतरी मोठ्या आस्थेने माझी चौकशी करत होतं. मी डोळे उघडले, तेव्हा मघाशी भेटलेली ती सुंदरी पाण्यात उभी राहून माझ्या तब्येतीची चौकशी करत होती.

'आभारी आहे मी तुझा. तू माझा जीव वाचवला.. ' हे शब्द माझ्या ओठांवर आले; पण ते मुखावाटे बाहेर पडले नाहीत. कारण आजवर जपलेल्या माझ्या पुरुषी अहंकाराला कुठेतरी ठेच लागली होती.

"तू आहेस तरी कोण? अगदी सहजपणे लाटा अंगावर घेतेस. तुला भीती वाटत नाही का या समुद्राची?"

त्याही परिस्थितीत त्या सुंदरीला मी प्रश्न केला.

"समुद्रकन्येला पाण्याची कसली रे भीती? हा समुद्रच माझे विश्व आहे. माझे घर आहे. मी तुला सांगितलं पण तू माझ्यावर विश्वास ठेवला नाहीस. स्वतःच्या जीवाशी असा का रे खेळलास? भरतीच्या पाण्यापासून मला सावध करण्यासाठी तू धोका पत्करलास. स्वतःच्या जीवाची पर्वा केली नाहीस; पण जिच्यासाठी जीव धोक्यात घालून समुद्रात शिरलास तिच्या शब्दावर विश्वास मात्र ठेवला नाहीस. असा निष्ठुरतेने का रे वागलास? माझी मदत अव्हेरून उसळत्या लाटांत स्वतःला झोकून दिलंस तू. स्त्रियांच्या भावनांशी असं कसं खेळता तुम्ही माणसं? स्त्री सौंदर्याचे नेहमी गोड शब्दात गोडवे गाता, पण त्यांची

मदत घेताना अहंकार दुखावला जातो तुमचा. अगदी पाणी नाकातोंडात पोहोचले तरी स्पष्ट बोलते म्हणून माफ कर मित्रा!"

"चुकलं गं माझं." मी कबुली दिली. "तुझी मदत घेताना मला कमीपणा वाटत होता. माझं जगातलं कर्तृत्व या दर्यात अजमावून पाहिलं. निसर्गाच्या अमर्याद शक्तीला मी कमी लेखलं. पण एक सांग तू आहेस तरी कोण? तुझा परिचय देशील का?"

ती मंदशी हसली. जगातलं सर्वोत्कृष्ट असे लोभस स्मित तेव्हा मी तिच्या ओठांवर पाहिलं. "समुद्रात वास्तव्य करणारी परी तर नव्हे ना तू?" चकित होत मी तिची चौकशी केली.

"होय मित्रा, बरोबर ओळखलंस तू. मी एक जलपरी आहे. तेथे दूर पाण्याखाली दगडाच्या गुहेत राहतो आम्ही. तू येशील तिथे?"

"मी आलो असतो. पण मला पोहता येत नाही. पण तू आमच्या लोकांत येऊ शकतेस."

"नाही. मी पाण्याबाहेर येऊ शकत नाही. एकदा का मी पाण्याबाहेर पडले तर पुन्हा पाण्यात परतू शकणार नाही. माझं विश्व वेगळं, तुझं वेगळं. मी एक परी आहे. अगदी मुक्त आणि स्वतंत्र. माझं स्वातंत्र्य, माझे अधिकार तुमच्या लोकांत मिळणार नाहीत मला. तुम्हा माणसांचे जग अहंकाराने भरलेलं आहे. स्पर्धा, कुरघोडी, तंटे, गावागावांत कलह, माणसामाणसातील द्वेष, स्वतःभोवती मोठेपणाची कुंपणं घालून स्वतःलाच कैद करून घेता तुम्ही लोक. पण, स्वतःचा जीव धोक्यात घालून दुसऱ्यांना वाचवणारी माणसंही आहेत तुमच्यात, तुझ्यासारखी. भरतीच्या पाण्यात सापडलेल्या एका मुलीला वाचवण्यासाठी तू समुद्रात शिरलास, तेही एखाद्या समुद्रपक्ष्यासारखा उडत उडत.

तुला पाहून घाबरले मी. हळूच पाण्यात उतरून लपून बसले. तुझी नजर शोध घेत होती माझी. संकटात पडलेल्या एका जीवाला सुखरूप किनाऱ्यावर घेऊन जाण्यासाठी. तुझ्या जीवाची होत असलेली तगमग पाण्याखालून मी पाहत होते. मग राहावलं नाही मला. तुझ्यासमोर हजर झाले. तुला पोहता येत नाही, हे पाहून तुला मदत करायचे ठरवले मी. पण खरं सांगू मित्रा? कुशल पोहणाऱ्यालाही हा किनारा धोकादायक आहे. पुन्हा असा जीव धोक्यात घालू नकोस. स्वतःची काळजी घे." बोलता बोलता तिला भरून आलं. तिचे डोळे पाणावले.

"तुझ्या डोळ्यांत असे अश्रू का गं?" न राहवून मी तिला प्रश्न केला.

"उशीर झालाय रे मला. निघायला हवं आता. मी तुझा निरोप घेते. पण त्याआधी या छोट्याशा भेटीचा स्वीकार करशील?" असं बोलून तिने गळ्यातला रत्नहार काढून तो माझ्यापुढे धरला.

"अगं, हा हार तुझ्या गळ्यातच शोभून दिसतो. तो तिथेच राहू दे."

"नाही बोलू नकोस मित्रा. तू जर माझी भेट स्वीकारली नाहीस तर कायम अस्वस्थ राहीन मी. चालेल तुला ?”

तिच्या डोळ्यांतील व्याकूळ भाव पाहून मी नकार देऊ शकलो नाही. अनमोल रत्ने माझ्या हाती सुपूर्द करून ती 'नीलम परी' माझा निरोप घेत खोल पाण्यात उतरू लागली.

"अगं थांब, माइयाकडून काही घेणार नाहीस तू?"

"काय देणार आहेस रे मला?" ती गोड हसली.

तिला देण्यासारखं माइयाकडे काय होतं? किनाऱ्यावरील खडकावर बाहेर डोकावणाऱ्या गवतफुलांचा गुच्छ हाती घेऊन मी पाण्यात उतरू लागलो. पण अवखळ लाटा व बेभान वारा मला तिच्यापर्यंत पोहोचू देत नव्हता.

"अगं, या तुफानाला सांग मी तुझा मित्र आहे."

"ये रे तू ... काही त्रास होणार नाही तुला. मी आहे ना?" तिच्या शब्दांवर विश्वास ठेवत मी तिच्यापर्यंत पोहोचलो.

त्या फुलांचा संमिश्र गंध हुंगून ती रोमांचित झाली, भारावली व आभार मानून खोल पाण्यात जात दिसेनाशी झाली!

# लांब केसांची राजकन्या

■ मॅक्लिना रिबेलो, चौकाळा

तिची ओळख गावात तिच्या लांबसडक केसांमुळेच होती. गव्हाळ वर्णासोबत त्या लांब केसांनी तिचं सौंदर्य अधिकच खुलवलं होतं. जो कोणी तिला पहायचा, त्याचं लक्ष तिच्या कमरेपर्यंत पोहोचणाऱ्या सरळ, रेशमी केसांकडे वेधलं जायचं. ती नेहमी साधी वेणी बांधायची, कधीच फुलं माळायची नाही. तिच्या केसांबद्दल अनेकांना हेवा वाटायचा, पण त्याचवेळी मनात विचार यायचा—काय उपयोग या सौंदर्याचा? कारण जन्मतःच तिला हृदयविकाराचा आजार होता. या आजारामुळे तिने लग्न न करण्याचा निर्णय घेतला आणि ती गेली ३५ वर्षे आपल्या विधवा आईसोबत राहत होती. ती कमावत नव्हती, पण ताटात वाढलेलं जेवण समाधानाने खायची, सांगितलेलं काम शांतपणे करायची. तिने कधीच कुणावर आवाज चढवला नाही, कुणाशी भांडण केलं नाही. तिचा हसरा चेहरा आणि बोलके डोळे सगळ्यांना आवडायचे.

तिच्या आईसाठी मात्र एकच काम आव्हानात्मक होतं, मुलीचे केस धुणं... ती आपल्या आईलाच केस धुण्यासाठी सांगायची. कुठलाही शॅम्पू किंवा कंडिशनर न वापरता, केवळ भिजवलेल्या शिकेकाईने केसांना मसाज करायची, तास-दोन तास तसंच ठेवायची आणि मग गरम पाण्याने धुवायची. तिच्या लांबसडक केसांचं रहस्य हेच होतं. आईलाही आपल्या मुलीच्या केसांचा अभिमान होता. कुठलीही तक्रार न करता, मुलीच्या केसांची काळजी घ्यायची. दोघींचं नातं अतूट होतं. त्या झोपाळ्यावर बसून बालपणीच्या आठवणींमध्ये रमायच्या, भविष्याची स्वप्नं रंगवायच्या. म्हातारी ८० वर्षाची होती, पण माझ्या लेकीचं माझ्याशिवाय कसं होईल या विचाराने ती तग धरून होती.

भर पावसाची रात्र.. बाहेर धो-धो पाऊस पडत होता. आकाशात वीज कडाडली. अचानक तिला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्या धक्क्याने तिच्या शरीराची निम्मी बाजू कायमची निष्क्रिय झाली. उजवा हात, उजवा पाय काम करेनासे झाले. शरीराने जरी ती जिवंत होती, तरी मनाने मात्र कोलमडली. जगण्याची उमेद सुटली. 'काय फायदा या शरीराचा? काय फायदा या जगण्याचा? कुणासाठी जगावं? आणि जगलोच तर त्यांना

आपलं सगळं करावं लागणार.' या विचारांनी ती ग्रासली गेली. पण मृत्यू सहजासहजी येत नाही, तो येणार तेव्हाच.

आई अजूनही काटक होती. लेकीची सगळी कामं तीच करायची. डोळ्यातले अश्रू पदराने पुसत, 'देव सगळं नीट करेल. तू पुन्हा चालशील, फिरशील,' असं सांगून मुलीची समजूत काढायची. तिचं धुणं, खाणं, पिणं सगळं आईच करत होती. पण एकच गोष्ट तिला जड जात होती, मुलीचे केस. 'बघ, आता माझ्याहून होत नाही तुझं. मीही म्हातारी, आजारी. मला नीट दिसत नाही. त्यात तुझ्या केसांचे लाड करणं आता शक्य होत नाही,' असं ती म्हणायची.

मुलगी म्हणाली, 'आई, एक वेळ मला खायला-प्यायला नाही दिलंस तरी चालेल. माझी रोजची अंघोळ नाही केलीस तरी चालेल. पण माझे केस रोज विंचर, तेल लाव, वेणी बांध. तेवढंच काही आहे माझ्याकडे.'

म्हातारी मनातल्या मनात विचार करायची, 'ही अशी आजारी आणि त्यात इतकी हट्टी. हिची कशी समजूत काढू? मला किती त्रास होतो या केसांचा. काहीतरी करायलाच हवं.'

त्या रात्री, आईने मुलीचे केस हातात घेतले. थंडगार हाताने तिच्या डोक्यावरून हात फिरवला. केसांना छान तेल लावलं, फणीने गुंता काढला आणि रोजच्या सवयीप्रमाणे लांबसडक वेणी बांधली. आईच्या थंडगार हातांनी मुलीला कधी झोप लागली, तिला कळलंच नाही. म्हातारीने हातातील कात्री घट्ट पकडली, डोळे घट्ट बंद केले, अश्रूंना वाट मोकळी करून दिली आणि लांबसडक वेणी छाटून टाकली.

'आई, काय करतेस तू? माझ्या केसांना का हिसका देतेस?' मुलगी ओरडली.

'बघ राणी, आता मला नीट दिसत नाही. तुझं काम करताना मी फार थकून जाते. तुझ्या केसांचे लाड करणं आता शक्य नाही. त्यांचा गुंता काढून, तेल लावून, वेणी बांधणं माझ्या म्हातारीकडून जमत नाही. आणि काय फायदा या केसांचा? तुझं हे शरीर अर्धवट काम करतं. केसांचा मेळा तर तुला त्रासच देतो. म्हणून मी ते छाटून टाकले आहेत. आता हे एका पिशवीत बांधते आणि दूर फेकून देते.'

'आई, माझ्या केसांसारखंच तुला माझाही एकदा त्रास होईल. तुला मीही नकोशी होईन. मग असंच माझा गळा छाटशील का? पंखाविना पक्षी कसा उडेल? फांद्याविना झाड कसं शोभेल? मला न विचारता तू इतका धाडसी निर्णय घेतलास. या केसांच्या

प्रेमामुळेच तर मी जगत होते. तेच माझ्याकडे होतं, जे माझं होतं, जे मला मनापासून आवडत होतं. तेही तू माझ्याकडून घेतलंस, मला न विचारता. असो, तू म्हणतेस तेच खरं. काय फायदा या केसांचा मला.'

त्या रात्री दोघी रडल्या. बाहेर पाऊस पडत होता. काही दिवसांनी मुलीने या जगाचा निरोप घेतला. शरीराने जरी ती अपंग होती, तरी मनाने ती मुक्त झाली. म्हातारी एकटी पडली. 'आता जगू कुणासाठी? मुलीची सेवा करण्यासाठी आयुष्य मागितलं होतं. तीही देवाने हातून घेतली.

तिच्या जाण्यानंतर काही दिवसांतच म्हातारीने अंथरूण पकडलं. काळाच्या ओघात तीही आपल्या लेकीकडे निघून गेली. तिच्या जाण्याने घर सुन्न झालं. जसं घर रिकामं झालं, तसंच एकेक करून दूरदूरचे नातेवाईक येऊ लागले, काय मिळतंय, काय उरलंय, हे पाहण्यासाठी. विधवा, एकटी बाई, तिच्या घरी काय मिळेल, हीच चर्चा.

कपाट उघडण्यात आलं. व्यवस्थित घड्या घातलेले जुने कपडे, जुन्या वस्तू, एका कोपऱ्यात एक छोटीशी पिशवी ठेवलेली दिसली. 'काही संपत्ती तर नसेल ना? कदाचित थोडेफार दागदागिने किंवा पैसे?' नातेवाईकांच्या नजरा पिशवीवर खिळल्या. सावधपणे ती उघडली गेली. आत काही नव्हतं, ना दागदागिने, ना नोटा, फक्त एक सुंदर, काळीभोर, लांब, रेशमी वेणी.

त्या केसांची वेणी... जी कधीकाळी एका मुलीचं स्वप्न होतं, तिचं अस्तित्व होतं, तिचं एकमेव अभिमानाचं, प्रेमाचं दागिनं होतं.

पिशवीतली ती वेणी खूप काही सांगून गेली, एक कथा, एक नातं, एक प्रेम, एक वेदना... आणि दोन जीवांचं संपलेलं आयुष्य.

# नेत्रावती एक्स्प्रेस

**-- मॅटिल्डा डिसिल्वा, मर्सेस**

"यावेळी जाताना मत्स्यगंधा एक्स्प्रेसने गेलो तरी येतानाची तिकिटे नेत्रावती एक्स्प्रेसची काढ."

आमच्या अहोंची आज्ञा झाली. ही तेव्हाची गोष्ट आहे जेव्हा आमची मुलगी उडुपीला मणिपाल युनिव्हर्सिटीत शिकत होती. मुलीला एवढ्या लांब शिकायला ठेवल्यामुळे आमचे; विशेषतः माझे तेथे खूप वेळा जाणे होत असे. आम्ही बरेचदा मत्स्यगंधा एक्स्प्रेसनेच प्रवास करायचो. कारण दुपारी दोन वाजता ती लोकमान्य टिळक टर्मिनस वरुन सुटायची. त्यामुळे ऑफिसमधून थोडे लवकर निघालो की चालायचे. एक दिवसाची सुट्टी वाचवायचा पर्याय! दुसरं काही नाही. त्यावेळेस ऑनलाईन बुकिंग हा प्रकार फारसा अस्तित्वात नव्हता किंवा मला तरी ते जमत नव्हते. पण नेहमी रेल्वेचे बुकिंग मीच करायचे. चर्चगेटला ऑफिसला जाण्याचा हा एक फायदा! तेथे महिलांसाठी एक राखीव खिडकी असायची. त्यामुळे गर्दीत उभे रहावे लागत नसे. रितसर फॉर्म भरून तिकिटे काढावी लागत.

मुलीची युनिव्हर्सिटी, तिथला परिसर तसा सुंदर होता. म्हणून नेहमी आमच्याबरोबर तेथे जाताना आमच्या नातेवाईक किंवा मित्र परिवारांपैकी कुणीना कुणी तरी सोबत असायचेच. यावेळी माझी एक जाऊ आणि एक पुतण्या आमच्याबरोबर येणार होते. आम्ही दोघे, आमचा मुलगा व ते दोघे असे पाच जणांचे मला बुकिंग करायचे होते. जाऊ शिक्षिका होती. तिची शाळा सुरू होईल त्या हिशेबाने तिकिटे काढायची होती.

दिवाळीच्या सुट्टीत ५ तारखेला जाऊन १० तारखेला परत यायचे असा आमचा बेत होता. त्याप्रमाणे मी ५ तारखेची जायची आणि १० तारखेची यायची तिकिटे काढली. सगळी तिकिटे एकाच ठिकाणी मिळाली म्हणून मी स्वतःवरच खुश झाले. ५ तारखेच्या मत्स्यगंधा एक्स्प्रेसने आम्ही निघालो. कोकण रेल्वेचा प्रवास म्हणजे नजरेला आल्हाददायक असणारा प्रवास ! डोंगर दऱ्या, झरे आणि ओढे.. आजुबाजुला हिरवीगार शेते पाहूनच डोळे सुखावतात. तेथे पोहोचल्यावर मुलीला भेटण्याचा आनंद आणि आजुबाजुला फिरण्यात पाच दिवस कसे निघून गेले ते समजलेही नाही. शेवटी घरी परत

यायचा दिवस; म्हणजे १० तारीख उजाडली. सकाळी उठल्याबरोबर सर्व सामान वगैरे बॅगेत भरणे आमचे चालू होते.

"गाडीची तिकिटे बघू दे जरा... कुठला डबा आहे ते तरी पाहून ठेवूया." मिस्टरांनी फर्मान सोडले.

मी माझ्या पर्स मधून तिकिटे काढून दिली. त्यांनी ती पाहिली आणि ते एकदम ओरडले." अगं गाडी गेली आपली.."

मला काही कळेचना."तिकिटे १० तारखेचीच तर काढली आहेत..." अगदी ठासून सांगितले मी.

"हो बरोबर... पण आज पहाटे दीड वाजता ती गेली..." अहोंचा आवाज चढला.

नंतर सगळी गडबड माझ्या लक्षात आली. या वेळेस पहिल्यांदा मी नेत्रावती एक्स्प्रेसची तिकिटे काढली होती. ती एक्स्प्रेस उडुपीला पहाटे दीड वाजता येत होती. मला खरी ११ तारखेची तिकिटे काढायला पाहिजे होती, पण मी १० तारखेची रात्रीची समजुन तिकिटे काढली होती. आता आली का पंचाईत !! आता आम्हाला दुसरी परतीची तिकिटे मिळतील की नाही याची चिंता लागली; तर जाऊबाईंना शाळेचा पहिला दिवस बुडतो की काय याची काळजी.. त्यात ह्यांचा तोफखाना चालूच होता.

शेवटी आम्ही दोघेही धावतपळत उडुपी स्टेशनला गेलो. तिथल्या बुकिंग खिडकीवर एक तरुणी होती. तिला आम्ही सगळी परिस्थिती सांगितली.

"नाही ही तिकिटे चालणार नाहीत..." ती म्हणाली. म्हणजे आता दोन हजार रुपयांचा फटका. (त्यावेळी दोन हजारालाही किंमत होती)

"मग आता आम्ही काय करु ? आम्हाला आजची... (परत चुकले) म्हणजे उद्याची पहाटेची तिकिटे द्या.." मी अजिजीने सांगितले.

"मॅडम सॉरी.. बाहेर जाणाऱ्या गाड्या या स्टेशनला थांबतात ;पण येथुन त्यांचे तिकिट बुकिंग होत नाही.." तिला बहुतेक आमची दया आली असावी.

"मग आता ?" ह्यांच्या स्वरातही चिंता होती.

"तुम्हाला पुढच्या म्हणजे भटकल स्टेशनवर तिकिटे मिळतील." ती खेदाने म्हणाली.

"म्हणजे आम्हाला आता त्यासाठी पुढच्या स्टेशनवर जावे लागेल ?" मी आश्चर्याने विचारले.

"तसेच नाही काही... इथे बरेचशे एजंट आहेत. त्यांच्याकडे चौकशी करा.." तिने पर्याय सुचवला. आम्हालाही आता दुसरं काही सुचत नव्हते. आम्ही जड मनाने परत फिरलो. इतक्यात तिने आम्हाला परत बोलावले.

"मॅडम.. मला माहित आहे तुमची गाडी सुटली आणि पैसेही गेले. मलाही खुप वाईट वाटते. एक फॉर्म मी तुम्हाला देते. तो भरुन तुम्ही कोकण रेल्वेच्या मुंबई ऑफिसला देऊन बघा. कदाचित तुम्हाला पूर्ण नाही पण काही तरी भरपाई मिळेल... एवढेच मी करु शकते तुमच्यासाठी..." तिच्या त्या चांगुलपणाने माझे डोळे भरुन आले.

आम्ही परत आमच्या हॉटेलवर आलो. मुलीकडे चौकशी केली आणि ती आणि तिच्या मैत्रिणी ज्या एजंटकडे तिकिटे काढत असत त्याच्याकडे पोहोचलो. त्याने सगळ्या शक्यता पडताळून पाहिल्या. तोपर्यंत आमचा जीव टांगणीला लागला होता. बऱ्याच वेळाने त्याने सांगितले.

"हो जाएगा... तिकिटे मिळतील. पण आता लगेच नाही... संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सांगतो.." आमचा जीव भांड्यात पडला.

"हां पण एक गडबड आहे. तिकिटे भटकल पासून मिळतील..." तो पुढे म्हणाला.

"पण मग तिथपर्यंत आम्ही कसे जाणार ?" परत एकदा पंचाईत.

"काही नाही होणार." तो अगदी आत्मविश्वासाने बोलला." मी नेहमी अशीच तिकिटे देतो मुलांना. काय करायचे; इथुन भटकल पर्यंत चालू तिकीट काढायचे. चढायचे मात्र आपल्या रिझर्व्ह डब्यातच ! पुढे मग पक्क तिकीट असतेच की आपल्याकडे..."

शेवटी हो ना करता आम्ही तिकिटाचे आणि त्याचे चार्जेस असे सगळे पैसे जड अंतःकरणाने त्याला दिले.

आता संध्याकाळच्या पाच वाजायची वाट बघत बसलो. धड जेवणही त्यादिवशी झाले नाही. त्या एजंटचे ऑफिस कॉलेजच्या कॅम्पसमध्येच होते त्यामुळे आम्ही पाच वाजताच त्याला विचारायला गेलो. पण "अभी तक नहीं हुवा..." ची धुन ऐकावी लागली. अर्ध्या अर्ध्या तासाने आम्ही फेरी मारत होतो. शेवटी सात वाजता आमची तिकिटे आमच्या हातात पडली. देवाच्या कृपेने आणि नशिबाने आताही पाचही तिकिटे एकाच ठिकाणी मिळाली होती. देवाचे आभार मानून; व्यवस्थित जेवण करून (दुपारी धड जेवण झाले

नव्हते; भुकेची आता जाणिव झाली) परत एकदा सगळी बांधाबांध केली. गाडीला वेळ होता म्हणून थोडावेळ झोपेची आराधना केली पण तीही आज रूसली होती.

स्टेशन तसे फारसे दूर नव्हते. मुलीचा निरोप घेऊन तिला आधीच हॉस्टेलवर सोडून आलो होतो. शेवटी देवाचे नाव घेऊन साडेबाराच्या सुमारास आम्ही निघालो. उडुपीला पोहोचलो तर स्टेशनवर एक दोन कर्मचारी आणि एखादा पॅसेंजर सोडला तर पूर्ण शुकशुकाट होता. त्यात फक्त आमच्या पाच जणांची भर पडली. एजंटने सांगितल्याप्रमाणे मिस्टरांनी उडुपी ते भटकल पर्यंतची चालू तिकिटे काढून आणली. आणि मग आम्ही साधारण आमचा डबा कुठे येईल अशा ठिकाणी; सर्व जण जांभाया देत गाडीची प्रतिक्षा करत बसलो.

पहाटे दीड वाजताच्या सुमारास; पाच दहा मिनिटे इथेतिथे नेत्रावती बाई अवतरल्या. गाडीतील बहुतेक लोक त्यावेळी झोपलेले होते. फक्त एक माणूस आमच्या आधीच्या डब्याच्या दारात उभा होता. बहुधा उडुपीला उतरणारा असावा. आम्ही आमच्या डब्यात चढलो. तिकिटे भटकल पासूनची होती त्यामुळे मनाची तयारी होती की तोपर्यंत कदाचित बसायला किंवा झोपायला मिळणार नाही. तशी गाडी फारशी भरलेली वाटत नव्हती. आम्ही आमच्या सीट जवळ गेलो आणि पाहतो तर काय ! सीट सगळ्या रिकाम्या होत्या. सगळ्यांनाच झोप अनावर झाली होती.

"चला बरे झाले, सीट रिकामी आहेत ते! बॅगा खाली ठेवा आणि झोपून टाका..." मी अगदी हर्षाने म्हटले.

आम्ही सगळ्या बॅगा व्यवस्थित लावण्यात गर्क होतो इतक्यात "तिकीट प्लिज" करून मागुन आवाज आला. मागे वळून पाहिले तर तो तोच माणूस होता जो आम्हाला वाटलं होतं की उडुपीला उतरणारा असेल. त्याने आम्हाला बरोबर पकडले होते. पण आम्ही विदाउट तिकीट तर नव्हतोच !

"अहो.. दाखवा ना त्यांना आपली तिकिटे..." मी ह्यांना सांगितले. मिस्टरांनी तिकिटे काढून टिसी कडे दिली. त्याने तिकिटे पाहिली. "ये टिकटे तो भटकलसे है."

"हां, हमे मालुम है... म्हणूनच भटकलपर्यंतची ही चालू तिकिटे काढली आहेत आम्ही.." मी अगदी दीनवाणा चेहरा करून सांगितले.

"पण हा डबा रिझर्व्ह डबा आहे. तुम्ही इथे कसे चढलात ?" त्यांचा प्रश्न.

"हो पण एका स्टेशनचाच तर प्रश्न आहे.." आम्ही त्याला समजावू पाहात होतो.

"ते काही नाही... तुम्हाला त्यासाठी दंड भरावा लागेल." त्याचा आवाज चढला. आमच्या डोळ्यातील झोप पार उडाली होती.

"किती दंड भरावा लागेल?" मिस्टर आता सकाळपासूनच्या दगदगीने कंटाळले होते.

"हर एक टिकीट का दो सौ रुपया.." टिसी महाशय उत्तरले.

"काय ?" मी किंचाळलेच एकदम. मनात हिशोब सुरू झाला. तिकिटे वाया गेली त्याचे पैसे, नविन तिकिटे काढली त्याचे आणि एजंटला दिले ते पैसे. चालू तिकिटे काढली त्याचे आणि आता हा आणखी मागतोय. बापरे ! मी ट्रिप फारच महागात पडणार बहुतेक. हे सगळे माझ्या एका चुकीमुळे. मी मनातल्या मनात मलाच कोसले. त्या टिकीट चेकरला सगळी परिस्थिती सांगितली, कळकळीने विनंती केली पण तो काही ऐकेना !

"समजा आम्ही नाही भरले पैसे तर ?" मी जरा चिडूनच विचारले.

"तो आपको ट्रेनसे उतरना पडेगा..."

"कैसे ? ट्रेन तो चल रही है.. कुद पडे क्या हम ट्रेनसे ?" माझा पारा चढत चालला होता.

"वो मुझे नहीं पता... आपको चालू टिकिट लेके जनरल डिब्बेमे ट्रॅव्हल करना चाहिए था." महाशय ऐकायलाच तयार नव्हते. त्याला रात्रीच्या वेळेस बरोबर बकरा मिळाला होता. पण आता माझी पण सणकी फिरली.

"चला रे.. आपापल्या बॅगा घ्या.. आपण जनरल डब्यात जाऊ या..." मी रागाने म्हटले आणि खरंच आमच्या बॅगा उचलुन चालू लागलो. आता त्या टिसीची तंतरली. "मॅडम.. ये रिझर्व्ह डिब्बा है. यहासे जनरलमे जाने के लिये रास्ता नही है.." तो आता काकुळतीला आला होता.

"ते मला माहित नाही..." आणि आम्ही दोन पावले अजुन पुढे टाकली. त्या टिसीला आणि मलाही माहित होते की आता पुढे गाडी थांबेल ती भटकल स्टेशनवरच ! आपल्या हातून सावज निसटून चालले आहे हे पाहताच टिसीने आमच्या ह्यांना एका कोपऱ्यात घेतले.

"सर जी, कुछ नहीं तो सौ रुपया तो दे दो.." आता तो दीनवाणा झाला. एवढ्या रात्री आमची झोपमोड करायला आलेल्या टिसीला, तेही सकाळ पासून एवढी दगदग झालेली असताना तसेच लटकवून ठेवावे असे वाटत होते. पण शेवटी आम्हाला त्याची

दया आली. मिस्टरांनी त्याला शंभर रुपये काढून दिले. हे सर्व आटोपेपर्यंत गाडी भटकल स्टेशनमध्ये शिरत होती. गाडीचा वेग थोडा कमी झाल्याबरोबर टिसी महाशय लगबगीने उतरून गेले. त्या रात्री आमच्याकडून फारशी कमाई झाली नव्हती. आता भटकल स्टेशनवर आणखी कोणी बकरा सापडतो का ते शोधत असावा बहुतेक !! हुश्श !! आम्ही सगळ्यांनी मोठा सुस्कारा टाकला. आता यापुढे आम्हाला या जागेवरून कोणी उठवू शकणार नव्हते. आम्ही परत आमचे सामान व्यवस्थित लावले आणि मस्त ताणून दिली.

त्यानंतर परत मात्र कधीही मी त्या नेत्रावतीच्या फंदात पडले नाही. आपली नेहमीची मत्स्यगंधाच बरी असे मानून मग त्यानेच प्रवास करत राहिलो. पण एक मात्र झाले, उडुपी स्टेशनवर त्या तरुणीने दिलेला फॉर्म भरून चर्चगेटला कोकण रेल्वेच्या ऑफिसमध्ये मी नेऊन दिला. आणि काही दिवसांनी चक्क तिकिटाचे अर्धे पैसे मला परत मिळाले. हे ही नसे थोडके !!

मॅटिल्डा अँथनी डिसिल्वा
भिमटवाडी, मर्सेस, रानगांव रोड,
वसई पश्चिम, पालघर -४०१२०१
९५४५०९३४३६ / matildadsilva50@yahoo.co.in

बॅंक ऑफ बडोदा मधुन सेवानिवृत्त. सुवार्ता , दिवाळी अंक ' लिलाई' आणि गीत, नवकिरण या नाताळ विशेषांकात लेखन. लोकसत्तामध्ये रविवारच्या लोकरंग पुरवणीत बाल मैफल मधे बालकथा लेखन.

अ ) ग्रंथाली प्रकाशन तर्फे 'निवांत' कथासंग्रह प्रकाशित. यासाठी मिळालेले पुरस्कार

१) मराठी साहित्य मंडळ- राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कार
२) प्रकाश किरण प्रतिष्ठान - श्रीरामपूर - राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०२२
३) मुक्त सृजन साहित्य पत्रिका - आद्य कथाकार चक्रधर स्वामी मुक्त सृजन कथा पुरस्कार
४) वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळ पुरस्कार

ब) दिलीपराज प्राकाशन , पुणे तर्फे प्रकाशित ' कासव येता घरा ' हा बालकथा संग्रह.
१) प्रकाश किरण प्रतिष्ठान - श्रीरामपूर - राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार.

# लता मंगेशकर आणि त्यांच्या समकालीन गायिका

■ प्रा. मॅक्सवेल लोपीस, नंदाखाल

गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांना जाऊन साडे तीन वर्षे पूर्ण झाली. संगीताचा इतका मोठा इतिहास काळाच्या पडद्याआड गेला. परंतु त्यामुळे संगीत जगतात एक मोठी पोकळी निर्माण झाली, संगीत क्षेत्राचे अपरिमित नुकसान झाले... वगैरे वगैरे मी नाही बोलणार! कारण मुळात लतादीदींनी आपल्या अभूतपूर्व गायनाने संगीतविश्व ज्याप्रमाणात समृद्ध केलेले आहे ते प्रमाण पाहता अजून हजार वर्षे तरी त्यांच्या सांगितिक प्रतिभेची चिकित्सा होऊ शकते. दीदींच्या गायनावर विविध दृष्टिकोनांतून विचार करताना अभ्यासाचे निरनिराळे पैलू समोर येतात. यापैकी एक अभ्यासकांनी विशेष लक्ष देण्यासारखा विषय म्हणजे लता मंगेशकर आणि त्यांच्यासोबत तुलना झालेल्या त्यांच्या समकालीन गायिका. वास्तविक पाहता दीदींची तुलना कुणासोबतच होऊ शकत नाही. परंतु तरीही हा तौलनिक अभ्यास अशासाठी महत्त्वाचा ठरतो की त्यामुळे लतादीदींच्या गायकीला नव्या अर्थाने पाहण्याची समज मिळते, त्यांची विविध वैशिष्ट्ये होतकरू संगीत साधकांना मार्गदर्शक ठरतात आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अज्ञानापायी वा द्वेषापायी त्यांच्या गायन प्रतिभेवर काहींनी लावलेला कलंक पुसता येण्यास मदत होते.

या मध्ये सर्वात अग्रक्रमाने घेतले जाणारे नाव म्हणजे ‘सुमन कल्याणपूर’. वरवर पाहता दोघींच्या आवाजामध्ये साधर्म्य असल्याने सुमनबाईंची ओळख बऱ्याचजणांना त्यांच्या बऱ्याचशा गीतांतून होत नाही. परंतु यात दोष जर कोणाचा असेलच तर तो गायनातील सुक्ष्मता कधी टिपूच न शकणाऱ्या किंवा तसा साधा प्रयत्नही न करणाऱ्या सर्वसामान्य रसिकांचा! खरे पाहता सुमन कल्याणपूरचा आवाज हा गोड आहे. तर दीदींचा आवाज गोड असूनही त्यात अगदी हलकीशी तीक्ष्णता आहे. म्हणजे थोडक्यात सौंदर्य शास्त्राच्या निकषानुसार ती तशी नकारात्मक बाजूच! परंतु ही बाजूच दीदींच्या गाण्याचे खरे सौंदर्य ठरते. उदाहरण म्हणून दीदी आणि सुमन कल्याणपूर या दोघींच्याही

आवाजातील जहाँआरा सिनेमातील ‘हाल-ए-दिल यूँ उन्हें सुनाया गया’ हे गीत. सुमनजींचे  सुर अगदी अवखळ पैजणांप्रमाणे नादत राहतात. परंतु दीदींचे स्वर अगदी तरवारीप्रमाणे हृदय भेदून जातात. दीदींच्या आवाजातील हलकीशी तीक्ष्णता त्या गायनाचे वैशिष्ट्य ठरते. त्यातील हर एक शब्दांवर दिलेले वजन, गाताना त्यामागील धीरगंभीर विचार दाखवून देतो की मदनमोहनची गीते दीदींनीच गावी असे का म्हटले जाते!

‘रहे ना रहे’ हे दीदींचे प्रसिद्ध गीत सुमनबाईंच्या आवाजात देखील आहे. या दोन गीतांना एकापाठोपाठ ऐकताना दीदींचे स्वरांना थेट भेदणे आणि सुमनबाईंचे अंदाज घेत सुरेल गाणे या दोहोंमधील फरक कळून येतो.

सुमनबाई आणि दीदी यांच्या आवाजातील अजून एक भेद म्हणजे सुमनबाईंच्या आवाजात हलकासा कंप होता. याचा अर्थ असा नाही की दीदींनी कंपनयुक्त गाणी गायली नाहीत. परंतु या दोन्ही गायिकांच्या कंपन देण्याची पद्धत पूर्णपणे भिन्न. बाईंच्या कंपनात तारूण्यातील चंचलता तर दीदींच्या कंपनात द्रूत गतीत गायलेल्या आंदोलनांची गंभीरता! हा फरक लक्षात घ्यायचा असेल तर ‘ब्रह्मचारी’ सिनेमातील सुमनजींच्या ‘आज कल तेरे मेरे’ मधील कंपनयुक्त आवाज आठवावा. आणि दीदींसाठी ‘रूस्तम सोहराब’ सिनेमातील ‘ए दिलरुबा’ आठवावे.

व्हायोलिनच्या लेबनिज स्टाईलमधील सुरावटी संपताच दीदींचा त्या सुरांना भेदणारा आंदोलनमय कंपनयुक्त तो आलाप आणि मग ते लेबनिज संगीत धारण केलेले ते शब्द! लेबनीज गायिका ‘फैरूज’ या दीदींच्या आवडत्या गायिका होत्या. सदर गीत गाताना दीदींनी त्यांच्या आवाज लावण्याच्या पद्धतीचा सखोल अभ्यास केलेला असावा असा भास हे पूर्ण गीत देत राहते. वेगळ्या संस्कृतीतील शैली गातानाही स्वतःचे अस्तित्व अबाधित ठेवणाऱ्या दीदी म्हणूनच एकमेवाद्वितीय!

परंतु या दोघींमधील सर्वात मोठा फरक म्हणजे वयपरत्वे दीदींचा बदलत गेलेला तरीही खणखणीत स्वरांची फेक असलेला आवाज. तर सुमनबाईंचा थकलेल्या अवस्थेतही तसाच भासणारा आवाज. त्यासाठी सोनू निगम सोबत सुमनबाईंनी गायलेले ‘बाद मुद्दत की ये घडी आयी’ ऐकावे. दीदींची तर ‘लुक्का छुपी’ आणि ‘आता विसाव्याचे क्षण’ ही १९४८ मधल्या त्यांच्या आवाजाचा मागमूस देखील दिसणार नाही

अशा अगदी वेगळ्या आवाजातील आणि तरीही प्रचंड ताकदीने गायलेली गीते ऐकली नाहीत असे रसिक न सापडणे!

सुमन कल्याणपूर पाठोपाठ दीदींवर लादलेली स्पर्धक म्हणजे खुद्द त्यांची धाकटी बहिण आशाताई. परंतु इथे दोघींच्याही गाण्याचा ढंग, गाण्याची निवड, व्हॉईस मॉड्युलेशन, एकंदरीत पूर्ण सादरीकरण आणि त्या साकारणाऱ्या नटी, त्यांची भूमिका सगळेच भिन्न! दोघींनी गायलेली द्वंद्वगीते जर ऐकायला लागलो तर या भिन्न शैलींची अजून स्पष्ट कल्पना येते. 'पडोसन' मधील 'मै चली मै चली' हा त्याचा एक नमुना. दीदींचा बेफामपणे स्वर फेकणारा आवाज! नायिकेच्या स्वैर पळणाऱ्या सायकलची गती दाखवणारा! तर आशाताईंचा खोडकर, रूसवे, लडिवाळ असे भाव दाखवणारा!

यांमध्ये अभ्यासाच्या दृष्टीने सर्वोत्तम गीत म्हणजे 'जानवर' चित्रपटातील 'आँखो आँखो में'. या गीताची एकंदरीत आकृतीच इतकी कठीण आहे की ते गावे तर मंगेशकरांनीच.  सदर गीताचा शेवट करताना दोघींसोबत मन्ना डे देखील आहेत. यामध्ये दोघींनींही स्वतःच्या शैलीतील व्हॉईस मॉड्युलेशन अगदीच कमी घेतलेली आहेत. परंतु तरीही दोघींमधील भेद सहज दिसतो. इथे दीदींचा आवाज सहज नैसर्गिक वाटतो; तर आशा ताईंचा दमदार रियाजाने कसलेला. गाण संपता संपता एक तान मात्र दोघींनीही एकत्रितपणे इतकी एकरूप होऊन घेतलेली आहे की मन्नादांशी जणू दोघी मंगेशकर भगिनी एक होऊन जुगलबंदी करीत असाव्यात!

आशा ताईंचा आवाज सुरूवातीला दीदींसारखाच होता हे बहुतेकांचे म्हणणेही काही फारसे खरे वाटत नाही. कारण त्यांचा १९४९ सालातील 'दो चार इधर दो चार उधर' हे गीत जर ऐकले तर त्यात गीता दत्त, मुबारक बेगम, सुरय्या अशा अनेक गायिकांशी मिळतेजुळते गाणे आढळते. दीदींची झलक तर खूप कमी दिसतेच; परंतु खुद्द त्यांच्या स्वतःच्या नंतरच्या गायकीच्या देखील काही खुणा त्यात दिसत नाहीत. अशाप्रकारे या दोन बहिणींबाबत उपस्थित केलेला प्रश्न कलेच्या नजरेतून पाहिल्यास तरी अतार्किक ठरतो.

खरे तर हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्ण काळात एका महान कलाकाराचा आभास देणारे दुसरे कलाकार होते. जसे हेलन आणि मधुमती, वैजयंतीमाला आणि पद्मिनी, गीता दत्त आणि मीना कपूर इ. सारांशतः एखाद्या प्रसिद्ध व्यक्तिमत्वाच्या पूर्व प्रभावामुळे भले त्या काळातील त्यांच्यासारख्या वाटणाऱ्या इतर कलाकारांना वाव

मिळाला नसेल. त्याचा सरसकट दोष त्या महान व्यक्तीच्या माथी मारण्याची सामान्य मानसिकता आहे. दीदींनी सुमनताई, आशाताई यांच्यावर अन्याय केले असे म्हणणे हा देखील त्यातीलच एक भाग. कदाचित सुमनताईंना दीदींइतके यश जर मिळाले असते तर कदाचित सुमनजींच्या आवाजाशी मेळ खाणाऱ्या परंतु प्रसिद्धीपासून लाखो कोस दूर असलेल्या त्यांच्या धाकट्या बहिण श्यामा चित्तार यांच्या आणि सुमनताईंच्याबाबत देखील असेच काहीसे बोलले गेले असते!

शेवटी परिपूर्ण स्वतःचे अस्तित्व दाखवल्याखेरीज तुमच्याकडे कितीही परमोच्च दर्जाची कला असली तरीही तुम्ही त्या अढळ स्थानापर्यंत पोहोचू शकतच नाही हे अभ्यासकांनी विचारात घेण्याचे तात्पर्य! इथे अजून एका गोष्टीची आठवण होते की दीदींनी आपल्या मृत्यूच्या अगदी चार महिने आधी आपल्या आयुष्यातली शेवटची मुलाखत देताना 'ए मेरे वतन के लोगो' या गाण्याच्या स्मृतीमध्ये जात सुमन कल्याणपूर यांची आठवण केलेली होती. प्रतिस्पर्धेची जर भावना दीदींनी कधी जोपासली असती तर इतक्या सहजपणे त्यांचे नाव घेतले नसते. अशा सहजतेमुळेच दीदींचे गाणे देखील तितक्याच सहज रसिकांच्या मनाचा ताबा घेणारे आहे. त्यांच्या अमाप यशाचे सगळ्यात महत्त्वाचे रहस्य हे त्यांच्या निखळ आणि स्वतंत्र स्वरापुढे अन्य काहीही असू शकत नाही!

(लेखक भारतीय संगीताचे अभ्यासक आहेत.)

# ए.आय.(A.I.): मानवी अस्तित्वास धोका ?

■ **मेलवीन डाबरे - वसईकर**

आज हाकेच्या अंतरावर आणि एका क्लिकवर जग आलेलं आहे. बेसपासून ते स्पेसपर्यंत स्वयंचलित कार्ये सहज होताना दिसत आहेत. एग्रीकल्चर ते सायन्स कल्चर दिवसेंदिवस वेगाने विकसित होत आहे. टॉप-टू-बॉटम संगणक प्रणाली धावत आहे. ऑफलाइन - ऑनलाइनच्या जमान्यात यंत्रशिक्षणाच्या जोरावर मानव अधिक बुद्धिमान बनत आहे. अशा या चौफेर भडीमार करणाऱ्या टच-क्रांती युगामध्ये संगणक शास्त्रातील शाखांमध्ये आणखी एका महत्त्वाच्या शाखेची भर पडलेली आहे आणि ती म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात ए. आय. (Artificial Intelligence).

**ए. आय. चा वटवृक्ष**

संशोधन, नियोजन, संयोजन, समस्या निराकरण, क्षमता शोधन, खेळ -मनोरंजन – मीडिया – तंत्रज्ञान - शिक्षण, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, वैद्यकीयशास्त्र, संरक्षण, विज्ञान, अभियांत्रिकी,वाहतूक, राजकारण, साहित्य, उत्पादन अशा या सर्वच क्षेत्रांमध्ये ए. आय.ची बीजे रोवून त्याचा वटवृक्ष होताना दिसत आहे.

**सर्वव्यापी कृत्रिम बुद्धिमत्ता**

रूढ आणि संगणकीय अशा दोन्ही प्रवाहामध्ये ए. आय. ने मोठ्या प्रमाणात बाजी मारलेली आहे आणि या दोन्ही प्रवाहातून आता संकरित बुद्धिमत्ता देखील आकार घेत आहे. दररोज नव्याने येणारे संगणकीय विविध ॲप्स, गेम्स, टेक्स्ट – टू - स्पीच टू - फ्लॅश सॉफ्टवेअर, यंत्रमानव, मोबाईल रोबोट, अमेझॉनची अलेक्सा, एप्पलच्या सिरी, गुगल ट्रान्सलेट, चॅट बॉट्स, ॲनिमेशन ग्राफिक्स, व्हर्च्युअल रिॲलिटी, ड्रोन, स्पॉट, अल्फाझिरो या सर्वांमधून कृत्रिम बुद्धिमत्ता सर्वव्यापी झालेली आहे.

## ए.आय.आणि कार्यक्षमता

ए.आय.च्या मदतीने मानव अधिक सुजनात्मक होत आहे यात शंका नाही. कामातील अचूकता, पूर्णवेळ ए.आय.ची उपलब्धता, नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीत ए. आय. रोबो चा वापर, माहिती संपादन व पृथक्करणाचा मोठ्या प्रमाणातील गुंतागुंतीचा डेटा सहज हाताळणं, वेबसाईटवर उपलब्ध असलेली सर्व प्रकारची माहिती, भावनिक व प्रात्यक्षिक गोष्टींपलीकडे जाऊन घेतलेले ए.आय.चे निर्णय, कामगारांपेक्षा जलद गतीने केलेली उत्पादनक्षम कामं अशा एक ना अनेक गोष्टींमध्ये ए.आय.च्या मदतीने मानव सृजनशील बनत आहे.

## ए.आय. आणि मानवी अस्तित्व

मानवांसारखी बुद्धिमत्ता असून विचार करणारा, शिकू शकणारा, सर्व प्रकारची कामे करणारा, कोणतेही बौद्धिक कार्य करणारा, यंत्रे बनविणारा तंत्रज्ञानाचा एक संच म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेकडे पाहिली जाते पण याच ए.आय. मुळे मानवी अस्तित्वाला धोका निर्माण करणारी बरीचशी आव्हाने समोर उभी ठाकलेली आहेत. ए. आय.च्या मदतीने मिळणाऱ्या वैयक्तिक माहितीमुळे (बिग डेटा) पारदर्शकता आणि निष्पक्षता तसेच गोपनीयता आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे. ए. आय. च्या वापरामुळे खेळ – मनोरंजन - शिक्षण आणि मिडियाच्या दुनियेत नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. बेरोजगारी वाढत आहे. नैतिकतेला बाधा आलेली आहे. सायबर गुन्हेगारी आणि हॅकर्सची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. गुन्हेगार जगत अधिक आक्रमक झालेलं आहे.

आज ए. आय. च्या मदतीने सर्व काही होत असल्यामुळे माणूस ज्ञानी बनतो आहे की अज्ञानी? स्वावलंबी बनत आहे की परावलंबी? तसेच बौद्धिक दृष्ट्या अपंग तर बनत नाही ना? असे अनेक ज्वलंत प्रश्न निर्माण झालेले आहेत.

इतक्या सहजपणे आपल्या नकळत आपण ए. आय.ला आपल्या जीवनात स्थान दिलेलं आहे की भविष्यात ए. आय. आपली रोजची दैनंदिन कामे आपल्यापेक्षा बिनचूक आणि सफाईदारपणे करील यात दुमत नाही त्यामुळे आपले भविष्यातील जीवन कृत्रिम बुद्धिमत्ता संचलित असेल याची मानसिक तयारी करणे अपरिहार्य आहे; कारण विचार आणि भावना समजून संवाद साधणारे तंत्रज्ञान ए. आय. आधारे तयार करण्याचे प्रयत्न सातत्याने होत आहेत आणि जर या प्रयत्नांना यश आले तर मानवी अस्तित्वच धोक्यात येऊ शकते.

# नाशिक-गुलशनाबाद-नाशिक

**■ मुक्ता अशोक टिळक, नाशिक**

१८८०-८१चा सुमार. नाशिकला गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर मोठ्या पटांगणात भारतीय ख्रिस्ती मिशनरी सुवार्ता प्रसार करीत प्रवचन देत. नारायण वामन टिळक हा तरुण त्यांच्याशी वाद घाले आणि त्याची मित्रमंडळी मिशनरींची खिल्ली उडवीत. हा तरुण नाशकात इंग्रजी शिकला. त्याने बायबल विषयी थोडे बहुत ऐकले वाचले. का तर त्यावर टीका करता यावी म्हणून. पण दैवी योजना त्याला उमगली नाही. खरे तर परमेश्वरानेच त्याला 'निवडले' होते! आपल्या ख्रिस्तांगीकारानंतर पणजोबा म्हणतात, 'सुमारे दोन सव्वा दोन वर्षांपूर्वीच मी ह्या ख्रिस्ताचा व त्याच्या अनुयायी जनांचा हाडवैरी नव्हतो का? त्यावेळेस हा ख्रिस्ती होईल असे कोणाला स्वप्नात तरी वाटले होते का? पहा, मीच चालता बोलता चमत्कार आहे. मी आता येशूचा शिष्य बनलो आहे.'

पणजोबांचे मार्गक्रमण 'स्मृतिचित्रे' आणि 'चालता बोलता चमत्कार' या दोन ग्रंथात सविस्तर वर्णिले आहे. ख्रिस्तांगीकारानंतर त्यांचे वास्तव्य, कार्य, सेवा सारे काही मुंबई, अहमदनगर, सातारा, वाई या परिसरात झाले. 'बीज' मात्र नाशिकमध्येच पेरले गेले होते!

९ मे १९१९ रोजी पणजोबांना देवाज्ञा झाली. त्यानंतर लक्ष्मीबाई टिळक (माझ्या पणजी) मुलगा देवदत्त, सून रूथ आणि नातवंडांसह नाशकात १९२४ मध्ये स्थायिक झाल्या. नाशिक त्यांचे माहेर. एवढेच नाही तर टिळक गोखले परिवार नाशिक परिसरातीलच राहणारा. २४ फेब्रुवारी १९३६ रोजी माझ्या पणजीबाईंनी अखेरचा श्वास घेतला. त्यांची कबर नाशिकच्या ख्रिस्ती कब्रस्तानात आहे. अनेक जाणकार, साहित्यिक, आप्तेष्ट, स्नेही तेथे जाऊन आदरांजली अर्पण करतात. नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाने पणजीबाईंची कबर बांधली. पणजोबांची कबर अहमदनगरला आहे. अगदी त्याच धर्तीवर ही कबर बांधलेली आहे. त्यावर कुसुमाग्रजांनी जो शोक संदेश आजोबांना पाठविला होता तो कोरला आहे.

पणजीबाईंनी नाशकात आपले महत्त्वाचे स्थान प्रस्थापित केले. नाशकातील आपल्या एक तपाच्या वास्तव्यात पणजीबाईंनी अनेकांशी नाती जोडली. जाती-धर्माचा भेदभाव त्यांना कधी भावला-शिवला नाही. साहित्यिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, वैद्यकीय प्रत्येक क्षेत्रात त्यांचा मनोभावे सहभाग आणि सेवा असे. पशुपक्षी, वृक्षवेलींसह जनसेवाला त्यांचे

प्राधान्य असे. १५ डिसेंबर १९३५ रोजी नाशिककरांनी पणजीबाईंचा जंगी नागरी सत्कार केला. अध्यक्ष आचार्य अत्रे यांनी त्यांना 'साहित्यलक्ष्मी' हे बिरूद प्रदान करून गौरविले. आपल्या भाषणात अत्रे शेवटी म्हणाले, 'उतार वयात आपण पूर्ण विश्रांती घ्यावी आपले आयुष्य अत्यंत आनंदात विसाव्यात जावो अशी मी प्रार्थना करतो.' पणजीबाई उत्तरल्या, 'ज्या दिवशी मला पूर्णविराम मिळेल त्याच दिवशी माझ्या स्मृतीचित्रांना पूर्णविराम मिळेल. लक्ष्मीबाईंचा फुल स्टॉप अजून झालेला नाही.'

नाशकात त्यांचे चार मानसपुत्र होते. रावबहादुर वंडेकर, भा.ल.पाटणकर, सोपानदेव चौधरी आणि भाऊराव गायकवाड म्हणजे दादासाहेब गायकवाड. ते माझ्या पणजीबाईंविषयी लिहितात, 'आई मला समाजसुधारणेबद्दल तासचे तास धडे देत असे. मी म्युनिसिपल कौन्सिलवर असताना वारंवार आईचा सल्ला घेत असे.' माझे आजोबा ॲडवोकेट देवदत्त टिळक आणि पद्मश्री दादासाहेब गायकवाड अगदी जवळचे स्नेही-बंधूच! आजोबा नाशिक नगरपालिकेचे वाईस प्रेसिडेंट, स्कूल बोर्ड आणि नाशिक जिल्हा लोकल बोर्डाचे पदाधिकारी होते. त्यामुळे या दोघांचे समाजकार्य एकोप्याने आणि प्रभावीपणे चालत असे. आजोबांचा नाशिकच्या जडणघडणीमध्ये मोठा सहभाग होता. याशिवाय रिमांड होम, कुष्ठरोग सहाय्य व पुनर्वसन, जनावरांचा दवाखाना याविषयी परदेशी ख्रिस्ती मिशनरींनी द्विशतकापूर्वी नाशकात येऊन अनेक कामे केली. त्यांना मदत करणे, भविष्यकाळात आलेल्या नवख्या मिशनऱ्यांना सर्वतोपरी पाठिंबा आणि सहकार्य-मार्गदर्शन करणे हे आजोबांचे स्वभाव विशेष म्हणता येतील.

गुलशनाबाद हे नाशिकचे जुने नाव. तीन विभाग - गोदावरीच्या पूर्वेला पंचवटी, पश्चिमेला नवी वस्ती आणि मध्य नदीच्या घाटावरची मुख्य वस्ती. नाशिकला ऐतिहासिक, धार्मिक महत्त्व आहे. बौद्ध त्रिरश्मी आणि जैन चामर लेणी फार पुरातन काळात नाशिक परिसरात खोदली गेली. काही शतकांपूर्वी मुघलांनी नाशिक हे नाव बदलून गुलशनाबाद केले. कारण इथली हिरवाई. आपल्या काळात मराठ्यांनी ते पुन्हा पूर्ववत नाशिक ठेवले. अनेक धर्माचा इथल्या इतिहासात उल्लेख आहे.

१८६१ मध्ये अमेरिकन मिशनचे ख्रिस्ती मिशनरी रेवरेंड गार्डन हॉल नाशकात आले. त्यावेळी इथे कॉलऱ्याने थैमान घातले होते. धर्मसंदेश, आजारांची शुश्रुषा आणि औषधोपचार हे त्यांनी आपले कर्तव्य मानले. दुर्दैवाने कॉलऱ्याचा संसर्ग होऊन मृत्यूने त्यांचा घास घेतला. त्यानंतर १८३०-३५ पर्यंत अनेक मिशनरी नाशकात आले. अत्यंत प्रतिकूल वातावरणात त्यांना हवा, पाणी आणि विविध आजारांना तोंड द्यावे लागले. काही परतले तर काहींनी इथेच देह ठेवला. इथे राहिलेल्यांनी हर प्रकारे सेवा कार्य केले. सामाजिक कार्याच्या बरोबरीने

१८३२मध्ये मिसेस फेरर यांनी मुलींची शाळा सुरू केली. प्रगती संथ गतीने होत होती. १८३५ मध्ये मुलींची संख्या वाढली. वस्तीगृह ही सुरू झाले. शाळेत धर्मज्ञान, इतिहास-भूगोल-खगोलशास्त्र, भाषा व व्याकरण, वैद्यकशास्त्र, गणित या विषयांचा अंतर्भाव होता. हळूहळू चांदोरी, गंगापूर, देवळाली, मखमलाबाद येथेही शाळा सुरू झाल्या.

नाशिकच्या मध्यवस्तीच्या पश्चिमेला सुमारे दोन किलोमीटर अंतरावर १८५५ मध्ये ख्रिस्ती वसाहत वसवायला सुरुवात झाली. अनाथ, गरजूंसाठी धर्मपुरी हा निवारा, धान्याचे भांडार-कोठार, प्रार्थनागृह, आटोपशीर घरे आणि व्यवसाय शिक्षण देणाऱ्या कार्यशाळा उभारल्या गेल्या. १८५७ मधील एक वृत्तांत आहे - 'शालेय शिक्षणासह उपयुक्त धंदे शिक्षणाची आवश्यकता भासल्यामुळे सुतार- लोहार काम, टांगे व छकड्यांची निर्मिती, छपाई काम व पुस्तक बांधणी, विणकाम वगैरे कामात मुले वाकबगार झाली. शिक्षकांसाठी प्रशिक्षण ही सुरू केले. १८६५ मध्ये नागपुरात भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात शरणपूरच्या कारखान्यात तयार केलेल्या टांग्याला पहिले बक्षीस आणि पदक मिळाले. या टांग्यांना इतर देशातूनही मागणी असे आहे.'

विशेष म्हणजे आफ्रिकेतील गुलामगिरी विरुद्ध लढा देणाऱ्या डॉ. डेव्हिड लिविंगस्टनचा ही १८६०-६५ मध्ये शरणपूरशी संबंध आला होता.

नाशिक १८१८ पासून इंग्रजांच्या अंमलाखाली आले. मुंबई प्रांताचा एक भाग म्हणून. १८६४मध्ये नाशिक नगरपालिका आणि १८६९मध्ये नाशिक जिल्हा म्हणून जाहीर झाला. हा भाग मुंबई प्रांताच्या जवळ असल्याने नाशिकला विशेष महत्त्व मिळाले.

१८९२ मध्ये शरणपूर भागात रेव्हरंड रॉबर्ट्स यांची देखरेख, मार्गदर्शन आणि देशी-विदेशी ख्रिस्ती बांधवांची आर्थिक मदत यामुळे संत आंद्रिया (अँड्र्यूज) देवालय उभे राहिले. दगडी बांधकामाचे हे देवालय स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. १२ डिसेंबर १८९३ रोजी मुंबईच्या बिशपांच्या हस्ते देवालयाचा समर्पण विधी झाला. या देवालयाव्यतिरिक्त १९२३-२४ मध्ये मध्यवस्तीमध्ये संत थॉमस देवालय बांधले. नाशिक रोडला हे देवालयाचे समर्पण १ मे १९३८ रोजी झाले. देवळाली परिसरामध्ये ख्राईस्ट चर्च, गॅरीसन चर्च ही देवालये आहेत. याशिवाय रोमन कॅथोलिक चर्च नासिकला होली क्रॉस, देवळालीला सेंट पॅट्रिक चर्च आहेत. सेंट पॅट्रीक चर्च १८७९ मध्ये तत्कालीन मिलिटरीतील ख्रिस्ती मंडळींसाठी सुरू केले. नाशिक रोडचे संत ॲना चर्च १९४२ मध्ये सुरू झाले. १९७८पासून या चर्चला कॅथेड्रल म्हणून मान्यता मिळाली. नाशिक कॅथोलिक धर्मप्रांताची स्थापना १९८७मध्ये झाली. बिशप हाऊस मधून काही वर्षे 'निरोप्या' हे मासिक प्रकाशित होत असे. निरोप्याचा १९०३ मध्ये पहिला अंक राहुरी येथे प्रसिद्ध झाला. डिसेंबर १९७५ मध्ये फादर प्रभुधर यांनी ख्रिस्तजयंती विशेषांक

प्रकाशित केला. मुखपृष्ठावर भारतीय शैलीतले बाळ येशू आणि आई मरियाबाई यांचे रेखाटन आहे.

उत्तर महाराष्ट्रातील एकमेव 'बाल येशू मंदिर - द इन्फंट जिझस श्राईन' नासिक रोड येथे १९७० मध्ये बांधले. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात लाखो भाविक देश विदेशातून या मठामध्ये प्रार्थनेसाठी येतात.

मिस. रोझाली हार्वे या एक अद्वितीय मिशनरी होत्या. १८८४मध्ये त्या नाशकात आल्या. अत्यंत सेवाभावी, जिद्दीच्या, प्रेमळ कार्यकर्त्या, भूतदयाने ओतप्रोत भरलेल्या खऱ्या ख्रिस्तसेविका होत्या. त्यांचे कार्य अनमोल आणि चिरंतन ठरले. 'बालपूर' (सध्याचे एच् आर.डी.सेंटर, रामकृष्ण परमहंस रोड) हे अनाथ, नवजात बालकांसाठी हक्कांचे घर. कुष्ठग्रस्तांसाठी आश्रय, औषधोपचार, पुनर्वसन आणि व्यवसाय शिक्षण केंद्र. (सध्याचे व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर पंचवटी) पशुवैद्यक चिकित्सालय आणि छत्रछाया (सध्याचा जनावरांचा दवाखाना घरपुरे घाट). नाशिककर त्यांना 'आई' म्हणत. याशिवाय कॅनडियन मिशनरींनी चालविलेल्या हॉस्पिटलची उभारणी, खेडोपाडी उघडलेल्या शाळा, महिला-बालकांसाठी मदत केंद्र ही 'आई'ची कामे अत्यंत महत्त्वाची ठरली. त्यांच्या सेवेचा गौरव म्हणून इंग्रज सरकारने त्यांना प्रथम 'रौप्य' नंतर 'सुवर्ण' आणि 'कैसर-इ-हिंद' या पदव्यांनी सन्मानित केले. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी आपले सेवाव्रत सोडले नाही. ३१ मार्च १९३२ रोजी त्यांनी आपला देह ठेवला. त्यांची कबर नाशिकच्या ख्रिस्ती कब्रस्तानात आहे.

सध्याचे पोलीस कमिशनर ऑफीस (शरणपूर) आहे ती इमारत १८७० मध्ये बांधली. ख्रिस्ती तरुणांना धर्मगुरू होण्यासाठी इथे धर्मशिक्षण दिले जात असे. हीच ईश्वरीविद्या प्रशाला म्हणजे डिव्हिनिटी स्कूल. अनेक तरुणांनी इथे प्रशिक्षण घेऊन महाराष्ट्रभर वेगवेगळ्या चर्चमध्ये यशस्वीपणे धर्मगुरूपद सांभाळले.

शरणपूर परिसरात कॅनडीयन मिशनरींनी सुरू केलेले हॉस्पिटल सर्व सर्वदूर प्रसिद्ध होते. येथे आलेला प्रत्येक रुग्ण बरा होत असे. उत्तम वैद्यकीय सेवा आणि त्याला आध्यात्मिक जोड याचा हा परिपाक.

ख्रिस्ती लेखन संस्था (के एल एस) आणि वाचनालय सध्याच्या कॅनडा कॉर्नर भागात कार्यरत होते. १९७२पर्यंत वाचनालयात पत्रकारितेचा अभ्यासक्रम सुरू होता. हा अभ्यासक्रम इंग्लिश भाषेत असे. परराज्य आणि परदेशातूनही विद्यार्थी येत. अध्यापक वर्ग इंग्लंडमधील जाणकार, अनुभवी पत्रकारितेतील तज्ज्ञ असत. संत अंद्रिया मराठी शाळा ही फार जुनी शाळा. आज ती जिल्हा परिषदेची शाळा आहे. पूर्वी या शाळेचे वस्तीगृह ही होते.

रेव्ह. डी.के.शिंदे यांनी १९१७मध्ये नाशिकच्या मध्यवस्तीत सेंट जॉर्ज शाळा सुरू केली. ही आज पेठे हायस्कूल म्हणून ओळखली जाते. श्रीमती हिराबाई शिंदे (रेव्ह. शिंदेंची कन्या) २४ सप्टेंबर १९४७ रोजी आदर्श मॉन्टेसरी ही शाळा सुरू केली. आज अनंत कान्हेरे चौक (सी बी एस) परिसरात ह्या शाळेने माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण देण्यापर्यंतची प्रगती केली आहे.

'अखिल भारतीय अपंग पुनर्वसन शिक्षण संस्थे'ची स्थापना १ऑगस्ट १९८४ रोजी झाली. मतिमंद, कर्णबधीर, शारीरिक-मानसिक दृष्ट्या अपंगांना मोठा आधार आणि आशा या संस्थेने दिला आहे. विद्यार्थ्यांचे पुनर्वसन आणि पालकांना मार्गदर्शन याबाबत विशेष लक्ष दिले जाते.

'महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ' ही संस्था यावर्षी हिरक महोत्सव साजरा करीत आहे. १३ नोव्हेंबर १९६४ रोजी होली क्रॉस चर्चचे फादर ज्योकिम बरांको यांनी ही संस्था स्थापन केली. मुख्य उद्देश ग्रामीणांचे शहरात होणारे स्थलांतर थांबविणे. आर्थिक गोष्टींची हे निगडित आहे. म्हणून शेती व्यवस्थापन, जल-जमीन-बियाणे यांचे परीक्षण याविषयी ही संस्था मार्गदर्शन करते शिक्षण देते. आज ही संस्था पाच जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे.

मदर टेरेसांच्या मिशनरीज ऑफ चॅरिटीजची एक शाखा 'प्रेमदान' हा वृद्धाश्रम पुरुषांसाठी सुरू आहे. यापूर्वी १९७५ मध्ये 'निर्मला होम फॉर एजेड' सुरू झाले होते. 'कृपाप्रसाद' हा पूर्वी दवाखाना होता. सध्या तिथे शाळा-महाविद्यालयात शिकणाऱ्या, नोकरी करणाऱ्या ग्रामीण मुलींसाठी वस्तीगृह सुरू आहे. 'देवमाता' ही संस्था महिलांना आवश्यक ती मदत करते. होली क्रॉस चर्चतर्फे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह चालवीत असत. तेथे छापखानाही होता 'आपण' हे पाक्षिक तेथे प्रकाशित होत असे. संपादक आचार्य सत्यवान नामदेव सूर्यवंशी. सध्या या इमारतीमध्ये कविवर्य टिळक वाचनालय आहे. येथे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू केलेली आहे.

देवळाली परिसरातील निसर्ग रम्य वातावरणामध्ये 'बार्नस् स्कूल' ही निवासी शाळा अँग्लोइंडियन संस्थेने १९२५ सुरू केली. जुन्या शाळा म्हणजे सेंट फिलोमिना १९४६, सेंट पॅट्रीक १९५६, सेंट झेवियर्स १९६१, निर्मला कॉन्व्हेंट १९६४ आजही प्रगतीपथावर आहेत. शैक्षणिक क्षेत्रात सुमारे ५० वर्षे, १९७२ पर्यंत माझ्या अमेरिकन आजी शोभना देवदत्त टिळक यांनी इंग्लिश शिकवणी वर्ग चालविले. शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना इंग्लिश भाषा, व्याकरण, साहित्याचे उत्तम मार्गदर्शन केले. संवाद साधायला पारंगत केले. त्यामुळे अनेकांचे भविष्य उज्ज्वल झाले. आज त्यांचे विद्यार्थी ७०-८० वर्षांचे असून आवर्जून टिळक मॅडमचे नाव घेतात.

१९६२ मध्ये 'ऑटोस्किल्स' या प्रशिक्षण संस्थेची स्थापना अमेरिकन मराठी मिशन तर्फे झाली. पहिले प्रिन्सिपल माल्कम वॉर्नर  होते. उच्चशिक्षित तंत्रज्ञ प्रशिक्षक होते. विद्यार्थी भारताशिवाय परदेशातूनही येत असत.

हा आढावा ख्रिस्ती बांधवांनी नाशिक साठी केलेले कार्य, परिश्रम, बलिदान, त्यांच्या प्रयत्नांना-सेवेला मिळालेले यश याचा आहे. त्यांनी चिकाटीने कर्तव्य निभावल्यामुळे आज आपल्याला आजचे प्रगत नाशिक शहर दिसते आहे यात काही शंका नाही.

९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन डिसेंबर २०२१ मध्ये नाशकात भरले होते. तेव्हा नाशिक महानगरपालिकेतर्फे नाशकातील आजी-माजी साहित्यिकांच्या घरावर रोषणाई केली होती. याचा आनंद अनपेक्षित पणे मला लुटता आला. ते चार दिवस जणू 'ख्रिस्ताच्या आगमना'प्रीत्यर्थ माझ्या घरावर रोषणाई झळकत होती!!

असा हा माझ्या 'नाशिक-गुलशनाबाद-नाशिक'चा  इतिहास.

--------------------------------

संदर्भ:

*संपूर्ण स्मृतिचित्रें- संपादन- श्री अशोक दे. टिळक .पॉप्युलर प्रकाशन.

*नाशिक व ख्रिस्तसंदेश.

*साहित्य सावना, दिवाळी विशेषांक २०१३.

*श्री.  कामिल पारखे.

# लोक काय म्हणतील ?

■ डॉ. नेन्सी विन्सेंट डिमेलो
गास, गार्सियन नगर

कर्ज काढून एका थकलेल्या बापाने थाटामाटात मुलीचं लग्न केले. परीक्षेत नापास झालेल्या मुलाने लोकलाजेस्तव आत्महत्या केली. कर्ज काढून समाजात थाट मिरवण्यासाठी तरुणाने महागडी बाईक आणली. अशी एक ना अनेक उदाहरणे आहेत की ज्याद्वारे आपल्याला समजते की व्यक्ती स्वतः पेक्षा लोकांचा विचार अधिक करतो. 'लोक काय म्हणतील?' हे वाक्य हमखास सगळ्यांच विशेषतः मध्यमवर्गीय घरात ऐकायला मिळते.

बालवयात आपल्याला लोक काय विचार करतील किंवा लोक काय म्हणतील याची चिंता, भिती नसते. या वयात वागण्यावर बंधन नसते. वागणं नैसर्गिक असते. कोणताही मुखवटा परिधान करण्याची गरज वाटत नाही. काहीही करण्याची तयारी असते. काहीतरी नविन शिकण्याची ईच्छा आणि उमेद असते. पण व्यक्ती जसजशी मोठी होत जाते तसतशे व्यक्तीच्या विचारांचे दमन व्हायला सुरुवात होते आणि हळूहळू लोक आपले विचार व्यक्तीवर थोपवायला सुरुवात करतात. काळाच्या ओघात व्यक्तीचे बालपणीचे पहिले रुप कुठेतरी लुप्त होते आणि दुसरे रुप उदयाला येते जे लोकांच्या विचारानूसार तयार झालेले असते. मग व्यक्ती प्रत्येक वेळी वागताना, बोलताना एकच विचार करायला लागते, लोक काय म्हणतील? कधीकधी तर लोकांच्या काही म्हणायच्या अगोदर व्यक्ती स्वत:च लोक काय म्हणतील? हे ठरवते. मी कोण आहे, मला काय हवं आहे, मी काय बनू इच्छीतो हे सगळ विसरून लोकांच्या मतानूसार जगायला व्यक्ती सुरुवात करते. आपल्यातील ९० टक्के लोकांना यामुळे कधी जीवन जगण्यातील खरा आनंद मिळत नाही.

हिंदीत एक म्हण आहे, "सबसे बडा रोग, क्या कहेंगे लोग?" मी जर असा वागलो तर लोक काय म्हणतील? मी टाकलेल्या धंद्यात यशस्वी नाही झालो तर लोक काय

म्हणतील? मी इतका हुशार, माझ्याकडे एवढा प्रचंड पैसा... त्यात माझा मुलगा शिकला नाही तर, मुलगा व्यसनी निघाला तर, माझ्या मुलीने प्रेमविवाह केला तर ? अशा अनेक प्रश्नामागे एक ब्रम्हराक्षसी प्रश्न उभा असतो तो म्हणजे,"लोक काय म्हणतील?" हे तीनच शब्द माणसाला अस्वस्थ करतात. माणूस अपयशाला भीत नाही पण अपयश आल्यानंतर त्यावर लोकांची प्रतिक्रिया काय असेल? याच विचाराने तो अस्वस्थ होतो.

तुम्ही इतके हुशार आणि मुलाला इतके कमी मार्क कसे मिळाले ? काय म्हणता तुम्ही इंजिनियर आणि मुलगा शिक्षक व्हायचं म्हणतोय ? 'अरे आता लेकीची/लेकाची पंचविशी उलटून गेली लग्न कधी करताय? / लग्नाला कधी बोलवताय?, तुमच्या लग्नाला एक वर्ष झालं ना मग बाळाचे पेढे कधी देताय?, तुमचा घटस्फोट का झाला?, आता तुझं शिक्षण संपलं मग नोकरी केव्हा लागणार?, काय रे तुला पगार किती ? इत्यादी खोचक प्रश्न जे विचारणाऱ्याला सहज साधे वाटतात तेच प्रश्न बऱ्याचदा इतरांना खुप त्रासदायक असतात. ह्यामुळे एखाद्याच्या जीवनावर खुप विपरीत परिणामही होवू शकतो.

शिक्षण घेत असलेल्या मुलांना तर 'आता पुढे काय?' हा प्रश्न हमखास ठरलेला असतो आणि एखाद्या मुलाने त्याचा प्लॅन सांगितला तर काही महाभाग त्याने ठरवलेले कसे चुकीचे आहे हे त्याला ठासून सांगण्याचा प्रयत्न करतात. कोणी काय कपडे घालायचे इथपासून कोणी काय व्हॉटसअप स्टेटस, स्टोरी ठेवली आहे ह्या विषयी चर्चा करून त्या व्यक्तीविषयी विधाने सहज केली जातात. आपल्या जीवनात स्वतःच्या किंवा आपल्या जवळच्या व्यक्तीच्या आवडीनिवडी, मतांपेक्षा 'लोक काय म्हणतील?' लोकांना काय वाटेल ? याचा आपण पदोपदी विचार करतो आणि त्याप्रमाणे वागतो. ह्यामुळे बऱ्याच वेळेला आपण आपल्या स्वतःवर ,आपल्या प्रियजणांवर अन्याय करत असतो.

‘कुछ तो लोग कहेंगे लोगों का काम है कहना.’ लोकांचं काय, दोन्ही बाजूने नावे ठेवतात. जरा विचार करा की, तुम्ही तुमच्या मुलांचे खूप लाड करीत असाल तर लोक म्हणतात की, इतके नका लाड करू, मुले डोक्यावर चढतील आणि जर आपण लोकांचे म्हणणे मानून जर मुलांना रागावण्यास सुरुवात केली तर हेच लोक म्हणतात की, बघा कसे पालक आहेत, मुलांना समजून घेत नाहीत, त्यांच्यावर जराही प्रेम करत नाहीत. तुम्ही जर तुमच्या पत्नीवर खूप प्रेम करत असाल तर लोक म्हणतात की, हा बायकोच्या खूप अधीन गेला आहे आणि जर तिच्याकडे लक्ष दिले नाही तर हेच लोक म्हणतात की, बघा ही मुलगी आपले घर सोडून याच्या मागे आली आहे आणि हा तिची जराही काळजी घेत नाही. आपण एखादे काम करित असताना बरेच लोक आपल्याला सकारात्मक प्रतिसाद

देवून प्रोत्साहन देतात. तर काही लोक हे नकारात्मक विचार व्यक्त करणारे असतात. आपण मात्र नकारात्मक बोलणाऱ्यांचा गंभीरतेने विचार करतो आणि आपला उत्साह न जाणो कुठे निघून जातो. ज्या व्यक्तींनी लोक काय म्हणतील ? याचा कधीच विचार केला नाही, आपल्यातील बालपण जिवंत ठेवले किंवा आपल्या मतावर ठाम राहिले त्यांनी इतिहास घडविण्याचे काम केले आहे.

काळ बदलला की, लोकांची मते ही बदलत असतात. लोकही प्रत्येक परिस्थितीत बोलत असतात. लोक काय म्हणतील ? याचा विचार न करता आपण आपले काम करीत राहिले पाहिजे. फार जुनी म्हण आहे कि "ऐकावे जणांचे पण करावे मनाचे" या म्हणीप्रमाणे आपण कोणतेही काम विचारपूर्वक केले पाहिजे. लोकांच्या विचारांचा विचार न करता आपण आपल्या विचाराचा विचार करावा, पण तो विचारही आपल्या व इतरांच्या हिताचा असला पाहिजे. शेवटी बोलणारे हे 'लोकं' कोण असतात ? कुठून येतात?... ही लोक म्हणजे तुम्ही आम्हीच असतो ना...? लोकं काय म्हणतील हा प्रश्न मरेपर्यंत माणसाचा पिच्छा सोडत नाही आणि मेल्यावरही बरेच क्रियाकर्म मुलं आणि नातेवाईक निव्वळ ह्या प्रश्नाच्या भीतीने करतात. या धकाधकीच्या जीवनात 'लोक काय म्हणतील?' यामुळेसुद्धा व्यक्ती डिप्रेशनमध्ये जातात. म्हणूनच हे असे विचार आपल्या पुढच्या पिढीपर्यंत नं पोहोचणं हेच फायदेशीर आहे आणि ती आपली जबाबदारी आहे. पुढची पिढी ही आपला साचेबद्ध, मर्यादित समाज ओलांडून जागतिक पातळीवरील विविध समाजाचे भाग बनले आहेत. त्यामुळे समाजव्यवस्था वा लोक काय म्हणतील ? ह्या श्रृंखला पार गळून पडल्या आहेत असे म्हणावे लागेल.

# सार्थक

■ डॉ. नेहा सावंत , दहिसर

सकाळची नेहमीची कामं आवरून वर्तमानपत्र वाचत असतानाच मोबाईल किणकिणला. खूप दिवसांनंतर ‘तिचा' उत्साही स्वरातला फोन आला. "बाई, मी पास झाले. मला बी.एड.ची डिग्री मिळाली आणि फर्स्ट क्लासने पास झालेय”. तिच्या स्वरातून तिच्या आनंदाची कल्पना येत होती. मलाही खूप आनंद झाला होता. कारण तिचा संघर्ष मी पाहिला होता.

"अरे व्वा! अभिनंदन. कधी भेटतेस? बक्षीस म्हणून काय देऊ तुला?"

"लवकरच भेटेन. मार्कशीट मिळाली की पेढे घेऊन येईनच आणि बक्षीस काहीच नको मला फक्त तुमचा आशीर्वाद हवा."

"तो तर असतोच आणि असणार. बरं, बाबा काय म्हणतायत?"

"हो, ते तर खूपच खुश आहेत. माझी लेक आता टिचर होणार, शाळेत शिकवणार असं सगळ्यांना सांगत सुटलेत. त्यांची इच्छा पूर्ण केल्याचा खूपच आनंद झालाय मला." तिच्या या वाक्यानंतर माझे डोळे टचकन भरले. तिची सगळीच परिस्थिती ठाऊक असल्यामुळे तिला विचारलं, “ पण आता तुझ्या राहण्याचं काय?" कारण ती एका धर्मादाय संस्थेच्या चर्चच्या बालिकाश्रमात राहात होती. नियमानुसार तिला आता डिग्री मिळाल्यावर तिथे राहता येणार नव्हतं. "हो बाई, तीही सोय झालीय. मला इथेच राहण्याची परवानगी मिळालीय. मार्था सिस्टरने खूप प्रयत्न केले. मला जर कॉन्व्हेंटमध्ये किंवा चर्चच्याच शाळेत नोकरी लागली तर मी इथे सहज राहू शकते, नियमानुसार. पण जोपर्यंत मला नोकरी लागत नाही तोपर्यंत मी आमच्या हॉस्टेलच्या मुलींना शिकवायचं आणि इथल्या व्यवस्थापनात मदत करायची. मला चालेल ते काम." म्हणजे अजूनही तिला तिच्या स्वतःचे श्वास मोकळेपणी घेता येणार नव्हते. अर्थात हे मला वाटत होतं. तिच्या दृष्टीने तर चर्चचं बालिकाश्रमच हेच तिचं घर होतं. आणि ते तिला आवडतही होतं.

"बाबा आता कुठेयत? कसे आहेत?" माझा पुढचा प्रश्न.

"आता ते बरे आहेत आणि गावीच आहेत. वय झालंय त्यांचं. दिसतही नाही नीट, मीच त्यांना मे महिन्याच्या सुट्टीत गावी घेऊन गेले होते. तिथेच राहा म्हटलं. शेजारी पाजारी नातेवाईकही आहेत आणि आता पुन्हा ते काम..." असं म्हणत तिने पॉज घेतला. त्या पॉजमध्ये तिला काय म्हणायचं होतं ते मला कळत होतं.

मला दोन वर्षांपूर्वीचा सकाळचा माझा तास आठवला. सकाळी सातच्या पहिल्या तासाला मी तिच्या वर्गात गेले तर वर्गात ही एकटीच खिन्नपणे बसली होती. नजर शून्यात हरवलेली. चेहऱ्यावरचा नेहमीचा उत्साह, खळाळतं हसू मावळलेलं होतं. कसला तरी ताण तिच्यावर आलाय, हे जाणवून मी तिला विचारलं, "काय गं! काय झालं? बरं वाटत नाहीये का?"

"नाही, काही नाही." ती म्हणाली. पण ती काहीतरी लपवतेय याची जाणीव मला झाली. तिची आई बऱ्याच वर्षांपूर्वी वारली होती. वडील सोलापूरला एकटेच राहतात. किराणामालाचं दुकान आहे, रेशन दुकानासाठी भाडेतत्त्वावर एक रुम दिलेली आहे. इतकी जुजबी माहिती मला होती. ती ख्रिश्चनांच्या बालिकाश्रमात राहते याचीही पूर्ण कल्पना होती मला. ती काही ख्रिस्ती नव्हती. पण आपल्या मुलीचे पालन, पोषण, संगोपन व्यवस्थित व्हावे आणि आपल्याला अधूनमधून तिला भेटता यावे, म्हणून तिच्या वडिलांनी चर्चच्या फादर, सिस्टर यांना गळ घालून तिला तिथे ठेवली होती. आणि चर्चची मंडळी तिची अगदी व्यवस्थित काळजी घेत होती, हिच्यासारखी आणखीही काही लहान मुलं तिथे राहात होती. त्यांचं पालनपोषण चर्चमार्फत होत होतं. याची कल्पना तिच्या वडिलांना होती, आपली लेक इथे सुरक्षित राहू शकेल हा विश्वासही त्यांना वाटत होता.

वयाच्या पाचव्या वर्षापासूनच ती तिथे राहत होती. तिच्या आईवडिलांना दोघांनाही कुष्ठरोग झाला होता. सोलापूरच्या आडगावात त्यांचं घर होतं. नवरा-बायको दोघानांही कुष्ठरोग झाल्यामुळे गावाने त्यांना वाळीत टाकलं होतं. पदरात सोन्यासारखी गोड मुलगी बऱ्याच वर्षांने त्यांच्या पोटी आली होती. नवससायासाचं फळ म्हणून देवीचंच नाव लेकीला देण्याची आईची इच्छा. म्हणून तर तिचं नाव ल़क्ष्मी ठेवलं. त्या टवटवीत फुलाच्या रुपाने संसारात आनंद दिला होता. पण त्या आनंदाला गालबोट लागलं होतं कुष्ठरोगाच्या रुपाने. आपल्या रोगाची छाया मुलीवर पडू नये, तिचं आयुष्य उद्ध्वस्त होऊ नये म्हणून नवरा बायको लेकीला घेऊन मुंबईत आले होते. दोघंही लेकीसोबत एक छोटसं झोपडं घेऊन राहू लागली. कुणीतरी त्यांना चर्चचा पत्ता दिला. तिथे कुष्ठरोगावर फुकट उपचार होतो असं कळलं, म्हणून उपचारासाठी चर्चच्या दवाखान्यात ही नवराबायको नियमित

येऊ लागली. त्यांच्या या हसऱ्या राणीचा लळा चर्चमधल्या सिस्टरांनाही लागला होता. या मुलीचा सांभाळ इथे व्यवस्थित होईल असं तिच्या बाबांना वाटत होतं. पण आपल्या काळजाचा तुकडा आपल्यापासून दूर ठेवावा लागणार या कल्पनेने आई मात्र खचत गेली, खंगत गेली. भरीसभर काहीतरी काम मिळेल या आशेने तिच्या वडिलांनीही खूप वणवण केली पण काम काही मिळालं नाही. म्हणून पुन्हा ते गावाकडे परतले होते.लेकीच्या आठवणीने व्याकूळ होऊन आईने अंथरूण धरलं, त्यातूण ती ऊठलीच नाही.  अशी हकीकत मला तिनेच सांगितली होती.

आई बाबांविना पोर अशी बालिकाश्रमात राहून शिकते, सतत आनंदी असते म्हणून तिच्याविषयी मला विशेष प्रेम वाटायचं. पण असं काय घडलंय की, ही आज इतकी खिन्न झालीय, तेच कळेना. मी पुन्हा विचारलं, "काय गं, काय झालंय ? तू नेहमी सारखी दिसत नाहीस. बाबांची आठवण येतेय का?" माझं हे वाक्य ऐकलं आणि ती अक्षरशः ढसाढसा रडू लागली. तिचं ते रडणं पाहून माझेही डोळे टचकन भरले. वर्गात तिच्या माझ्याखेरीज दुसरं कुणीच नव्हतं. मी जवळ घेऊन तिला थोपटू लागले. तशी ती अगदी घट्ट बिलगून स्फुंदू लागली. आईच्या कुशीत लेकरू शिरतं तशीच ती बिलगून होती. थोड्यावेळाने शांत होत म्हणाली, "बाई, I am sorry. मी खोटं बोलले तुमच्याशी. पण खरं बोलण्याचं धाडस होत नव्हतं आणि खोटं बोलल्याची गोष्ट मनाला लागून राहिली होती. कधीतरी तुम्हाला खरं सांगायचंच होतं. काल मी बाबांना खूप बोलले म्हणून मला खूप वाईट वाटतंय."

काय घडलंय याचा अजूनही मला उलगडा होत नव्हता. माझ्या चेहऱ्यावरची साशंकता पाहून तीच म्हणाली, "बाई, मी खोटं सांगितलं की माझे बाबा गावी असतात, गावी दुकान चालवतात. गावी घर आहे पण ते दुकान वगैरे नाही चालवत." "मग?" "ते मांगतात, आणि मला आवडत नाही ते. माझे वडील मांगत राहतात काय पण पैशे वगैरे" बोलताना तिचा स्वर कापत होता. "मांगत राहतात?" मला तरीही खरंच कळत नव्हतं. "हो बाई, माझे वडील एक़ा सिग्नलला 'भीक मागतात" असं म्हणताना तिचा बांध पुन्हा फुटला. माझ्यासाठीही तो धक्काच होता. काय बोलावं तेच मला सुचत नव्हतं. गळ्यात आवंढा दाटून आला होता. न राहवून मी तिला म्हटलं, "का? कां अशी वेळ आली त्यांच्यावर? आणि तू हे होऊच कसं दिलं?"

"मलाही बरीच वर्ष माहीत नव्हतं. मी दहावी पास झाले तेव्हा दोन दिवस  आमच्या त्या झोपडीत राहायला गेले तेव्हा त्यांनी सांगितलं की मुंबईत त्यांना कुणी कामच देत

नव्हतं. अनेक कुष्ठरोगी भीक मागतात ते पाहून त्यांनीही भीक मागायचं ठरवलं. पण हे पाहून आईला आणखीच धक्का बसला. आपल्या सोन्यासारख्या देखण्या मुलीलाही आपला नवरा भीकेला लावेल असं वाटून ती आतल्या आत कुढत गेली. त्यातच ती गेली. पण आई मरताना बाबांनी आईला वचन दिलं होतं, की काहीही झालं तरी लेकीला शिकवणार, तिला टिचर बनवणार. म्हणून मला बाबांनी इकडे आणून ठेवली. तेच मला वरचेवर भेटायला येतात. मी त्या झोपडीत यायचं नाही असं सांगून ठेवलंय त्यांनी. परवा ते मला भेटायला आले होते तेव्हा मी खूप समजावलं त्यांना की हे काम आता सोडून द्या. मी शिकून नोकरी करीन, मग आपण दोघंही आपल्या घरी आनंदात राहू, पण बाबांना आता 'मांगायची सवय झालीय. माझ्या लग्नासाठी बँकेत त्यांनी खूप पैसा जमवलाय. "तुला नोकरी लागली की मी हे काम सोडेन असं म्हणतात." तिची हकिकत ऐकून मी सुन्न झाले होते.

न राहवून तिला विचारलं, "त्यांच्या ट्रीटमेंटचं काय?" "ती केव्हाच संपली. त्यांचा कुष्ठरोगही पूर्ण बरा झालाय. पण लोकांना खरं वाटत नाही. शिवाय त्यांची साठी उलटून गेलीय. आता कुठे नोकरीही मिळणार नाही आणि 'मांगायची सवय पण झालीय ना! बाई, मला त्यांना खूप सुखी ठेवायचंय, आनंदी बघायचंय, पण ते आपला हट्ट सोडत नाहीयेत. तू शिक्षिका हो मग मी हे काम सोडेन, असं म्हणतात. त्यांच्या इच्छेसाठी मला शिक्षिका व्हायचंय. मी खूप अभ्यास करीन."तिच्या आत्मविश्वासपूर्वक बोलण्याचं मला खूप कौतुक वाटलं.

खरोखरच त्यावर्षी ती खूप अभ्यास करून बी.ए.ला विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली आणि हा हा म्हणता दोन वर्षात कठोर मेहनत घेऊन बी.एड. ही झाली. तिचा हसरा, आनंदी स्वभाव आणि विनम्रता पाहन केवळ तिच्यासाठी चर्चने नियम शिथिल केले होते. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर बोर्डिंगमध्ये मुलींना ठेवत नसत. पण वयाच्या पाचव्या वर्षापासूनच ती तिथे राहिल्यामुळे सगळ्या सिस्टर्सना ती आपली मुलगीच वाटत होती. चर्चच्या सगळ्या कार्यक्रमांमध्ये, उपक्रमांमध्ये ती हिरीरीने, आनंदाने सहभागी होत होती. मार्था सिस्टरने तर तिला आपली मुलगीच मानलं होतं. त्यामुळे नोकरी लागेपर्यंत तरी ती आता निश्चिंत होती.

"बाई, नक्की येते पुढच्या आठवड्यात, ठेवू फोन?" तिच्या या वाक्याने मी भानावर आले. फोनवरचं तिचं झऱ्यासारखं झुळुझुळु हसणं मनाला सुखावून गेलं.

लक्ष्मी शिक्षिका झाली, एका कॉन्वेंट शाळेत नोकरीला लागली, रितसर, नियमानुसार कायमस्वरूपी नोकरी करू लागली. विद्यार्थ्यांची लाडकी झालीच पण चर्चच्या निराधार मुलांसाठीही ती काम करू लागली. वडील सोलापुरातच होते. दिवाळी, नाताळ, मे महिन्याच्या सुट्टीत वडिलांसोबत राहात होती. आता वडिलांना लेकीच्या लग्नाची काळजी होती. त्यांनी तिच्यासाठी गावातलाच पण छान सुशिक्षित मुलगा शोधून ठेवला होता. त्याचा स्वत:चा बिझनेस होता. मोठं घर होतं. त्याच्या आईवडिलांशी बोलणं करूनही ठेवलं होतं. वडिलांनी लक्ष्मीच्या नावावर बँकेत पैसे ठेवले होते, चार दागिनेही करून ठेवले होते. पण दुर्दैव मध्यंतरी कोरोना काळ आला, त्यातच लक्ष्मीचं पितृछत्र हरवलं.

वडिलांचे दिवसकार्य करायला लक्ष्मी गेली, पण तिच्या नातेवाईकांनी तिची समजूत घालून तिचं लग्न लावून दिलं. हा निर्णय अगदी योग्य होता. वडिलांच्या मृत्यूच्या धक्क्यातून सावरायला तिला आधार हवा होताच. तो तिच्या नवऱ्याच्या रूपात मिळाला. सासूच्या रूपात आई मिळाली. सासऱ्यांच्या नावलौकिकामुळे  आणि लक्ष्मीच्या हसमुख व्यक्तिमत्वामुळे तिला सोलापुरातल्या शाळेतच नवी नोकरी मिळाली. अर्थात हे सगळं इतकं झटपट नाही झालं. काही महिने जावे लागले. लग्न झाल्यावर ती आपल्या नवऱ्याला घेऊन चर्चच्या तिच्या गोतावळ्याला भेटायला आली होती, तेव्हा मलाही भेटून गेली. मीही लेक सासरला जाताना माहेराहून जसा निरोप दिला जातो तसा दिला. खूप भरून येत होतं... आईविना वाढलेल्या पोरीने बापाचं स्वप्न, त्याच्या इच्छा पूर्ण करत आपलं जीवनाचं सार्थक केलं होतं. तिला कुशीत घेत, तिला निरोप देताना माझं मन आनंदाने भरून गेलं होतं...

डॉ. नेहा किशोर सावंत

nehasawant603@gmail.com

# मनोरमा मेधावी – समीक्षा

■ निशा सातपुते, मुंबई

'मनोरमा मेधावी' ह्या पुस्तकाच्या लेखिका "डॉ. अनुपमा निरंजन उजगरे" ह्यांनी लेखिकेच्या मनोगतात हे स्पष्ट केले आहे की कर्तुत्ववान समाजकार्य करणाऱ्या पंडिता रमाबाई ह्यांचे आयुष्य म्हणजे एक अद्भुत कांदबरी आहे असे अत्रेंना वाटले तर पहिले चरित्र प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी पंडिता रमाबाईचे चरित्र लिहिले अशा थोर मातेच्या उदरी जन्मलेल्या मनोरमाची मात्र आपल्याला माहिती फारशी नाही. त्या मनोरमा ताईचा ही परिचय आपल्याला व्हावा ह्या लेखनाचा संकल्प लेखिकेने केला. मनोरमाची कहाणी सांगताना रमाबाईविषयी ही सांगावे लागेल म्हणून रमा - मनोरमा ह्या मायलेकींनी जे कार्य त्याकाळी स्त्री नायिकांसाठी केले आपले जीवन समर्पित केले. स्त्रियांना सुशिक्षित, सुसंस्कारीत व स्वावलंबी केले, त्याची संक्षिप्त महिती या चरित्रात आहे. योग्य मोजकीच पण महत्वाची छायाचित्रे व डॉ सिसिलिया कार्व्हालो यांचा समर्पक अभिप्राय यांनी ते पुस्तक नटलेले असल्यामुळे वाचकांना आनंद देऊन जाते. शिवाय लेखिकेच्या समर्पक सुयोग्य मांडणी, तेजस्वी भाषा, भाषेची  योग्य रचना मांडणी, ओघवती लेखनशैली यामुळे वाचकांच्या मनावर योग्य प्रभाव या पुस्तकाचा पडतो. वाचकांपर्यत अज्ञान व अमूल्य कार्य पोहचविण्याचा संकल्प यशस्वी होतो.

मनोरमाचे कार्य समजण्यासाठी रमाबाईच्या भूतकाळाचा परामर्श थोडकयात घेणे गरजेचे आहे. म्हणून थोडक्यात पण महत्वाचे. मनोरमाच्या आजोबांचे म्हणजे पंडिता रमाबाईच्या वडिलाचे नाव अनंतशास्त्री व आई लक्ष्मीबाई यांच्या पोटी २३ एप्रिल १८५८ रोजी रमाबाईचा जन्म झाला. अनंतशास्त्री विद्वान शास्त्री होते त्यांना तिच्या पत्रिकेवरून ह्या मुलीमध्ये बुध्दीचे तेज व आपल्या कर्तुत्वाने जगाला टिपवून टाकण्याचे सामर्थ्य आहे पण पराकोटीच्या दु:खाचा तिला सामना करावा लागेल हे समजले म्हणून सर्व प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी तिची बुध्दी धारदार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी आपल्या पत्नीला व मुलीला संस्कृत शिकविले.

त्या काळात स्त्रियांना संस्कृत शिक्षण घेण्यास मनाई होती तेव्हा त्यांनी धाडस केल्यामुळे 'धर्माज्ञा मोडली' म्हणून त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात आला. त्यांना बऱ्याच

त्रासातून जावे लागले. पण कर्नाटकात त्यांनी पुराणे, महाभारत, रामायण या ग्रंथातून स्त्रियांनी संस्कृत शिकण्यात कोणतेही पाप नाही हे त्यांनी सप्रमाण पटवून दिले. काही आर्थिक अडचणीमुळे त्यांनी गंगामुळ सोडून तीर्थाटनाला जायचे ठरविले. तेव्हा रमा ६ महिनांची होती. तिला टोपलीत ठेवून त्यांचा प्रवास सुरू झाला. तेव्हापासून ते वयाच्या २०च्या वर्षापर्यंत कलकत्ता गाठेपर्यंत रमाबाईंची भटकंती चालू होती. वयाच्या ४थ्या वर्षापासून तिच्या आईने सुरुवात केली. वयाच्या ८व्या वर्षी 'पायोनियर' या परदेशीय वर्तमानपत्रात रमाबाईंना प्रसिद्धी मिळाली. १८७४-७५ या वर्षात आईवडील व बहीण कृष्णा या तिघांचा मृत्यू झाला. श्रीनिवास व रमा एकमेकांच्या आधारे जगू लागली.

भाऊ श्रीनिवास मिळेल ते काम करत असे. अत्यंत हलाखीचे जीवन जगताना सुद्धा त्यांनी कोणापुढे हात पसरला नाही. कपडे नाही, अन्न नाही. पण क्रूर जगाला त्यांचीदया आली नाही. देवदर्शन, फसवणूक, धर्ममातंडाकडून होणारा छळ यामुळ आपल्या धर्माच्या बाबतीत त्यांचा विरस झाला. झेलम नदीच्या काठी मुक्काम करताना थंडीपासून बचाव व्हावा म्हणून दोघेही स्वत:ला वाळूच्या खड्ड्यात गळ्यापर्यंत पुरून घेत. त्या थंडीचा परिणाम म्हणून रमाबाईच्या एका कानाला बहिरेपणा आला. ह्याच बहिरेपणामुळे परदेशात त्या वैद्यकीय शिक्षण घेऊ शकल्या नाहीत. ४००० मैलांची पायपिट करून दोघांनी कलकत्ता गाठले. इथे त्या भावंडांच्या विद्वतेची कदर करण्यात आली. कलकत्त्यात सिनेत हॉल मध्ये विदुषी म्हणून रमाबाईंचा सत्कार करण्यात आला व त्यांना 'पंडिता' व सरस्वती' या पदव्या प्रदान करण्यात आल्या. तेव्हापासून आजपर्यंत त्या पंडिता रमाबाई या नावाने ओळखल्या जातात.

ब्राम्हण विद्वान ठाकुर यांच्या विवाहाच्या मागणीला त्यांनी मान्यता दिली नाही. आपल्या भावाची हलाखीच्या परिस्थितीमुळे ढासळलेली तब्बेत यामुळे आपल्या लग्नाचा बेट रहित केला. बिपिन बिहारी यांचा लग्नाचा प्रस्ताव भावाची समंती असेल तर असे उत्तर दिले. दुर्दैवाने १८८० मध्य श्रीनिवासचे अकाली निधन झाले. त्यामुळे त्या एकट्याच राहिल्या एकट्या तरुण स्त्रीला राहणे कठीण म्हणू त्यांनी बिपिन बिहारी यांचा प्रस्ताव मान्य केला. बिपिन बिहारी निम्न जातीतले. रमाबाई ब्राम्हण. ब्राम्हण स्त्रीने इतर कुळातील पुरुषाशी लग्न करू नये असे संगितले जात. त्या समाजाविरुद्ध, धर्माविरुद्ध जाऊन बंड पुकारून त्यांनी विवाह केला. त्यांचा विवाह १३ जून १८८० रोजी बंकापुर कोर्टात झाला. कारण दोघेही धर्म मानत नव्हते. दोघेही सुसंस्कृत, सुविद्य व विद्वान होते. बिपिन बिहारी हे मेधावी कुळातले. विवाह प्रसंगी रमाबाई २२ वर्षाच्या होत्या. दोघांचाही संसार सुखाने चालू होता. कारण त्याकाळी स्त्रियांना दुय्यम स्थान देण्याची मानसिकता असलेल्या

समाजामध्ये बिपिन बिहारी अपवाद होते. रमाबाई त्यांना बी. बी. असे म्हणत. बिपिन बिहारींच्या ग्रंथसंग्रहात ‘नवा करार’ त्यांच्या वाचनात आला. ख्रिस्ती धर्माविषयी जाणून घेण्याची इच्छा असल्यामुळे बिपिन बाबूंनी आपला मित्र ॲलन ह्याला घरी बोलावले. परंतु ॲलनने दिलेल्या महितीमुळे रमाबाईचा कल ख्रिस्ती धर्माकडे झुकून आहे हे पाहून त्यांनी मित्राची शिकवणी ताबडतोब बंद केली.

ईस्टरच्या आदल्या रात्री १६ एप्रिल १८९१ रमाबाईंनी कन्येला, मनोरमाला जन्मदिला. स्त्री-पुरुष भेद, मुलगी परक्याचं धन अशा काळात पित्याला कन्यारत्न झाले याचा आनंद झाला होता. मनाला आनंद देणारी म्हणून तिचे मनोरमा असे ठेवण्यात आले. वडिलांनी तीच्या नावाची नोंद आपल्या दरीत करून ठेवली होती ती मनोरमाने आयुष्यभर जपली. पण त्यांच्या सुखाला ग्रहण लागले. एन्फ्लुएंझा आला, लहान मनोरमा कडे पाहणारे कुणीच नव्हते. बिपिन बाबू कोर्टकचेरीच्या कामात. तरी जसे जमेल तसे घरी लक्ष देणारे. पण आई उचलून घेत नाही, पोट भरत नाही म्हणून मनोरमा चिडचिड करत रडत होती. शिवाय बिपिन बाबूंनाही खाण्याचे हाल होत. त्यांना भूक आवरत नसे. भूकेपोटी त्यांनी एकदा सगळे फूटाणे खाल्ले म्हणून त्यांचे पोट प्रचंड दुखू लागले. उलट्याही होऊ लागल्या. आजारी रमाबाई अंथरुणाला खिळून होत्या. रात्र कशी बशी पार पडली. डॉक्टरांनी बिपिन बाबूना एशियाटिक कॉलरा झाला असे निदान केले. त्या दुखण्यातच ४ फेब्रुवारी १८८२ रोजी वयाच्या २४ व्या वर्षी बिपिन बाबू मरण पावले. दहा महिन्याच्या मनोरमेला पोरके करून रमाबाईना दोन वर्षात विधवा करून गेले. रमाबाईच्या नशिबात संसार सूख नव्हतेच.

महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी रमाबाईना स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी महाराष्ट्रात बोलावले. १८८२ मार्च मध्ये रमाबाई सिलचर सोडून महाराष्ट्रात आल्या. मनोरमाबाईंचाही प्रवास सुरू झाला. त्या पूणे येथे आल्या. भारतीय स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्यासाठी स्त्री डॉक्टर होण्यासाठी लंडनमध्ये परिक्षा देण्यासाठी व पदवी मिळविण्यासाठी मनोरमा व आनंदीबाई भगत यांच्या समवेत होत्या. रमाबाई जेव्हा परदेश प्रवासाला निघाल्या तेव्हा तिचे वय अवघे २ वर्षाचे होते. परदेश प्रवास करणारी ती पहिली भारतीय बालिका असेल. १७ मे १८८३ रोजी ते सर्व इंग्लडला पोहचले. तेथे त्या वॉल्टेज गावातोल सेंट मेरी वर्जिन होम या मठात ॲग्लिकन सिस्टर जेरल्डिन व मिस फुलर यांच्या बरोबर राहताना त्या दोघींचा तिचा खुप लळा लागला. जेरल्डिन तिची आजी झाली व शेवट पर्यत त्यांनी हे नाते निभावले. पुण्यात राहताना फादर गोरेनी रमाबाईच्या शंकाचे निरसन केलेच होते. शिवाय सिस्टर जेरल्डिन यांच्या मार्गदर्शनाखाली रमाबाईनी खिस्ती

धर्माचा अभ्यास केला. स्वधर्मीयांकडून आई वडिलांच्या मृत्यु प्रसंगी मिळालेली लाजिरवाणी व निष्ठूर वागणक यामुळे हिंदू धर्मावरील त्यांचा विश्वास उड़ाला होता. याच परिस्थीतीने त्याच्या एका कानाला बहिरेपणा आल्यामूळे त्या वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर होऊ शकल्या नाहीट. १९ सप्टेंबर १९८३ रोजी रमाबाई व मनोरमा यांचा बाप्तिस्मा झाला.

मनोरमानेही कायम मनो हेच नाव वापरले. सिस्टर जेरल्डिन यांनी त्यांना प्रभूची प्रार्थना, १० आज्ञा, स्तोत्रे, येशूची शिकवण, प्रार्थना करणे. बायबल वाचणे, संडेस्कूलला जाणे शिकवले. व मनोरमाबाई ते आवडीने करत. सर्व लाड करतात म्हणून आपली मुलगी वाया जाणार नाही याकडे आई रमाबाईचे लक्ष होते. चांगले वळण शिस्त अशी तिची ओळख व्हावी म्हणून त्या तिला जाणिवपूर्वक घडवत होत्या. तेथे रमाबाई ‘चेल्टनहम लेडीज कॉलेज’मध्ये संस्कृत शिकवत होत्या व स्वत: इंग्रजी शिकत होत्या. आपल्याला मिळणाऱ्या मानधनातच त्या आपल्या सर्व खर्च भागवत होत्या. कारण त्याची साधी राहणी. भारतीय पोशाखातच त्या वावरत होत्या. दोन पांढरी पातळे कोपऱ्यापर्यत ब्लाऊज या साध्या राहणीमानाचा मनोरमावर प्रभाव पडला. तिने कधीच कुठल्याही महागडया गोष्टीसाठी हट्ट केला नाही. साधी राहणी व उच्च विचारसरणी हेच ध्येय ठेऊन त्या त्या आयुष्यभर चालत राहील्या. १८८६ मध्ये डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या पदवीदान समारंभास त्या इंग्लडहून अमेरीकेत गेल्या. भारतातील एक स्त्री पहिली डॉक्टर होते ह्याचा त्यांना सार्थ अभिमान होता. त्यावेळी मनोरमा ५ वर्षाच्या होत्या. पण मनोरमाचे मन अमेरीकेत लागेना. ओळखीचे कोणी नाही, लाड करणारे कुणी नाही म्हणून रमाबाईनी मनोरमाला एकटीला पाठवले.

मनोरमा परत आली. त्या सर्व संन्यासीना खुप आनंद झाला. कारण त्या आईप्रमाणे तिच्यावर प्रेम करत. व त्यांनी प्रेमाने तिचे संगोपनही केले. मनोरमासाठी सिस्टर व इतर मुलांना तिच्या बरोबर खेळायला बोलवत. समुद्रावर फिरायला मनोरंजन करायला नेत. त्यामूळे तिही इतरांबरोबर मिळून मिसळून वागे. मनोची वृत्ती आनंदीत होती. दुसऱ्याला आनंद देणे तिला आवडत असे. आजीबाईनी तिला आईचा विसर कधी पडू दिला नाही. दर आठवडयाला त्या तिच्याकडून आईसाठी पत्र लिहून घेत. खोटे बोलू नये असे तिला शिकवले होते. तिच्या खोटया बोलण्याने आजीला दुख झाले हे पाहुन तिला खूप वाईट वाटले. ती मनाने खूपच हळवी होती. आपल्या बाहूल्यांना सुध्दा ती खोटे बोलू नये अशी शिकवण देत असते.

भारतात आल्यावर मनोरमाची काळजी घेण्याचे काम त्यांनी आपली आवडती विद्यार्थिनी शारदा सदन मधील गोदू हिच्यावर सोपविली. त्य कामाच्या बदल्यात तिच्या वडिलांचा वार्षिक ५० रू. मोबदला दिला. गोदू व मनोची छान मैत्री जुळली. आपल्या आईचा अधिक सहवास मनोला लाभला नाही. मनोला चांगले शिक्षण लाभावे म्हणून शारदा सदनच्या बाजूला असलेल्या शाळेत घातले. येथे मनोला एलिझाबेथ सोर्बन कोर्निलिस नावाची मैत्रिण मिळाली. या शाळेत पालक मुलांना महिन्यातून एकदाच भेटू शकत. मनो बरोबर रमाबाई सगळया मुलींसाठी खाऊ आणत. इंग्लडमध्ये झालेले शिक्षण आणि भारतातील शिक्षण यामध्ये बराच मोठा फरक तिला जाणवला म्हणून ती पुन्हा इंग्लडला शिक्षणासाठी गेली. मनोरमाचे वास्तव्य व शिक्षण बालपणापासून इंग्लड अमेरीकेत अधिक आहे. म्हणून तिच्या शिक्षणाचा पाया परदेशातच भरून झाला. त्या फ्रेंच व इंग्रजी उत्तम बोलू शकत होत्या. दूर असूनही दोघीच्या नात्यात कधी अंतर पडले नाही. म्हणून जगातील सर्वात प्रिय व्यक्ति तिच्यासाठी आईच होती.

मनो जेव्हा परत आली तेव्हा तिला मराठी भाषा चांगली अवगत व्हावी म्हणून बळवंत कुलकर्णी या खिस्ती शिक्षकाची नेमणूक केली. रमाबाईनी मनोला नाजूकपणे वाढवले नाही ती मनाने खंबीर आणि कणखर व्हावी याची त्यांनी काळजी घेतली. शारदा सदन संस्थेसाठी अमेरीकेतून फंड त्या गोळा करत. तर भारतातील स्त्रियांना विधवांना सुशिक्षण मिळावे त्यांनी आपले आयुष्य परोपकार व लोकोपयोगी कामे करावीत. येथे कुठलेही धार्मिक शिक्षण दिले जात नव्हते. कुठलेही धर्मकृत्ये येथे केले जाणार नाही हे त्यांनी स्पष्ट केले. संस्थेचा पैसा फक्त संस्थेसाठी शिक्षणकार्यासाठी खर्च होईल याची दक्षता घेतली. मनोरमा १८ वर्षाची होईपर्यत तिच्या शिक्षणासाठीचा खर्च करण्यास एका स्त्रीने रमाबाईना विनंती केली. तो त्यांनी मान्य केली. मनोरमा हुशार तिच्या कडून रमाबाईना अपेक्षा होती म्हणून रमाबाई मॅट्रिक झाल्यावर तिला पुढचे शिक्षण घेण्यासाठी तिला अमेरीकेत पाठवले. अमेरिकेत मनो शिक्षण घेत असताना पंडिता रमाबाईनी आजारपणामूळे तिला पुण्यात बोलावून घेतले. तेव्हा शारदा सदन पुण्यात होते. शारदा सदनची जबाबदारी मनोवर सोपवली. तेव्हा त्या फक्त १९ वर्षाची होती. पुढे शारदा सदनची मुख्यध्यापिका म्हणन मनोरमाचे प्रशासनीय कामगिरी केली. पुढे स्थलांतर केल्यानंतर ही शिक्षणसंस्था चालविण्यासाठी आपले बीए पर्यतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.

खेडेगाव ते पुणे प्रवासासाठी मनोरमा घोडेस्वारी करीत पण रोज हे शक्य नसल्यामूळे त्य स्वःताच्या गाडीतून प्रवास करू लागल्या. याचवेळी मनोरमाने टिचर

ट्रेनिगचाही कोर्स पूर्ण केला. प्रकृतीच्या कारणामूळे त्यांना M.A. चा अभ्यास पूर्ण करता आला नाही. आपल्या जवळच्यासाठी त्या मनोच होत्या. पण इतरांसाठी मनोरमा मुलांना मनोरमा आपली थोरली बहिण तार्ड वाटे. रमाबाई प्रमाणे मनोरमासुध्दा स्वतातली साधी साडी वापरत. परदेशातून आल्या तरी त्या साडीच वापरत. अत्यंत साधी राहणी हातात काचेची सुध्दा बागंडी नाही. आपल्या देशाविषयी अपार प्रेम आदर व अभिमान होता. तो लहान पणापासून शाहणी व समजदार मुलगी होती. वयाच्या मानाने अधिक समज भारतातील सगळया अंध अपंग विधवा परिस्थितीच्या गरीब अशा स्त्रियांना त्यांनी बहिणच मानले. तळमळीने कार्य करणा-या सामाजिक कार्यकर्त्या होत्या त्यामूळे सामाजिक शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रात २१ वर्ष त्यांनी कार्य केले. मुक्तीच्या मुली इंग्लड अमेरिका ऑस्ट्रेलिया अशा देशात जाऊन विशेष शिक्षण घेत. ५ छापखाण्याचे काम जेऊबाई करत. स्त्रियांना वाव मिळाला तर तो काम करू शकेल. हे रमाबाई व मनोरमा यांनी दाखवून दिले. मुक्तीचे कुंपन सुशोभित करणे बिया पेरणे रोपटे लावणे त्यांना पाणी घालणे देखभाल करणे यासाठी मनोरमा लहानांना प्रोत्साहन देत असत.

मनोरमाचे व्यक्तीमत्व साधे पण आकर्षक होते. वडिलाप्रमाणे सावळा रंग त्यांना मिळाला होता. अंगपीडानेही त्या नाजुक नव्हत्या. उंच धिप्पाट थोडे दौलत चालणे, कुरळे केस, संस्थेत त्याचा दराराही होता. बालवयापासून प्रवासाला सुरूवात झाली. शिक्षणाच्या निमित्ताने प्रार्थना मंडळ स्थापण करणे ब्रेल लिपीचे शिक्षण कधी देणग्या गोळा करण्याच्या निमित्ताने देशा परदेशात त्यांना प्रवास करावा लागे. बुध्दी संपन्न असूनही त्या विनम्र होत्य इथल्य विधवांसाठी त्यांनी तळमळीने कार्य केले. केडगावला शैक्षणिक विभाग पत्रव्यवहार हिशोबाचे खाते रमाबार्डने मनोरमावर सोपविले. विधवांची मैत्रिण पंडिता रमाबाई, त्या स्वःताही विधवांची मैत्रीण झाल्या. मुक्तीचा कारभार गुलबर्गा इथली शाळा ह्यात त्या जीव ओतून काम करत होत्या.

त्यांचे प्रकृतीकडे दुर्लक्ष झाले. त्या आजारी पडू लागल्या. वेळ कमी उरला आहे. तो अत्यंत मोलाचा आहे. प्रभुसाठी कार्य करायचे आहे. असे त्यांनी लिहिले. आपले आयुष्य संपत आल्याची जाणीव त्यांना झाली असावी. ‘प्रेअर बेल’ हे अर्थपूर्ण नाव देऊन मासिक काढण्याची कल्पना त्यांचीच. त्यामध्ये संजीवनीसाठी प्रार्थना करण्याची विनंती त्यांनी केली. जानेवारीपासून जून १९५० पर्यंत प्रार्थना चालू होत्या व त्यावेळेस पहाटे ३.३० वाजता पवित्र आत्मा तेथे अवतरला, याची जाणीव झाली. १९०५ मध्ये संजीवनास देवाला बोलवण्याने शुभवृतप्रसार कामातही मनोरमा ताईंनी पुढाकार घेतला. २९ व ३० जून १९०६ ह्या दिवशी पवित्र आत्मा मुक्तीमध्ये उतरला. स्त्रिया अन्य भाषेत बोलू लागल्या.

त्याचा परिणाम सर्व उत्कटतेने भक्ती करू लागले. सकाळी मुक्तीच्या देवालयात मनोरमाताई पियानो वाजवत असत. शारदा सदनची धुरा समर्थपणे पेलताना विधवा पीडितांचा शोध घेणे, त्यांची व्यवस्था लावणे तसेच खेड्यापाड्यातील मुलींना शिक्षण मिळावे म्हणून शाळा सुरू केल्या. कामाची व्यग्रता, मुलींसाथी केलेले उपवास यामुळे त्यांची प्रकृती अशक्त झाली.आईसाठी अत्यंत निष्ठेने, शुद्ध आचरणाने आपले जीवित कार्य करून तिला समाधान देऊन गेल्या. ज्या पियानोवर त्या गाणी वाजवत तो आजही मुक्तीच्या चर्चमध्ये वाजवला जातो. परदेशात वाढून सुद्धा आपल्या देशातल्या गोरगरीब, पीडितांविषयी व देशाविषयी आपलेपणा होता.

हात्याच्या बोटावर मोजण्या इतक्या त्यांच्या मैत्रिणी होत्या. १) गोदू जोशी, २) मिसेस पॉल, ३) नर्मदा देशपांडे, ४) मिस मिनी अब्राम्स, ५) मिस एडमंड, ६) कृष्णाबाई गद्रे. त्यांच्या आयुष्य आलेल्या स्त्रिया. – सि. जेरल्डिन (आजी), २) मिसेस शेवंतीबाई, ३) मिसेस निकम्ते, ४) सुंदराबाई पवार ५) मिसेस बोकर. आपल्या मुलीचे फार कौतुक कधी त्यांनी केले नाही. त्याचप्रमाणे काही पुरुष सहकारी व समकालिक सामाजिक कार्यकर्त्या त्यांच्या जीवनात येऊन गेल्या.

दीपशिखा मालवली. :- मनोरमा ताईंची प्रकृती ढासळत होती. प्रथम थकवा, मग श्वासाचा, दम्याचा त्रास सुरू झाला, संधिवाताचा त्रास, हिवताप भरला. अशक्तपणा खूप वाढला. शेवटी डॉक्टरांनी विश्रांती घेण्याचे सुचविले म्हणू त्या हवापालटासाठी कोडाईकनाल येथे पॉल अप्पास्वामीकडे गेल्या. तेथे त्या आपण आजारी आहोत हे विसरून गेल्या. पायी चालून निसर्गाचा आनंद लुटला. पण अतिश्रमाने त्यांना दम लागू लागला म्हणून डॉक्टरांनी हृदयविकाराचे निदान केले.म्हणून त्यांना मिरजेच्या वानलेस मिशनरी हॉस्पिटलमध्ये हलविले. मिरजेत त्यांना जरा बारे वाटू लागल्याबरोबर त्या केडगावास येऊन पुन्हा कामास लागल्या. आपल्या वेदना, त्रास कधी कोणालाच जाणवू दिला नाही. हसत खेळत राहून. पण शेवटी त्यांना फारच त्रास होऊ लागला. म्हणून परत मिरजेला हलविण्याचे ठरविले.

त्या मिरजेस जाण्यास निघाल्या तेव्हा आईच्या रमाबाईच्या खोलीत गेल्या. त्यांनी गुडघे टेकून लेकीसाठी प्रार्थना केली. पण शेवटी म्हणाल्या, “हे प्रभू, तुझी इच्छा. तुला हवे ते कर.” मुक्तीच्या मुलींचा शेवटचा निरोप घेऊन त्या निघाल्या. पुणे स्टेशनवर त्यांना भेटण्यास, निरोप देण्यास पुष्कळ मंडळी आली. ते पाहून तिला बरे वाटले. त्यांनी 91 स्तोत्र वाचले. ‘तू माझा आश्रय, तू माझा मार्ग, तू माझा देव, मी तुजवर भाव ठेवितो.

मनोरमा ताईसाठी स्टेशनवर त्यांनी एकत्र प्रार्थना केली. म्हणून त्यांना दिलासा मिळाला. हॉस्पिटलमध्ये आपल्यासमोर मृत्यू उभा आहे हे त्यांना समजले. पण हातातली पुष्कळशी कामे पूर्ण झाली होती. बाकीची कृष्णाबाई आणि गोदूवर सोपवलेली होती. त्या वेळेस मनोरमा ताईंनी डॉक्टर व आपल्या सोबतच्या मंडळींना निक्षून बजावले. "माझे प्रेत केडगावला आईकडे नेऊ नये. आपल्या मृत्युचे तिला दु:ख होऊ नये, ती खचू नये हीच प्रार्थना त्यांनी देवाकडे केली. या धीरोदत्त स्वभावाला शतश: दंडवत.

डॉक्टरांनी तिचा डोळा लागू देवू नका असे निक्षून बजावले. म्हणून सोबतीच्या मुलींबरोबर त्या भक्तिगीते गात होत्या. क्षीण आवाज होत असताना मुलगी ताईंची आवडती भक्तिगीते गाऊ लागल्या. 'प्रिय प्रभूच्या हाती सूरक्षित मी, माझ्या जीवा विश्रांती होईल नेहमी' 'दिव्य तेज प्रकाशित स्थळ, अहा त्या सुस्थळी पार नाहीच हो विश्रामा, तेथे सुदिनी भेट होई प्रियांची आम्हा.' मनोरमा ताईंनी अखेरचे शब्द उच्चारले, "प्रभो बोलावत आहे, मी जाते. माझ्या आईला, मुलींना सांभाळा." स्त्री कल्याणाचे व्रत घेऊन अविरत कष्ट करत आपले आयुष्य व्यतीत करून अखेर ईहलोकीचा प्रवास त्यांनी संपवून प्रभूच्या विसाव्यात गेल्या. तो दिवस '२४ जुलै १९२१' त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचा दफनविधी मिरजेलाच करण्यात आला.

अशा ह्या मायलेकींचे कार्य ख्रिस्ती समाजामध्ये तरी परिचित असावे म्हणून लेखिकेने जिवापाड श्रम करून अनेक ठिकाणी जाऊन संशोधन करून 'मनोरमा मेधावी' हे पुस्तक लिहून या पुत्रीचे कार्य, महाराष्ट्राच्या लेकीचे कार्य आपणासमोर आणले. इतरांनी ते दुर्लक्षित केले तरी किमान आपण मराठी महाराष्ट्रीय ख्रिस्ती म्हणून याची दखल प्रत्येक वाचकांनी घ्यावीयासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. आपण ते पुस्तक वाचून किमान त्यांच्या अमूल्य कार्याची महती जाणून घ्यावी. आदर करावा. पुस्तक संग्रही अमूल्य ठेवा म्हणून करावा व त्याप्रमाणे आचरण करावे. हीच खरी मनोरमा ताईंना श्रद्धांजली.

# निराशा

■ पेट्रेशिया गोन्सालवीस,
बोरीवली पश्चिम

“हॅलो ममी, मी मॅसेज केला आहे सकाळी तुम्हांला, तुम्ही वाचला नाही म्हणून मग मी फोन केला.” “बोल ना काय सांगतेस? “

“माझी टेस्ट पॉझीटीव्ह आली आहे.”

“बापरे ! आता… १४ दिवस क्वॅारांन्टाईन राहावे लागेल. अरेरे, हा कोरोना कधी सोडणार आपल्याला.”

“मम्मी, ऐका नीट पुढचं. कोरोनाची नाही. मी सकाळी प्रेगन्सी टेस्ट केली ती पॉझीटीव्ह आली आहे. तुम्ही आजी होणार…”

“खरंचsss wow… what a lovely news.” तिला विश्वास बसला नाही कारण मागे हटकले तेव्हा सून म्हणाली की आम्हाला अजून वेळ हवा आहे. मग तीही गप्प बसली होती.

“आता सांभाळ हं, मेट्रो पकडताना घाई नको. एस्केलेटरवरून सावकाश… धावपळ नको… बरं खायला काय बनवू तुला…”

“मम्मी थांबा… मी घरी आल्यावर बोलू. ठेवते फोन…”

फोन बंद झाला होता तरी तीचा फोन कानाशीच आणि सल्ल्याची सरबत्ती चालूच होती. नंतर लक्षात आल्यावर फोन ठेवून ती घरातल्या जीजसच्या स्टॅच्यूजवळ गेली आणि आभाराची प्रार्थना केली आणि एक मागणेही मागितले देवा, एक गोंडस मुलगी माझ्या घरी येऊ दे रे. मला दोन मुलगेच. मुलीची मला भारी हौस.आता नातीच्या रूपाने भरून निघू दे रे.

सुनेचे कोडकौतुक करण्यात किती रमली ते सांगताच येत नाही. तिला गोडधोड, तिखट चटपटीत खाऊ घालणे, विश्रांती, ऑफीसला जाताना जास्तीचे डबे, डोहाळे पुरवण्यात इतकी रमली की घरात इतर सदस्य आहे याचे भानच नाही. विणकाम येत होते मग येणाऱ्या बाळासाठी मोजे टोपडी विणायला घेतली. लेक म्हणाला, “ममी, हल्ली बाजारात छान छान हवे तसे warm cloths मिळतात. तू कशाला मेहनत करतेस इतकी.”

"तुला नाही कळायचं.. स्वतः विणलेल्या स्वेटरचा आनंद काय असतो."

बेबीशॉवरचा कार्यक्रमही ऊत्साहाने पार पाडला. आजूबाजूच्या बायका नात्यातल्या बायांना बोलावून शिस्तबद्ध असा बेबीशॉवर कार्यक्रम केला. रिटर्नगीफ्ट सुद्धा थोडे हटकेच दिले. सगळ्या आलेल्या बायकांनी तोंडभरून कौतुक केले. आणि प्रथेप्रमाणे सुनेला पहिले बाळंतपण म्हणून माहेरी बोलावून नेले.

सुनेचे दिवस भरले आणि एके सकाळी तिच्या ममीचा फोन आला.. "तिला दुखतंय आम्ही हॉस्पीटलला नेतोय तुम्ही या. मुलांसोबत सगळे घरचे हॉस्पीटलला दाखल झाले. दुपारच्या सुमारास सुनेला लेबररूममध्ये घेतले. ३ वाजता बाळाच्या रडण्याचा आवाज आला तसे सगळेच आतुरतेने लेबररूमच्या बाहेर थांबलेले सगळेच पुढे धावले. डॉ.नी हातातले बाळ दाखवले... मुलगी झाली... कानात कोणीतरी सनई चौघडे वाजवत आहे असा भास सासूला झाला. तिने आनंदाने स्वतः भोवती एक गिरकी घेतली....म्हणाली तीस वर्षे तुझी वाट पाहात होते... मला नाही पण नातीच्या रूपाने तू आलीस माझ्या घरी... thank you Jesus... praise the lord... Thank you Mother Mary.

किती कौतुक... तिच्या नवरोबाने बाळाचा फोटो काढण्यासाठी सक्त विरोध केला पण तिने हळुच मोबाईलवर क्लीक केला आणि नवजात परीची छबी आपल्या मोबाईलमध्ये बंदिस्त केली. सगळ्यांचे अभिनंदनाचे फोन, मॅसेज.. कोडकौतुकाला ऊधान आलेले.. सहा महिन्यासाठी बाळ बाळंतीण तिच्या ममीच्या घरी त्यामुळे बहुदा रोजच सासूच्या फेऱ्या तिकडे होत असत. छकुलीने थोडंसं हसायला सुरूवात केली त्याचे हिला किती नवल. ६ महिने भुरकन कसे भरले कळालेच नाही. सासूने बाळाच्या संगोपनाचे नवनवीन विडीओ पाहून स्वतःला अगदी सज्ज ठेवले होते. अंगाईगीते पाठ केली.... बाळाचा आहार. तिच्याबरोबर बोबडे बोलणं, तिला न्हाऊ घालणे . बडबडगीतांची यादी रंगीबेरंगी झबली, छोटीची खोली सजवणे नानाविध खेळणी जमविणे अशी तयारी चालू होती. छकुली म्हणजे तिचे जग झाले होते.

आणि एके संध्याकाळी चहा घेत असताना मुलगा म्हणाला, "मम्मी, छोटी येत्या रविवारी आपल्या घरी येणार आहे". "अरे..बाळंतसण म्हणतात त्याला...थोडे पाहुणे येतील, जेवणाची तयारी...तिच्या मदरीन पदरीनला आमंत्रण"

"हो मम्मी करू आपण... पण एक महत्त्वाचे सांगायचे आहे... मागे बघ हिच्या सोनोग्राफीच्या दिवशी माझा एक interview होता, त्या कंपनीत माझे सिलेक्शन झाले आहे पण त्यांची एक अट आहे. मला हॅागकॅागला मुव्ह व्हावे लागेल. मी होकार दिला आहे कारण पॅकेज चांगले आहे." एका दमात तो बोलला.

“अरे, पण मग आपली छकुली..”

“मम्मी, आम्ही तिघेही मुव्ह होतोय.”

“काय sss.”

“हो मम्मी... म्हणून तर तिचा पासपोर्ट काढला एवढ्या घाईत...”

स्मशान शांतता....

“तुझे व्हिसाचे सोपस्कार झाले सुद्धा...”

“हो मम्मी ... पप्पाना माहीत आहे सगळं... तर असं आहे त्यामुळे छोटी आपल्या घरी महिनाभरच राहील. दोनेक महिन्यात आम्ही निघतोय.”

“कायsss...” तिच्या कानात कुणीतरी गरम शिसे ओतत आहे असं वाटले... हातातला अर्धवट प्यायलेला चहाचा कप खाली पडला..

“मम्मी तू इतकी का पॅनिक होतेस?? अगं परदेशात जाणे हे आता कॉमन झाले आहे...आणि मी काय दर वर्षी येईनच सुट्टीला... शिवाय फोनमुळे जग किती जवळ आले आहे. सकाळ संध्याकाळ फोन असेलच...”

“अरे पण... .मी किती स्वप्ने रंगवली आहेत...माझी परीबरोबर खेळण्याची, तिला स्ट्रोलरमधून गावभर फिरवणे, ती जरा मोठी झाली की गायन क्लासला, प्ले ग्रुपला घेऊन जाणार, डान्सला घालणार.. माझ्या साडीला मॅचिग तिचे फ्रॅाक असावेत म्हणून मी नवीन साड्यातले ब्लाऊजपीस तिचे फ्रॅाक शिवण्यासाठी ठेवले आहेत.” तिला पुढे बोलवेना...

तिच्या स्वप्नांचा चुराडा झाला होता. किती सहज बोलतो हा....जसं सांगतोय की मी जरा नाक्यावर जाऊन येतो. घोर निराशा झाली होती... डोळे डबडबलेले जीव घशात अडकला जणू.... तशीच उठली आणि जिझसच्या स्टॅच्यूजवळ गेली... त्याला विचारले हे तर तुझ्याकडे न मागता दिलेस का.... निराशा.. घोर निराशा.. ती रडरड रडली... आणि यंत्रवत बाळंतसणाच्या तयारीला लागली..

पेट्रेशिया गोन्सालवीस. बोरीवली पश्चिम
सेवानिवृत्त शिक्षिका (M.A., B. Ed.)
सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार
सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार.

# ख्रिस्ती साहित्याची नवी वाटचाल

■ **पौलस वाघमारे, अहमदनगर**

**अध्यक्ष, मराठी ख्रिस्ती साहित्य परिषद, महाराष्ट्र.**

ख्रिस्ती साहित्य परंपरा प्रामुख्याने फादर थॉमस स्टीफन्स यांच्या पासून सुरू झाली असे मानले जाते. ख्रिस्ती साहित्याची ही परंपरा आजतागायत सुरू आहे. सुरूवातीच्या काळात बायबल, आणि परदेशी मिशनऱ्यांनी लिहिलेल्या साहित्याचे भाषांतर इतकेच मर्यादित साहित्य लेखन होते. स्वयंप्रतिभेने लिहिलेल्या साहित्याचे प्रमाण अत्यंत अल्प होते. यात बायबलमधील गोष्टी आणि येशू ख्रिस्ताची शिकवण यावर आधारित हे साहित्य होते.

पुढे १८४२ मध्ये मराठी ख्रिस्ती साहित्यात क्रांती घडली. अमेरीकन मराठी मिशनने ज्ञानोदय ह्या मासिकाची सुरुवात केली. या मासिकातून ख्रिस्ती साहित्याला नवी दिशा मिळाली. नवनवीन लेखक तयार झाले. आपापले विचार मासिकातून मांडू लागले. अनेकांना यातून प्रेरणा मिळाली आणि लेखनाची ही परंपरा वाढत गेली. याआधी नारायण वामन टिळकांचे ख्रिस्तायन प्रसिद्ध झाले होते. बायबलमधील नव्या करारावर आधारित लिहिलेले ते एक खंडकाव्यच होते. नारायण वामन टिळक यांच्याकडून हे खंडकाव्य पूर्णत्वास गेले नाही तेव्हा पत्नी लक्ष्मीबाई टिळक व पुत्र देवदत्त यांनी ते पूर्णत्वास नेले. ख्रिस्तायनाचाही मराठी ख्रिस्ती साहित्यावर फार मोठा प्रभाव आहे.

ख्रिस्ती लेखकांसाठी ज्ञानोदयाने दिलेल्या व्यासपीठामुळे ख्रिस्ती लेखकाची संख्या वाढली. लेखक सातत्याने लिखाण करू लागले. पर्यायाने लिखाणाचा दर्जा वाढला. भाषांतरीत किंवा धार्मिक लिखाण तसेच कथा, कविता, सामाजिक लेख असे बहूअंगी लेखन करू लागले. ज्ञानोदयामुळेही मराठी ख्रिस्ती साहित्यात खूप मोठी क्रांती घडली. ख्रिस्ती लेखकांबरोबरच ख्रिस्तेतर लेखकही ज्ञानोदयात लिहित असत.

१९२७ मध्ये एक उल्लेखनीय गोष्ट घडली. रेव्ह. निकल मॅक्नीकल यांच्या अध्यक्षतेखाली पहिले मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन नाशिक येथे संपन्न झाले. त्यानंतर अंतराअंतराने ख्रिस्ती साहित्य संमेलने भरत गेली. १९७१/७२ मध्ये काही ख्रिस्ती लेखक एकत्र भेटले आणि ख्रिस्ती साहित्य संमेलनाला पुनरुज्जीवित करण्याचे ठरले. तत्कालीन

सिद्धहस्त लेखक, साहित्यिक, किर्तनकार, आचार्य सत्यवान नामदेव सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात आठवे ख्रिस्ती साहित्य संमेलन भरविले गेले. या संमेलनात प्रोटेस्टंट व कॅथोलिक असे दोन्ही पंथातील लेखक साहित्यिक उपस्थित होते. पुण्यात पार पडलेल्या या साहित्य संमेलनामुळे मराठी ख्रिस्ती साहित्य चळवळीला खरी चालना मिळाली. आणि येथूनच सध्याच्या मराठी ख्रिस्ती साहित्यिकांना चालना मिळाली.

अनेक ख्रिस्ती लेखकानी ख्रिस्ती साहित्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न प्रामुख्याने मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी केला. अध्यक्षीय भाषणातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ख्रिस्ती साहित्याची व्याख्या असे. जे साहित्य देवाविषयी आणि मानवी अस्तित्वाबद्दलचे आहे याबद्दलची माहिती देण्याचे काम करते, ते ख्रिस्ती साहित्य असे ढोबळमानाने म्हणता येईल. परंतु यामुळे साहित्य लेखनाला खूपच मर्यादा आल्या. असे साहित्य निर्माण करणारे साहित्यिक आणि साहित्य मर्यादित राहिले.

काही ख्रिस्ती लेखक परिघाबाहेर जाऊन सामाजिक आशयाच्या कथा, कविता, लेख लिहू लागले. समाजातील विविध समस्या आणि प्रश्न आपल्या लिखाणातून मांडू लागले. समाजाचा इतिहास लोकांसमोर येऊ लागला. आणि ख्रिस्ती लेखकाची संख्या वाढू लागली. हळूहळू ख्रिस्ती साहित्याची व्याख्या बदलली जाऊ लागली. ख्रिस्ती लेखकाने निर्माण केलेले साहित्य म्हणजे ख्रिस्ती साहित्य असे मानले जाऊ लागल्याने नव्याने लिखाणात नाविण्य आले. नवोदित लेखक साहित्यिक निरनिराळ्या प्रकारचे साहित्य लिहू लागले. त्यात कथा, कादंबऱ्या, वाचावयास मिळू लागल्या. ख्रिस्ती लेखकांच्या साहित्याला वाइमय पुरस्कार मिळू लागले. ते ख्रिस्त केंद्रित साहित्याला कधीच मिळाले नसते. ख्रिस्ती लेखक गुणात्मक दृष्टीने इतर प्रस्थापित साहित्यिकांशी बरोबरी साधू लागला.

आणि याचमुळे फादर फ्रान्सिस दिब्रिटो, निरंजन उजगरे, देवदत्त हुसळे, सिसिलिया कार्व्हालो अशा दिग्गज साहित्यिकांनी मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले. साहित्याची हीच री पुढे ओढत नवीन लेखक, आधुनिक मराठी ख्रिस्ती साहित्य वाचकांसमोर आणू लागले. त्या साहित्याचे स्वागतही होऊ लागले.

मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची अध्यक्षीय भाषणे वाचली तर त्यात ख्रिस्ती साहित्यिकांची नावे वाचावयास मिळतात. कादंबरी लिहिणारे लेखक, कथासंग्रह असलेले लेखक, कविता, ललित लेखन, प्रवास वर्णन, आत्मकथन असे वाडमय प्रकार हाताळणाऱ्या लेखकांची जंत्री वाचावयास मिळते. निरनिराळ्या अध्यक्षांची भाषणे

वाचली तरी नावांची जंत्री मात्र तीच. ख्रिस्ती साहित्य प्रवाहात नवीन लेखक साहित्यिक निर्माण झालेच नाहीत का? असा प्रश्न अभ्यासकांना पडू शकतो. हा गैरसमज दूर करण्यासाठी ख्रिस्ती साहित्याचा इतिहास नव्याने लिहिण्याची गरज निर्माण झाली आहे. डॉ गंगाधर मोरजे यांनी खूप कष्ट पूर्वक १९६० पर्यंतच्या ख्रिस्ती साहित्यिकांचा मागोवा घेतलेला आहे. त्यानंतरच्या काळात डॉ सुभाष पाटील यांनी ख्रिस्ती साहित्याचा इतिहास लिहिण्याचा उल्लेखनीय प्रयत्न केला आहे. ज्येष्ठ लेखक अनिल दहिवाडकर यांनी देशी आणि विदेशी ख्रिस्ती लेखकांची साहित्य संपदा यांची सुची करून मराठी ख्रिस्ती साहित्य दालनात खूप मोठी भर घालून ख्रिस्ती साहित्य अभ्यासकांना मोठा खजिना उपलब्ध करून दिला आहे.

'मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन' हा ख्रिस्ती साहित्य चळवळीचा एक महत्त्वाचा भाग आहे. अशा साहित्यिकांना एकत्र येण्याची संधी मिळते. १९७२ पासून अशी साहित्य संमेलने नियमित भरत आली आहेत. या संमेलनातून नवनवीन लेखक आणि त्यांचे नवनवीन साहित्य वाचकांसमोर येत आहे. ख्रिस्ती साहित्य चळवळीला नवीन झळाळी मिळू लागली आहे. काही ठिकाणी ख्रिस्ती साहित्यिकांचे निरनिराळे गट निर्माण झाले आहेत. त्यांनी त्या गटांना आपापली नावे देऊन वेगळ्या चुली मांडल्या आहेत. चुली वेगळ्या झाल्या तरी त्यातून साहित्य निर्मितीच होणार आहे आणि पर्यायाने ख्रिस्ती साहित्यात भरच पडणार आहे. या सकारात्मक भुमिकेतून आम्ही याकडे पाहतो.

ख्रिस्ती साहित्य चळवळीचे ध्येय आणि उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून काही साहित्यिकांनी नव्या दमाचे साहित्यिक निर्माण करण्याचा प्रयत्न केला. नव्या साहित्यिकांना लिहिण्यासाठी व्यासपीठ मिळवून दिले. लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिले. पुढील काळात ख्रिस्ती साहित्याचा इतिहास जेव्हा केव्हा लिहिला जाईल तेव्हा साहित्यिकांच्या नावाची जंत्री बदलली जाईल याचा आम्हाला विश्वास वाटतो.

# "मस्कीपुराण"

■ डॉ. रिबेका दोडती, निर्मळ

पावसाळ्यानंतर प्रचंड वाढलेली पिलावळ घेऊन मच्छराची झुंडच्या झुंड सायंकाळच्या संधीप्रकाशात चुकून उघड्या राहिलेल्या मेन डोरमधून घरात प्रवेशती झाली..

आल्या आल्या सोप्याच्या कोपऱ्यात, पडद्यांवर, कूशन्सच्या मागे अशा अडचणींच्या जागी यांची फौज दबा धरून बसली. जेवणाचे ताट घेऊन आम्ही अन्नावर तुटून पडताच ही फौज आमच्यावर तुटून पडली... जेवता जेवता आमच्या आऊट ऑफ रिच होईल अश्या जागांवर आपल्या स्ट्रॉस टोचून खुशाल पेयपान करीत बसली...

एक हात ताटाला पकडून दुसऱ्या हाताने खमंग माशाच्या तुकडा तोंडात टाकणार इतक्यात पाठीतून सुई भसकन खोल खुपसणाऱ्या मच्छराधमाला मागची कुशन आणि पाठीत मधोमध चेचावे म्हणून मी केलेले सगळे यत्न फोल ठरवून मोठ्या शिताफीने माझ्या पाठीवर तुरी देऊन त्या मच्छराने पलायन केले. परंतु रक्तमदिरेचे अति प्राशन झाल्याने तुडूंब भरलेल्या पोटाचा भार सहन न होऊन पुऱ्या दिवसाच्या गर्भार बाईसारखं ते मच्छर भुईवरून भेलकांडत चालू लागलं. आधीच मच्छर त्यात रक्त प्यालेल्या त्या दुष्ट जीवाचा चेंदामेंदा करावा म्हणून मुलांच्या मॅग्नेटिक टॉईझ मधली एक टाईल मी त्या मच्छरवर नेम धरून फेकली. धनुर्विद्याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले नसले तरी अचूक निशाणा साधण्याचे माझे कसब वाखाणण्याजोगे असल्याची कबूली माझ्या एका मावशीने आमच्या इन्गेजमेंट प्रोग्रामच्या दिवशी दिली होती. त्यावरून अचूक निशाणा साधण्यात अर्जूनानंतर मीच...

चेहऱ्यावर विजयश्री घेऊन मी ती टाईल उचलली. मच्छर धारातीर्थी पडले होते रक्ताच्या थारोळ्यात. थोड्या वेळाने मुंग्यांची एक फौज मार्च पास्ट करत अवतरली आणि त्यांनी त्या मच्छराला उचलून नेले. शासकीय इतमामात त्याचा अंत्यसंस्कार पार पडला असावा...

त्यानंतर घटनास्थळावरचे उरले सुरले पुरावे मोठ्या चलाखीने आणि मेहनतीने घासून पुसून नाहीसे करुन मी निश्चिंत होऊन झोपी गेले.

काही सेकंदाच्या अत्यंत क्षणिक पेयपान सुखासाठी आपल्या जीवाची बाजी लावणाऱ्या मच्छरांचं कौतुक करावं तितकं कमीच.

तसं पाहिलं तर मच्छरांशी मानवजातीचा 'खून का रिश्ता' आहे. पण आपण सगळे हात वाजवत आणि पुरळ खाजवत 'सात खून माफ' असल्यासारखे मच्छरांच्या पाठी लागलेलो असतो.

'10 मोस्ट डेंजरस जॉब्स इन द वर्ल्ड' अश्या यूट्यूबवर व्हिडिओ करणाऱ्या लोकांना मच्छरांच्या एवढ्या डेंजरस जॉबचा सपशेल विसर पडावा ही शोकांतिकाच नव्हे काय? अखिल मानवजातीने आजवर मच्छरांची कत्तल करून ह्या संगीतप्रिय किटकजमातीवर घोर अन्याय केला आहे.

ज्यांची कत्तल करणे जमले नाही अश्यांना पंगू करून त्यावर अनन्वित अत्याचार केले आहेत.

कुठे फेडेल मानवजात हे अघोरी पाप?

पण पुढेमागे काळ बदलूही शकतो..

कारण सध्याच्याच काळात माणसं अक्षरश: काहीहीबाही प्राणी 'पेट' म्हणून बाळगू लागली आहेत. त्यामुळे नजीकच्या भविष्यात अनादी काळापासून मानवाच्या घरांवर आणि कानांवर अधिराज्य गाजवणाऱ्या या किटकांना पाळीव प्राण्यांचा दर्जा मिळण्याची दाट शक्यता नाकारता येणार नाही.

अमेरिका युरोपात लोकं पायथन, इंग्वाना, हेजहॉग पाळत असताना, दुबई सौदीचे शेख चित्त्या वाघासारख्या हिंस्र श्वापदांना माणसाळत असताना 'मच्छरे जाहली उदंड' चा नारा घेत भारतीयांनी मस्किटोस् पाळणे हे वेगळेपण सिद्ध करणारे ठरेल.

तश्या मलेरिया, डेंग्यू, झिका, चिकणगुणिया या मच्छरांच्या नगण्य खोड्या त्यांना वेट कडून टाईम टू टाईम वॅक्सिनेशन देऊन सहज नियंत्रणात आणता येऊ शकतात.

कुत्र्या मांजरापेक्षा मच्छर पाळलेल्यांच्या घरी जाणं नक्कीच जास्त सेफ वाटेल की नाही?

मच्छरांच्या नशीबी कायम असलेली अवहेलना धूळीत मिसळून त्यांना ग्लॅमर प्राप्त होईल!

ह्या पेट प्रेमींचा काय भरवसा?

जागोजागी मच्छरांच्या पैदाईशीसाठी गटारांवर इनक्यूबेशन प्लांट उघडले जातील.

पोटापाण्यासाठी मानवी रक्ताच्या शोधात वणवण आणि घरघर गुणगुणणाऱ्या मच्छरांसाठी  अखिल भारतीय मच्छर संवर्धन संघटना उभारली जाईल.

सतत औषधं आणि धूर फवारणी करून मच्छरांची मास किलिंग करणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांवर सक्त कारवाई केली जाईल.

मच्छरांच्या सेवेसाठी आणि हौसेपोटी वेगवेगळ्या ब्लडगृपची माणसे बहुमच्छर सुखाय आपली शरीरे स्वच्छेने रक्तदानार्थ बहाल करतील.

मच्छरांनी माणसांना आणि माणसं मच्छरांना किश्श्यू बिश्श्यू करतानाचे फोटो सोशल मिडिया वर व्हायरल होऊ लागतील.

मच्छरांच्या मस्कीऑलिंम्पिक वैगेरे स्पर्धा सुरू होतील.

मच्छरांना घराघरांतून मायेनं स्वीकारून अडगळीच्या अडचणीच्या जागी नव्हे तर उजळ माथ्यानं  बसता येईल अश्या खास जागा उपलब्ध करून दिल्या जातील.

चूकून मच्छर चावलंच तर मोठ्या मनानं त्याला माफ केलं जाईल. इतकंच काय तर कौतुकानं आल्यागेल्यांना दाखवलं जाईल 'it’s so notorious. it has bitten me almost 15 to 20 times. naughty fellow.’

शेवटच्या दोन पायांना नाजूक धागे बांधून बागेत फिरायला, मनोमिलनाला आणि शीसू करायला येणारी मच्छरांची लाडाकोडात वाढलेली जमात घेऊन धावणारे आबालवृद्ध नजिकच्या भविष्यात बागेत, जॉगिंग ट्रॅक वर दिसू लागले तर आश्चर्य वाटू नये म्हणून अगोदरच हा प्रपंच...

काय सांगावे असले घडेलही...

कालाय तस्मै नमः

# ‘सत्य - जीवनाचा मार्ग’

■ रेमंड मच्याडो - 8668639989

भारतात विविध धर्मांचे अनुयायी प्रतिवर्षी आपापल्या देव-देवतांचे धर्मोत्सव साजरे करत असतात. तसेच ख्रिस्ती धर्मीयांचा ‘नाताळ’ हा उल्हासाचा वार्षिकोत्सव! प्रभू येशू ख्रिस्त यांचा जन्मदिवस म्हणून तो जगभर २५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. डिसेंबरचा महिना उगवला आणि थंडीचा मोसम सुरू झाला की आपोआपच खिस्तजयंती महोत्सवाची चाहूल लागते व अंतर्मनात एक प्रकारची उत्सवाची व उल्हासाची भावना तयार होते. तरूण-तरूणींमध्ये खेळी-मेळीचे वातावरण निर्माण होते. गावाच्या वेशीवर किंवा बावखलावर सार्वजनिक गोशाला उभारण्यात युवा पिढीमध्ये प्रचंड चैतन्य निर्माण झालेले असते. गृहिणी गोड पदार्थ करण्याच्या योजना आखण्यात मग्न असतात. लहान मुलं नवीन कपडे शिवण्यासाठी पालकांकडे आग्रह धरतात. पॅरीशमधील धर्मगुरू खिस्तीजनांची आध्यात्मिक तयारी करण्यासाठी कंबर कसतात. सकाळ-सायंकाळ चर्चमध्ये खिसमस संगीताचे सराव सुरू होतात, तेव्हा आसमंत पावित्र्याने निनादून जातो.

वरील सर्व गोष्टी बाह्यस्वरूपाच्या असल्या तरी त्याचा मूळ हेतू दैनंदिन धकाधकीच्या जीवनात वातावरण निर्मिती करणे हा असतो. अशा वातावरणात येशूच्या सांकेतिक आगमनासाठी आध्यात्मिक व वैयक्तिक तयारी करणे सुकर होते. खिस्ती विश्वासानुसार परमेश्वरपुत्र येशूचे पृथ्वीतलावर आगमन दोन हजार वर्षांपूर्वी झाले असले तरी प्रतिवर्षी त्याची जयंती साजरी करून त्याने दिलेल्या जीवनमूल्यांचे अनुकरण प्रतिदिन करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक खिस्ती माणसाने आपल्या आंतर्हृदयात येशूचा मार्ग स्वीकारून आपले दैनंदीन जीवन सात्विकतेने जगणे अपेक्षित असते.

येशूने उपदेशाद्वारे आपल्या अनुयायांना देवराज्यात प्रवेश मिळवण्यासाठी एक राजमार्ग दाखवला. दया, क्षमा, शांती, प्रीती व न्यायाचा तो मार्ग! प्रत्येक खिस्ती व्यक्तीने त्या मार्गावरून प्रवास करावा व तो प्रवास सतत चालूच ठेवावा असे अपेक्षित असते. येशूने दाखवलेला मार्ग अरूंद म्हणजेच कठीण आहे. आपले जीवन पावलोपावली

विरोधाभासांनी गच्च भरले असताना येशूची वचने पाळणे इतके सोपे नसते. तरीपण त्या मार्गावरून सतत मार्गक्रमण करणे महत्त्वाचे आहे.

प्रभू येशू ख्रिस्ताने मार्क १०:२५ च्या शुभवर्तमानात म्हटले आहे: "श्रीमंत माणसाचे देवाच्या राज्यात प्रवेश करणे यापेक्षा उंटाला सुईच्या डोळ्यातून जाणे सोपे आहे." यामधून येशू ख्रिस्त एक गहन आध्यात्मिक संदेश देतात: श्रीमंत व्यक्ती अनेकदा आपल्या संपत्तीवर, सामाजिक प्रतिष्ठेवर आणि आत्मनिर्भरतेवर अवलंबून असतात. हे त्यांना नम्रतेने देवाच्या राज्यात प्रवेश करण्यापासून अडवू शकते. सुईच्या डोळा म्हणजे सुईतील लहान छिद्र, ज्यातून धागा ओढला जातो. उंटासारख्या मोठ्या प्राण्याला त्यातून जाणे अशक्य आहे. उंट हे त्या काळातील सर्वात मोठे आणि भारदस्त प्राणी मानले जात होते. त्यामुळे हे रूपक अधिक प्रभावी ठरते. येशू ख्रिस्त हे सांगू इच्छितात की, देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी नम्रता, त्याग, आणि आत्मिक शुद्धता आवश्यक आहे. स्वतःसाठी संपत्ती वाईट नाही, पण ती जर माणसाच्या मनात गर्व, लोभ किंवा आत्मकेंद्रितता निर्माण करत असेल, तर ती आध्यात्मिक प्रगतीस अडथळा ठरते. देवाच्या राज्यात प्रवेश हा कृपेवर आधारित आहे, संपत्तीवर नाही.

आज प्रचंड संख्येने खिस्तीजन येशूची आराधना व भक्तीपूजा करतात, त्याच्यावर अपार प्रेम करतात, त्याला राजा व तारक मानून आपल्या हृदयात स्वीकारून आपल्या अस्तित्वाच्या केंद्रस्थानी बसवतात. परंतु त्याचे वास्तवात अनुकरण करणारे खिस्तीजन फार थोडे असतात. अनेकांसाठी येशूवर विश्वास ठेवणे म्हणजे फक्त त्याच्यावर प्रेम करणे किंवा त्याच्या बाबतीत घडलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवणे असा आहे. उदा. देवपुत्राने मानवी रूप धारण करून गरिबीमध्ये जन्म घेतला, मानवाच्या पापांसाठी त्याने क्रूसावर मरण पत्करले व जगाच्या शेवटी तो आपला न्याय करावयास पुन्हा येईल, इत्यादी. आपल्या विश्वासाचा हाच एक दृष्टीकोन ठेवला तर येशूने दिलेल्या महत्त्वाच्या संदेशावर आपले दुर्लक्ष होऊ शकते. एकीकडे श्रद्धावंत येशू हा देवाचा पुत्र आहे यावर ठाम विश्वास ठेवतात परंतु दुसरीकडे वैयक्तिक व स्वकेंद्रित जीवन जगतात, गरिबांच्या गरजांवर दुर्लक्ष करतात, इतर धर्माच्या किंवा जातीच्या लोकांचा द्वेष करतात, लांडीलबाडी करतात, लोकसेवा व सहकाराच्या नावाखाली भ्रष्टाचार करतात व सत्ता गाजवतात. ही सर्व जीवनातील विरोधाभासाची लक्षणे आहेत.

काही लोक जाहिररित्या 'प्रेझ द लॉर्ड' म्हणून किंवा गळ्यामध्ये रोझरी व क्रूस टांगून येशूवरील प्रेम व्यक्त करत असतात. परंतु येशू आमचा राजा व स्वामी आहे हे फक्त जाहीर

करणे म्हणजे त्याच्यावर प्रेम करणे नव्हे. येशूवर प्रेम करणे म्हणजे त्याचे अनुकरण करणे आणि त्याचे अनुकरण करणे म्हणजे जगाशी प्रत्यक्षरित्या आपले नाते जोडणे. येशू आपल्या शिष्यांना प्रश्न करतोः "तुम्ही मला प्रभू प्रभू म्हणता, पण मी जे सांगतो ते का करीत नाही?" (लुक-6:46).

येशूचे अनुकरण करणे म्हणजे त्याची वचने पाळणे व ती प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरवणे. येशूचे अनुकरण करणे म्हणजे न्याय व शांतीचे जीवन जगणे. जगात न्याय असल्याशिवाय शांती असू शकत नाही. म्हणजेच न्यायासाठी झटणे म्हणजे येशूचे वचन पाळणे. येशूचे अनुकरण करणारा निराळा असतो. तो सामान्यातील असामान्य असतो. त्याचे जीवन संघर्षमय असते. त्याला अन्याय सहन होत नसतो. तो लांडीलबाडी व हिंसा करणाऱ्यांशी हातमिळवणी करीत नसतो. येशूच्या स्फूर्तीने तो निर्भय बनतो व अन्यायाविरूद्ध तो पेटून उठतो. अशावेळी येशूवरील भक्ती व त्याची आराधना त्याने दाखवलेल्या मार्गावरून प्रवास करताना फार उपयोगी पडते, त्यातून निर्माण होणारी ऊर्जा प्रवासाला पूरक ठरते.

येशूने आपणास जगाचे परिवर्तन करण्यास पाचारण केले आहे. जे एकाकी आहेत, जे निराधार आहेत, जे बेघर आहेत, जे दुर्लक्षिलेले आहेत त्यांची सेवा करण्यासाठी येशूने आपणास आव्हान दिले आहे. येशूचे खरे शिष्यत्व ख्रिस्तमंदिराच्या चार भिंतींच्या बाहेर आपणास प्रत्ययास येते - जेथे हजारो लोक आतंकवाद्यांच्या बॉंबस्फोटामुळे मृत्यूमुखी पडतात, जेथे त्सुनामी, तुफान, अतिवृष्टी, धरणीकंप, वणवा इत्यादी नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेले अभागी आणि निर्वासित लोक टाहो फोडून मदतीची हाक देतात, ती हाक येशूची असते व त्यांच्यावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी अशा पीडित लोकांना मदत करण्यास धाव घेणे म्हणजेच येशूने दाखवलेल्या दिशेने मार्गक्रमण करणे होय.

आपण येशूचे फक्त चाहते आहोत की त्याचे अनुयायी आहोत हा फरक जाणणे महत्त्वाचे आहे. चाहता निष्कर्मीपणे विचार करत बसतो तर अनुयायी प्रत्यक्ष अनुकरण करतो. महात्मा गांधींचे अहिंसेचे व्रत पाळणारे आणि अमेरिकेमधील कृष्णवर्णीय लोकांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध लढणारे, हुतात्मा झालेले मार्टीन लुथर किंग ज्युनिअर म्हणाले होते: “आपणास जीवनमार्गावरून जाणारा 'चांगला शोमरोन' बनण्यासाठीच नव्हे, तर येरूसालेमहून यरिहोकडे जाणाऱ्या रस्त्याचे परिवर्तन करण्यासाठी पाचारण केले गेले आहे. तो रस्ता लुटारूमुक्त करणे आवश्यक आहे, जेणेकरून रस्त्यावरील प्रवासी लुटले जाणार नाहीत. भिकाऱ्यांना दान करणे ही करूणा असली तरी माणसाला भिकेला लावणारी शासनव्यवस्था बदलणे आवश्यक आहे!"

येशूने दान व न्याय या दोन्ही गोष्टींचा पुरस्कार केला. म्हणून भुकेल्या गरिबांना मोफत अन्न वाटण्यापलीकडे त्यांना उत्पन्नाची सुविधा उपलब्ध करून देणे अधिक न्याय्य ठरते. जगातील धर्मादाय संस्था दानावर अधिक भर देतात. कारण त्यामुळे गरजवंतांच्या तात्काळ गरजा भागल्या जातात व दात्यांना उपकृत होण्याची संधी प्राप्त होते. अशा धर्मादाय संस्थांची सरकारकडून प्रसंशा होते, कारण सरकारची नागरिकांप्रत असलेली जिम्मेदारी आपोआपच पार पाडली जाते. ब्राझीलमधील बिशप हेल्डर कामारा म्हणाले होते: "मी जेव्हा गरिबांना अन्न देतो तेव्हा सरकार मला संत संबोधते. परंतु ते गरीब का? असा प्रश्न केल्यास ते मला कम्युनिष्ट समजतात." दान माणसाला संत बनवते तर न्यायासाठी आग्रह धरणा-या माणसाला क्रुसावर चढवले जाते. येशूच्या याच धर्माने त्याला क्रुसावर चढवले!

आज जगात प्रचंड प्रमाणात विविध धर्म-संप्रदाय पाळणारे आस्तिक अनुयायी आहेत. त्यात  मूलतत्ववादी, उदारमतवादी, नास्तिक व अज्ञेयवादीही आहेत. या सर्व संप्रदायांतील विविध धर्मकायदे, परंपरा, नीतितत्वे, अनेक प्रकारच्या धर्मविधी व रूढी यांचा विचार करताना सर्वसामान्य माणून गोंधळून जाऊ शकतो. परंतु आपल्या दैनंदीन जीवनात स्वातंत्र्य, समता, बंधुता, सर्वधर्मसहिष्णुता व न्याय ही जीवनमूल्ये सर्व भारतीयांनी आचरणात आणण्याचा प्रयत्न केला, तर भिन्नविभिन्न धर्मसंप्रदायांच्या व्यक्तींतील फरक जाणवणार नाही. खिस्तीजनांनी आपण राहात असलेल्या परिसरातील इतर जाती-धर्मीय लोकांबरोबर दुधात साखर एकरूप होते त्याप्रमाणे समाजाच्या नैतिक, आर्थिक व राजकीय जीवनशैलीत सहजरित्या समरस होणे सर्वहितकारक बनते.

परंतु केंद्र सरकारपासून ते राज्य, जिल्हा, तालुका, नगरपालिका व ग्रामपंचायत पातळीपर्यंत भ्रष्टाचार, अन्याय, नागरी हक्कांची व मानवी मूल्यांची पायमल्ली शासनाच्या नसानसात घुसली आहे. या परिस्थितीत खिस्ती म्हणून आपण मात्र बघ्याची भूमिका घ्यायची का? भारतीय राजघटनेने प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्य दिले असले तरी अलिकडे अनेक सनातनी व हिंदुत्ववादी धर्मांध संघटनांनी धर्मविद्वेष व आकस यापोटी अल्पसंख्यांकावर अत्याचार करण्याचा विडा उचलला आहे. गेल्या काही वर्षांत कट्टर धर्मांध व जात्यंध संघटनांद्वारे आदिवासी, मुस्लिम व खिस्ती बंधूंवर प्राणघातक हल्ले झाले व होत आहेत. अशा वेळेला यरिहोच्या रस्त्यावर लुटारूंनी अर्धमेला केलेल्या पथिकाकडे याजकासारखे आपण दुस-या बाजूला पाहून निघून जावे की शोमरोनसारखे त्याची मलमपट्टी करावी, की मार्टीन लुथर किंग सुचवितात त्याप्रमाणे यारोहोचा रस्ता लुटारूमुक्त करावा?

येशूने दाखविलेला मार्ग हा एक प्रवास आहे. प्रवासामध्ये आपण पुढे जात असतो, त्यात आपण स्थितप्रज्ञ नसतो, त्यात नवीन काहीतरी घडत असते. येशूने स्थापन केलेल्या खिस्तसभेचा प्रवास दोन हजार वर्षे पुढे आलेला आहे. गतकाळात इतिहास घडला. जसा तेव्हाच्या व आजच्या जीवनशैलीमध्ये बदल झाला तसा खिस्तसभेच्या प्रवासातसुद्धा बरेच बदल झाले व होत आहेत. सत्य शोधण्याच्या प्रक्रियेत सुदृढ ख्रिस्तसभेने भाविकांना सतत प्रश्न विचारले पाहिजेत आणि तसेच शंका विचारणाऱ्यांचे स्वागत केले पाहिजे. यामुळे सर्व संबंधितांच्या ज्ञानात भर पडून जीवनाचे रहस्य उलघडण्यास मदत होते. माणसाची विवेकबुद्धी बळकट करण्यासाठी सदर प्रक्रिया महत्त्वाची असते. प्रश्न विचारणाऱ्या थोर पंडितांनी उपस्थित केलेल्या शंकांमुळेच आज मानवी ज्ञानामध्ये प्रचंड भर पडून त्यांची प्रगती होत आहे.

संत पोप जॉन तेविसावे यांनी १९६२ मध्ये व्हॅटिकन येथे सुरू केलेली दुसरी व्हॅटिकन विश्वपरिषद पोप पॉल सहावे यांच्या कारकिर्दीत १९६५ मध्ये संपन्न झाली. परिषदेमध्ये धर्मपिठाने पारित केलेले सुधारित कायद्यांद्वारे जागतिक कॅथलिक ख्रिस्तसभेला नवीन दिशा मिळाली. पुढील २६ वर्षे महान पोप संत जॉन पॉल द्वितीय यांनी ख्रिस्तसभेचा कारभार अधिकाधिक लोकाभिमुख केला. दि. १३ मार्च २०१३ रोजी कॅथलिक ख्रिस्तसभेचे परमगुरूस्वामी म्हणून निवडून आलेले पोप फ्रान्सिस यांनी कॅथलिक बिशपांच्या सर्वसामान्य वैश्विक धर्मपरिषदेच्या तयारीसाठी सप्टेंबर २०२१ मध्ये जागतिक स्तरावर जागृतता मोहीम आरंभिली आणि ती २९ ऑक्टोबर २०२३ रोजी व्हॅटिकन येथे संपन्न झाली. या धर्मसभेचा विषय होता – ‘एकमेव सिनोडल ख्रिस्तसभेच्या जीवनातील सहप्रवासासाठी सहभागिता, सहभाग आणि मिशन’. सदर धर्मपरिषदेद्वारे पोप महाशय ख्रिस्तसभेच्या उगमापासून संपूर्ण परमेश्वर प्रजेचा समावेश असलेल्या एकत्रित जीवनयात्रेला नवीन चालना देण्याचा प्रयत्न करीत आहेत!

# “कर माझे जुळती”

■ रिचर्ड नुनीस, मेलबर्न.



सोबतच्या चित्राच्या प्रतिकृती आणि नक्कला आपण अनेक ठिकाणी पाहिल्या असतील. विधात्यासमोर समर्पणाच्या भावनेने जोडले जाणारे हात हे एक धर्मनिरपेक्ष वैश्विक चिन्ह आहे. ऑस्ट्रिया मधील व्हिएन्ना ही कलावंतांची राजधानी! तेथे कधी गेलात तर तेथील अल्बर्टा म्युझियमला भेट द्यायला विसरू नका. कारण आल्ब्रेख्त ड्युरर ह्या जर्मन चित्रकाराने इ.स. १५०८ मध्ये चितारलेले हे रेखाचित्र ह्या म्युझियममध्ये आहे.

युरोप मधील पुनरुद्भवन काळाने (Renaissance) जगाला अनेक कलावंत दिले. त्यापैकी एक मोठं नाव म्हणजे ड्युरर.

चौदावे ते सतरावे शतक हे युरोपमध्ये नवचेतन युग (renaissance) समजले जाते. ह्या काळात युरोपमध्ये काव्य, शास्त्र साहित्य, तत्वज्ञान, कला आदी ज्ञानशाखांचा झपाट्याने विस्तार झाला, भरभराट झाली. अनेक उत्तमोत्तम कलावंत जन्मले. त्यांनी निर्मिलेल्या कलाकृतींनी जगाला भुरळ घातली. साऱ्या जगाचा सांस्कृतिक असा हा वारसा युरोपमधील सर्व देशांनी जतन करून ठेवला आहे.

फ्रेंच renaistre वरून Renaissance हा शब्द इंग्रजीत प्रचलित झाला. फ्रेंच शब्दाचा शब्दशः अर्थ "पुन्हा जन्म घेणे" असा आहे. मराठीत ह्याला पुनरुज्जीवन चळवळ, प्रबोधन काळ, पुनरुद्भवन (enlightenment) नवजीवन हे प्रतिशब्द अभासाकांनी योजले आहेत

सेंट पीटर बॅसिलिका मधील सिस्टाइन चॅपेलच्या छतावरील जगप्रसिद्ध फ्रेस्को चितरणारा आणि पिएता, किंग डेव्हिड सारखी अप्रतिम शिल्पे बनवणारा मायकेल अँजेलो, The Last Supper आणि मोनालिसा रंगवणारा लिओनार्दो द विंची, येशूचे रुपपालट (The Transfiguration), महादूत मायकल सारखी अद्वितीय पेन्टिंग रंगवणारा राफेल आदी दिग्गज ह्याच काळाने मानवजातीला दिले. योगायोगाने हे सारे

कलावंत जवळपास एकाच वेळी म्हणजे इ.स. १४८३ ते इ.स. १५१९ ह्या ३६ वर्षांच्या “सुवर्ण” कालखंडात, आपल्या कलाकृतींचं दान भरभरून देत होते.

मायकेल अँजेलो, लिओनार्दो द विंची आणि राफेल हे एकाच प्रांतातील, म्हणजे सध्याच्या इटलीमधील. हे “नवचेतन” केवळ इटलीपुरतं मर्यादित नव्हतं तर युरोपमधील इतर राज्यांत देखील अनेक कलावंत आपल्या कलाकृतींनी लोकांची वाहवा मिळवीत होते. ह्याच सुवर्णयुगात जर्मनीत आल्ब्रेख्त ड्युरर (इ.स. १४७१ ते १५२८) ह्या कलावंताने आपल्या कलेने जगाला भुरळ घातली होती. त्याच्या अनेक कलाकृती जगभरातील म्युझियममध्ये जतन करून ठेवल्या गेल्या आहेत.

प्रार्थनेत जोडलेले हात (The Praying Hands) ह्या ड्युररच्या रेखाचित्रामागे एक दंतकथा देखील आहे.

आल्ब्रेख्त ड्युररचा जन्म इ.स. १४७१ चा. त्याचे वडील सोनारकाम करीत असत. ड्युरर दाम्पत्याला अठरा मुलं होती. सोनारकामात चांगली कमाई असली तरी वीस जणांचं कुटुंब पोसताना वडिलांना नाकी नऊ येत असे.

आल्ब्रेख्त आणि त्याचा मोठा भाऊ अल्बर्ट चित्रकलेत वाकबगार होते. युरोपमधील त्या काळाचं वातावरणच कलाधार्जिणं होतं. त्यामुळे दोघांनाही न्युरेम्बर्गमधील प्रतिष्ठित कला अकादमीत शिक्षण घेऊन आपण मोठं कलावंत बनावं ही इच्छा होती. पण प्रतिष्ठित कला अकादमीत प्रवेश घ्यायचा तर खिशात दाम हवा. वडिलांना दोन मुलांचं सोडाच, एकाचंही उच्च शिक्षण करणं अशक्य होतं.

दोघा भावांनी अनेक पर्याय शोधले. पण ठोस असं काहीही ध्यानात येईना. खूप विचारविनिमय झाला आणि अल्बर्टने एक प्रस्ताव मांडला. दोघांपैकी एका भावाने आधी आपलं शिक्षण पूर्ण करायचं. दुसऱ्याने कामधंदा करून त्या शिक्षणाचा सारा खर्च उचलायचा. मग दुसऱ्या भावाने शिकायचं आणि पहिल्याने खर्च उचलायचा.

हा पर्याय चालण्यासारखा होता. मात्र पहिलं कोणी शिकायचं ते कसं ठरवणार? शेवटी “छाप-काटा” करायचं ठरलं. अल्बर्टने नाणेफेक केली आणि तो हरला (त्याचा ‘सिक्का’ पुढे शोलेमधील जयच्या हाती लागला असावा, असा आपला एक अंदाज).

आल्ब्रेख्त चार वर्षाच्या अभ्यासासाठी कला अकादमीत रुजू झाला. वडिलांकडून पैशाची काहीच अपेक्षा नव्हती. तेव्हा अल्बर्ट, मोठा भाऊ, नोकरीच्या शोधात निघाला. एका मोठ्या खाणीमध्ये त्याला खोदण्याचे काम मिळाले. युरोपच्या थंडीत, खोल खाणीत

दिवसाचे बारा ते चौदा तास मेहनत करून त्याने पै-पै जमविली आणि आपल्या भावाच्या शिक्षणावर खर्च केली. सोनाराच्या कुटुंबातील ह्या तरुणाला खाणीतल्या श्रमाची सवय नव्हती. पण त्याने जिद्द सोडली नाही. आपल्या लहान भावाला काहीही कमी पडू दिलं नाही.

चार वर्षे सरली. आल्ब्रेख्तच्या प्रगतीचा आलेख उंचावत राहिला. चित्रकला, रेखाचित्र आणि प्रिंटमेकिंगमध्ये तो आपल्या शिक्षकांपेक्षाही पुढे गेला होता. त्याच्या चित्रांनी लोकांना भुरळ पाडली होती. मोठमोठे उमराव त्याला काम देऊ लागले होते. आपल्या थोरल्या भावाने आपल्यासाठी केलेल्या कष्टांचे त्याला भान होते. आता मोठ्या भावाची कला अकादमीत जायची पाळी होती. आल्ब्रेख्तच्या मिळणाऱ्या कामाच्या पैशातून तो अल्बर्टच्या शिक्षणाचाच नव्हे तर राहण्याचा खर्च लीलया निभावून नेणार होता.

आल्ब्रेख्त घरी परतला. त्याच्या सन्मानार्थ जंगी मेजवानी झाली. आल्ब्रेख्तने थोरल्या भावाला सांगितलं, आता तू जायचंस. खर्चाची काहीही चिंता नको. तू माझ्याहून अधिक कुशल आहेस, प्रतिभावान आहेस. तू माझ्याहून मोठा होशील.

थोरला अल्बर्टच्या डोळ्यात अश्रू तरारले. त्याच्या उष्ण अश्रूत आपण केलेल्या श्रमाचं चीज झालं ही भावना होतीच, पण चित्रकार होण्याचं आपलं स्वप्न कधीही साकार होणार नाही ह्याचा विषाद देखील होता. आल्ब्रेख्तला त्या अश्रूंची भाषा कळायला थोडा विलंब लागला. आपल्या थोरल्या भावाचे हात आपल्या हातात घेऊन 'तू उदास का' असं त्यानं विचारायच्या आधीच भावाच्या हाताच्या स्पर्शाने तो व्याकुळ झाला. कारण तो स्पर्श चित्रकाराच्या नाजूक सडपातळ बोटांचा, उबदार हाताचा नव्हता तर खाणकाम करून राकट झालेल्या, संधीवाताने वाकड्या झालेल्या बोटांचा, चेतना हरवलेल्या हाताचा होता. खाणीत काम करताना त्याचे हात अनेकवेळा चेचले गेले होते, मोडले देखील होते. आता तो फक्त हातोडा चालवू शकत होता, ब्रश नाही. कलावंत बनण्याची त्याची संधी कायमची नष्ट झाली होती.

आपल्या भावाच्या निस्वार्थ त्यागामुळे आल्ब्रेख्त गहिवरला. तो काहीच बोलला नाही. बोलू शकला नाही. अल्बर्टचा त्याग अबोल होता, त्याच्या वेदना अबोल होत्या. आल्ब्रेख्तची परतफेड देखील अशीच अबोल असणार होती.

हेलर नावाच्या एका उमरावाने आल्ब्रेख्तला चर्चमधील मोठ्या वेदीसाठी एक ऑल्टरपीस बनवण्याचे काम दिले होते. त्या पॅनेलच्या एका बाजूला हात जोडून प्रार्थनेत

मग्न अशा येशूच्या एका शिष्याची प्रतिमा असणार होती. ती प्रतिमा कोरायच्या आधी त्याचे रेखाचित्र करणे गरजेचं होतं.

त्या रेखाचित्रासाठी कोणते हात योग्य आहेत ते आल्ब्रेख्तला तत्काळ जाणवलं. त्याने अल्बर्टला प्रार्थना करण्याच्या मुद्रेत उभे राहण्यास सांगितले. त्यानंतर शाई आणि पेन्सिलचा वापर करून आल्ब्रेख्तने अल्बर्टच्या ओबडधोबड झालेल्या हाताचे, प्रार्थना करणाऱ्या हातांचे, रेखाचित्र चितारले. ते रेखाचित्र म्हणजेच The Praying Hands. ह्या रेखाचित्राला आणखी एक नाव आहे. Hands of an Apostle म्हणजे 'प्रेषिताचे हात'. आल्ब्रेख्तसाठी त्याचा थोरला भाऊ प्रेषिताहून कमी नव्हता. ह्या चित्राद्वारे आपल्या थोरल्या भावाच्या त्यागाला आणि त्याच्या बंधुप्रेमाला आल्ब्रेख्तने अजरामर केले.

गरिबी आणि खडतर परिस्थितीवर मात करून यशाचे शिखर गाठणाऱ्या व्यक्तींच्या अनेक कथा इतिहासात वाचायला मिळतात. त्यात बंधुप्रेम, त्याग, सत्याची कास आदी नीतिमूल्ये असली की अशा कथा जनमानसाला भुरळ घालतात, व्याख्याते, गुरु आदी मंडळींच्या मुखांतून रसाळपणे वाहत राहतात आणि आख्यायिका बनून जातात.

अगोदर म्हटल्याप्रमाणे आल्ब्रेख्तची वरील कथा एक दंतकथा आहे कारण आल्ब्रेख्त आपल्या कामाच्या सविस्तर नोंदी करायचा. त्याच्या कोणत्याही नोंदीत 'प्रार्थनेत जोडलेले हात' ह्या रेखाचित्रासाठी आपल्या भावाचे हात वापरल्याचा उल्लेख नाही. आल्ब्रेख्तला मोठा भाऊ होता हे खरे, पण त्याने खाणीत काम केल्याचा उल्लेख सापडत नाही. किंबहुना तो आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून सोनारकामात पारंगत झाला असा उल्लेख सापडतो. आल्ब्रेख्तचे वडील देखील सधन होते. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाची आबाळ झाली असण्याची शक्यता देखील तेवढीच धूसर.

मग प्रश्न असा उरतो की बंधुप्रेम, त्याग, जिद्द ह्या गुणांची भलावण करणाऱ्या गोष्टीत खोटेपणा घुसडावा असं कोणाला का वाटलं असावं? आपण वाचलेल्या अनेक आत्मचरित्रांमध्ये सत्याच्या जोडीला थोडं असत्य असतं किंवा अडचणीचं वाटेल असं सत्य दडपून ठेवलेलं असतं हे आपल्याला जाणवलं असेलच. पण काही वेळेला तद्दन असत्यालाच सत्याची थोडीशी फोडणी असते. कोणी एक कोट्यधीश बाई विमानप्रवासात इतकी साधी साडी वापरते की तिला बिझनेस क्लासच्या रांगेत पाहून एखादी रुपगर्विता तिला खडसावते आणि इकॉनॉमी क्लासच्या रांगेत उभं राहायला सांगते त्याची सुरस आणि चमत्कारिक कथाही तुम्ही वाचली असेल. किंवा कोणी एक बॉलीवूडचा खिलाडी आपलं बालपण किती गरिबीत गेलं आणि हॉटेलमध्ये कपबशा

विसळून आपण कसे जगलो आणि वर आलो हे सांगताना आपले बाबा किती मोठ्या पदावर होते आणि आपलं शिक्षण कोणत्या महागड्या शाळेतून झालं हे नमूद करायला सोयीस्कर विसरतो.

आल्ब्रेख्त कुशल कलावंत होता. त्याच्या अनेक कलाकृती लाकडावर कोरलेल्या आहेत. अशा कोरीव चित्रावरून अनेक प्रतिकृती निर्माण करण्याची क्लृप्ती त्याने शोधून काढली होती. एकोणिसाव्या शतकात आल्ब्रेख्तच्या कलेबद्दल लोकांचं औत्सुक्य पुन्हा जागृत झालं. त्याच्या 'जोडलेले हात' ह्या रेखाचित्राबद्दल लोक भरभरून बोलायला लागले. ह्या चित्राच्या मोठ्या प्रमाणावर कॉपी काढून त्या विकल्या तर खूप पैसा मिळेल अशी कल्पना कोण्या व्यापारी मनोवृत्तीच्या माणसाच्या डोक्यात आली. हजारो कॉपी तर काढल्या. पण त्या विकायच्या तर उत्तम 'मार्केटिंग' हवं. मग एक 'कथक' तय्यार झालं. आल्ब्रेख्तचा श्रीमंत बाप, मुलांचं शिक्षणदेखील न करता येण्याइतपत गरीब केला गेला. त्याचा कुशल सोनार असलेला भाऊ खाणकामगार बनला. येशूच्या प्रेषिताचे म्हणून चितारलेले हात 'प्रार्थनेत जोडलेले हात' झाले. त्यात बरचसं बंधुप्रेम आणि त्याग मिसळला. खाणीतल्या कष्टांची फोडणी दिली. कथा तयार झाली. चित्राच्या कॉपी हजारांनी विकल्या गेल्या. बक्कळ पैसा आला. मार्केटिंग झिंदाबाद. सत्याची ऐशी तैशी!

अमेरिकेचे पहिले अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांची एक कथा प्रसिद्ध आहे. त्यांच्या बालपणी त्यांनी त्यांच्या बागेतील चेरीचं झाड गंमत म्हणून कापून टाकलं. मात्र वडिलांनी विचारताच 'मी खोटं बोलू शकत नाही' असं म्हणत त्यांनी आपला गुन्हा कबूल केला. ही गोष्ट चक्क त्यांच्या चरित्रग्रंथात आहे. पण ती खोटी असल्याचं आणि जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांच्या मृत्युनंतर आपण ती दडपून घुसडल्याचं त्यांच्या चरित्रकाराने मान्य केलं. कारण? 'नेहेमी खरे बोलावे' हा संदेश लहान मुलांपर्यंत पोहोचावा! म्हणजे मुलांनी खरं बोलावं हे मूल्य शिकवण्यासाठी एका 'अ-मूल्याचा' वापर हा एक अमूल्य आणि गमतीशीर विरोधाभास समजायचा.

शुद्ध सोन्याचे दागिने बनवत नाहीत. त्यासाठी सोन्यात हिणकस मिळवतात. मग असे चौदा, अठरा कॅरेटचे दागिनेच स्त्रियांच्या सौंदर्यात भर घालू शकतात. सत्याचंही तसंच असावं. निखळ सत्याला देखील गिऱ्हाईक मिळत नसावं. कारण ते पायात चप्पल घालून बाजारात निघेपर्यंत असत्य जगभर हिंडून आलेलं असतं! म्हणून बोरकरांची क्षमा मागून म्हणावसं वाटतं – "असत्याची जेथ प्रतीती, तेथे कर माझे जुळती"

# ओटा . . . एक स्मरणरंजन

■ सॅबी परेरा
(sabypereira@gmail.com)

वसईतील आपल्या जुन्या घरी एक मोठ्ठासा ओटा असायचा. अजूनही असतो. मात्र आता त्याचा आकार आक्रसत आक्रसत जेमतेम ऐंशी ते शंभर चौरस फुटांवर आलेला आहे. मराठीत त्याला ओटी किंवा व्हरांडा म्हणत असले तरी आपल्या लेखी तो आजही ओटाच आहे! हा ओटा म्हणजे, घरातील स्वयंपाकघर आणि झोपायची खोली या आतल्या जगाला, आपले अंगण आणि त्यापलीकडील बाहेरच्या जगाशी जोडणारा एक दुवा होता.

या ओट्याने आपले बालपण, आपले खाजगी जीवन, आपले सार्वजनिक जीवन आणि आपली संपूर्ण कुपारी संस्कृतीच व्यापलेली आहे. कधी एकच मुख्य दरवाजा असलेले, तर कधी तीनचार मुख्य दरवाजे असलेले, एकाच घरात पाच-दहा कुटुंबे सुखेनैव नांदणारे कौलारू घर आणि या सगळ्यांना सामावून घेणारा एकच लांबलचक ओटा. दगडी जोत्याचा आधार असलेला, मातीने बनवलेला, शेणाने सारवलेला, आपल्या अंगावर एखादा हिंदोळा, एखादी माशी (सुंभाने विणलेल्या लाकडी चौकटीचा हिंदोळा), आणि एकाच किंवा दोन्ही बाजूला बलकाव (विटा किंवा दगड आणि सिमेंट किंवा चुना वापरून बांधलेले बाकासारखे आसन) असे अलंकार मिरवणारा ओटा!

आज गावात, क्वचितच एखाद्या वापरात नसलेल्या घरी जुन्या पद्धतीचा लांबलचक ओटा राहिला आहे. या ओट्याने काय काय ऐकलं आहे, पाहिलं आहे, भोगलं आहे, सोसलं आहे, मिरवलं आहे, अनुभवलं आहे? हा ओटा जेव्हा मेडीवर लटकलेल्या, पारा उडालेल्या छोटुश्या आरशात आपलं प्रतिबिंब पाहतो तेव्हा त्याच्या मनातल्या रेडिओवर भूतकाळाचं स्टेशन लागतं.

वर्षा दोन वर्षाला संपूर्ण ओटा कुडवून, त्यात आणखी मातीची भर घालून, धोपण्याने धोपुन, ताज्या शेणाने सारवून, कनी काढल्याने निखरलेलं आपलं रूप पाहून ओटा स्वतःच स्वतःशी मानवतो आहे.

हिंदोळ्याच्या कडीच्या करकर आवाजाच्या पार्श्वसंगीतासोबत 'मुगले मुगले नास लो' ऐकत पेंगुळणाऱ्या लहान बाळांच्या कित्येक पिढ्या त्याला दिसतात. नुकतंच रांगू

लागलेलं बाळ ओट्यावरून खाली पडू नये म्हणून त्याच्या कदेठ्याला (करगोटा) दोरी बांधून ती ओटीवरील खिडकीच्या गजाला बांधून ओटीवर सोडलेली बाळं आपल्या अंगाखांद्यावरून अजूनही गरुले घालत असल्याचा त्याला भास होतो. हिंदोळ्यातील तरुण पोरांच्या मेंढीकोटच्या डावात तो रंगून जातो. तरुणांच्या घोळक्याच्या हसण्याचा संसर्गजन्य खळखळाट त्याला अजून ऐकू येतो. बलकावाच्या एका कोपऱ्यात चालणारी तरुण पोरींची आपल्या भावी प्रियकराबद्दलच्या अपेक्षांची कुजबुज ऐकण्यासाठी त्याचे कान आजही आसुसलेले आहेत.

पावसाळ्यात ओटीवरच खेळल्या जाणाऱ्या लंगडी, धावडी, लपाछपी अशा बालकांच्या खेळात ओटाही सामील झालेला आहे. कागदाच्या विमानसोबत त्याच्याही मनोव्यापाराने उड्डाणे केलेली आहेत. ओटीवरून अंगणातल्या पाण्यात सोडल्या जाणाऱ्या कागदांच्या होडीसोबत त्यानेही हेलकावे खाल्ले आहेत. पावसानंतर ओटीवर आलेल्या माशा मारणारी आणि मारलेल्या माशांच्या संख्येवरून एकमेकांशी पैज लावणारी पोरं पाहून त्यालाही गंमत वाटलेली आहे. मस्ती करणाऱ्या, खोडी काढणाऱ्या किंवा शाळेत नापास होणाऱ्या मुलांना शिक्षा म्हणून घराच्या मेडीला (लाकडी खांब) बांधलेलं पाहून ओट्याचा जीव देखील कळवळला आहे. हिंदोळ्यात बसून आजोबांनी नातवंडांना सांगितलेल्या भुताखेतांच्या कानी (कथा) ऐकून ओट्यालाही घाम फुटला आहे. माशीच्या हरेक झोक्यासोबत येणाऱ्या गार वाऱ्याच्या झुळुकीमुळे बय (आजी)च्या कुशीत सुखावलेलं बाळ पाहून ओट्यालाही वात्सल्याने भरून आलेलं आहे.

बय गुणगुणत असलेल्या देवळातल्या गाण्यांच्या शब्दांचे झालेले विचित्र अपभ्रंश ऐकून ओट्याच्या चेहऱ्यावर मिश्किल हसू उमटले आहे. भल्या पहाटे उठल्यावर दातोन किंवा राखेडीने दात घासत, नारळाच्या पातीने ओरप काढत चित्रविचित्र आवाज काढणारे वाडगे (बुजुर्ग) अन ओटीवरून अंगणात दूरवर मुतण्याची पैज लावणारी पोरं आठवून त्याच्या गालावर आजही स्मित फुलत आहे.

सकाळी शाळेत जाण्याआधी ओटीवर घोळक्याने अभ्यास करणारी, पाटीवरची पेन्सिल जिभेने चाटत शरीरातील कॅल्शियमची कमतरता भरून काढणारी, पेन्सिलीचं मागचं टोक चावून अभ्यासाचं टेन्शन घालवणारी, पुस्तकात पिंपळाचं पान आणि मोरपीस ठेवणारी बारकी बारकी पोरं ओट्याला अजून आठवतात.

ओटीवर एका बाजूला ठेवलेल्या हळांब्यात (बांबूपासून बनविलेले कोंबडीचे छोटे गोलाकार खुराडे) कोंबड्याना अंडी देताना त्याने पाहिले आहे. त्याच अंड्यातून जन्मलेली

छोटी छोटी पिल्ले घराच्या अंधाऱ्या खोलीतून पहिल्यादा ओटीवर आली तेव्हा त्यांचा तो किलबिलाट ऐकताना त्याला वात्सल्याने उचंबळून आलं आहे.

हिंदोळ्यात किंवा माशीत बसून झोके घेता-घेता समोरासमोरच्या घरातील तरुण तरुणीच्या चाललेल्या नेत्रपल्लवीचा, त्यातून पुढे जुळलेल्या, जुळू न शकलेल्या किंवा जुळून तुटलेल्या नात्यांचे ओट्याला मूक साक्षीदार व्हावे लागले आहे.

घरात लग्न असल्यावर महिनाभर आधी गावातल्या पोरी-बाळी हिंदोळ्यात बसून, जोरजोरात झोके घेत, लग्नाची पारंपरिक लोकगीते गात तेव्हा ओट्यालाही लग्नाची हळद चढली आहे. क्वचित कधी गाणी गाणाऱ्या स्त्रियांच्या वजनाने तुटणारा हिंदोळा ओट्यालादेखील शारीरिक मानसिक, जखम देऊन गेला आहे.

दिवाळी-दसऱ्याच्या सुमारास येणाऱ्या अवकाळी पावसापासून संरक्षण करण्यासाठी अंगणात घातलेल्या भातपिकाचे भारे घाईगडबडीत ओटीवर आणताना संपूर्ण कुटुंबाची झालेली दमछाक त्यानेही अनुभवली आहे. ओटीवरील आथरी किंवा चटईवर केळीच्या पानात बांधल्या जाणाऱ्या कागड्या सोबत ओट्याने आपली प्रार्थना देवापर्यंत पोहोचवली आहे. एकेकाळी ओटीवर वजन करण्यासाठी आथरी किंवा चटईवर पसरलेल्या मोगऱ्याच्या ढिगाने ओटा गंधाळला आहे. बाजारात घेऊन जाण्यासाठी वांगी, मिरची, भाजी इत्यादी निवडून, कमअस्सल भाजी खाली घालून, उत्तम भाजी टोपलीत वर भरली जात असताना ओट्याला आपल्या घरमालकाची मजबूरी जाणवली नसेल असे नाही.

एका ओटीवरील बलकावात बसलेल्या बुजुर्गाने समोरील ओटीवर हिंदोळ्यात झोके घेणाऱ्या दुसऱ्या बुजुर्गाच्या साथीने, पलीकडील ओटीवरील माशीत झोपलेल्या तिसऱ्या बुजुर्गाची केलेली थट्टा-मस्करी ओटा एन्जॉय करतो. थंडीच्या दिवसात ओटीवरील उन्हात साकळलेले खोबरेल तेल वितळविण्यासाठी ठेवलेली काचेची बाटली त्याला आठवते. तिथेच बाजूला पिंडा (बसायचं पाट) घेऊन कोवळ्या उन्हात पाठ शेकत बसलेली अन आपल्या नातीचे केस विंचरत त्या केसांतील उवा काढणारी आजीबाई त्याच्या नजरेसमोर जशीच्या तशी उभी राहते. ओटीवर तासंतास चालणाऱ्या वार्तांमध्ये बायकां नक्की काय बोलत असतील ह्याचं त्याला आजही कुतूहल वाटत आलं आहे.

पावसाळ्यात छपराला बांधलेल्या झावळ्यांच्या झडीला न जुमानता ओटीवर आलेल्या पावसाच्या माऱ्यापेक्षा म्हाताऱ्या-कोताऱ्यांच्या उसाशाने ओटा अधिक मलूल झालेला आहे. ओटीवरील आढ्याला टांगवलेल्या कंदिलाने किंवा उताराच्या (उंबरा)

बाजूला, वाऱ्याच्या झोताने विझणार नाही अशा बेताने ठेवलेल्या घासलेटच्या दिव्याने, मिट्ट अंधारात आपण एकटेच नसून आपल्यासोबत कुणीतरी जागं असल्याची धीर देणारी जाणीव ओट्याला करून दिली आहे. घरची कर्ती मंडळी शेतीवाडीत गेल्यावर, ओट्याने म्हाताऱ्या-कोताऱ्यांचे उसासे ऐकलेले आहेत. घरचे सगळेच लोक शेतीवाडीत गेल्यावर निर्माण झालेल्या सक्तीच्या एकांतवासात, कौलांमध्ये बसवलेल्या काचेतून ओटीवर येणाऱ्या उन्हाच्या तिरीपी सोबत तो खेळला आहे.

दारू पिऊन बायकोला मारणारा नवरा पाहून, आपण काहीही करू शकत नाही या भावनेने ओटा हतबल झाला आहे. कधी कधी एखाद्या खमक्या बाईने दारू पिऊन आलेल्या आपल्या नवऱ्याला घरात न घेण्याची हिंमत दाखविलेली पाहून ओट्याला भरून आलं आहे.

गावोगाव फिरणाऱ्या न्हाव्याला ओटीवर बसूवून घरातील लहानथोर सगळ्यांचे एकसाथ, एकाच प्रकारे कापल्या जाणाऱ्या केसांची आठवण, कितीही झाडले तरी जमिनीवरील पोपड्यात अडकून राहणाऱ्या केसांसारखी ओट्याच्या मनात अडकून पडली आहे. उन्हाळ्याच्या दिवसात गावात येणारे फेरीवाले, घरमालकाच्या परवानगीची वाटही न पाहता हिंदोळ्यात, माशीत, बलकावात किंवा जमिनीवर खुशाल पथारी पसरतात या आपल्या सर्वसमावेशकपणाबद्दल ओट्याला स्वतःचाच अभिमान वाटतो आहे.

सासू सुनांचे भांडण, एकाच घरातील कुटुंबा-कुटुंबातील भांडणं, एका घरच्यांचे दुसऱ्या घरच्यांशी भांडण अशी असंख्य भांडणे ओटी नावाच्या रणभूमीवर लढली गेली आहेत. रागाच्या भरात भांडण करणाऱ्या ह्याच लोकांना अडीअडचणीच्या वेळी एकमेकांसाठी वेळी-अवेळी धावतानाही ह्याच ओट्याने पाहिले आहे.

शेजार-पाजारच्या सगळ्या बायकांना बोलावून, आख्या गावातील मुसळ गोळा करून पापडाचा लोळ कुटताना, त्याच्या गोळण्या करताना, पापड लाटताना, अंगणात पापड वाळत घालताना अन राखणीसाठी बाजूला बसलेल्या पोरांकडून पापडाच्या गोळण्या मटकावल्या जाताना ह्याच ओट्याने पाहिले असेल.

भाच्याची हाडीसोळीची वरात जेव्हा बँडवाल्या सोबत आली तेव्हा भाचेमंडळी सोबत ओट्याने देखील आनंदाने चार उड्या मारल्या होत्या. मामाच्या मांडीवर बसून भाच्याचा मोआ (समारंभपूर्वक हजामत) करताना गावकऱ्यांनी मामाच्या टकलावर टाकलेल्या मेणबत्तीच्या थेंबांचा चटका लागून मामासोबत ओटा देखील विव्हळला आहे.

लाडकी लेक सासरी जाताना आपल्या बय-बाबाला बिलगली, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रू ह्याच ओट्याने गुपचूप पिऊन टाकले आहेत.

घरातली पोरं उन्हाळ्याच्या सुट्टीत आख्खा गाव पायी फिरायची, भर उन्हात शिवारात क्रिकेट खेळायची आणि घरी येऊन ओटीवरील हिंदोळ्यात किंवा माशीत बसून सुखावायची. पण जेव्हापासून त्यांना डिग्री आणि सेल्सियस कळायला लागले तेव्हापासून त्यांना उन्हाचा प्रचंड त्रास होऊ लागला, बेडरूम मधील एसी मधे शिरल्याशिवाय त्यांच्या जीवाची तलखी शांत होईनाशी झाली. या जाणिवेने ओट्याच्या मनाची तलखी मात्र वाढली आहे.

ओटीवर कोंबड्यांनी शी केली तर ती कागदाने उचलून अंगणात फेकून द्यायची, बारक्या पोरांनी ओटीवर शी केली तर पेंढ्याच्या गुंडीने ते साफ करून केवळ तेव्हढा एखाद स्क्वेअर फुटाचा भाग शेणाने सारवला की झालं. स्वच्छतेचा उगीच बाऊ करणे हे ओट्याच्या स्वभावातच नाहीये. ओटीवरच्या वातावरणात ऑक्सिजन आणि हायड्रोजनपेक्षा मोकळेपणा आणि साधेपणा अधिक भरलेला होता. ओट्यावर आमची माती होती तोवर माणसे एक होती. मातीच्या जागी मार्बल नावाचा पांढरा दगड आला आणि माणसेही दगडी झाली. एखाद्याच्या उंचीवरून त्याची पात्रता ठरविण्याचा उथळपणा ओट्याने कधी केला नाही. सतत पायरीच्या सोबत राहूनही हा पायरीचा अवगुण ओट्याला कधी चिकटला नाही.

ओटीवर एका बाजूला पहिल्यांदा जेव्हा पेढीची खोली बांधायला सुरुवात झाली तेव्हा ओट्याच्या मनात, कुपाऱ्यांच्या जीवनात दिवसेंदिवस आपले महत्व अन त्यांच्या काळजात आपली जागा कमी होत जाणार अशी पाल चुकचुकली होती... आणि दुर्दैवाने तसेच झाले. नव्या फॅशनचे, केवळ नावालाच ओटा असलेले बंगले आले आणि जेन-झी ची पोरं ओटीवर क्षणभरही न थांबता ड्रॉईंग रूममधील ओटीटीवर रमू लागली.

# लाईक्स, फॉलोअर्स आणि वास्तव: किशोरवयीन जगण्याची नवी कथा

**■ सचिन मेंडिस, बोळींज.**

आजच्या डिजिटल युगात किशोरवयीन मुलांचे जगणं स्क्रीनच्या उजेडात आकार घेतं आहे. मोबाईल हातात घेतल्यापासून ते सोशल मीडियावरील पहिल्या पोस्टपर्यंत, त्यांच्या भावना, ओळख आणि आत्मसन्मान या सर्वांचा एक अदृश्य धागा 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'शी जोडला गेला आहे. ही पिढी संवाद, मैत्री, आणि स्वप्नं डिजिटल माध्यमातून जगते. पण या आभासी जगात लोकप्रियतेचा शोध घेताना अनेकदा वास्तव आणि डिजिटल प्रतिमा यातील सीमारेषा धूसर होते. अशा या नव्या जगण्याच्या कथेत, सामाजिक माध्यमांवरील मान्यता हे फक्त कौतुकाचे साधन राहिलेले नाही, तर आत्मसन्मान मोजण्याचे नवे मापदंड बनले आहे.

किशोरवय हा स्वतःची ओळख घडवण्याचा काळ असतो. या वयात प्रत्येकजण स्वतःला समजून घेण्याचा, स्वीकार मिळवण्याचा प्रयत्न करत असतो. सोशल मीडिया या प्रवासात आरसा बनतो, पण हा आरसा अनेकदा फिल्टर लावलेला असतो. फोटोवर मिळालेल्या शंभर लाईक्समुळे काही क्षणांसाठी आनंद मिळतो, पण जेव्हा तो प्रतिसाद कमी होतो, तेव्हा असुरक्षिततेची भावना वाढते. हळूहळू त्यांच्या आत्मविश्वासाचा पाया डिजिटल प्रतिसादावर उभा राहू लागतो.

याचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावरही खोलवर होतो. सतत तुलना, अपुरी मान्यता आणि नकारात्मक प्रतिक्रिया यामुळे अनेक किशोरवयीन मुलांमध्ये ताण, चिंता, अस्वस्थता आणि नैराश्य वाढताना दिसते. काही वेळा सोशल मीडियावर मिळणाऱ्या नकारात्मक कमेंट्स किंवा 'ट्रोलिंग'मुळे भावनिक वेदना आणि आत्मविश्वासाचा ऱ्हास होतो. झोपेची कमतरता, एकाकीपणा आणि स्वतःबद्दल असमाधान या समस्या त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनतात. मनोवैज्ञानिकांच्या मते, सततच्या डिजिटल दडपणामुळे किशोरवयीन मेंदू सतत 'मान्यता मिळवण्याच्या' मोडमध्ये राहतो, ज्यामुळे मेंदूच्या भावनिक स्थैर्यावर परिणाम होतो. मानसिक आरोग्य मजबूत ठेवण्यासाठी सोशल

मीडियाशी थोडं अंतर राखणं, प्रत्यक्ष जीवनातील संबंध जोपासणं आणि आपल्या भावना खुलेपणाने व्यक्त करणं गरजेचं आहे.

इन्स्टाग्रामवरील परिपूर्ण चेहेरे, टिकटॉकवरील स्टाइलिश व्हिडिओ, आणि इतरांच्या 'सुखी' पोस्ट पाहून किशोरवयीन मन नकळत तुलना करू लागते. "मी तसा का नाही?", "माझ्याकडे तसं का नाही?"  हे प्रश्न त्यांच्या मनात उमटतात. पण त्यांना कळत नाही की या आभासी जगात प्रत्येकजण आपले फक्त सर्वोत्तम क्षण दाखवतो, वास्तव नव्हे. परिणामी, वास्तव जीवन आणि डिजिटल प्रतिमा यातील अंतर वाढत जातं.

तरीही, सोशल मीडियाचा दुसरा चेहरा आशादायक आहे. अनेक मुलं या माध्यमातून आपली सर्जनशीलता व्यक्त करत आहेत. संगीत, नृत्य, चित्रकला, लेखन, सामाजिक विचार अशा विविध क्षेत्रांत ते आपला आवाज मांडत आहेत. डिजिटल मंचावर त्यांना प्रोत्साहन मिळतं, समान विचारांच्या लोकांशी ओळख वाढते, आणि आत्मविश्वासही फुलतो. योग्य वापर केल्यास सोशल मीडिया ही प्रेरणेची आणि स्वअभिव्यक्तीची एक सुंदर जागा ठरू शकते.

मात्र, या सगळ्या प्रक्रियेत संतुलन राखणे अत्यंत गरजेचे आहे. पालक, शिक्षक आणि समाजाने या पिढीला मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. मुलांनीही हे समजून घेतले पाहिजे की लाईक्स आणि फॉलोअर्स हे केवळ आकडे आहेत. ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची किंमत ठरवत नाहीत. खरा आनंद मैत्रीत, कौटुंबिक नात्यांत, आणि स्वतःच्या प्रयत्नांत असतो. वेळोवेळी स्क्रीनपासून दूर जाऊन वास्तव जगाचा अनुभव घेणे, कुटुंबासोबत संवाद साधणे आणि स्वतःच्या आवडी जोपासणे हे अधिक समाधानदायी ठरते.

शेवटी, आजच्या डिजिटल पिढीसमोर सर्वात मोठं आव्हान म्हणजे स्वतःवरचा विश्वास टिकवणं. सोशल मीडियावर मिळणारी मान्यता ही क्षणभंगुर असते, पण स्वतःबद्दलची प्रामाणिक भावना आणि आत्मसन्मान हेच दीर्घकाळ टिकणारे मूल्य आहे. या नव्या युगातील किशोरवयीन मुलांनी डिजिटल जगाचा वापर स्वतःचा आवाज मांडण्यासाठी करावा, पण स्वतःची ओळख त्या स्क्रीनच्या उजेडात हरवू देऊ नये. कारण खऱ्या आयुष्यातील प्रकाश हा कोणत्याही लाईक्सपेक्षा अधिक तेजस्वी असतो.

# रेशीमगाठी...!!

■ संगीता वाझ, वसई

नवराबायको म्हटलं की तिथे पहिली येते ती स्वामित्वाची भावना नि स्वामित्व आलं की तिथे अपेक्षा ह्या आल्याच, अपेक्षा आल्या की ओघाने अपेक्षाभंगही आलाच... नि हा अपेक्षाभंगच मग नात्यात कटुता, दुरावा आणतो. ही कटुता नात्यातील गोडवा संपवते नि मग उरतो तो निव्वळ रूक्ष व्यवहार. मारून मुटकून मुखवट्याआडून केलेला निव्वळ दिखावा, कधीही न संपणारा...

काही दिवसांपूर्वी आम्ही काही मैत्रिणी एकत्र जमलो होतो. गप्पा-गप्पांमध्ये विषय निघाला. घटस्फोटानंतर बायकोला alimony म्हणजे पोटगी मिळावी की मिळू नये. प्रत्येकीने आपापली मते मांडायला सुरूवात केली. एकंदरीत सूर 'पोटगी मिळू नये' ह्या मताकडे जरा जास्त झुकणारा होता नि गंमत म्हणजे असं मत मांडणाऱ्या साऱ्या स्त्रियाच होत्या. त्यांच्यामते एवढा घटस्फोट घेतच आहात तर मग स्वतःच्या हिमतीवर घ्या. नाहीतर मुकाट तडजोड करून लग्न/संसार टिकवा.

नेहमीप्रमाणे इथेही मी odd one out होते. मुळात लोकं घटस्फोटाला नेहमी इतकं निगेटिव्हली का घेतात तेच कळत नाही. अरे कुणासाठी तरी तो एक सुटकेचा मार्ग असू शकतो. 'विवाह हे एक पवित्र बंधन आहे, लग्नगाठी स्वर्गात बांधल्या जातात.' वगैरे भंपक समाजमान्यतांना धरून राहताना नि लोकं काय म्हणतील / समाज काय म्हणेल या असल्या मिलियन डॉलर प्रश्नाला कुरवाळत तडजोडीच्या नावाखाली घुसमटीत आयुष्य जगण्यापेक्षा घटस्फोट हा पर्याय केव्हाही चांगलाच.

जमतच नसेल, पटतच नसेल, सहनच होत नसेल तर फारकत घेण्यात काय हरकत ? एखादं नातं जबरदस्तीने लादण्यात नि बळजबरीने ते रेटण्यात तरी काय हशील ?

मुळात प्रत्येक गोष्टीला नैतिक / अनैतिकतेचं लेबल लावून ती पापपुण्याच्या तराजूत तोलण्याची आपणा भारतीयांना सवयच आहे. मग तो शरीराचा व्यवहार असो, मनाचा व्यवहार असो किंवा मग जगण्याचा. प्रत्येक गोष्टींचं फालतू उदात्तीकरण करत असतो आपण.

तसं पाहिलं तर मुळात लग्न हा एक शुद्ध व्यवहारच आहे. (अगदी निरखून पारखून खेळलेला एक जुगारच म्हणा हवं तर.) कालांतराने जर तो व्यवहार फसला तर नुकसानभरपाई ही द्यावीच लागणार. कोणत्याही व्यवहाराचा तो एक उसूलच आहे.

आता तुम्ही म्हणाल की मग ही नुकसानभरपाई (पोटगी) नेहमी बायकोलाच का मिळावी नवऱ्याकडून. vice versa का नाही. एरवी स्त्रीपुरूष समानता, स्त्रीमुक्ती वगैरे मोठमोठ्या गप्पा हाणताच ना. मग आता घटस्फोटानंतरही स्वतः कमवा आणि खा.

तर इथे एक गोष्ट लक्षात घ्या की घटस्फोट हा अगतिकतेतून आलेला असतो. कुठलीही स्त्री (नि जेन्युईन पुरूषही) सहजासहजी या निर्णयाप्रत आलेली नसते. या निर्णयाआधी नि नंतरही तिलाच खूप काही भोगायचं असतं. येणाऱ्या मानसिक, भावनिक, सामाजिक, आर्थिक संकटांना एकटीने लढायचं असतं. शिक्के तिच्यावरच बसणार असतात. भले चुक असो/नको. बदनाम तीच होणार असते. पुरूष (नवरा) ह्यातून अगदी सहज निसटून काही काळाने पुन्हा बोहोल्यावर चढायला मोकळा असणारच असतो. तिच्यासाठी मात्र हे सारं तेवढं सोपं नसते. तिने केलेल्या या त्यागाची किंमत म्हणा हवं तर पण तिला पोटगी ही मिळायलाच हवी !

दुसरी गोष्ट... ती कितीही उच्चशिक्षित असली, कमावती असली तरी तिचं earning हे नेहमीच secondary असते. लग्नानंतर तिचं मुख्य कार्यक्षेत्र हे घर-संसार, मातृत्व, मुलांचं संगोपन हेच होऊन बसते. त्यामुळे पुरूष जितका career-oriented होतो तितकं इच्छा असूनही तिला होता येत नाही. कधीतरी नोकरीला मग ब्रेक लागतो, कधीतरी मुलांसाठी तडजोड करावी लागते नि मग अनिच्छेने नोकरीत धरसोडपणा येतो. अशावेळी तिची ती कमाई तिच्या भविष्यकालीन तरतूदींसाठी sufficient नसते... त्यामुळे तिला पोटगी ही मिळायलाच हवी !

तिसरा नि महत्वाचा मुद्दा म्हणजे... घटस्फोटानंतर मुलांची जबाबदारी, त्यांचं संगोपन हे आईकडेच जाते (छोटी असतील तर कायद्याने नि समज आलेली असतील तर स्वेच्छेने ती आईजवळ राहणेच पसंत करतात) अशावेळी बाप या नात्याने मुलांच्या संगोपनाची भविष्यकालीन जबाबदारी त्याने उचलायलाच हवी.

बाकी मला इथे घटस्फोटाचं glorification वगैरे अजिबात करायचं नाहीय् पण फक्त एवढंच सांगायचं की मुळात तडजोड करून लग्न टिकवण्याचा केलेला हा प्रयत्न खरंच यशस्वी होतो का ? तडजोडीनंतर ती/तो आपल्या संसारात पुढे खरंच सुखी, आनंदी होतात का की निव्वळ समाजाच्या, नातेवाईकांच्या भीतीपोटी. दबावापोटी असतो हा

निर्णय. कारण केलेली तडजोड ही घुसमट वाढवणारी नसावी. तडजोडीनंतरचं वैवाहिक जीवन फार आनंदी नसलं तरी निदान 'सुसह्य' असावं. अन्यथा त्या तडजोडीलाही काहीच अर्थ नसतो. नपेक्षा मग 'घटस्फोट' हे better option ठरेल.

बाकी आपल्या भारतीय समाजाने तसंही विवाहसंस्थेला प्रमाणाबाहेर महत्व देऊन ठेवलंय. पण पावित्र्याच्या वेष्टनात गुंडाळून त्याचं कितीही स्तोम माजवलं तरीही तो असतो फक्त नि फक्त एक शुद्ध व्यवहार.

लग्न झालं... नवराबायकोच्या नात्याचा शिक्का बसला म्हणजे आता त्या दोघात प्रेम निर्माण झालंच पाहिजे किंवा मग ते तसं होणारच अशी अपेक्षा म्हणजे तद्दन वेडेपणा.

तसंही जगात कुणीही कुणासाठी जन्माला वगैरे आलेलं नसतं, पण तुम्ही त्या ‘कुणा’ला तरी तुमच्यासाठी जगायला मात्र निश्चित लावू शकता. पती-पत्नीचं नातं हे इतर नात्यांसारखं नैसर्गिक नसतं तर ते एक (बनवून) जमवलेलं/निवडलेलं नातं असतं नि विवाह टिकवण्यासाठी हे निवडलेलं नातं निभावणं ही पण एक कलाच असते. अशा या नात्यातील कर्तव्ये पार पाडणे म्हणजे केवळ शारिरीक, भौतिक गरजा पूर्ण करणे नसून प्रसंगी आपल्या जोडीदाराला हवा तो मानसिक आधार देणे. त्याची/तिची भावनिक निकड ओळखून ती भागवणे हेही अंतर्भूत आहे पण आपण नेमके इथेच कमी पडतो. 'नाती' ही फक्त मिरवण्यासाठी नसावीत तर ती जगणं सुसह्य करणारी, जगण्याला अर्थ प्राप्त करून देणारी असावीत.

## पुस्तक परीक्षण:

# 'ऑस्ट्रेलियन स्मृती'

## (लेखक-रेमंड मच्याडो)

**■ संतोष गायकवाड, वसई**

आजच्या झपाट्याने होणाऱ्या पर्यटनाच्या, इंस्टाग्राम रील्सच्या युगात, श्री. रेमंड मच्याडो यांचे 'ऑस्ट्रेलियन स्मृती' आपल्याला आठवण करून देते की प्रवास म्हणजे केवळ दर्शन किंवा सहल नव्हे. तो एक चिंतनाचा, भेटी-गाठींचा आणि काही वेळा यात्रेचाही अनुभव असतो, जो आत्मा आणि इंद्रियांची सफर केल्यावर परतीच्या विमानानंतरही मनात रेंगाळत राहतो.

मच्याडो यांना विचारपूर्वक लेखनाचे वेगळेच भान आहे. रोम येथील रोमस्थित व्हॅटिकन रेडिओमधील माजी रेडिओ जर्नलिस्ट म्हणून त्यांचा आवाज परिचित आहे. त्यांनी पोप बेनेडिक्ट सोळावे, पोप फ्रान्सिस आणि संत मदर तेरेसा यांच्या चरित्रांची लेखनयात्रा केली आहे. तसेच मराठी कादंबऱ्या 'कोपात', 'जाना कुमारी' आणि इंग्रजीत 'टू टेस्ट ऑफ द फॉरबीडन फ्रूट' व 'द मेलबर्न मॅगपाय' यांसारख्या साहित्यकृती निर्माण केल्या आहेत. या नव्या पुस्तकात त्यांनी दृष्टी ऑस्ट्रेलियाकडे वळवली आहे – पण पर्यटक मार्गदर्शकासारखी नव्हे तर मैत्रीपूर्ण चिंतनाच्या शैलीत!

**चित्रफित पलीकडची ऑस्ट्रेलिया** : हे प्रवासवर्णन मेलबर्न, सिडनी आणि ॲडलेड या शहरांतून नेते. मेलबर्न क्रिकेट ग्राउंड, मेलबर्न म्युझियम, ग्रेट ओशन रोडवरील 'ट्वेल्व अपॉस्ल्स', ॲडलेडमधील भव्य कॅथेड्रल्स, सिडनी ऑपेरा हाऊस, ब्लू माउंटन्समधील 'थ्री सिस्टर्स' या ठिकाणांचा परिचय करून देताना ते त्यांना केवळ पोस्टकार्डच्या चौकटीत अडकवून ठेवत नाहीत. प्रत्येक थांबा नवी विचारप्रेरणा ठरतो. मेलबर्नच्या बाजारातील व्हिएतनामी सँडविच जागतिक असमानतेवरचं चिंतन बनते; एक साधे बार्बेक्यू स्थलांतरित समुदायांनी ऑस्ट्रेलियन खाद्यसंस्कृतीत आणलेले बदल दाखवते; तर कॅथेड्रलमधले मौन गोंगाटाच्या युगातील श्रद्धेबद्दलचे ध्यान ठरते.

**शहररचना म्हणजे रूपक** : व्हिक्टोरियन घरांची कलाकुसरीची गॅलरी आणि व्हरांड्यांची शोभा ही काचेच्या गगनचुंबी इमारतींबरोबर जिवंत नांदते, हे पाहून मच्याडो म्हणतात की परंपरा आणि आधुनिकता एकत्र नांदू शकतात. तर पंखासारखे झळाळते 'सिडनी ऑपेरा हाऊस' आधुनिकतेचा ध्वजच आहे, पण तो उभा आहे अशा किनाऱ्यावर ज्यावर अजूनही 'सिडनी हार्बर ब्रिज' सारख्या भूतकाळाच्या छटा उमटवतात.

**खाद्यसंस्कृती, कुटुंब आणि स्थलांतर** : येथे खाद्यपदार्थ केवळ चवीचा अनुभव न राहता स्थलांतराचा आरसा बनतात. व्हिएतनामी सँडविच, लेबनीज श्वर्मा किंवा भारतीय व श्रीलंकन मसाल्यांच्या गंधात, समुद्र ओलांडून आलेली स्वप्ने, संघर्ष आणि संस्कृती गुंफलेली आहेत. मच्याडो सांगतात की स्थलांतर हे केवळ भौगोलिक नसते. ते स्मृती, ओळख आणि संधी यांचे गुंफलेले वस्त्र असते, जेथे सौंदर्य आणि वेदना नेहमी एकत्र असतात. हे प्रवासवर्णन कुटुंबजीवनाशीही घट्ट बांधलेले आहे. मेलबर्नमध्ये मुलाच्या कुटुंबाबरोबर घालवलेला काळ, शाळेच्या फेऱ्या, कॉफीचे मग, अगदी उंटाच्या मांसाचा श्वर्माही कथेत सामावतो. घरगुती अनुभव आणि जागतिक अनुभव सहजपणे मिसळतात आणि वाचकांना निकटता व अंतर्दृष्टी एकत्र मिळते.

**समाजावरील चिंतन** : 'ऑस्ट्रेलियन स्मृती' चे वैशिष्ट्य म्हणजे ते मच्याडोंचे पर्यटनाच्या सुखद अनुभवापलीकडे जाऊन सार्वजनिक जीवन व समाज व्यवस्थेबद्दल विचार करण्याचे धाडस. ते ऑस्ट्रेलियन किंवा पाश्चात्य नागरी संस्कृतीतील शिस्तीची तुलना आशियाई सवयींशी करतात. त्यांच्या मते, सार्वजनिक अराजकता ही केवळ गोंधळ नसून सामायिक मूल्यांचा अभाव दर्शवते. भारतात नागरिक अशा परिस्थितीत एकत्र येतात; तर पाश्चिमात्य समाजात लोक अधिक अलिप्त राहतात - कदाचित वैयक्तिक सीमांचा आदर म्हणून. दोन्ही पद्धतीत काही बरोबर किंवा काही चुकीचेही असू शकते, परंतु ते त्या समाजाच्या रचनेबद्दल खोल अंतर्दृष्टी देतात. इतरत्र मच्याडो इशारा देतात की संपत्ती, सुखसोयी किंवा माहिती यांचा अतिरेक झाल्यास मानवी वेदनांची जाणीव बोथट होऊ शकते. यावर उपाय म्हणजे जागरूकता, अंतःकरणाचा आवाज आणि समृद्धीच्या मधोमधही अंतर्मन जागं ठेवण्याची नम्रता.

**आनंदी, आत्मीय सफर** : या प्रवासवर्णनाची शैली सौम्य आणि सख्ख्यासारखी आहे. मच्याडो प्रभाव टाकण्यासाठी लिहीत नाहीत, तर जाणीव करून घेण्यासाठी लिहीतात.

मग ते ब्लू माउंटन्समधील 'श्री सिस्टर्स' असोत, मेलबर्न म्युझियमचा गजबजलेला परिसर असो किंवा कॅथेड्रलचा शांत कोपरा. त्यांच्या आवाजात कृतज्ञता, चिंतन आणि हलकंफुलकं विनोदांचा सूर सापडतो.

शेवटी, ऑस्ट्रेलियन स्मृती हे प्रवासाबद्दल कमी, पण प्रवास जागृत करून देणाऱ्या त्या विचारांबद्दल अधिक आहे. हे भारतीय वाचकांना ऑस्ट्रेलियाकडे केवळ परदेशी रंगभूमी म्हणून नव्हे तर स्थलांतर, शिस्त, असमानता,  संस्कृती आणि कुटुंब याबद्दलच्या आपल्या प्रश्नांचा आरसा म्हणून पाहायला प्रवृत्त करते. त्यांचे लेखन, प्रवास म्हणजे पलायन नव्हे, तर लोकांशी, संस्कृतींशी आणि शेवटी स्वतःशी भेट घडविते. प्रस्तावनामध्ये रेव्ह. मॉन्सिनिओर फ्रान्सिस कोरिया म्हणतात की हे प्रवासवर्णन केवळ 'निसर्गचित्रांचे दर्शन' नाही, तर 'मानवी आत्म्याच्या अंतरंगातले दर्शन' आहे. हेच या पुस्तकाचे खरे यशोगान आहे: प्रवासाला ते कृतज्ञतेचे, आपलेपणाचे आणि जीवनाच्या अर्थाचे ध्यान बनवतात; निरीक्षणाला ते सहप्रवासात रूपांतरित करतात.

जे प्रवास केवळ स्थलांतरासाठी नव्हे तर समजून घेण्यासाठी करतात, त्यांच्यासाठी ऑस्ट्रेलियन स्मृती हा एक समाधानकारक अनुभव ठरतो. हे चमकदार मार्गदर्शक पुस्तक नाही, पण तुमचा पुढचा प्रवास - परदेशात असो वा आपल्या परिसरात - पाहण्याचा दृष्टीकोन बदलू शकेल. श्री. रेमंड मच्याडो स्वतः लिहितातः "हा एक आनंददायी, जीवन समृद्ध करणारा आणि आत्म्याला ताजेतवाने करणारा अनुभव आहे, जो विचारांना गहिराई देतो, मनाला शांती व आनंद देऊन उबदार बनवतो."

# आशेचे यात्रेकरू होण्यासाठी

■ सायमन मार्टिन, ९४२१५४९६६६

प्रकाश होवो आणि प्रकाश झाला. त्याच प्रकाशाने आमची जीवनं उजळली. कळायला लागल्यापासून त्याच प्रकाशाचा मागोवा घेत आलोय. ख्रिस्त सोबत होता म्हणूनच उजेड आणि अंधारातला भेद कळू लागला. लेखक म्हणून आजच्या परिस्थितीचं विश्लेषण करणे आवश्यक आहे. काय जाणवते आणि काय खटकते याचा धांडोळा घेत असतानाच काय करायला हवं यावरही बोलणं गरजेचं असते.

लेखकाने स्वप्न पाहायला हवं. लेखकाने आपल्या समाजाला स्वप्नांच्या दिशेने न्यायला हवं. अशी स्वप्नं जेथे आपल्या प्रतिभेला पंख फुटतील. फर्नांदो पेसो नावाचा पोर्तुगीज कवी म्हणतो

स्वप्न पाहण्याची कला

कष्ट साध्य आहे

कारण ही निष्क्रियतेची कला आहे.

यात कोणतेही प्रयत्न न करण्याचे

प्रयत्न करावे लागतात.

तेही पूर्ण एकाग्र होऊन.

जो समाज स्वप्न पाहतो, जो समाज स्वप्नांचा पाठपुरावा करतो तोच समाज आंतर्बाह्य बदल घडवून आणू शकतो. समाजाला स्वप्नाच्या दिशेने नेण्याचं कार्य लेखक, कलावंत करीत असतात म्हणून एकत्र यायचं आणि शब्दांचा उत्सव साजरा करायचा.

दुभंगलेला समाज आणि फुटलेला तुटलेला माणूस सांधण्यासाठी साहित्य असते. आमच्या चिरफळ्या उडालेल्या आहेत कारण आम्ही गटात तटात दुभंगलेलो आहोत. आमच्यात संवाद नसल्यामुळे आमचे शब्द हरवले आहेत. निसर्गाबरोबरचा आमचा संवाद संपलेला आहे. आमचा मानव समूहाबरोबरचा संवाद संपलेला आहे. आमचा स्वत:बरोबरचा संवाद संपलेला आहे म्हणून आम्ही भीतीग्रस्त आहोत.

हा असा काळ आहे जेथे लिहिता वाचता येणे हा गुन्हा आहे

विचार करता येणे हा घोर अपराध आहे

रात्रभर जागरण हा गुन्हा आहे डोळे उघडे ठेवून चालणं हा गुन्हा आहे

देवाधर्मावर संशय घेणे हा गुन्हा आहे

हाती शस्त्र नसणे हा गुन्हा आहे शस्त्र असूनही त्याचा वापर न करणे हा गुन्हा आहे

लिहिणारे बोलणारे वाचणारे विचार करणारे जिवंत असणं हा गुन्हा आहे

इतकं सारं होऊनही एखादा सडक छाप उच्च रवाने मुक्तीचे गीत गात असेल तर तो दखलपात्र गुन्हा आहे

कान डोळे उघडे असतील तर तुम्हाला ऐकू येऊ शकतो शस्त्रांचा खणखणाट आणि लेखकाच्या घरावर चाललेला गोळ्यांचा वर्षाव.

या सगळ्या आक्रीतातून केवळ साहित्यच माणसाला बाहेर काढू शकते म्हणून साहित्य आणि विचारा बरोबर फारकत घेऊन चालणार नाही कारण बोलण्याची किंमत मोजावी लागते आणि न बोलण्याची देखील. आपण बोलणं थांबवलं आहे, आपण विचार करणं थांबवलं आहे त्यामुळे आपल्या दिशा काळवंडलेल्या आहेत. विचारांचा वारसा हरवला की समाज मृतप्राय होतो. त्यात पुन्हा खोट्या व काल्पनिक गोष्टी पद्धतशीरपणे पसरवल्या जात आहेत त्यामुळे आपण विद्वेषाचा अनुभव घेत आहोत. जे तंत्रज्ञान विकसित झालेलं आहे त्याचा वापर आपल्यावर पाळत ठेवण्यासाठी केला जात आहे. अदृश्य कॅमेऱ्याची पाळत आहे आपल्यावर. आमच्यासारखं बोला, एक धर्म, एक भाषा, एक पक्ष, एक संस्कृती हे आमचं तत्त्वज्ञान मान्य करा किंवा विचारहीन मांसाचा गोळा म्हणून जगत रहा. बोलाल तर लिस्ट वर याल. या परिस्थितीत ज्यांना जगण्याचीच भ्रांत आहे अशी सर्वसामान्य माणसं कुठला लढा उभारणार आहेत ? म्हणून लेखक महत्वाचा असतो. तो निद्रिस्त समाजाला जागं करण्याचं काम करतो.

आपण आंधळे का झालो? आपण बहिरे का झालो ?

आपण मुके का झालो?

आपण पांगळे का झालो? आपल्याला ठाऊक नाही कारण मुळात आपण आंधळे, बहिरे, मुके, पांगळे आहोत हेच आपल्याला ठाऊक नाही.

आंधळी मुकी जनता असली तरच आम्हाला सुखनैव राज्य करता येईल आणि लेखकाला व विचारी माणसाला हे भयाण वास्तव बदलायचं असते. भले तो अल्पमतात असेल पण त्याने बोलत राहिलं पाहिजे. दगडी तटबंदीला कायमच धडका देत राहिलं पाहिजे कारण आमच्याकडे कोणीतरी शब्द सोपवून गेला होता. मोठ्या विश्वासाने जतन, जोपासना करण्याच्या हेतूने आमची निवड करण्यात आली होती.

येशू ख्रिस्ताची एक सुंदर दृष्टांत कथा आहे. एक धनिक होता. तो परदेश प्रवासाला निघाला. जाण्यापूर्वी त्याने आपलं मौल्यवान धन आपल्या तीन विश्वासू दासाकडे सोपवलं. एकाकडे दहा हजार मोहरा दिल्या. दुसऱ्याकडे पाच हजार मोहरा दिल्या. तिसऱ्याकडे तीन हजार मोहरा दिल्या आणि तो त्यांना म्हणाला, मी परत येईपर्यंत यावर व्यापार उदीम करा आणि तो निशांत, निवांत होत आपल्या प्रवासाला निघून गेला. काही काळाच्या अवकाशानंतर तो आपल्या नगरात परत आला आणि त्याने आपल्या दासांना बोलावणे पाठवले. आपण दिलेल्या मोहराचे त्यांनी काय केले आहे याचा जाब त्याने त्यांना विचारला. पहिला दास आला आणि म्हणाला, महाराज तुम्ही दिलेल्या मोहरा घेऊन मी व्यापार केला आणि दहा हजाराच्या वर दहा हजाराची कमाई केली. यावर धनी त्याला म्हणाला, शाबास, भल्या दासा तू जो प्रामाणिकपणा दाखवलास त्याबद्दल मी आता पुष्कळावर तुझी नेमणूक करीन. तू आता माझ्या बरोबरीचा हो. माझ्या संपत्तीचा वाटेकरी होण्याचा पात्रतेचा आहेस तू.

दुसरा दास आला आणि म्हणाला, महाराज तुम्ही मला पाच हजार मोहरा दिल्या होत्या त्याच्या मी दुप्पट केल्या आहेत यावर धनी त्याला म्हणाला, शाब्बास भल्या दासा, तू देखील माझ्या बरोबरीचा होशील. मी तुला माझ्या संपत्तीचा वाटेकरी करीत आहे. तिसरा दास आला आणि म्हणाला, महाराज ह्या घ्या तुमच्या मोहरा, मोजून घ्या तुमच्या मोहरा. मी त्या एका रुमालात गुंडाळून, जमिनीत गाडून ठेवल्या होत्या. मला ठाऊक आहे तुम्ही फारच कडक शिस्तीचे आहात. जेथे पेरलं नाही तेथून तुम्ही कापणी करता. म्हणून मला तुमचे भय वाटले. यावर धनी म्हणाला, मुर्खा, तुझ्या शब्दानेच मी तुझा न्याय करीन. तू म्हणतोस भीतीमुळे तू मोहरांचा वापर केला नाहीस, तुला ठाऊक होते की मी कडक शिस्तीचा आहे तर मग मी सांगितल्याप्रमाणे तू का नाही केलेस? ज्यासाठी तुला मोहरा दिल्या होत्या त्या कामासाठी तू त्याचा वापर का केला नाहीस? तू त्या जमिनीत गाडून ठेवल्या. तेव्हा त्या धन्याने आज्ञा केली, या मोहरा याच्याकडून काढून घ्या आणि ज्याच्याकडे वीस हजार मोहरा आहेत त्याला द्या. जो उत्तम विनीयोग

करतो त्याच्याकडे सोपवण्यात येते. जो दिलेला ठेवा गाडून, पुरून ठेवतो त्याच्याकडे जे आहे ते देखील काढून घेण्यात येईल.

शब्द आमच्याकडे मोठ्या विश्वासाने सोपवण्यात आले होते. त्यांची वाढ करावी, ते अनेकापर्यंत घेऊन जावेत ही लेखकाची प्रथम आणि अंतिम जबाबदारी असते म्हणून लेखकाने सत्य प्रकट करण्यासाठी बोलत राहिलं पाहिजे. बुद्ध असतील येशू असतील तुकारमा सारखे संत असतील, त्यांनी आपल्याकडे शब्द सोपवून ठेवले होते. ज्याद्वारे आम्हाला सत्य प्रकट करण्यात आलं होतं. त्याचा पुनरुच्चार करीत राहणे म्हणजे लेखक असणे आहे.

लेखक का लिहित असतो ? असा प्रश्न विचारला जातो. कारण त्याला दर्शन झालेलं असते. भारतीय तत्त्वज्ञानात ज्या वेगवेगळ्या विचारधारा आहेत त्याला दर्शन म्हणतात. देव नाकारणाऱ्या चार्वाकाचा देखील या दर्शनात समावेश करण्यात आलेला आहे म्हणून लिहिणे म्हणजे जाणून घेणे असते. लिहिणे म्हणजे जीवनाच्या दुखऱ्या स्कंधाला स्पर्श करणे असते. जे खोल अंधाऱ्या डोहात आत आत पाहू शकतात तेच प्रकाशाचं स्तोत्र रचू शकतात.

बोलून काय होणार आहे? लिहून काय होणार आहे? ही अफवा त्यांनीच पसरवलेली असते ज्यांना बोलणाऱ्याची आणि लिहिणाऱ्यांची भीती वाटत असते. आपण त्यांच्या कटाला जर बळी पडलो तर एक एक करून आपलाही बळी जाईल. म्हणून ऐकणाऱ्याला आपली भाषा अवगत नसली तरीही आपण बोलत राहायचं असते. त्यांना काही कळणारच नाही असं नाही. आपण बोलत असताना ते आपला चेहरा वाचतील आणि त्यातून आपला संवाद होईल. जेव्हा आपण बोलत राहू तेव्हाच आपण शरीराच्या पलीकडे जाऊ. आपण बोलणं चालू ठेवू आणि आपण शब्द होऊ. म्हणून लेखकाचे डोळे सताड उघडे असावेत. त्याचा दरवाजा उघडा असावा. त्याच्यापर्यंत आलेले विचार पारखून तपासून त्याने विचाराचा वाहक व्हावे. एक दिवस असा येईल की लेखक शब्दांना पाहू शकेल. त्यानंतर तो शब्दांना मनुष्यरूप देईल. मग त्याचे शब्द वाचणाऱ्यांना महाआनंदाची प्राप्ती करून देतील.

लेखक हा आशेचा यात्रेकरू असतो

लेखक हा आशेचा यात्रेकरू असतो म्हणून निराश न होता त्याने आशा वाढवावी आणि आशा फुलवावी. ज्या लेखनात विश्वास, आशा आणि प्रेम ही मूल्यं असतात ते

लेखन प्रेरणादायी असते कारण आशा जीवनावरील श्रद्धा बळकट करते. ज्यांनी जीवन जाणून घेतलेलं असते, ज्यांची जीवनावर श्रद्धा असते तेच प्रेम नावाचं चिरंतन मूल्य प्रकट करू शकतात. लेखकाच्या जगण्यात आणि एकूणच जीवन व्यवहारात प्रेम नसेल तर तो वाजणारी थाळी आणि झणझणणारी झांज आहे.

अनेकदा नकारात्मक भावाचं, द्वेष पसरवणारं आणि माणसा माणसामध्ये धर्म, जात, पंथ व भाषेच्या मुद्द्यावरून फूट पाडणारे विचार पसरवले जातात. त्यामुळे एकूणच वातावरण अस्वस्थ आणि भीतीग्रस्त होते. या सर्व अशांत काळात लेखकाची जबाबदारी मोलाची असते. त्याने सर्व प्रकारचे धोके पत्करून सत्य प्रकट करण्यासाठी कटिबद्ध व्हावे आणि आपल्या समाजाला परिपूर्ण जीवनाचा मार्ग दाखवावा. त्यासाठी लेखकाने कष्ट उपसण्याची तयारी ठेवली पाहिजे. उचलली लेखणी आणि पाडली कविता असं होत नसते. जेव्हा आपण जीवनाची जयंती साजरी करीत असतो, जेव्हा आपण जगण्याचा उत्सव करीत असतो तेव्हा थोडं थांबून मागचा धांडोळा घ्यायचा असतो.

चांगला शेतकरी जमीन एक वर्षांसाठी रिकामी ठेवतो. त्यानंतर तो राब करतो. त्यावेळेला जमीन स्वतःला जाळून घेते. तिला वेदना होतच असतील पण उद्याच्या उज्वल भविष्यासाठी केलेली ती पूर्वतयारी असते. पावसाचा शिडकावा झाला की त्याच जमिनीवर नांगर फिरवलं जातो. जमीन आत बाहेर फाटली जाते. हे सर्व उघड्या डोळ्यांनी बांधावर उभा असलेला पेरणारा न्याहाळत असतो. त्यानंतर आपली भरलेली ओंजळ तो रिकामी करतो. यालाच भूमीला अर्घ्य देणं असं म्हणतात. जाळून घेतल्यानंतर, शरीर फाडून घेतल्यानंतर व्यक्त झालेली ही कृतज्ञता असते. त्यानंतर उत्तम शेतकरी हिरवा कोंभ उगवून येण्याची वाट पाहत थांबतो. या वाट पाहण्यालाच साधना म्हणतात. जे अशी प्रतीक्षा करू शकतात त्यांच्या शेतात जे रुजून येते ते मनुष्य मात्राचे भरणपोषण करते.

शेतात उगवलेला कोवळा कोंभ म्हणजे शब्द असतो. शेतकरी येथे थांबत नाही तर त्यानंतर निगराणी आहे, खतपाणी आहे. दाणा भरून आल्यानंतर कापणी आहे, झोडणी आहे, मळणी आहे. पिकाचा भारा डोक्यावर घेऊन जाणारी बाई म्हणजे साक्षात कविता असते. पेरणी ते कापणी पर्यंतचा प्रवास म्हणजे लेखकाचे सृजन आहे. त्याचा सन्मान व्हावा म्हणून संमेलन आहे. एकत्र भेटणे आहे. म्हणूनच पेरणी करीत

राहायचं. काही काही बियाणं खडकावर पडेल, एखादं ऊन आलं की ते सुकून जाईल. काही बियाणं काट्याकुट्यात पडेल. त्यातलं काही रुजेल काही रुजणार नाही. काही मात्र सकस जमिनीवर पडेल. त्याला शंभर पट पिक येईल. काहीतरी रुजून येईल या आशेवर लेखक जगत असतो. या अंधाराच्या काळात सर्व धोके पत्करून म्हणूनच बोलत राहणे, लिहीत राहणे गरजेचं आहे.

ज्या काळात कविता लिहिणे हा दखलपात्र अपराध झालेला असताना, न्यायालयं कोसो मैल दूर गेलेली असताना, न्यायाधिशाच्या डोळ्यावरची पट्टी हरवलेली असताना. बोलण्यासाठी, लिहिण्यासाठी योग्य काळ नसतानाच्या युगात बोलत राहिलं पाहिजे. याच विश्वासावर की कुठलीच कबर सत्य दडपू शकत नाही.

# अवघे धरू पंथ!

■ स्टॅन्ली गोन्सालविस.
(stanleyg2013@gmail.com)

आज बँकेचा स्थापना दिवस साजरा होणार होता. रविवार असूनही कर्मचारी कामावर असल्याप्रमाणे तयारीत गुंतले होते. मुख्यालयातील सभागृहात तो रितीप्रमाणे साजरा होणार होता. व्यासपीठावर एका बाजूला बँकेच्या संस्थापक धर्मगुरूंचा अर्धपुतळा ठेवण्यात आला होता. समोर फुलांची सजावट होती. समई तेवत होती. मागे बॅकड्रॉपवर बँकेच्या नावाचा फ्लेक्स झळकत होता.

चेअरमनसाहेब अभ्यास दौऱ्यावर परदेशात गेल्यामुळे ज्येष्ठ संचालक व उपाध्यक्ष पास्कोल ह्यांना कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बहाल करण्यात आले होते. संचालकपदाची मुदत संपत आली होती. दोन-तीन महिन्यांत निवडणुका लागण्याची शक्यता होती. त्यामुळे पास्कोल हाती आलेल्या कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमाचे आमंत्रण त्वरित स्वीकारीत असत.

बँकेच्या महाव्यवस्थापक उर्फ सीईओंना काही तांत्रिक कारणांमुळे दीर्घ मुदतीच्या रजेवर जावे लागल्याने सीनियर साहाय्यक महाव्यवस्थापक परेरा कार्यभार सांभाळीत होते. सभागृहाच्या दारात ते व दोन संचालक - एडवर्ड आणि डिकुन्हा पास्कोल साहेबांची वाट पाहत उभे होते. सधन शेतकरी डिकुन्हाला 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल' गटातून संचालक मंडळावर आणण्यात पास्कोल ह्यांचा मोठा हातभार होता. दहावी पास 'इंडीपेंडन्ट' संचालक एडवर्डला संचालक मंडळात पास्कोलशिवाय कोणाचाच आधार नव्हता. पास्कोलनेच त्याची दोन-तीन कमिट्यांवर वर्णी लावली होती. कर्जवसुली कमिटीवर असल्यामुळेच त्याच्या कन्स्ट्रक्शन कंपनीचा भाग्योदय झाल्याचे इतर संचालक खासगीत बोलत असत.

"वेलकम, सर!" डिकुन्हा व एडवर्ड इतरांना ढकलून पुढे आले आणि त्यांनी पास्कोलशी हात मिळवले. परेरासुद्धा पुढे येऊन वाकून कुर्निसात करीत म्हणाले, "सर, थोडा उशीरच झालेला आहे. आपण स्टेजवरच जाऊ..."

तिकडे सूत्रसंचालिकेने उपस्थित संचालक व वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही व्यासपीठावर येण्याची विनंती केली. संस्थापक धर्मगुरूंच्या अर्धपुतळ्याला हार, समई प्रज्वलनाची औपचारिकता पूर्ण झाल्यावर सीनियर मॅनेजर इझाबेल मॅडमनी प्रास्ताविक सुरू केले. बँकेची स्थापना वगैरे बोलून झाल्यानंतर तिने सभाध्यक्षांचे लाडीक आवाजात कौतुकपुराण सुरू केले. ते ऐकून पास्कोलना अगदी गुदगुल्या होऊ लागल्या. तिचा एच. ओ. ला बदली मागणारा अर्ज आपल्या टेबलावर आल्याचे त्यांना आठवले. त्यांनी मनोमन त्यावर ओके असा शेरा मारून टाकला!

सभागृहात कुजबुज वाढलेली पाहून इझाबेल मॅडमनी आपले प्रास्तविक आवरते घेऊन कार्यकारी सीईओ परेरा ह्यांना बोलण्याची विनंती केली. परेरांना आज प्रथमच व्यासपीठावर झळकण्याची संधी मिळाली होती. टायची गाठ नीट करीत ते उठले आणि आपल्या काळात बँकेचा टर्नओव्हर किती वाढला आहे, एनपीए कसा खाली आला आहे वगैरे आकडेवारी वाचून दाखवायला सुरुवात केली. त्यावर कोपऱ्यातून टाळ्या वाजल्या. त्या टाळ्यांना आणखी प्रतिसाद मिळाल्याचे पाहून परेरा थँक्यू म्हणत खाली बसले.

"आता अध्यक्ष महोदय आपले मनोगत व्यक्त करतील", असे म्हणून इझाबेल मॅडमनी अध्यक्षांकडे पाहिले. पास्कोल चपापले. स्थापना दिन म्हणजे संस्थापकांबद्दल बोलणे भाग होते. पण एकूण गडबडीत त्यांना त्या व्यक्तीचे नाव -गाव, कार्य काही आठवेना. ते एक धर्मगुरू होते, एवढेच त्यांना ठाऊक होते. त्यांनी समोरच्या अर्धपुतळ्याकडे नजर टाकली. पुतळे काहीच बोलत नसतात. आपणच त्यांच्या मुखी सोयीने काही घालायचे असते, ह्या जाणिवेने ते अजून गडबडले. तशा तालुक्यातील सर्वच सहकारी संस्था कोणी ना कोणी फादरनीच स्थापन केलेल्या असल्याने त्यांना हे फादर नक्की कोण हे काही आठवत नव्हते.

त्यांनी हळूच डावीकडे बसलेल्या परेरांना विचारले.

"सर, तुम्ही मघाशी ज्या पुतळ्याला हार घातला ना तेच! ते समोर पाहा!" परेरा मोठ्या खुबीने आपले अज्ञान लपवित म्हणाले.

"ते ठाऊक आहे मला... नाव सांगा... नाव त्यांचं..." ते तोंडावर हसत, पण मनातून चडफडत म्हणाले.

तेव्हा परेरा पास्कोलच्या कानाला लागून घाईघाईत म्हणाले," रेव्हरंड फादर असे म्हणा... धर्मगुरूंचा त्याग, थोरवी, दूरदृष्टी असे काहीतरी द्या ठोकून... चालून जाईल बघा!"

पास्कोल मान डोलवत उठले. 'आपली बँक' व 'आपले फादर' हे इतरांप्रमाणेच त्यांचेही अगदी जिव्हाळ्याचे, म्हणजेच जिभेवरचे विषय होते. चारचौघांत ते ह्या विषयावर अगदी न थकता बोलत असत. त्यामुळे आज त्या संस्थापकांबद्दल बोलताना त्यांना अगदी भडभडून आले. ते ऐकून उपस्थितांचे डोळे पाणावले व त्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला! पास्कोलनी लांबूनच पुतळ्याला नमस्कार केला व ते खाली बसले.

त्यानंतर आणखी काही भाषणं, आभार प्रदर्शन वगैरे होऊन कार्यक्रम आटोपला.

एरवी कार्यक्रम पत्रिकेवर अखेरचा विषय 'चहापान' असायचा. पण योगायोगाने रविवार आल्याने 'भोजन' असा विषय होता. उपवास काळ चालू असल्याने भोजन ठेवावे की नको ह्यावर बराच काथ्याकूट झाला होता. त्यावर नेहमी ताबोर, वेलंकनी असे नोव्हेने करणारे व आपल्या व्हाट्सअप ग्रुपवर दररोज आजचे वाचन, धर्मगुरूंची प्रवचने इ. टाकणारे धर्मपरायण संचालक श्री. रॉय ह्यांनी अशी राय दिली की, रविवारचा दिवस उपवास काळात गणला जात नाही. तो भले 'कायद्याचा दिवस' असला तरी 'फ्री' असतो! त्यामुळे सर्वांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आणि भोजनाचा ठराव बहुत जनांच्या एकमताने संमत झाला!

त्यामुळेच आज उपस्थिती शंभर टक्के होती. हा सर्व खर्च 'चहापान' हेडखाली जाणार असल्याने अकाऊंटंट मॅडमनी खाण्या 'पिण्याच्या' व्यवस्थेत हात ढिला सोडला होता.

मीटिंग संपताच कर्मचारी वर्ग तत्परतेने कामाला लागला. राऊंड टेबलांची झटपट व्यवस्था झाली. टेबलांवर सोडा, पाणी व ग्लास ठेवण्यात आले. संचालक आपापल्या 'जातीचे' दोस्त निवडून कोंडाळे करून बसले. संचालक - अधिकाऱ्यांचे रंग न्याहाळता येतील, पण कोणाशी नजरानजर होणार नाही ह्या बेताने स्टाफचे लोक थोड्या कोपऱ्यात जागा पकडून बसले होते. काही चलाख कर्मचारी पुढे-मागे आपल्या कामाला येतील अशी माणसं हेरून त्यांच्या सेवेसाठी आजूबाजूला घुटमळत होते. महिला वर्गाने स्टेजजवळचा आडोसा घेऊन दोन-तीन टेबले जोडून आपला ग्रुप जमवला होता. एरवीप्रमाणे एकमेकींच्या साड्या, अलंकार ह्यांऐवजी त्या संचालक व अधिकाऱ्यांचे गट आणि त्यांच्या पुढ्यातील द्रव्याचे रंग ह्यावर बारीक लक्ष ठेवून होत्या.

बॅंकींग तज्ज्ञ म्हणून नियुक्त करण्यात आलेली संचालिका मिस अंजली लग्नाला जावं तशी शालू नेसून, नटून थटून आली होती. महिला स्टाफकडे ढुंकून न बघता पुढच्या टर्मला आपल्याला व्यवस्थापक मंडळावर घेण्यासाठी कोण डायरेक्टर उपयोगी पडतील

ह्याचा तज्ज्ञाच्या नजरेने धांडोळा घेत हॉलभर फिरत होती. अनेकांच्या नजरा तिच्याकडे वारंवार वळत होत्या आणि दृश्यमान वळणांवर खिळत होत्या. पण तिच्याशी अशी किंवा 'तशी' सलगी नजरेत आल्यास बँकभर तो चर्चेचा विषय होण्याची धास्ती असल्याने प्रत्येक जण आपापली सभ्यता सांभाळीत डोळ्याच्या कोपऱ्यातून तिला टिपत होते.

आणखी एक बँकींग तज्ज्ञ (निवृत्त मॅनेजर, एसबीआय) श्री. सिल्व्हा गंभीर मुद्रा करून दुसरे एक संचालक घोसाल मास्तर (तिसरी खेप उर्फ टर्म आणि त्यामुळे साहजिकच स्वतःला बँक तज्ज्ञ समजणारे) ह्यांच्याशी आरबीआयच्या नव्या तिमाही पतधोरणावर तावातावाने चर्चा करीत होते. आपण तज्ज्ञ आणि आर्थिक विषयाचे जाणकार असल्याचे दिसूनही यावे म्हणून ते आटोकाट प्रयत्न करीत इंग्रजीमिश्रीत मराठीत बोलत होते. हातातील ग्लास काठोकाठ भरलेला असल्याने त्यांचे बोलणे थांबत नव्हते. त्यामुळे इंग्रजी शिकवण्याचा थर्टी फाइव्ह इयर्स एक्स्पिरियन्स असूनही आपल्याला सिल्व्हांचे इंग्रजी समजत नसल्याने घोसाल मास्तर कमालीचे वैतागले होते.

तिकडे पास्कोल आपण अजून अध्यक्षपदाच्या खूर्चीत असल्यासारखे सर्वांची ख्यालीखुशाली विचारीत फिरत होते. ते समोर येताच महिला हात जोडून उभ्या राहिल्या. पण त्यांनी हात न जोडता प्रत्येकीचा हात हाती घेत हस्तांदोलन केले व शुभेच्छा दिल्या. पाठोपाठ आलेल्या एडवर्ड आणि डिकुन्हानेसुद्धा हात पुढे केले, तेव्हा सगळ्या जणींनी दोन्ही हात जोडून त्यांच्या शुभेच्छांचा स्वीकार केला!

त्यांना पाहून पास्कोलच्या कपाळावर आठ्या चढल्या. आपल्याला चिकटू पाहणारी ही ब्याद कशी कटवावी ह्या विचाराने ते हसत म्हणाले, "तुम्ही प्लीज, आपल्या डायरेक्टर लोकांची व्यवस्थित सोय होतेय का पाहा ना... च्यायला, नायतर मीटिंगमध्ये पकडतील माझा गळा... "

"येस.... येस सर..." असं म्हणून ते दूर झाले. पास्कोल हॉलभर फिरू लागले. माजी चेअरमन प्रवीणदादांना पाहताच त्यांनी आपला मोर्चा त्यांच्या टेबलाकडे वळवला. समाज विकास पॅनेलचा तो म्होरक्या. बडा डेव्हलपर असल्याने समाजविकासाबरोबर स्वयंविकासाची त्याने उत्तम सांगड घातली होती. हात ढिला सोडीत असल्याने अनेक संचालक त्याच्या मुठीत होते. मागील दोन टर्म तो जवळपास बिनविरोध निवडून आला होता. आताही तसाच येईल. चेअरमनची पोस्ट मिळवण्यासाठी त्याची मोर्चेबांधणी चालू असल्याचे आतील गोटातून पास्कोलच्या कानावर आले होते. त्याला कसा डच्चू द्यायचा ह्याचा प्लॅन पास्कोलकडे तयार होता. पण नॉर्थवाला ग्रुप काय खेळी करेल ह्याचा भरवसा

नसल्याने पास्कोल प्रवीणदादाशी खूप सख्य असल्याचा आविर्भाव आणीत म्हणाला, "हाय दादा! तुमच्या ग्रुपमध्ये आम्हाला पण सामील करून घ्या!" ते ऐकून त्याच्या कंपूच्या कपाळावर आठ्या पडल्या.

प्रवीणदादा मात्र हसत खूर्चीतून उठला आणि आपल्या खूर्चीकडे बोट दाखवत म्हणाला, "अहो अध्यक्ष महाराज, माझी खूर्ची तुम्हाला! या! बसा!"

"थँक्स, दादा!" पास्कोल त्याचा हात हाती घेऊन त्याला खूर्चीत बसवत म्हणाले,"त्या खूर्चीवर फार काळ बसू देत नाहीत हो लोक! सर्वांचाच डोळा असतो तिथे... वर बसल्यावर हार-तुरे पडतात, तशा शिव्याही खायला लागतात! त्यापेक्षा हे उभ्या उभ्याने बरं ना! चालू द्या तुमचं. एन्जॉय फाऊंडर्स डे!"

सध्या तरी आपल्याला इथे स्थान नाही, ह्याची खूणगाठ बांधत पास्कोल तिथून सटकले. त्यांनी थांबून सभोवार नजर टाकली. परेरा दिसताच त्यांना खूण करून बोलावले. परेरा त्वरेने पुढे आले व पास्कोलना एका आडोशाच्या टेबलाजवळ नेले. पास्कोलनी घड्याळाकडे पाहत पट्कन समोरचा उपडा ग्लास घेतला व त्यात बाटलीतील सोनेरी द्रव्य ओतले. परेरांनी चपळाईने सोड्याची बाटली ओपन करून पास्कोलच्या हाती दिली.

"बसा सीईओ साहेब! बॅंकेच्या कामात नसलं तरी इथलं तुमचं मॅनेजमेंट एकदम टॉप आहे बरं का! घ्या!" पास्कोलनी बाजूच्या रिकामी ग्लासकडे निर्देश करीत म्हटले.

हे कोणी ऐकले तर नाही ना, असा विचार करीत परेरांनी इकडे तिकडे पाहिले व तोंडावर हसू आणीत मान डोलवली. व्यवस्थापन क्षेत्रात पारंगत असल्याने त्यांनी स्वतःची व्यवस्था बाजूच्या खोलीत आधीच करून ठेवली होती. अधून मधून तिथे जाऊन ते त्या पेयाचा आस्वाद घेत होते.

ते नम्रपण म्हणाले, "आपल्या शेजारी बसून घेणे मला प्रशस्त वाटत नाही, सर. प्रथम आपलं होऊ द्या. "

"बसा हो!" पास्कोलनी त्यांना हाताला धरून समोरच्या खूर्चीवर बसायला लावले. "आपली बॅंक... आपलीच माणसं... सारे मिळून पिऊ.... हॉऽ हॉऽ हॉऽ..." पास्कोल स्वतःच्या विनोदावर खळखळून हसले.

तो विनोद आवडला नसला तरी परेरांनी बळेच हसून त्याला दाद दिली. परेरांच्या डोक्यात वेगळे विचारचक चालू होते. रजेवर गेलेले सीईओ पुन्हा येतील किंवा नाही ह्याची

खात्री नव्हती. मागच्या बोर्ड मीटिंगमध्ये त्यावरून वादंग होऊन बोर्डात दोन तट पडले होते. चेअरमनसाहेबांना ते नको होते हे स्पष्ट झाले होते. विद्यमान तीन साहाय्यक महाव्यवस्थापकांमधून तिथे कोणाची वर्णी लागेल हे सांगता येत नव्हते. प्रत्येक जण आपापली सेटिंग लावून होता.

पास्कोल ह्यांचे आमदारांबरोबर बऱ्यापैकी संधान होते, शिवाय संचालक मंडळातील काही विकासक संचालकांच्या प्रोजेक्टमध्ये त्यांची पार्टनरशिप होती. त्यामुळेच परेरा पास्कोल ह्यांची मर्जी राखण्यात गर्क होते.

हसता हसता पास्कोलना पुन्हा खोकल्याची उबळ आली.

"सर, सर... पाणी घ्या." परेरांनी पाण्याची बाटली पुढे केली. पास्कोलनी ती बाजूला ठेवली आणि व्हिस्कीचा एक मोठा घोट घेत ते म्हणाले, "परेरा, बघा, आज आम्ही बँकेसाठी रक्ताचे पाणी करतोय... पण हे व्हाट्सअपवाले काय काय बदनामी करतात हो आमची? कोणाची शेंडी कोणाच्या बुडाला जोडतात रांडीचे... आजचा प्रोग्रेस आपोआप झालाय का? "

"सर, सर... जाऊ द्या... आपल्या पडेल मंडळींचे उद्योग हे... दुर्लक्ष करा..." परेरा त्यांना समजावू लागले.

"इथे येऊन बसा आणि कामं करून दाखवा म्हणाव... सहकार खातं, आरबीआय बांबू घालायची वाटच पाहत असतात..."

"होय ना, एक साधं कर्ज सँक्शन करायचं तरी किती स्क्रुटिनी असते? दोन हप्ते थकले की एनपीएखाली जाणार."

"राईट! कर्जे तर गेली पाहिजेत. नुस्त्या ठेवी काय चाटायच्या? कर्जे राईटऑफ करता येतात, ठेवींवर व्याज द्यावंच लागतं..." पास्कोलनी अचानक पॉझ घेतला. हातातील ग्लास संपवून ते म्हणाले, "बरे झाले कर्जाचा विषय काढलात! आपल्या इमानदार इंडस्ट्रीच्या नव्या अर्जाचं कुठवर आलेय? ओके करून टाका लवकर!"

परेरांनी चमकून पाहिले. ते अस्वस्थ होत म्हणाले," सर, त्या २३७ प्रकरणांमध्ये ह्यांच्या सिस्टर कन्सर्नचंही प्रकरण आहे. एजीएममध्ये बोंबाबोंब झाली होती. ह्या फ्रेश अर्जात खूप त्रुटी आहेत. त्यांचे असेट्स कमी आहेत. फॅक्टरीत सेकंड हॅन्ड मशिनरी आहे. उद्या ठपका येऊ शकतो आपल्यावर. "

"ते काही सांगू नका मला! व्हॅल्यूअरकडून पॉझिटिव्ह रिपोर्ट घ्या. पेपरवर्क बरोबर झालं पाहिजे. बाकी मी बघतो. काय?" पास्कोल बोटाला लागलेली चटणी जिभेने चाखत म्हणाले.

परेरांना किळस आली. त्यांनी नॅपकीन पुढे केला. पास्कोलनी नॅपकीन घेऊन बोटे-तोंड पुसून पेपरचा बोळा तसाच परेरांच्या हातात दिला. परेरांनी तो झट्कन खूर्चीखाली टाकला व ते हाताची बोटे मोडत बसून राहिले.

तेव्हा पास्कोल हाताने टेबलावर टकटक करीत म्हणाले, "अहो सीईओ साहेब, एवढे सीरियस होऊन बँकेच्या भवितव्याचा विचार करू नका! आपली बँक मजबूत आहे.. आता ग्रोथ, विकास हे शब्द ध्यानात ठेवून धोरणं आखायची... विकसित भारत तशी विकसित बँक! खी:खी:खी:!" मग ते पुढे झुकून हळू आवाजात म्हणाले, "विकास साधता आला पाहिजे... तो इमानदारचा शहा येऊन भेटेल तुम्हाला... तो कोणाला नाराज करीत नाही..."

"पण... साहेब, त्यांचे क्रिसील रेटिंग चांगले नाही. शिवाय आरबीआयच्या नव्या नॉर्मनुसार..."

"मरो ते नॉर्म्स! तुमचे पॉवर्स वापरा. बोर्डालाही काही अधिकार असतात ना? आम्ही आहोत तिथे. घाबरू नका. करून टाका!"

परेरांच्या डोळ्यांसमोर संभाव्य प्रश्नांनी थैमान घातले. ते काहीच बोलत नाहीत हे पाहून पास्कोल पुन्हा त्यांना टोकत म्हणाले, "तुम्ही एमबीएवाले खूप विचार करता. नो ॲक्शन! विचार करता करता वेळ निघून जाते हातची... संधीचा लाभ घ्या... बँकेसंबंधी बोलतोय मी... हात लावा..." पास्कोलनी कबाबची बशी ओढली आणि त्यातील एक कबाब परेरांच्या हातात कोंबला. परेरांनी यंत्रवत तो स्वीकारला. त्यांचा चेहरा अतिशय गंभीर बनला होता. परेरा काहीच बोलत नाहीत हे पाहून पास्कोल पुन्हा पुढे झुकून उजव्या हाताने परेरांचा डावा हात दाबत म्हणाले, "...आणि माझ्या लक्षात आहे बरं का ते... सीईओच्या पोस्टसंबंधी... आमदार साहेब सेशनमध्ये आहेत... भेटतोय मी त्यांना पुढच्या आठवड्यात... एकदम वरून काम! हंड्रेड पर्सेंट फत्ते होईल!"

ते ऐकून परेरांचा नूरच बदलला. त्यांचे डोळे विस्फारले. अख्खाच्या अख्खा कबाब तोंडात टाकीत ते म्हणाले,"हॅाय सर, मी करतोच ते कॉम... आय विल गेट इट डॉन.. म्हणजे डॉन..... पण कॉमाचं विसरू नका तेवढं...." परेरांनी सोड्याची बाटली तोंडाला लावली व समाधानाने ढेकर दिला.

"नाहीच विसरणार मी. मलाही माझा माणूस माझ्या हाताखाली हवाच आहे. बोर्डाने आणि प्रशासनाने हातात हात घालून काम केले तरच कामं पटापट मार्गी लागतील... आपसात संघर्ष, कोर्टकचेऱ्या करुन काय फायदा? बदनामी बँकेची होते. मी नेहमी असा पुढचा विचार करतो... तुमच्या भाषेत ते व्हिजन वगैरे... तरच प्रोग्रेस होईल... तेव्हा लेट्स सेलिब्रेट...!" पास्कोल अगदी खुशीत आले होते. त्यांनी समोरचा रिकामी ग्लास भरला व परेरांच्या हाती दिला.

परेरांनी डावा हात छातीवर ठेवत उजव्या हाताने तो ग्लास स्वीकारला व मान लववून म्हटले, "इट्स माय प्लेजर, सर!"

"चिअर्स!" पास्कोल आपला चौथा पेग हवेत उंचावत म्हणाले, "लेट्स हेल्प इच अदर टू ग्रो बियाँड...!"

"चिअर्स!" परेरा आपला ग्लास त्यांच्या ग्लासला हलकेच लावत उत्साहाने म्हणाले, "फॉर युवर हेल्थ अँड वेल बिईंग, सर! एकमेकां करू साहाय्य...!"

# ‘कॅथलिक’ त्रैमासिकाची सदतीस वर्षे

■ प्रा. स्टीफन आय. परेरा
सांडोर, वसई

एखादे नियतकालिक सुरू करणे ही अगदी साधी व सोपी गोष्ट आहे. परंतु एकदा सुरू केलेले नियतकालिक पुढे सतत अनेक वर्षे प्रकाशित करीत राहणे आणि वाचकांमध्ये त्याची आवड निर्माण करणे हे काम वाटते तितके साधे, सोपे नसते.

गेली सदतीस वर्ष मी 'कॅथलिक श्रध्देचा मानबिंदू' या नावाने एक त्रैमासिक प्रसिद्ध करीत आलो आहे. त्याच्या स्थापनेची पार्श्वभूमी आणि त्यानंतर हे मुखपत्र चालविताना गेली सदतीस वर्षे आलेले काही अनुभव येथे नमूद करु इच्छितो. त्यातुनच कॅथलिक त्रैमासिकाच्या सदतीस वर्षाच्या वाटचालीकडे दृष्टिक्षेप टाकता येईल.

**पार्श्वभूमी :**

इ.स. १९६२ ते ६५ या काळात दुसरी व्हॅटिकन परिषद भरविण्यात आली, ती एक ऐतिहासिक महत्वपूर्ण अशी परिषद समजली जाते, या परिषदेमुळे चर्चमध्ये अनेक बदल झाले. खिस्तमंडळ अधिकाधीक लोकाभिमुख बनले. उपासनेचा अर्थ लोकांना समजू लागला, भाविकांचा सहभाग वाढविण्यांसाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले जाऊ लागले. संस्कृतीकरणाच्या नावाने स्थानिक भाषांमधून उपासना, प्रार्थना आणि संगीत होऊ लागले, प्रापंचिकांना बरेच अधिकारही दिले गेले, एकंदरीत दुसऱ्या व्हॅटिकन परिषदेनंतर खिस्तमंडळाची बंद कवाडे उघडली गेली आणि नवे वारे आत शिरु लागले असे अभिमानाने सांगितले जाऊ लागले.

काही धर्मपंडितांच्या मते मात्र खिस्तमंडळाने उघडलेल्या कवाड्यामधून नव्या वाऱ्यांसोबत काही विषारी वायूही दुदैवाने खिस्तमंडळात शिरु लागले, जागतिक पातळीवर 'फ्रीमेसनरी' सारख्या संघटनांद्वारे तयार करण्यात आलेले धर्मगुरु खिस्तमंडळात शिरुन क्रियाशील झाल्याने हळूहळू श्रद्धा हानी होऊ लागली.

दुसरी व्हॅटिकन परिषद ही एकविसावी एक्यूमिनिकल (Ecumenical) परिषद होती, प्रभू येशूच्या म्हणण्याप्रमाणे 'एक कळप आणि एक मेंढपाळ' म्हणून सर्व खिस्ती पंथियांना एकत्र करण्याच्या प्रयत्नासाठी बोलवलेली परिषद होती. त्यामुळे या परिषदेत

जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया येथील बरेच प्रॉटेस्टंट धर्मपंडितही सहभागी करुन घेतले होते. त्यांच्या प्रभावाखाली आणि केवळ ऐक्यासाठी (एक्युमिनिझमसाठी) कॅथलिक पंथीय काही पारंपारिक श्रध्दा सोडून देण्यास तयार झाले. त्यावेळी सनातनी परंपरावादींनी आग्रहाची भूमिका घेतली की No ecumenism at the cost of Catholicism, (ऐक्यासाटी कॅथलिक श्रद्धा सोडल्या जाणार नाहीत.)

**श्रद्धा म्हणजे काय ?**

श्रद्धा हा संस्कृत शब्द श्रत (म्हणजे सत्य) आणि धा म्हणजे धारण करणे. या शब्दावरुन बनला आहे. ज्याचा अर्थ सत्य व सत्यावर आधारित गोष्टीवरील विश्वास. श्रध्दा ही केवळ तर्क किंवा पुराव्यावर आधारित नसते तर ती एक आंतरिक भावना असते. डोळ्यांना न दिसणाऱ्या व कोणताही पुरावा नसलेल्या गोष्टींवर ठेवलेला विश्वास म्हणजे श्रद्धा. दुसऱ्या व्हॅटिकन परिषदेनंतर कॅथलिक श्रद्धांमध्ये झालेल्या हानीमुळे पुराणमतवादी आणि नवमतवादी अशा दोन विचारसरणी निर्माण झाल्या. पुराणमतवाद्यांनी दुसऱ्या व्हॅटिकन परिषदेवर टीका करताना म्हटले, या परिषदे मुळे The Rhine flows into the Tiber. ऱ्हाईन नदीचे पाणी टायबरमधून वाहु लागले. ऱ्हाईन नदी ही जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रीया मधून वाहणारी म्हणजे प्रॉटेस्टंट विचारसरणी आणि टायबर ही कॅथलिक विचारसरणीचे प्रतीक या अर्थाने हे म्हटले गेले.

आपल्याकडेही सदर दोन्ही विचारसरणी सुरु झाल्या, त्यातून श्रद्धाहानीचा धोका दिसू लागला, अशावेळी आम्ही काही मंडळी मॉन्सिनियर सेबेस्टीन वाझ, मॉन्सिनियर फिलिप तवारीस आणि आमचे गुरुवर्य फा. बर्नड भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिकलो की खिस्तमंडळात कोणीही अतिपारंपारिक अगर अनिपुराणमतवादी असू नये. काही बुरसटलेल्या पारंपारिक गोष्टींचा त्याग करणे आवश्यक आहे. मात्र सगळ्याच पारंपारिक गोष्टी पायदळी तुडविल्या जाऊ नयेत कारण some Traditions are the pillars of the Church. काही पारंपारिक श्रद्दा ह्या खिस्तमंडळाच्या पायाभूत श्रद्धा आहेत.

याच पार्श्वभूमीवर आही काही मंडळींनी ‘बॅसिन कॅथलिक असोशिएशन’ नावाची संस्था सुरू करून 'कॅथलिक श्रध्देचा मानबिंदू' या नावाने त्रैमासिक सुरू केले. (१९८८) कॅथलिक श्रद्धा जतन करणे हे मुख्य उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून ही संस्था व त्रैमासिक आपले कार्य करीत असते.

या ठिकाणी श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक जाणून घेणे महत्वाचे आहे. अंधश्रद्धा निर्मुलनचे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या मते "जी श्रद्धा माणसाची शारीरिक,

आर्थिक अगर भावनिक असे कोणत्याही प्रकारचे शोषण करीत असते ती अंधश्रद्धा होय. (संदर्भ, साधना जुलै २०१८) या व्याख्येनुसार पाहू गेल्यास कॅथलिक मूलभूत श्रद्धांपैकी कोणतीच श्रद्धा अंधश्रद्धा म्हणता येणार नाही, कॅथलिक म्हणजे जागतिक धर्म म्हटलेल्या आपल्या धर्माच्या कोणत्याही श्रद्धा कोणत्याही प्रकारचे शोषण करणाऱ्या नाहीच उलट भावनिक पोषण करणाऱ्या निकोप श्रद्धा आहेत असेच म्हणावे लागेल.

'कॅथलिक श्रध्देचा मानबिंदू' हे त्रैमासिक गेली सदतीस वर्ष श्रद्धाबांधणीचे कार्य करीत आले आहे, त्यामधून दुर्मिळ, ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध केली जाते. अधूनमधून काही विशेषांकही प्रसिद्ध केले जातात. उदा. मिस्सा विशेषांक (मराठी आणि इंग्रजी आवृती), पवित्र मरियेने दिलेल्या महत्वाच्या दर्शनांची सविस्तर माहिती देणारा मरिया दर्शन विशेषांक तर अलीकडचा क्रॉस विशेषांक ज्यामधून क्रुसाविषयी सविस्तर माहिती तसेच वसईतील आगाशीपासून दक्षिण वसईतील पाली पर्यंतच्या शतक महोत्सवी क्रूसाची माहिती देण्यात आलेली आहे.

बिशप थॉमस डाबरे, बिशप एडविन कोलासो यांनी आमच्या कार्याची नेहमी स्तुती करुन आम्हाला आशीर्वाद दिलेले आहेत तसेच अनेक धर्मगुरुंनी आणि पुष्कळशा भाविकांकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीमुळेच गेली सदतीस वर्षे आम्ही कॅथलिकचे अंक विनामुल्य भाविकांना देत आलो आहोत. मागील काही वर्षापासून कॅथलिक छापील दोन हजार पाचशे प्रती व्यतिरिक्त पी. डी. एक फाईलद्वारे हा अंक जगभर पसरविला जातो. धन्यवाद... HAPPY CHRISTMAS...

# रक्तापलीकडचे नाते

■ सौ. सुनिता बर्नड परेरा.
गास, मदर तेरेजा शेजोळ

ऑक्टोबरची दाहकता संपून नुकतीच नोव्हेंबरच्या गुलाबी थंडीला सुरुवात झाली होती. उटी येथील थंड हवेच्या ठिकाणी तर थंडीने अगदी कहर केला होता. तापमान पाच, सहा डिग्री पर्यंत गेले होते. सकाळची शाळा असल्यामुळे सर्व मुले, शिक्षक शाल, स्वेटर घालून शाळेत येत होते. आज शाळेत स्पोर्ट्स डे असल्यामुळे मिस जेनीची लगबग सुरू होती. संपूर्ण कार्यक्रमाची ती इन्चार्ज होती. त्यामुळे मुलांच्या सर्व तयारीची व्यवस्था, त्यांचे पोशाख, सर्व अँक्टिव्हिटी, साहित्य, मेकअप, सूत्रसंचालन सर्वच जबाबदाऱ्या ती अगदी कार्यकुशलतेने पार पाडणार होती.

मिस जेनी उटीतील सेंट जॉन बॉस्को शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होती. पाच वर्षांपूर्वी तिने टीचर ट्रेनिंग कोर्स पूर्ण केला होता. मुळातच हुशार आणि चाणाक्ष असलेल्या जेनीने प्रथम दर्शनीच आपली हुशारी दाखवून ही नोकरी संपादन केली. फादर गिल्बर्ट शाळेचे प्रिन्सिपल होते. ४० वर्षापासून त्यांनी शिक्षण क्षेत्रात काम केले होते त्यामुळे त्यांची निवड कधीही चुकणार नव्हती. जेनीसारख्या हुशार, उत्साही शिक्षिकेला त्यांनी निवडले होते. आणि त्या दिवसापासून जेनी अगदी मन लावून अध्यापनाचे काम करत होती. बालपणापासून अनाथ असलेल्या जेनीला फादर गिल्बर्ट ह्यांच्या ओळखीवरून शाळेपासून वीस मिनिटाच्या अंतरावर एक घर भाड्याने मिळाले होते. त्यामुळे जेनी दररोज सायकलवरून शाळेत ये जा करीत असे. अत्यंत लाघवी आणि प्रेमळ असलेल्या जेनीने अल्पावधीत सहकारी शिक्षकांचे आणि आपल्या विद्यार्थ्यांचे मन जिंकून घेतले. Learn by fun ह्या तत्वाचा अवलंब करून कठीण घटक सोपा करून मुलांमध्ये मूल होऊन ती शिकवत असे. त्यामुळे विद्यार्थी प्रिय शिक्षिका म्हणून ती ओळखली जाऊ लागली.

आजचा स्पोर्ट्स डे उत्तमप्रकारे पार पाडला. सर्वांनी तिचे अगदी मनापासून कौतुक केले. दररोज जीन्स, टॉप घालणाऱ्या जेनीने आज गुलाबी रंगाची सुंदर साडी परिधान केली होती. हलकासा मेकअप आणि चेहऱ्यावरील निर्मळ हास्य ह्यामुळे ती अगदी नखशिखांत सुंदर दिसत होती. गालावरील खळी तिच्या सौंदर्यात अधिकच भर घालत होती. त्यामुळेच आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी असलेल्या वरूणचे लक्ष तिच्या चेहऱ्यावरून काही

केल्या हटत नव्हते. वरुण हा तिथल्या खासदारांचा एकुलता एक मुलगा होता. M.B.A पर्यंत शिक्षण पूर्ण करून तो वडिलांचा व्यवसाय सांभाळत होता. अतिशय रुबाबदार आणि देखणा तरुण असलेला वरुण वडिलांची कंपनी कार्यकुशलतेने सांभाळत होता. त्याच्या घरी लक्ष्मी पाणी भरत होती. दिमतीला गाड्या, नोकरचाकर, धनदौलत असलेला वरुण तोंडांत जणू सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आला होता.

असा हा गर्भश्रीमंत, रुबाबदार आणि उद्योजक तरुण जेनीच्या प्रेमात पागल झाला होता. कार्यक्रम संपल्यावर त्याने सर्वात प्रथम जेनीचे मनापासून कौतुक केले. जेनी देखील त्याच्या स्वभावावर आणि व्यक्तिमत्वावर फिदा झाली. आग दोनो तरफ से बराबर लगी थी... दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले होते. हळूहळू भेटीगाठी वाढू लागल्या. परस्परांना लग्नाचे वचन दिले गेले. सिनेमा पाहणे, बागेत भेटणे, तलावाशेजारी झाडीत बसून तासनतास गप्पा मारणे हा जणू त्याचा दिनक्रमच झाला.

जेनी नियमितपणे त्या दिवशी शाळेत आपल्या मुलांना शिकवत असताना तिच्या वर्गात एक नवीन अनोळखी चेहरा तिला दिसला. अत्यंत बावरलेला रडका, उदास चेहऱ्याचे एक गोंडस मूल तिच्याकडे बघत होते. तिने त्याला जवळ बोलावून नाव विचारले. संचितने तिला रडत रडत आपले नाव सांगितले. तिने प्रेमाने त्याला जवळ घेऊन सावरले. आणि त्याक्षणी संचितची भीती नाहीशी झाली. संचितचे वडील सरकारी नोकरीत असल्यामुळे त्यांची वारंवार बदली होत असे. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे शिक्षक आणि त्या शिक्षकांची कडक शिस्त... त्यामुळे त्याच्यात न्यूनगंड निर्माण झाला होता. पण मिस जेनीचा प्रेमळ स्वभाव त्याला खूप आवडला आणि हळूहळू त्याची अभ्यासात प्रगती होऊ लागली.

जेनीचे घर त्याच्या अगदी जवळ असल्यामुळे जेनी त्याला रोज तिच्या सायकलवरून शाळेत घेऊन येऊ लागली. शाळा सुटल्यावर त्याची शिकवणी घेऊ लागली. संचितवर ती आईसारखी माया करू लागली. संचितला अभ्यासाची गोडी वाटू लागली. वर्ष सरले आणि पुन्हा संचितच्या वडिलांची बदली झाली. संचितने आकांडतांडव केले. त्याला मिस जेनी आणि ह्या शाळेपासून दूर जायचे नव्हते. पण नाईलाज झाला. त्याला जावे लागले. दुसऱ्या शाळेत त्याचे मन काही रमेना, त्यामुळे त्याच्या आई वडिलांनी निर्णय घेतला आणि त्याला जेनीच्या शाळेत परत घेऊन येत असताना त्याच्या गाडीला अपघात झाला आणि त्याच्या आईवडिलांचे जागेवरच निधन झाले. संचित सुदैवाने वाचला. संचित आता अनाथ झाला होता. रस्त्यावर भटकत होता. पण त्याचे नशीब बदलणार होते....

दरम्यानच्या काळात तेथे पुलाखालून बरेचसे पाणी वाहून गेले होते. जेनी आणि वरुणच्या प्रेमाची खबर वरुणच्या बाहूबली असलेल्या वडीलांना लागली होती. त्यांनी डाव साधला आणि वरुण जेनीला वेगळे करण्याचा कट केला. आपल्या माणसाकरवी जेनीला

किडनॅप करून तिला मुंबईला एका कोठ्यावर विकले. एक हुशार, उत्साही शिक्षिका कोठ्यावर घुंगरू बांधून नाचू लागली. सुरुवातीला तिने खूप विरोध, विनवण्या केल्या पण कोणाचेही हृदय द्रवले नाही. शारीरिक आणि मानसिक ताकद संपली आणि शरीर विकणे हेच तिच्या नशिबी आले. वरुणही स्वार्थी बनला होता. प्रेमापेक्षा पैशाला महत्त्व देऊन त्याच्या कुळाला शोभेल अश्या श्रीमंत मुलीशी त्याने लग्न लावून संसार थाटला. जेनीच्या अचानक गायब होण्याने संपूर्ण शाळा हवालदिल झाली. त्यांनी जेनीला शोधण्याचा खूप प्रयत्न केला, पण पैशाच्या ताकदी समोर सर्व हरले. जेनी कोठ्यावर आपले आयुष्य जगू लागली. एक उच्चशिक्षित शिक्षिका, तिची स्वप्ने... सर्वांचा चुराडा झाला होता.

पण म्हणतात ना ‘काळयाकुट्ट अंधारात जेव्हा काही दिसत नसतं तेव्हा कुणीतरी एक मेणबत्ती घेऊन समोर उभा असतो’. तिच्याही जीवनात तोच प्रकाश पडला. दैवी योजना वेगळ्या असतात. संचित रस्त्यावर अनाथ म्हणून भरकटत असताना एका माणसाने त्याला आधार दिला, त्याला काम दिले आणि आपल्यासोबत घरी घेऊन आला. तोच माणूस जो कोठ्यावर पठाण म्हणून काम करत होता. त्याने छोट्या संचितला कोठ्यावर चहा आणणे, झाडलोट करणे अशी किरकोळ कामे दिली. आणि इथेच त्याची प्रेमळ टीचर जेनी त्याला भेटली. दोघेही नशिबापुढे हतबल झालेले.... एकमेकांना गच्च मिठी मारून खूप रडले. देवाने दोघांची भेट घडवून आणली होती. आणि मग सुरू झाला एक नवीन अध्याय. रात्री घुंगरू बांधून गिऱ्हाईकाचे मनोरंजन करणारी वेशा दिवसा मात्र संचितची आदर्श शिक्षिका बनली. तिने संचितवर अगदी मातृवत प्रेम केले. वर्षे सरली. मौसम बदलले. संचितने बाहेरून फॉर्म भरून दहावीची परीक्षा दिली. आणि कोठ्यावर किरकोळ काम करणारा संचित संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम क्रमांकाने पास झाला. पुढे बारावीनंतर M.B.B.S करून तो सुप्रसिद्ध सर्जन झाला. आणि पुढील शिक्षणासाठी तो अमेरिकेत गेला.

जेनीचे वय वाढले होते. चाळीशीनंतर कोठ्यावर स्त्रीला काडीमात्र किंमत नसते. जेनी कोठ्यावर किरकोळ कामे करु लागली. एक दिवस अचानक सरकारी आदेशानुसार प्रत्येक कोठ्यावर आरोग्य तपासणी करण्याचे आदेश दिले गेले. दैवी योगायोग. शिक्षणासाठी बाहेर पडलेला संचित डॉक्टर बनून ह्याच कोठ्यावर तपासणीसाठी आला. थकलेल्या जेनीला पाहताक्षणी त्याच्या अश्रूचा बांध फुटला. कित्येक वर्षानंतर दोघे भेटले होते. एकमेकांना घट्ट मिठी मारली. आणि त्याक्षणी संचितने निर्णय घेतला. जेनीला कायम आपल्यासोबत घेऊन जाण्याचा. आज मायलेकरांची भेट झाली होती. उटीच्या शाळेत प्रेमाने पायाभरणी केलेल्या ह्या नात्यावर मायेचा कळस चढला होता...

# मति आणि गती

■ डॉ. सुरेश पाटील, वसई

गोष्ट आहे जूनी. त्यावेळी शाळांचा बाजार नव्हता ना वेगवेगळ्या मिडीयमचा बोलबाला. शहरात नगरपालिका किंवा सामाजिक संस्थेच्या शाळा असायच्या. हाडामासाचे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवणारे शिक्षण. त्या काळात शाळा ह्या खरोखरच ज्ञानमंदिर होत्या.

अशाच एका शाळेत अमोल आणि विकास शिकत होते. अगदी बालवाडी पासूनचे मित्र. एकाच शिक्षक कॉलनीमध्ये राहणारे. अमोलचे बाबा सरकारी नोकरीत मोठे अधिकारी तर विकासचे बाबा बँकेत कामाला होते. दोघांच्या आई ह्या एकाच प्राथमिक शाळेत शिक्षिका.

दोन्ही कुटुंबाचा फार जिव्हाळा होता. दोन्ही घरचं वातावरण शिस्त मात्र खूप वेगळी होती. अमोलच्या घरी अभ्यासाला प्रचंड महत्त्व होते. त्याची आई वेळातवेळ काढून त्याचा अभ्यास घेत होती. स्कॉलरशिप, गणित; विज्ञान प्राविण्य या परीक्षेत तो चमकत होता. पूर्ण शाळेत त्याने पहिला नंबर कधी सोडला नव्हता. त्याला ही अभ्यासाची आवड होती. कॉलनीतील मस्ती करणाऱ्या मुलांबरोबर खेळायला त्याला आई बाबांनी मना केले होते. ठराविक हुशार मुले सोडली तर त्याचे मित्र कमी. शिवाय सुट्टीमध्ये त्याचे वेगवेगळे कोर्स चालू असायचे. एक अतिशय हुशार मुलगा अशी अमोलची ख्याती. 'मुलगा असावा तर असा' असे कॉलनीतील पालकांच मत होते.

विकासच्या घरात खेळीमेळीचे वातावरण. त्याचे बाबा नोकरीबरोबर सुट्टीच्या दिवशी गावी जाऊन शेती करत होते. त्याचा अभ्यास कोणी घेत नव्हते. फक्त तो अभ्यास करावा यासाठी आई त्याला प्रोत्साहित करत होती. विकासला खेळ, कला यांची आवड होती. शालेय अभ्यासात तो ठीक होता. गणेशोत्सव, दहीहंडी या सामाजिक कार्यक्रमात तो नेहमी आघाडीवर असायचा. शाळेच्या कबड्डी टीमचा कॅप्टन. भरपूर मित्रपरिवार. त्यात 'हुशार' आणि 'ढ' असे वर्गीकरण नव्हते. शाळेतून कधीकधी मस्ती केल्याबद्दल घरी तक्रारी यायच्या. सुट्ट्यात तो गावी आजी आजोबाकडे जायचा व बाबांना शेतातील कामात मदत करायचा. कॉलनीतील मुलांमध्ये तो प्रसिद्ध होता पण मोठ्या लोकांच्या

दृष्टीने तो वाया गेलेला. त्याच्यात आणि अमोल मध्ये नेहमी तुलना करून 'हुशार' आणि 'ढ' असे दोन शिक्के समाजाने त्यांना दिले होते.

दहावी बारावी बोर्डाच्या परीक्षेत अमोल चमकला. नावाजलेल्या मुंबईच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात त्याला प्रवेश भेटला. सर्वत्र कौतुकाचा वर्षाव झाला. विकासही बारावी कसाबसा पास झाला. त्याने मॅकेनिकलच्या डिप्लोमामध्ये प्रवेश घेतला. पण दोघांचेही आई बाबा खुश होते. पुढे विकासचे कुटुंब गावी शिफ्ट झाले. त्या दोन्ही कुटुंबातील संपर्क तुटला.

अमोलने आपले शिक्षण संपवून पुढे नावाजलेल्या कॉलेजमधून MBA केलं. वेगवेगळ्या कंपनीमध्ये पुढे पंधरा वर्षे नोकरी केली. आतातर त्याला एका खुप मोठ्या कंपनीत मॅनेजर म्हणून नोकरीची संधी मिळाली होती. त्याच्या मेहनतीने पहिल्या वर्षीच कंपनीचा त्याला 'उत्कृष्ट कामगार' हा पुरस्कार मिळाला. कंपनीचे मालक खुद्द पारितोषिक वितरणासाठी परदेशातून येणार होते.

मुंबईच्या आलिशान हॉटेलमध्ये हा कार्यक्रम होता. अमोलचे सर्व कुटुंब हजर होते. कंपनीचे मालक पारितोषिक वितरणासाठी स्टेजवर आले. अमोल स्टेजवर पोहोचला तर त्याला धक्काच बसला. ज्या कंपनीत तो काम करत होता त्याचा मालक दुसरा कोणी नसून त्याचा शाळेतील मित्र 'विकास' होता.

विकासने त्याला कवेत घेतले. त्याच्या हुशारीने कौतुक केले आणि तो म्हणाला "मी हिरा निवडला होता. मला माहित होते. गेल्या वर्षी तुझी या पदासाठी तुला न कळता मीच निवड केली होती. तुझ्यासारखी गुणवत्तापूर्ण मेहनती माणसे ह्या कंपनीला अजून उज्ज्वल भविष्य देऊ शकतात."

"अरे पण तू इथपर्यंत पोहोचलास कसा? कुठे तो 'ढ' विकास आणि कुठे हा 'कुबेर'! मान गये भाई" अमोलने आपल्या भावना व्यक्त केल्या.

"सांगतो नंतर पार्टीमध्ये निवांत!" हसत हसत विकास बोलला.

रात्री दोन्ही कुटूंब जेवणासाठी एकत्र भेटले. विकासने आपला प्रवास सांगितला. डिप्लोमा झाल्यावर त्याने एका कारखान्यात काम सुरु केले. पुढे मित्रांच्या मदतीने गावीच त्याने छोटा कारखाना काढला. प्रचंड लोकसंपर्क आणि नेतृत्वगुण या जीवावर त्याने हा व्यवसाय वाढवला. पुढे काही आपल्या मित्रांनाच पार्टनर घेऊन भारतभर कंपनीचा विस्तार केला. व्यवसायात त्यांनी काही धोके आणि मोठे निर्णय घेतले. सर्व यश

अपयशाची जबाबदारी त्याने घेतली. कामगारांच्या भावना जाणून घेणारा एक प्रेमळ आणि मेहनती मालक अशी त्याने प्रसिद्धी कमावली होती.

त्याचा हा प्रवास ऐकून अमोलची आई बोलली, "विकास, तू केलेला हा 'स्वयंविकास' अभिनंदनीय आहे. खरा हुशार तू आहेस. हुशारी म्हणजे पुस्तकी ज्ञान नव्हे तू दाखवून दिलेस. तुझा आम्हा सर्वांना खूप अभिमान आहे"

अशाप्रकारे विकासला लावलेला 'ढ' तला 'ढ' ढगात गेला.

अशा कित्येक गोष्टी तुम्ही ऐकल्या आणि अनुभवलेल्या असतील. तुमच्या शाळेतील, कॉलेजमधील अभ्यासात सर्वसामान्य असणाऱ्या मुलामुलींची नेत्रदिपक प्रगती तुम्ही पाहिली असेल. काही लोक त्याला गुडलक वा नशीब म्हणतील. पण मी असे म्हणणार नाही.

पण आपलीही मुले अशी 'हुशार' बनावी ही आकांक्षा सर्व पालकांच्या मनात असते. आपली मुले हुशार आहेत का? आणि त्यांना हुशार कसे बनवायचे? हे प्रश्न आता तुमच्या मनालाही पडले असतील! मुळात बुद्धीमान वा हुशारी याकडे पाहण्याचा आपल्या समाजाचा दृष्टीकोनच चुकीचा आहे.

बुद्धीमत्ता म्हणजे काय? त्याचे प्रकार कोणते? ती कशी मोजतात? मुलांची बुद्धीमत्ता कशी वाढवावी? मुले कशी घडतात? हे सर्व समजून घेणे गरजेचे आहे. बुद्धीमत्ता म्हणजे समजण्याची, शिकण्याची व विचार करण्याची क्षमता. बुद्धीमत्ता हे अनेक घटकांपासून बनलेली जटील बाब आहे. बुद्धिमापन करण्याच्या अनेक पद्धती आहेत. मुलाच्या वयानुसार योग्य ती पध्दत मानसशास्त्रज्ञ वापरतात.त्यातून आपणास बुद्धांक समजतो. सर्वसामान्य मुलाचा बुद्धांक हा ९० ते ११० मध्ये असतो. Verbal IQ आणि परफॉर्मन्स IQ हे दोन घटक या तपासणीत मोजले जातात. यावर मुलाची हुशारी समजते.

जसा आपल्या कथेतील अमोलचा बुद्धांक विकासपेक्षा जास्त होता. पण यशस्वी होण्यासाठी फक्त बुद्धांक नाही तर त्यापलीकडे अजून काही गोष्टी कारणीभूत आहेत हे नवीन संशोधनातून लक्षात आले आहे. त्या गोष्टी म्हणजे भावनिक बुद्धीमत्ता (इमोशनल इंटेलिजन्स) आणि सामाजिक बुद्धीमत्ता (सोशल इंटेलिजन्स). भावनिक बुद्धीमत्ता म्हणजे आपल्या मनातील भावनांची जाण असणे.

त्या भावना आपल्या नियंत्रणात ठेवता येणं. दुसऱ्याचा मनातील भावनांचा अचूक वेध घेणे. वेगवेगळ्या भावनांचे सूक्ष्म पोत ओळखणे. या सर्वांचा वापर आपल्या विचारात आणि वागण्यात बदल करण्यासाठी करणे.

उच्च भावनांक(EQ) असणारे लोक भावनांची योग्य माहिती असल्याने चांगले नातेसंबंध जोपासतात, नेतृत्व करू शकतात आणि कामामध्ये खूप यशस्वी होतात.दुसऱ्याला कसे वाटत असेल याची कल्पना करण्याची  क्षमता उच्च भावनांक असणाऱ्या लोकांत असते. त्याला आपण समवेदना वा तदनुभूती (Empathy) असे म्हणतो. मुलांना यशस्वी होण्यासाठी ही भावनिक बुद्धीमत्ता जास्त उपयोगी येते.

सामाजिक बुद्धिमत्ता म्हणजे स्वतःला आणि समाजातील इतरांना जाणून घेण्याची क्षमता. समाजातून आलेल्या वेगवेगळ्या अनुभवातून, यश अपयशातून या बुद्धिमत्तेचा विकास होतो. याला बोली भाषेत आपण 'कॉमन सेन्स' वा 'टॅक्टस' म्हणतो.

उच्च सामाजिक बुध्दांक असणारी लोक बोलकी असतात आणि इतरांना बोलत करण्याची त्यांच्यात कला असते. ते समाजात नेतृत्व करू शकतात. मार्केटिंगच्या या युगात ही बुद्धीमत्ता खूप कामाची आहे. आपल्या कथेतील विकासचा खरा 'विकास' याच्या अंगी असलेल्या भावनिक आणि सामाजिक बुद्धीमत्तेने झाला होता हे आता तुमच्या लक्षात आले असेल.

पण यशस्वी होण्यासाठी फक्त हुशारीच कामाला येते का? तुम्ही कधी खूप मोठ्या संकटात सापडला आणि मार्ग दिसत नाही अशावेळी तुम्ही हुशार माणसाकडे न जाता चतूर माणसाकडे सल्लासाठी जाता.

ही माणसं खूप बुद्धीमान असतात असे नाही पण संकटातून मार्ग कसा काढायचा याची कला त्यांच्या अंगी असते. त्याला आपण चतुराई (Cleverness) म्हणतो. वेगवेगळे सामाजिक पेच सोडवणे, कधी गोड बोलणे, कधी विनोद बुद्धी वापरणे तर कधी छक्के पंचे वापरणे हे चातुर्य मुलांना शिकवणे गरजेचे आहे. बिरबल, चाणक्य, तेणालीरामन यांच्या चातुर्याच्या कथा मुलाना आवर्जून वाचायला द्यावा.

पण यापेक्षा ही सर्वात महत्त्वाचा व दुर्मिळ गुण म्हणजे शहाणपणा (wisdom). त्याची व्याख्या नेमकी सांगणे फार कठीण. शहाणपण आपल्या अंगी आहे हे त्या व्यक्तीला माहीत ही नसते आणि त्याचे त्यांना कौतुकही नसते. पण समाजातील सर्वजण त्याच्याकडे आकर्षित होतात. अश्या व्यक्ती शांत, संयमी, निर्विकार, ज्ञानी असतात. त्यांना ना प्रसिद्धीचा कौतुकाचा हवास असतो ना ऐहिक सुखाचा लोभ. मनाच्या समाधानाकडे

आणि शांतिकडे अंतर्मुख होऊन ते वळतात. म्हणूनच हे शहाणपण मुलांच्या अंगी येणे खूप महत्त्वाचे.

मुले घडवण्याचे काम फक्त आईवडील करत नसतात. कुटुंब, शाळा, मित्र परिवार, समाज यांच्यामुळे मुलांची जडणघडण होत असते.खर पाहिलं . मुलांचा स्वतः चा स्वभाव, आवड निवड ही पण खूप महत्त्वाची आहे. या सर्वांचा विचार करून आपण फक्त त्यांना योग्य दिशा दाखवली पाहिजे आणि मार्गदर्शन केले पाहिजे.

मति म्हणजे 'बुद्धी'. ती तर दैवी असते पण त्याला गती देण्याचे काम आपण करू शकतो. मुलांच्या भावनिक आणि सामाजिक बुद्धिमत्तेचा विकास करणे गरजेचे आहे. फक्त हुशारीकडे न पाहता 'चातुर्य' आणि 'शहाणपणा' ही यांच्या अंगी कसा येईल याचा विचार केला पाहिजे. ढ' आणि 'हुशार'चा असे लेबल देणे थांबवले पाहिजे आणि सुजाण बनून पालकत्वाचा आनंद लुटला पाहिजे.

डॉ. सुरेश पाटील

मनोविकार व मनोविकास तज्ञ

वसई, नालासोपारा विरार

9987230222

# नायगाव रेल्वे स्टेशनचे शिल्पकार : पी. ए. कुटिनो

## (५०व्या स्मृती दिनाची श्रद्धांजली)

■ सिडनी जस्टीन मोरायस
नायगाव, पाली, मो. ९६०४३८५९८५

नायगाव गावात एक योगी समाजाचा कैवारी बनला. नाव त्याचं 'पॉलीकार्प'. पण समाजाने त्यांना पी. ए. कुटिनो नावाने ओळखले. ते ना सरपंच झाले, ना आमदार वा खासदार. पण समाजाच्या गरजांची चाड असणारा एक खराखुरा समाजगुरू म्हणून लोकांच्या मनात स्थान मिळवलं. त्याचं व्यक्तिमत्व शांत होतं पण विचार आणि कृतीने वादळासारखं. २१ जानेवारी १९२० रोजी नायगाव ख्रिश्चनआळी गावात जन्मलेलं हे रत्न!



कार्यकर्त्यांच्या आयुष्यात जीतके पाठीराखे येतात तितकेच विरोधकही असतात. त्या जय-पराजयानेच लढणाऱ्याचं आयुष्य घडत असते. कार्यकर्त्यांच्या आयुष्यात खाचखळगे असणारच पण त्यामुळे त्याच्या निष्ठा, त्याचं कार्य, त्याची तळमळ, त्यांनी घेतलेले कष्ट, सुखावर सोडलेलं पाणी आणि माणुसकीची पताका फडफडत राहावी म्हणून आयुष्यभर केलेल्या पराकाष्ठेचे महत्त्व कमी होत नाही. अशा ह्या पॉलीकार्पच्या कार्याचा लेखाजोखा.

पॉलीकार्प हे वृत्तीने आध्यात्मिक होते पण आध्यात्माची व्याख्या मंदिरात बसून ध्यान करणे नव्हे तर रस्त्यावर भर उन्हात झाड होणं- इतरांना सावली देण्यासाठी! म्हणूनच त्यांनी स्वतःच्या सुखाचा विचार न करता समाजासाठी झिजणं स्वीकारलं.

नायगाव स्टेशनची निर्मिती ही केवळ विकासाची गोष्ट नव्हती. ती होती पॉलीकार्प यांच्या दूरदृष्टीची फलश्रूती. नायगाव, कोळीवाडा, वडवली, पाली येथील कार्यकत्यांच्या प्रयत्नांची फलश्रूती.

कुठे ते भाइंदर स्टेशन आणि कुठे ते वसई स्टेशन. तब्बल १४ मिनिटांचे लोकलचे अंतर. त्या काळात वसई स्टेशनला लोकल पकडण्यासाठी जावे लागे. पाणजू-जुचंद्रचे प्रवासी तर जीव धोक्यात घालून रेल्वे रूळावरून चालत जात, जणू दिव्यच! नायगाव, पालीचा नोकरवर्ग पहाटे चार वाजताच पायी प्रवास करताना दिसे. कधी टांगा, बैलगाड्या, सायकली तर कधी एसटी बस खचाखच भरून प्रवास होई. रिक्षा नव्हत्याच. खाजगी चारचाकी गाड्या श्रीमंतासाठी असायच्या.

ही दुरावस्था पाहून पॉलीकार्प सारखा तरूण अस्वस्थ होई. नव्हे, असं पाहात बसून चालणार नाही हे त्यांना उमजलं. उचशिक्षित पॉलीकार्पने लेखणी उचलली. भाईंदर-वसई दरम्यान नायगाव स्टेशन झालंच पाहिजे अशी मागणी रेल्वेमंत्र्याना संबंधित कार्यालयांना पत्र पाठवून केली. वर्तमानपत्रातून आवाज उठवला. समाज जागृत झाला. ही पत्रे, पेपरची कात्रणे, निवेदने रेल्वे दरबारात पोहोचली आणि रेल्वे प्रशासनाने त्यांची दखलही घेतली. उचशिक्षित पॉलीकार्प एका नॅशनल ॲण्ड ग्रिन्डलेज बँकेत मोठ्या हुद्यावर होते.

रेल्वे रूळाचे सर्वेक्षण, प्लॅटफॉर्मची मोजमापेही झाली पण ती गुलदस्त्यातच राहिली. पॉलीकार्पने विचार केला हे माझं एकट्याचं काम नाही. त्यांनी परिसरातील कार्यकर्त्यांना हाक मारली. सर्व कार्यकर्ते श्री वाल्मिकेश्वर मंदिरात जमा झाले. देवाला साकडे घातले. आणि त्या दिवशी जमलेल्यांना त्यांनी जागं केलं. नायगाव स्टेशनच्या विकासासाठी एक नवा संकल्प त्या दिवशी उदयास आला.

जमाल काझीसाहेब, इब्राहिम अराई, सखाराम कोलमेकर, नारायण खुबडीकर, गोविंद गौरीकर, अनंत खारकर, शामराव म्हात्रे, द्वारकानाथ चौधरी, जगन्नाथ कारभारी, साथी इनास मच्याडो, पावल्या मच्यात, दत्तात्रेय राऊत ह्यांना मी पाहिलंय, त्यांच्याशी संवाद केलाय. यातील कोणीही हयात नाहीत. पण त्यांनी दिलेल्या योगदानाची आठवण नायगावच्या इतिहासात अमर होवो. ह्याखेरीत अजूनही काही कार्यकर्ते असतील जे माझ्या ऐकण्यात आले नसतील त्यांना माझे सन्मानपूर्वक वंदन!

ह्या निष्ठावंत, निःस्वार्थी व्यक्तीच्या पुढाकारातूनच 'नायगाव स्टेशन कृती समिती'ची स्थापना झाली. सर्व कार्यकर्ते चर्चगेटच्या कार्यालयात पोहचले. मुख्य अभियंत्यासमोर ठामपणे आपली मागणी मांडली. स्टेशनचे काम का सुरू होत नाही? आपण फक्त मोजमोपे घेऊन नकाशेच बनवत बसणार का? आमच्या जीवनाचा शेवट होईपर्यंत आम्ही मागे हटणार नाही. असा खडा सवाल रेल्वे प्रशासकाला कृतीसमितीच्या वतीने पॉलीकार्पने केला.ही घटना वर्तमानपत्रातून, आकाशवाणीच्या वृत्तातून प्रसिद्धिस आली.

समाजात एक नवा जागर झाला. आता मागे हटणे नाही असा निर्धार सर्वांनी केला. नायगावच्या विकासासाठीचा हा लढा केवळ स्थानकासाठी नव्हता तर गावाच्या अस्मितेसाठी होता.

वर्टीसर, कुलकर्णीसर, परूळेकर सर, एस. के. गाळवणकर ही मंडळी पाठिशी धावून आली आणि झपाटलेल्या पॉलीकार्पला फाईल्ससह घेऊन विधान भवनात थडकली. रेल्वेमंत्र्याला खडसावले. रेल्वेमंत्री प्रत्यक्ष पाहणी करण्यास पोहोचले व नायगाव स्टेशन प्रकल्पास मंजूरी दिली. रेल्वे प्रशासनाला काम चालू करण्यास हिरवा कंदिल दाखवला.

येथे उमेळाचे रहिवासी विरार-वसईंच्या त्यावेळच्या आमदाराकडे पोहोचले व ठरलेल्या नियोजीत जागेवरून स्टेशन उमेळा गावासमोर आणण्याचा प्रस्ताव मांडला, जेणेकरून उमेळा, उमेळमान, मिठागर वसाहत, मानकरपाडा यांना जवळ होईल व स्टेशनला 'उमेळा' हे नाव द्यावे असे निवेदन देऊन कामावर स्थगिती आणली.

पी. ए. कुटिनो साहेबांनी दिल्ली दरबारात धाव घेतली. लोकसभेच्या रेल्वेमंत्र्याना गाऱ्हाणे ऐकवले. निवेदने दिली. तीन वेळा स्वखर्चाने दिल्लीला गेले. पण जिद्द सोडली नाही. अखेर लोकसभेत ठराव मंजूर झाला. दोन स्टेशनच्यामध्ये ७ मिनिटाच्या अंतरावर स्टेशन बांधणे व त्यास 'नायगाव' हेच नाव देणे अशा मंजूरी ठरावाचे पत्र पी. ए.च्या हाती आले.



स्टेशन कृती समितीने फटाके वाजवून आनंद व्यक्त केला. भूमीपुजनास असंख्य कार्यकर्ते हजर होते. सुरूवातीला ६ फूट रुंदीचे दोन फ्लॅटफॉर्म व एक तिकीट घर बांधले व १ ऑगस्ट १९५६ रोजी पहिली चर्चगेट लोकल नायगावला थांबणार होती. ३५ वर्षाचा तरूण तडफदार पॉलीकार्प तिकीट खिडकीजवळ पहिले तिकीटे घेण्यास उभे होते. हा पहा फोटो-

चर्चगेट लोकल स्टेशनवर थांबली. कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी रूळावर नारळ फोडला. लोकलला हार घातला व मी असं ऐकलं की सर्व कार्यकर्ते भाईंदरपर्यंत प्रवास करून परतले व नायगाव कोळीवाड्यात आनंदोत्सव (भोजनासह) साजरा केला. असे हे प्रयत्नाचे क्षण पॉलीकार्पसह कृती समितीचे !!



रेल्वे स्टेशन झाले. पण तेथे पोहचायचे कसे? मिठागर आगरात जाण्यासाठी खाडीवर आगर मालकाने लाकडी फळ्याचा पूल तयार केला होत. त्या पुलापासून स्टेशनपर्यंत दोन फूटाची पायवाट होती. मध्ये चार नाले होते. त्यावरही फळ्या अंथरलेल्या होत्या. पावसात या रस्त्याला गुडघाभर चिखल होई. पाय रूतत प्रवासी स्टेशन गाठत. पावसाळ्यात पुलावरून चालताना एकमेकांचे हात धरत हे मी स्वतः अनुभवले आहे. मी साक्ष आहे. आज नवीन पिढी भरधावपणे जात आहे.

नायगावचा कोळी समाज रस्त्यावर गेला. बाजूची माती उचलून पायवाटेवर टाकून रस्ता उंच केला. तरूण, बायाबापडे सर्वच आठ दिवस राबत होते. श्रमदानाने ब्रिज व स्टेशन ही पायवाट 'रस्ता' म्हणण्याइतकी झाली. स्टेशन गाठणे म्हणजे एक दिव्यच असे!

पी. ए. कुटिनो स्वस्थ बसले नाहीत. ते रस्ते बांधकाम खात्याकडे धावले. कॉंक्रिट ब्रिज करण्यासाठी मंत्र्याच्या दारात निवेदन घेऊन. अनेक खेटे घातले. मंजूर मिळविली आणि एकदाचा रस्ता व ब्रिज झाला. मात्र ब्रिजच्या उद्धाटनाचे श्रेय पी. ए.च्या वाट्याला आले नाही. कुटिनो साहेब शांतपणे उद्गारले. "ब्रिज झाला हा माझा आनंद आहे. फित कापली तो त्यांचा आनंद आहे."

आज रेल्वे स्टेशनचे आधुनिकीकरण झाले आहे. उमेळा-नायगाव, पापडी-नायगाव रस्ते प्रशस्त झाले आहेत. वाहने धावत आहेत. नवीन पिढी त्यांचा आनंद घेत आहे. मात्र हे घडवणाऱ्या आपल्या समाजातील ह्या व्यक्तीचा विसर पडू देऊ नका; ही प्रार्थना त्यांच्या अथक प्रयत्नामुळेच आपण एक तासात मुंबईला पोहचतो.

स्व. पॉलीकार्पची आठवण म्हणून जुने-नवे कार्यकर्ते २०व्या शतकाच्या प्रारंभी एकत्र जमले. पी. ए.चं स्मारक व्हावं हा विचार पुढे आला. पण जागा कुठे मिळेल? स्व. बार्थोल फ्रान्सिस डिमेलो ह्यांनी मोठ्या अभिमानाने हात वर करून सांगितले, पालीबंदर नाक्यावर माझ्या मालकीच्या जागेत एक कोपरा मी येशूच्या आई मरिये-साठी दिला आहे. त्याच्या बाजूची जागा 'पॉलीकार्प' ह्या माझ्या गुरूवर्यासाठी देत आहे.

स्मारक समिती उदयास आली. काझी इब्राहिम सराई यांना अध्यक्ष नेमले. बार्थोल डिमेलो व विश्वनाथ बाळकृष्ण राऊत यांनी खजिनदारपदी राहून देणगी रूपाने आलेला पैसा सुरक्षितपणे स्मारकासाठी वापरला. १ ऑगस्ट २००२ साली या स्मारकाचा उद्धाटन

सोहळा संपन्न झाला. स्मारक समितीच्या सभासदांची नावे आमच्या दप्तरी आहेत. त्यांना माझा सलाम! प्रत्येक वर्षी १ ऑगस्टला हे कार्यकर्ते स्मारकाजवळ एकत्र जमतात व पी.ए.च्या स्मृतीला उजाळा देऊन वंदन करतात. ही प्रथा अशीच चालत राहो ही प्रार्थना.




पी. ए. कुटिनो साहेब हे केवळ नायगाव रेल्वे स्टेशनचेच शिल्पकार नव्हते तर समाजहितासाठी झटणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व होते. कोळी लोकांच्या अनेक समस्या त्यांनी शासकीय कार्यालयातून सोडवल्या आहेत व अनेक योजनांचा लाभही मिळवून दिला आहे. धारावी बेट, अर्नाळा, वसई कोळीवाडा, नायगाव, खोचिवडे येथील कोळी समाजाचे ते चाहते होत.

जेथे गाव तेथे एसटी बस गेलीच पाहिजे ह्या विचाराने ते पेटलेले होते. त्यांच्या अथक प्रयत्नामुळेच नंदाखाल, भुईगाव, रानगाव, राजोडी, अर्नाळा, नाळा, उत्तन, गोराई, मनोरी या गावामध्ये बस धावू लागल्या. या बससेवेच्या रस्त्याचे रुंदीकरण करताना त्यांनी खाल्लेल्या खस्ता आजही लोकांच्या स्मरणात आहेत. असे हे समाजहितासाठी झटणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व होते.

स्वतःच्या घरात रॉकेलचा दिवा असताना त्या मंद प्रकाशात 'टाक' नावाच्या पेनाने विनंती अर्ज लिहून त्यांनी नायगाव गावात घराघरात वीज पोहचवली. तो एक युगप्रवर्तक बदल होता.

तळमळ आणि जिद्दीच्या बळावर एक सर्वसामान्य कार्यकर्ता अनेकांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणतो. याचे पी. ए. कुटिनो हे जिवंत उदाहरण होते. त्यांच्या प्रकृतीची हेळसांड झाली. पण त्यांनी केवळ स्वतःसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या आनंदी, सुसंवादी आणि सुशोभित जीवनासाठी अखेरपर्यंत धडपड केली.

२ ऑगस्ट १९७४ रोजी वयाच्या ७४व्या वर्षी हे तेजस्वी जीवन अनंतात विलीन झाले. पण त्यांच्या कार्याची उजळणी आजही करतात हे नायगाव, पाली परीसरातील लोकांच्या मनामध्ये व समाजाच्या प्रगतीमध्ये ती दिसून येते.

# वसईच्या बोलीभाषा

■ विजय परेरा (D.D),
सांडोर, वसई. – 8007780313

'ग्रीअरसन' या पाश्चात्य भाषा वैज्ञानिकाने महाराष्ट्रातील बोलीसंदर्भात अभ्यास करून बोलीभूगोलाचा निकष लावला व बोली बोलल्या जाणाऱ्या प्रदेशाच्या सीमा निश्चीत केल्या. हा सर्व अभ्यास त्यांनी 'लॅग्वेस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' या ग्रंथात निष्कर्षसह मांडलेला आहे.

उत्तर कोकणाच्या संदर्भात त्यांनी ठाणे व मुंबई येथील बोलीभाषांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. तात्कालीन ठाणे जिल्हा व आत्ताचा नव्याने निर्माण झालेला पालघर जिल्हा येथे विविध बोलीभाषा याबाबत प्रामुख्याने 'डोंगराळ भागात बोलली जाणारी' आणि सपाट मुलखात बोलली जाणारी असे दोन भेद होतात.

महाराष्ट्रात खानदेशी, वऱ्हाडी, पुणेरी, चित्पावनी अशा अनेक बोली आहेत पण या सर्व निरनिराळ्या बोलींना सामावून घेणारी प्रमाणभाषा महाराष्ट्रात आहे. अलिकडेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे.

**बोलीच्या निर्मितीची कारणे**

काळ आणि स्थळ यानुसार तसेच जिवनाच्या गरजेनुसार बोलीभाषेत परीवर्तन होते. सामाजिक जिवनात चालीरीती, समजूती आणि रूढी नाहीशा होतात पण भाषा हे साधन कायम टिकून आहे. याचाच अर्थ माणसाच्या किंवा माणसांनी बनवलेल्या समाजाच्या जिवनासाठी व एकूणच मानवी अस्तीत्वासाठी भाषा ही अत्यावश्यक गोष्ट आहे. भाषेच्या अंगी एक लवचीकपणा असतो आणि मुख्य म्हणजे परिवर्तन होत रहाण्याची क्षमता असते. या मुख्य व अंगभूत वैशिष्ट्यांमुळे भाषेमध्ये बोली निर्माण होतात.

**वसई तालुका तसेच पालघर येथील बोली**

**१. वसईची पानमाळी बोली**

पानमाळी बोली ही वसई, आगाशी, सफाळे, केळवे माहिम, पालघर, डहाणू, चिंचणी तारापूर व बोर्डी या भागात बोलली जाते. पानमाळी समाज हा विशेषतः फुलांची शेती व विडयासाठी नागवेलीची पाने या शेतीसाठी प्रसिद्ध आहे.

पानमाळी बोलीतील काही शब्द व प्रमाणभाषेत अर्थ-

| | | |
|---|---|---|
| १) नावळ-वरात | २) कंही-कशी | ३) वहरा-वर्षी |
| ४) जकल्या – सर्व | ५) हणवार-सणासुदी | ६) हांगुन - सांगून |
| ७) धीई-दिवस | ८) रेली – राहिली | ९) हांगाशी-सांगायची |
| १०) बालटेर – बाळंतपण | ११) हाऊ- सासू | १२) ओव-सून |
| १३) ढोपे – गुढगे | १४) आख्खी -संपूर्ण | |

'पानमाळी' बोलीत लहान लहान स्वरांचा अंतर्भाव आढळून येतो.

**२. सामवेदी समाजाची 'कादोडी' बोली**

वसईतील एक विशिष्ट संस्कृती नालासोपारे ते विरार या भागात दिसून येते. या समाजाला 'कुपारी' समाज असेही संबोधीले जाते. इतिहासातील नोंदीनुसार सहाव्या शतकापासून मुळ सामवेदी ब्राम्हण समाज या परिसरात वास्तव्यास आहे.

'कादोडी' बोलीभाषेत मराठीत ज्या शब्दामागे 'ला' हा प्रत्यय येतो तेथे 'ला' या ऐवजी 'दो' हा प्रत्यय जोडला जातो.

उदाहरणार्थ: कशाला- कादो, कुणाला- कुणादो, मला- मादो. 'दो' हा प्रत्यय या बोलीभाषेत येत असतो या भाषेला 'कादोडी' बोलीभाषा म्हटले जाते.

कादोडी बोलीभाषेतील काही शब्द व प्रमाणभाषेत अर्थ-

| | | |
|---|---|---|
| १) तन्सीन-तिथून | २) अकलवंती-ज्ञानी, हुशार | ३) दोय-मुलगी |
| ४) लय – तिथे | ५) आंगा- अहो | ६) सोदोन-शोधून |

**३. वाडवळ समाजाची 'वाडवळी बोली'**

वाडवळी बोलीभाषेवर गुजराती भाषेचा पगडा दिसून येतो. तात्कालीन राज्यकर्ते राजे प्रताप बिंब यांनी सुमारे हजार वर्षांपूर्वी (११४०) गुजरात व राजस्थान येथून काही कुळे वसईला आणल्याची नोंद 'महिकावतीची बखर' यामध्ये आहे. त्यामुळे या बोलीमध्ये शब्दरचना गुजराती भाषेसारखी असली तरी हेल हा कोकणी असतो.

या समाजावर पोर्तुगिज भाषेचा प्रभावही आढळून येतो. वाडवळी बोलीत काही पोर्तुगिज शब्द वापरले जातात.

उदा. १) खमिस-शर्ट, २) पिरीस-बशी, ३) बेसॉव-आशिर्वाद, ४) पिरीसाव-मिरवणूक

काही गुजराती शब्द या वाडवळी बोलीत आढळून येतात.

| | | |
|---|---|---|
| उदा. १) पोते – स्वतः | २) देवळ-मंदिर | ३) हवारी- लवकर |
| ४) डोकरा – म्हातारा | ५) निअरला – घसरला | ६) उकंदी - कांदा |
| ७) भरमसाठ-पुष्कळ | ८) ढेसक् - कंबर. | |

## ४. "ईष्ट इंडियन" बोली

'ईष्ट इंडियन' बोली धर्माने खिस्ती असलेला मात्र मुंबईच्या रेल्वे व डॉक येथील ईष्ट इंडिया कंपनीच्या अधिपत्याखालील कामगार वर्गाची भाषा असा होतो.

मराठी, पोर्तुगिज, इंग्रजी या तिनही भाषांचा संमिश्र वापरामुळे 'ईष्ट इंडियन' बोलीभाषा आजही मुंबईच्या वांद्रे, सांताक्रूज, माझगाव, जुहू, मढ, गोराई, इर्ला, भाईंदर या भागात बोलली जाते. वसईला पापडी, पाली, गिरीज, आगाशी, माणिकपूर येथील काही भागात या भाषेचा वापर होतो.

या बोलीला लिपी नसल्यामुळे लिखित स्वरुपात साहित्य उपलब्ध नसले तरी काव्यरुपात ध्वनिमुद्रित साठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

काही शब्द :- १) आथरी-चटई, २) आगोठ- पावसाळा ३)बंदेर-पताका ४) बुशकोट- शर्ट, ५) बुराख-भोक, ६) बेगीन- लवकर, ७) बोची - चुंबन

## ५. पांचाळ समाजाची 'पांचाळी' बोली.

पांचाळ समाज जी भाषा बोलतो त्या पांचाळी भाषेवर गुजराती भाषेचा पगडा मोठया प्रमाणावर आढळून येतो. शेतकऱ्यांची अवजारे बनवणारे, लोहार, सुतारव अलिकडे डायमेकर म्हणून या पांचाळ समाजाची ओळख आहे.

पांचाळी बोलीतील शब्द-

१) मयनो- महिना २) अव्यो-आला ३) घरमा- घरात, ४) तमनू-तुला,

५) ग्यो-गेला, ६) थय्यो- होणे, ७) आणवतो-आणायचे.

### ६. 'कोळी' बोलीभाषा

वसईत व पालघर परिसरात कोळी समाजाची भाषा व कोळी गीते प्रसिद्ध आहेत. या भाषेत 'ड' ऐवजी 'र' वापरात येतो. उदा. कोंबडी - कोंबरी, होडी - होरी, शीड - शिर, या बोलीभाषेत गीतांचा मोठा साठा उपलब्ध असल्यामुळे कोळी बोली समृद्ध बोली भाषा म्हणून ओळखली जाते.

# नकळत आठवण झाली....

■ विजु वाझ, दारसेंग

दिवस ओलांडुन गेले, महिने गेले, वर्षे गेली. कारण एकच पोरी तु देवाघरी गेलेल्या सहा वर्ष झाली. मला खूप आठवण येते पण तुझी दोन पाखरे माझ्याकडे होती. अश्रूंनाही मी लपवलं. आवंढा गिळताना ऊचकी लागली, छाती दडपली. पण त्यांना नाही दाखवलं.

गेली सहा वर्षे त्यांना एकच खोटं बोलत आली होती की तुमची मम्मी बाहेर देशात कामाला आहे. संपर्क नाही होऊ शकत. पण आज तुझी कन्या दहा वर्षांची झाली ती म्हणाली, “आजी मोबाईल कशाला आहे? एकदा तरी माझी मम्मी बोलू शकते. तु खोटे बोलतेस सांग, माझी मम्मी कुठे आहे?”

अवसान गळालं, अंगाला कापरं सुटलं, कसं सांगू ? माझी लेक ती, जिला मी वाढवलं, लग्न लावून दिलं व सासरी जाताना माझ्या वेंगेत रडणारी माझी लाडकी लेक माझ्याच मांडीवर डोके ठेवून शेवटचा श्वास सोडला. स्वत:ला सावरत मी बोलले, पोरी, तुझी आई आता परत कधीच येणार नाही. ती देवाच्या दरबारात आहे.

टाहो फोडत ती माझी नात मला सांगते, आजी आम्हाला का अंधारात ठेवले ? का लपवलं ? का नाही आम्हाला जेऊ घालताना सांगितले ?

आम्ही वाट पाहत होतो आमच्या मम्मीची.....

एका बाजूला पोटची लेक गेल्याचं दु:ख सहन करत, आसवं लपत छातीवर दगड ठेवून नातवंडे वाढवताना आज दोषी कोण ? परमेश्वरा तू जेंव्हा एखाद्या प्रिय जनास बोलावतो तेंव्हा तु तो मी नव्हेच. पण दोषी कोण ?

दिवस ढकलण्यात येतो पण रात्र खायला येते. पाखरं संध्याकाळी घरट्याकडे झेपावतात तेंव्हा ते पहिले घरट्याच्या उंबरठ्यावर उभे राहून घरात जन्मदाते आहेत का हे शोधतात मगच घरट्यात शिरतात. येथे दफ्तर ओटीवर टाकून मम्मा कुठं आहे ?  हेच त्यांच्या नजरेत दिसतं. हिरमुसलेली लेकरं क्षणात माझ्या कुशीत विसावतात व आपल्या आईची उणीव शोधतात. डोळे भरतात, छाती जड झाली आहे. जोरात हंबरडा फोडून त्या मातेला विचारावं, तुझा पुत्र वधस्तंभावर दिला, येथे माझं पुर्ण कुटुंब क्रुसावर खिळलं.

फरक एवढाच की खिळे हाती पायी न मारता हृदयात मारले. कुठं दाखवू ? कुठुन आणू त्यांची आई? डोळे पाणावले पण आसवं गाळु शकत नाही. कुशीत माझ्या विसावलेत, एक थेंब जरी त्यांच्या गालावर कोसळला तर........

परत आठवण जागी होईल, प्रश्न मलाच विचारतील कुठे आहे ती....... ?

पोरी, तु लावलेल्या रोपाला गुलाबं धरली आहेत. तु लावलेला बटमोगरा फुललाय तुझी मागिलदारची शायली रोज रात्री बहरतेय ती तुझी वाट पाहते कारण रोज तिचा गजरा बनवून तु केसात माळत होती. त्याच शायलीच्या सुवासात तुझी मुलं झोपतात.

का मला फसवून तु निघुन गेलीस ? मी फक्त एकदाच रागावले होते तु तर कायमची रागावून गेलीस..... पुन्हा न भेटण्यासाठी..

तुझी वाट पाहते मी.... कुठल्यातरी दरवाजातून ये ग, मी दरवाजे सताड उघडे ठेवले आहेत.

मला शक्ती दे देवा, वाट दाखवण्यासाठी जी वाटच संपलेली.....



# आयुष्याची संध्याकाळ सुखाची होण्यासाठी..

**■ झेविअर डिमेलो, पापडी**

"आमच्या काळी असं नव्हतं. आम्ही काय संसार केला नाही का? की मुलं वाढवली नाहीत ? काटकसर केली. पैसे जपून वापरले कधी खिसा रिकामी असायचा, पण काही कमी पडू दिलं नाही."

'बंद करा तुमचं बोलणं. जेव्हा बघावं तेव्हा कट कट सुरु असते. एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगता आणि तेच ते प्रश्न परत एकदा विचारता. कंटाळा येतो ऐकून. तुमचं डोकं ठिकाणावर नसतं. शिस्तच नाही मुळी तुम्हाला.'

वरील प्रकारचा संवाद ज्येष्ठ नागरिक आणि त्यांची मुलं यांच्यात सुरु असल्याचं कधी कानावर पडतं. वयानुरुप विचारांची दरी रुंदावत चालल्याचं हे लक्षण. येथे दोघाचंही चुकत नाही. काळ, वेळ, परिस्थिती सातत्यानं बदलत असते.

दोन पिढ्यांमधील वाढत जाणारं अंतर - जनरेशन गॅप - याचा हा दृश्य परिणाम असतो. आता तर नातवंडंही घरात असतात. ही तिसरी हुशार, टेक्नोसॅव्ही पिढी. त्यांचे आचार-विचार, वागणं-बोलणं आणखी तेज असतं. म्हणजे मम्मी-डॅडी, आजी-आजोबा यांच्यापेक्षा अलग, अधिक मॉर्डन आणि स्मार्ट. त्यामुळं ज्येष्ठांना घरात दोन वैचारिक आघाड्यांना तोंड द्यावं लागतं.

## मी, माझं, मला

ज्येष्ठांची साधारणपणे तीन गटात विभागणी करता येईल. पहिला गट ५८ ते ६५ या वयोगटातील व्यक्तींचा. म्हणजे हा वृद्धत्वातील तारुण्याचा काळ असतो. दुसरा ६५ ते ७५ हा गट वृद्धत्वामधला प्रौढत्वाचा गट. तिसरा गट ७५ ते अधिक वर्षांच्या व्यक्तींचा. हा गट असतो वृद्धत्वाचा.

वयाची साठ वर्षे झालेल्या व्यक्तीला ज्येष्ठ नागरिक म्हणून समजलं जातं. एव्हाना नोकरदार व्यक्तींची सेवानिवृत्ती झालेली असते. त्यांचं अधिकारपद संपलेलं असतं. तसंच त्यांचं संसारातील जबाबदाऱ्याचं ओझंही थोडं कमी झालेलं असतं. त्यामुळं काहीसा मोकळेपणा आलेला असतो.

ज्येष्ठत्व हे सल्ला द्यायचं वय. कारण ज्येष्ठांनी अनेक उन्हाळे-पावसाळे अनुभवलेले असतात. प्रसंगी ज्येष्ठांनी सल्ला जरुर द्यावा. आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करावं, पण आपला आब राखून, मर्यादेनं. मला सर्व कळतं, मी सांगेन ती पूर्व दिशा, अशी भूमिका बरी नाही. म्हणजेच ज्येष्ठत्वाचा काळ दुसऱ्यांवर आपली मतं लादण्याचा नसावा.

कुटुंबात, समाजात वावरताना दुसऱ्यांच्या विचारांचा, भावनांचा अवमान होणार नाही याची काळजी ज्येष्ठांनी घेतलेली योग्य. सामंजस्याची, नेमस्तपणाची भूमिका घेणं हे त्यांच्या वयाला शोभण्यासारखं असतं. मी, माझा, मला अशी आत्म गौरवाची भाषा त्यांच्या तोंडी नसलेली बरी.

आता लागले पैलतिराला, माझे तर डोळे

तेल दिव्यातील संपत आले, दिन थोडे उरले

अशा ज्येष्ठत्वाच्या काळात जीवनाचा सांजपर्वातला प्रवास सुखरुप तर व्हायला हवा, नाही का ? त्यासाठी प्रथम आपल्या मोठेपणाची झूल खुंटीला टांगवून ठेवणं श्रेयस्कर!

## आरोग्यं धनसंपदा

वय वाढत जातं तसे विविध शारीरिक आजार आणि दुखणी निर्माण होणं साहजिकच असतं. दृष्टिदोष, श्रवणदोष, विकलांगता, विस्मरण, ताणतणाव, कंपवात असे आजार वळचणीला येऊन थांबलेले असताना हृदयविकार, मधुमेह, कॅन्सरसारखे मोठे आजार (पाहुणे) कधी शरीरात प्रवेश करतात, हे कळतही नाही.

अर्थात, प्रत्येकाची जीवनशैली भिन्न असल्यानं व्यक्तिनिहाय शारीरिक क्षमता कमी जास्त असतात आणि आजारही. ज्यांना कोणताही आजार नाही असा माणूस शोधून (औषधालाही !) सापडणार नाही. म्हणून 'पदरी पडलं नि पवित्र झालं' या न्यायानं जे आपल्या आयुष्याच्या झोळीत पडतं त्याचा स्वीकार तर करावाच लागतो.

कविवर्य बा. भ. बोरकर यांनी सार्थपणे म्हटलेलं आहे-

'असेल काळा हाती मरणं

परी अपुल्या हाती जगण'

म्हणजे जगायचा अधिकार आपल्याकडे असतो, मरायचा नाही. माणसानं कसं जगायचं हे सांगण्यासाठी कविवर्य मंगेश पाडगांवकर म्हणतात,

'सांगा, कसं जगायचं ?

कण्हत कण्हत की गाणं म्हणत

तुम्हीच ठरवा !

पेला अर्धा सरला आहे

असं सुद्धा म्हणता येतं

पेला अर्धा भरला आहे

असं सुद्धा म्हणता येतं

सरला आहे म्हणायचं की

भरला आहे म्हणायचं

तुम्हीच ठरवा !

चांगलं आरोग्य लाभणं हा नशिबाचा भाग असतो. तरीही 'जे काही लाभलं भाग्य आम्हा' त्याला रडतखडत का असेना, न्याय देणं हे आपण करु शकतो.

उतार वयात परिस्थितीशी जुळवून घेणं, पुरेशा व्यायाम करणं, कामात व्यस्त राहणं, सामाजिक कार्यात सहभाग घेणं या चार गोष्टी ज्येष्ठांच्या सुरक्षित व निरोगी जीवनासाठी उपयोगी ठरतात.

ज्येष्ठांसाठी चालणं हा साधा सोपा व नैसर्गिक व्यायाम आहे. हाडांच्या बळकटीसाठी तर तो आवश्यक आहे. प्रत्येकानं रोज प्रकृतीनुसार किमान अर्धा तास चालणं आवश्यक आहे. आज कौटुंबिक, सामाजिक वातावरण कमालीचं तणावग्रस्त व गढूळ बनलेलं आहे. ज्येष्ठांना या वातावरणाशी समायोजन करता आलं पाहिजे.

घरात लहान-मोठी कामं बरीच असतात. त्यापैकी जी कामं करता येतील ती ज्येष्ठांनी जरुर करावीत. (कांदे सोलण्याचे काम देखील ! मात्र स्टूलवर चढून पंखे वगैरे पुसायचं काम ज्येष्ठांच नसतं!)

प्रत्येक व्यक्ती समाजाचं काही देणं लागत असते. म्हणून समाजकार्य आवश्यक करावं. चर्च कार्यात सहभाग घेणं ही गोष्टदेखील तितकीच महत्त्वाची आहे. सीमित आहार, पुरेसं पाणी पिणं, पुरेशी विश्रांती, रुटीन चेक अप या गोष्टींकडे ज्येष्ठांचं लक्ष असावं.

आरोग्य चांगलं असणं, चांगलं ठेवणं हे संपत्तीसमान आहे.

**मन करारे प्रसन्न ...**

महाराष्ट्र राज्यात ज्येष्ठ नागरिकांची संख्या १ कोटी ४७ लाख आहे. एका पहाणी अहवालानुसार त्यातील ७१ टक्के नागरिक कोणत्या ना कोणत्या तरी मानसिक आजारानं त्रस्त आहेत. नैराश्य, भीती, किंवा स्मृतिभ्रंश अशा विकारांचं प्रमाण त्यांच्यात जास्त आहे. त्याचे परिणाम ज्येष्ठांच्या वागण्या बोलण्यात दिसून येतात. एका बाजूला त्यांच्या स्वास्थाकडे लक्ष दिलं जात असताना त्यांच्या मानसिक स्वास्थाकडे दुर्लक्ष होत असतं.

आपल्या देशाच्या संस्कृतीत ज्येष्ठ नागरिक हे कुटुंबाचे आधारवड म्हणून मानले गेले आहेत. पण आज सामाजिक मूल्ये व जीवन संस्कृतीमुळं ज्येष्ठांकडे पाहण्याची दृष्टी बदलत चालली आहे. त्रिकोणी - चौकोनी कुटुंबाची प्रथा प्रचलित होत आहे.

काही ठिकाणी आई-वडील आणि मुले वेगळी राहत असल्याचं दिसत आहे. न्यायालयात उभयंतामधील वाद पाहावयास मिळत आहेत. काही ठिकाणी ज्येष्ठांना घराबाहेर काढण्याची काहींची मजल जाते, असे वृत्तपत्रांमधील बातम्यांमधून समजते.

सर्वच घरांमधील कौटुंबिक जीवन शांत, स्थिर असेलच असं नाही. वाद, विसंवादाचे प्रसंग काही वेळा घडतात. परिणामतः ज्येष्ठांची मनं दुखावली जातात. त्यांच्यात एकटे पणाची भावना वाढीस लागते, त्याच्यातून नैराश येतं.

संवाद हा एकटे पणावर मात करणारा एक उत्तम मार्ग आहे. ज्येष्ठांनी व्यक्त व्हावं, बोलावं, गप्पागोष्टी कराव्यात. त्यामुळं त्यांच्यातील ऊर्जा वाढते. आणखी एक म्हणजे ज्येष्ठांनी स्वतःला गुंतवून ठेवलं पाहिजे. आवडीनुसार त्यांनी वाचन करावं, संगीत ऐकावं, बागकाम करावं, धार्मिक, सामाजिक कार्यात आपला वेळ व्यतीत करावा. घरातील नातवंडांना आपला वेळ द्यावा. मन प्रसन्न असलं तर आजार काबूत राहतात. जीवनातील ताण-तणाव कमी होतात. संत श्रेष्ठ तुकारामांनी म्हटलेलं आहे - मन करारे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण!

**काळजी घ्या**

गेल्या काही वर्षात देशातील नागरिकांचं आयुर्मान वाढलं आहे. खाण्यापिण्याच्या आणि औषधांच्या बाबतीत ज्येष्ठ सजग बनत आहेत. आयुष्याची संध्याकाळ सुखाची व्हावी असं त्यांना वाटणं ही निश्चितच चांगली बाब म्हणावी लागेल.

तरीही काही बाबतीत त्यांनी काळजी घेणं जरुरीचं आहे. त्याच्यातील पहिली गोष्ट म्हणजे पाय घसरुन पडणं. घरात, बाथरुममध्येही ज्येष्ठ पाय घसरुन पडतात. बाथरुममध्ये ग्रॅब बार बसवल्यास आणि अँटिस्लीप मेंट टाकल्यास हाता-पायांना आधार मिळतो, पडण्याचा धोका कमी होतो.

रात्री टॉयलेटला जाताना घाई गडबडीत जाऊ नये. उठावं, थोडा वेळ बसावं आणि दिवा लावून जावं. अंधारात धडपडण्याची, पडण्याची शक्यता जास्त असते.

बहुतांशी ज्येष्ठ रोज गोळ्या घेत असतात. पण विस्मरणामुळं काही वेळा गोळ्या ध्यायला विसरतात किंवा दोन वेळा गोळ्या घेतात. म्हणून आठवड्याच्या गोळ्या वेगळ्या काढून ठेवल्यास त्यामुळं गोळ्या घेतल्याचा अगर न घेतल्याचा अंदाज येऊ शकतो.

ज्येष्ठांनी बाहेर-जाताना आपलं ओळखपत्र आपल्या सोबत ठेवावं. आपलं नाव, पत्ता आणि संपर्क नंबर त्यामध्ये असावेत. आपल्या रक्तगटाची नोंद देखील तेथे असावी.

आर्थिकदृष्ट्या सक्षम असणं ही ज्येष्ठासाठी एक जमेची बाब आहे. केंद्र सरकारची ज्येष्ठ नागरिकांसाठी 'सीनियर सिटीझन्स सेव्हिंग स्किम' हो योजना आहे. या योजनेंर्तगत ज्येष्ठ नागरिक जास्तीत जास्त ३० लाख रुपये गुंतवू शकतात. सर्वाधिक व्याज देणारी ही एकमेव आणि सुरक्षित योजना आहे.

लेखाचा शेवट महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक संघाच्या ब्रीदवाक्यानं करावासा वाटतो-

'जगण्यासाठी खा, खाण्यासाठी जगू नका !

हसण्यासाठी जगा, जगण्यासाठी हसा!'

# कविता /

# चारोळ्या /

# कलाकुसर

# बोरं ईकणारा आज्या

सुरकुतलेल्या मरणाला टेकलेला म्हतारा
शाळंसमोरच्या वट्यावर
बसतो ईकत बोरं
दोन रुपायला एक वाटी
करून वाटीएवढा जीव

दिवसभर बसतो धूंडत
ह्या ना त्या बोरीला बोरं
बोरीला जाताच
त्याला हाकलून लावतात
कुत्र्यागत
बोरीचे मालक
तवा भिकाऱ्यावनी
तो हजारदा करतो इनवणी
झाडू द्या एखादं टोपलं

बोरीला दगड मारताच
बोरं पडतात पावसावनी खाली बदाबदा
तवा नाचतो लहान मुलासारखा
दिवाळीला फटाका फोडल्यावर
मुलं नाचतात तसा

त्याला सहज इच्यारलं
बाबा पोरंबाळ काय करतात
गोळामोळा करून जीव

तो म्हणला
महेपण मुलं याच शाळेत शिकली
मोटी झाली
आन आता कोण कुठं आन कुठं
लागलेत आपापल्या सवसाराला

बायकोचा हात निसटून गेला
हाताच्या मायेतून कायमचा
तवा हिंडत असतो असाच जगभर
अनाथ वाऱ्यावानी

पोरं वर्गात जाताच हा बाबा
आजकाल
सांगत बसतो
स्वतःलाच सुखदुःखाच्या जन्मभराच्या आठवणी
करून ताज्या
मोग्र्याच्या फुलागत


■ **अमोल विनायकराव देशमुख**
**महेंद्र नगर,परभणी**
**संपर्क - 7620949985**

# संस्कृती वसईची..

जगभर कुठेही हिंडलो, हरवलो,भटकलो,
तरी मोकळा श्वास मिळतो तो माझ्या माय वसईतच!

जिच्या नावातच वसतो ईश्वर,
अशा वसईची महती ती काय वर्णावी?

इथली माती काळी भोर,
इथली माणसं हिरवी कोर,
इथली चौकटीच जणू मोर!

वसईची संस्कृतीवर प्रभाव मराठीचा,
तर कधी कोकणी व पोर्तुगालचा,
सर्व धर्म मिश्रित आमची वसई काही न्यारी..
अगदी कुणालाही कुठेही प्यारी...

निसर्गाची सुरेख देण,
कुपारी आणि वाडवली परंपरेचा मिलाफ,
वसईच्या जुन्या इतिहासाच्या खुणा,
जाणतात इथल्या रक्तसाक्षीच्या वेदना!

श्रध्देचा वारसा मिरवत,
समाजप्रितिने ओतपोत,
कादोडी नी वाडवली बोलीत,
मज्जाच आहे सारी!

वसईची परंपरा दर्शविते माया,
वसईचा किल्ला सोबत काया,
निवास इथे संत महात्म्यांचा,
डोलारा आहे शिक्षणाचा!!

वसईची संस्कृती टिकावी,
यासाठी अनेकांनी केले सहन,
कारण इथला विषयच आहे गहन!!

या एकदा वसईला,
ही भूमी नाही तर आहे मान अमुचा!

- **ब्रिनल क्रास्टो, नंदाखाल,परसाव**

# धर्माची भिंत

शाळेच्या त्या पहाटसरशीतल्या वाटेवर
तो नेहमी तिच्या नजरेत हरवून जात असे.
त्याच्यासाठी ती नजर साधनेसारखी होती,
आणि गालातल्या मंद हास्यातून
शब्दांविना उमलणारी कविता त्याला दररोज ऐकू येत असे.

वर्गाच्या गोंधळातही
तो तिच्या सान्निध्याचा कोपरा शोधत असे.
पुस्तकांच्या पानांतून झिरपणाऱ्या प्रकाशासारखी
तिची एक कटाक्ष-दृष्टी
त्याच्या हृदयात शंभर स्वप्नांना रंग देऊन जात असे.

शाळेच्या अखेरच्या दिवशी
क्षणभर त्याला स्वप्न सत्य झाल्यासारखं वाटलं.
तिच्याशी झालेला संवाद
विश्वाची सारी संपत्ती लाभल्यासारखा भासला.
पण शब्द उमटण्याआधीच
नशिबाच्या कठोर हाताने
त्याचं विश्व तुटून कोसळलं.

त्याचं प्रेम निर्मळ होतं, निरागस होतं,
त्यात भेदभावाचा लवलेशही नव्हता.
पण तिच्या आणि त्याच्या मध्ये
धर्माची अटळ भिंत उभी राहिली,
जिने दोन अंत:करणं निर्दयतेने वेगळी केली.

काळ पुढे सरकला, ऋतू बदलले,
तरी ती भिंत आजही अढळ उभी आहे.
आणि त्याच्या मनात एकच प्रश्न
आजही ताजा आहे—
प्रेमापेक्षा धर्म मोठा का ठरतो?

**-- फ्रँक मिरांडा, उमराळे**

# "लेडीज रुमाल"

मिटलेल्या मनाच्या पाकळ्यास,
ओंजळीतून गळण्याआधीच,
शिंपण चांगल्या विचारांचे,
खुप सुंदर फुल ते जिवनाचे.

गंजलेल्या तारातून छेडले सुर,
जीवन गाणे असे जरासे दुर,
तडफडला ह्रदयातून बाण,
कोमेजलेले जीवाचे रान.

मागेच भिजून वाहिले सुख,
थांबावर थिजुनी राहिले दु:ख,
ओलीचिंब डोळयातली नजर,
मिटलेल्या ओठाची ती चादर.

चटकन उठून आली सनक,
डोक्यातच गेली तडक,
हळहळला जरासा जीवा,
दाटूनिया मौनातल्या गळा.

असतेच दुखणे जागोजागी,
निपटून सहज काहीबाही,
सुखदु:खाचा धागा या जिवनी,
अंथरलेले आयुष्यच तर विणूनी.

**■ हेडविजेस रुमाव, गास**

# उपकारी निसर्ग

या हो या, या हो या
हा निसर्ग वाचवू सारे, हा निसर्ग वाचवू सारे
हा निसर्ग वाचेल जेव्हा, जीवसृष्टी जगेल तेव्हा .
या हो या....

१. झाडे लावू झाडे जगवू, एकच धरुया ध्यास
धरतीचे उपकार हे फेडू, ठेऊ मनी ही आस
सजवू धरती, सजवू नाती पाहू स्वप्नं हे आज
या हो या ...
हा निसर्ग वाचवू सारे...

2.आकाशातील पक्षांना ह्या घेऊदे हो श्वास
भुमीवरच्या प्राण्यांना ह्या जगू दे मोकळे रान
पर्यावरणा साथ देऊ या, करू प्रतिज्ञा आज
या हो या...
हा निसर्ग वाचवू सारे

3. दूषित पाणी, दूषित हवा ही, थांबवू सारे आज
प्लास्टिकचा वापर हा टाळू, स्वच्छ ठेवू समाज
एकामेका साह्य करू या, बनवू स्वर्ग हा आज
या हो या ....
हा निसर्ग वाचवू सारे...


- **जॅकसन फिलिप आल्मेडा**

भुईगाव सामणी आळी
almeidajack1983@gmail.com / 7798636723

# सीसीटीव्ही प्रोपोगंडा आणि बळी

मी पहायचो
ओबड औरस
धोबड चौरस
मित्र तुझ्यात

पण
तू राहिलास ओरडत
भूमिकाफू
रंग रंग रंग
चेहरा पट्टी जात
खतरकान अतोनात

नि
तू मला दिसतो
रंग
चेहरा पट्टी जात
भूमिकाफू सूरसुर धूर
जात स्टिकर
तू दिसत नाही मित्र

नि
आता तुझी
अक्रार विक्रार तक्रार
की मला विकार मित्रांधत्वाचा
नि माजवतोस तू
समाज माध्यमात महापूर
तू बळी असल्याचा

नि
आता मी
अफूग्रस्तांनी
थकव�

■ **महेश लिलापंडित**

# एक निरपराधी प्रेषित

तुम्हाला ठाऊक होतं की एक दिवस
आपल्याला नक्कीच अटक होईल
तरीही तुम्ही त्या गरिबांच्या बाजूने
लढत राहिलात
का...? कशासाठी...?
कोण लागत होते ते तुमचे....?
पण तुम्हा प्रेषितांचं ना इथेच चुकतं
'करशील जे गरिबांसाठी'....!
म्हणून तुम्ही दीन दलीतांची बाजू घेताना
भ्रष्टाचाराविरोधी लढता, आंदोलन करता
तुम्हाला झग्यामध्ये लपता येत नाही
की देवळाच्या चार भिंतीत जगता ही येत
नाही...
त्यामुळे झालंय काय...
खिस्ताला क्रुसावर खिळले गेलं
महात्मा गांधींना गोळया घातल्या गेल्या
स्टेन ला तर त्यांच्या कोवळया मुलांसकट
जीवंत जाळलं गेलं
पण ह्यांचं कुणी वाकडं करू शकलं नाही
कारण सत्ता ह्यांच्याच हातात...
ह्यांना वाटतं सूर्य ह्यांच्या बापाचा
म्हणून सगळं काही सूर्य प्रकाशा स्पष्ट
असतांना सुध्दा
त्यांनी तुमच्यावर बिनबुडाचे आरोप लावले
तुम्हांला अंधाऱ्या कोठडीत डांबलं...
तुमच्या वयाची पर्वा न करता
तुमचे औषधोपचार बंद केले
ज्यांना तुम्ही हातात पेन धरायला शिकवलं
त्याच हातांनी तुम्हाला बेड्या ठोकतांना

ह्यांना लाज कशी वाटली नाही...?
कुत्र्या-मांजरांच्या पिलांना वेंगेत घेऊन
निजणाऱ्या तुमच्या मुलांना शिक्षणाचे
धडे दिले कुणी...!
ज्या ताटात खाल्लं त्याच ताटात...!
पण लक्षात ठेवा
त्याने तुम्हाला साताच्या सत्तर वेळा माफ
केलं असेल
नियती कुणालाही माफ करीत नाही
तुम्ही जे पेराल तेच उगवेल...

■ **मायकल लोपीस, माणिकपूर**

# अनंत काळची माता

त्याचं पौरुष क्षणाचंच
म्हणून ती क्षणाची पत्नी
तिच्यातलं बाईपण मात्र
दिवस रात्रीच्या मुठीत न मावणारं
यमुनेच्या डोहासारखं अक्षय अबाधित
आणि आईपण
ते तर गंगेसारखं अखंड प्रवाहित
शुभ्र धवल अमृतधारा होऊन
लेकराला सिंचणारं
जन्माआधीपासूनच त्याच्याशी जोडलेलं
म्हणून ती अनंत काळची माता
त्याला मात्र आपल्या बापपणावरही
नाही सांगता येत दावा

■ **संगीता अरबुने, वसई**

# पाऊस

पावसाचं ऋतुचक्र बदललं
कधीही असतं आभाळ भरलेलं
अवेळी जेव्हा पाऊस पडतो
बाप माझा शेतात रडतो
हिरवे शिवार गेले झोपून
पिकलं घरा कसं आणू कापून
कणग्याचा भाव,अंदाजाने मापून
खरं बियाणं ठेवलं सारं जपून
वर्ष भर मेला, शेतात खपून
कशी बरं करावी शेती खपून
कापणीच्या दिवसांतलं हे पाणी
थोपविल का आभाळ कोणी
कोण पुसणार डोळ्यातलं पाणी

- **शकुंतला नारायण पाटील, नवाळे**

# खीत

खीत आलॅ यार
खरास जाम खीत आले

हिंदाळ्यात जॉरात हॅफॉ धरॉन गाव्याशी
लाईट गेलिगा ओट्योर जमॉन खेव घाल्याशी
आन हांचापारा कागडॉ खुड्याशी खीत आले

काळोख पड्यापोत बॅट बॉल खेळ्याशी
गावात खुरसा हनाला व्हीसीआर वर पिच्चर बग्याशी
आन नाताळश्या हनाला खळ घॅऑन पताके चिकटव्याशी खीत आले

शिस दॅऑन बोरे घ्याशी
हॅतातश्यो हिंगो सॉरॉन बांडी बुझ्याशी
आन लॉका माडोर सडॉन नाळ पाड्याशी खीत आले

आहऱ्या तॅसाला मिळणारॅ बाफेलॅलॅ सनॅ खाशी
आयत्वारॅ कोंबडीआ मुंडी-पायाय जिव्याशी
आन मावशीनॅ आढलेली हॅवबुंदी खाशी खीत आले

अम्मा हरी विराडा बजारा जाशी
निर्मळश्या जत्र्यात विजी पाळण्यात ब्याह्याशी
आन वांद्र्या देवळा जाऑन काळॅ सनॅ हाड्याशी खीत आले

शाळीत जाताना तापना करॉन हॅक्याशी
सायमन-आस्वाद मिनसॉ वडापाव खाशी
आन दांड्याखालनॅ सायकल सालव्याशी खीत आले

छायागीत आन चित्रहार बग्याशी
हिनवारॅ हांचापारा टिवीवर मराठी पिच्चर बग्याशी
आन दिवाळी रज्यात लॉका दारा मिंगरशॅ फटाकॅ जमवॉन दारूगॉळॉ काड्याशी खीत आले

खीत आलॅ यार
खरास जाम खीत आले

माला या जकल्याई खीत आले

तुमाला क्याई खीत आले...

- **सुनिल डिमेलो (मॅंगो माहनू), नंदाखाल**

# फेक बाई फेक

१
फेक बाई फेक
फेकमफेक
निवडणुकीच्या आधी
सजला
योजनांचा केक
झाले लग्न
झाले बाळंतपण
कोण सून?
कोण लेक?

२
फेक बाई फेक
फेकमफेक
पावसाने नाही
राजकारण्यांनी आणले
घरा-घरात पाणी
नको आणू गडे तू
डोळ्यात पाणी
एकेक दाणा वाहून गेला
किचनमध्ये चिखल ओला
दिवस सुगीचे सुरु झाले
ओला चारा
अभियंते माजले

३
फेक बाई फेक
फेकमफेक
डोळ्यादेखखत फेक
पालिकेच्या दारा आत

भ्रष्टाचाराची मेख
तलावाच्या पाण्यात
फुलले इमारतीचे गुलाब
खड्ड्यातल्या रस्त्यावर
झुकले शाही नबाब
रात्रीच्या अंधारात
चाले लाईटीचा खेळ
झालो बाई महासत्ता
जुळेना मात्र खर्चाचा मेळ
महागाईचा वेलू
गगनावरी गेला
आले ते गरिबांचे सरकार
हाती घेऊन फुटका पेला
अनुदिनी अनुतापे
तापलो रे रामराया
मना सज्जना येरे लवकर
खाटलीवरुनी उचलाया

४
फेक बाई फेक
फेकमफेक
आई मला छोटीशी
खुर्ची देना
खुर्चीत बसीन
आयोग आणीन
बदल्या करीन
जजमेंट बदलीन
संसदेत बहुमत घेईन
खाकी वर्दीचा खुराक देईन
सरकारी खुंखार यंत्रणा
जुंपून धाडून
विरोधकांना करीन
ठोक ठोक ठोक

५
फेक बाई फेक
फेकमफेक
भिंतीवर महात्म्याचे चित्र असावे
टेबलाखालून प्रेम वाहू द्यावे
फुकट तेथे प्रकट
हे चित्ती ध्यानी असावे
गल्ली गल्लीत शोर असावा
कमजोर तरी आपले सरकार असावे
भिंतीवर महात्म्याचे चित्र असावे
टेबलाखालून प्रेम वाहू द्यावे

६
फेक बाई फेक
फेकमफेक
सुईणीने सांगितला
बाळाचा महिमा
आयएएस होऊन
करील हा करिष्मा
जेथे जेथे जाईल
साईन होतील फाईल
लाल दिव्याची दाखविल
दहशत
बिल्डर, माफियाबरोबर
क्लब, फार्महाउसमध्ये
सजवेल पंगत
लाचार मजबूर
येतील रांगत रांगत
आपली दुखणी रामकहाणी
सांगत सांगत
तीन बंदरची त्यांना
कहाणी ऐकवावी
पुढच्या महिन्याची तारीख द्यावी
तारक मेहताचा उलटा चष्मा

बाळाचा अनुदिने अनुतापे
रोज नवा नवा करिष्मा
वाढता वाढे त्याची तोंद
मार्केट मध्ये रोज नवी बोंब
गर्दीतून सुटेल
एकदिनी आईचे बोट
येईल येईल येईल
तो निवृत्तीचा क्षण
घेईना कोणी
रस्त्यात पडलेली
फाटकी नोट

7
फेक बाई फेक
वाढू लागला जी.डी.पी.
किशाकाकाचा वाढला बी.पी.
दारूसोबत दुधाचे वाढले भाव
सरकार मनल खा मस्का बनपाव
आला देश लक्ष्मीबाई
महासत्तेच्या उंबरठ्यावर
जनता खाते सरकारी वडापाव
अजून उकिरड्यावर
निफ्टीने टवकारले कान
सेन्सेक्सने खाली टाकली मान
अर्थमंत्र्यांनी उघडला
बजेटचा पेटारा
खोदा पहाड निकला चुहा
नवीन नवीन सरकार
नवीन नवीन धमाल
शेंबूड घामाने भिजला
जनतेचा हातरुमाल

■ **वर्जेश सोलंकी, आगाशी**

# कलाकुसर :-

## रिचर्ड वाझ :-









## ल्युएल लोपीस :-







## पॉल डिमेलो :-





